Peer reviewed Journal Impact Factor: 7.265 ISSN-2230-9578

# Journal of Research and Development




*A Multidisciplinary International Level Referred Journal*

***July 2022 Volume-14 Issue-8***



**Chief Editor**

***Dr. R. V. Bhole***

*'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.)*






**Address**

'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

# Journal of Research and Development

***A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal***

***July-2022 Volume-14 Issue-8***

**Chief Editor**

Dr. R. V. Bhole

'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

| EDITORIAL BOARD | | |
|---|---|---|
| ***Nguyen Kim Anh*** ***[Hanoi] Virtnam*** | ***Prof. Andrew Cherepanow*** *Detroit, Michigan [USA]* | ***Prof. S. N. Bharambe*** *Jalgaon[M.S]* |
| ***Dr. R. K. Narkhede*** ***Nanded [M.S]*** | ***Prof. B. P. Mishra,*** *Aizawal [Mizoram]* | ***Prin. L. N. Varma*** *Raipur [C. G.]* |
| ***Dr. C. V. Rajeshwari*** ***Pottikona [ AP]*** | ***Prof. R. J. Varma*** *Bhavnagar [Guj]* | ***Dr. D. D. Sharma*** *Shimla [H.P.]* |
| ***Dr. AbhinandanNagraj*** ***Benglore[Karanataka]*** | ***Dr. VenuTrivedi*** *Indore[M.P.]* | ***Dr. ChitraRamanan*** *Navi ,Mumbai[M.S]* |
| ***Dr. S. T. Bhukan*** ***Khiroda[M.S]*** | ***Prin. A. S. KolheBhalod*** *[M.S]* | ***Prof.KaveriDabholkar*** *Bilaspur [C.G]* |

**Published by**-Chief Editor, Dr. R. V. Bhole, (Maharashtra)

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**

**CONTENTS**


| Sr. No. | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1 | मराठवाड्यातील पर्यटन उद्योगपुढील समस्या आणि उपाय योजना<br>**जोगदंड रमेश बापूराव** | 1-2 |
| 2 | जनपद लखीमपुर खीरी में अवसंरचनात्मक विकास का भौगोलिक अध्ययन<br>**डॉ. पुष्पा सिंह, विकास सिंह** | 3-10 |
| 3 | आधुनिक काळातील ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण एक काळाची गरज<br>**प्रा. डॉ. एस.पी. लाखे** | 11-16 |
| 4 | मराठी वाङ्मयातील सामाजिक जाणिवांचे स्वरुप<br>**प्रा. डॉ. पुरुषोत्तम नंदेश्वर** | 17-22 |
| 5 | लोकप्रशासनातील आधुनिक विचारप्रवाहः नागरिकांची सनद<br>**डॉ. बाळासाहेब निर्मळ** | 23-26 |
| 6 | यशपाल के 'झूठा सच' उपन्यास मे सांप्रदायिक संघर्ष<br>**डॉ. पठाण जलालखान** | 27-29 |
| 7 | महाराष्ट्रातील सहकार चळवळ<br>**श्री.एच.आर.आहेर, डॉ.जयवंत भदाणे** | 30-34 |
| 8 | ग्रामस्थांच्या सहकार्यातून महाराष्ट्रातील जलसंधारण आणि जलसंवर्धन चळवळ<br>**डॉ. अंकुश साहेबराव डोके** | 35-38 |
| 9 | महिला सशक्तिकरण और भारत<br>**अर्जुन सिंह छतोला** | 39-45 |
| 10 | नाट्यप्रदर्शनाच्या माध्यमातून ‘आकडा’ या शेतकरी विषयक संहितेचे साहित्यीक मूल्य<br>**डॉ. वैशाली केशव बोदेले** | 46-49 |
| 11 | मुलांच्या शैक्षणिक विकासात अंगणवाडीची भूमिका<br>**संगिता गंगाराम मेश्राम** | 50-52 |
| 12 | नागपूर जिल्ह्यातील काटोल शहरातील शाळांमध्ये मुलांना ने-आण करणाऱ्या ऑटोचालकांना कोरोना काळात आलेल्या समस्या एकविश्लेषणात्मक अध्ययन<br>**Dr.Hemlata Manohar Nagmote** | 53-56 |
| 13 | सारबंगाली जीवन में कृतिवासी रामायण का प्रभाव<br>**डॉ. मनोतोष माजि** | 57-58 |
| 14 | मराठा आरक्षण: कायदेमंडळ आणि न्यायमंडळासमोरील गंभीर पेचप्रसंग<br>**Bandu Shrinivas Talikhedkar** | 59-63 |
| 15 | पाली भाषेचे महत्त्व<br>**डॉ. माधव बसवंते** | 64-66 |
| 16 | पूर्व बाल्यावस्थेतील मुलांच्या विकासात अंगणवाडीचे योगदान<br>**संगीता गंगाराम मेश्राम** | 67-70 |
| 17 | शेतमाल हमीभाव व शेतमालाच्या किंमतीचा शेतकऱ्यांवर होणारा परिणाम<br>**डॉ. संभाजी भाऊराव काळे, दिगांबर ज्ञानदेव नलगे** | 71-73 |
| 18 | शिक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रम में बिना उपस्थिती के डिग्री प्राप्त कर ने प्रवृत्ती के प्रति विद्यार्थीयों एवं शिक्षकों के दृष्टिकोन का अध्ययन<br>**डॉ. पंकज कुमार** | 74-81 |
| 19 | ‘युगांत’ आणि ‘साई’ एक दृष्टिक्षेप<br>**डॉ. यशवंत राऊत** | 82-86 |
| 20 | राजर्षी शाहू महाराजांची सामाजिक न्याय विषयक भूमिका<br>**प्रा.डॉ.शिवाजी गोविंदराव दिवाण** | 87-90 |
| 21 | स्वा. वि. दा. सावरकर वाङ्मयीन कार्य<br>**प्रा. प्रियंका आकाश राऊत** | 91-95 |

| | | |
|---|---|---|
| 22 | पचपन खम्भे लाल दीवारें: अदृश्य वेदना की दास्तान<br>**प्रा.बालाजी सूर्यवंशी** | 96-98 |
| 23 | तिनका तिनका आग और दलित चेतना<br>**डॉ. बी.आर. गायकवाड** | 99-104 |
| 24 | आंतरराष्ट्रीय व्यापारातील नवीन विचार प्रवाह<br>**प्रा.कांबळे शिल्पा बळीराम** | 105-107 |
| 25 | " कोयता कादंबरीतील ऊसतोड कामगार स्त्रीचे चित्रण "<br>**शिवगीता बस्वलिंग तुपकरी** | 108-109 |
| 26 | " कोयता कादंबरीतील ऊसतोड कामगारांचे जीवन "<br>**शिवगीता बस्वलिंग तुपकरी** | 110-111 |
| 27 | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे संकल्पनात्मक अध्ययन<br>**डॉ. गोरखनाथ वाकळे, गणेश मच्छिंद्र चोर** | 112-115 |
| 28 | नाटककार सुरेन्द्र वर्मा: एक अनुशीलन<br>**प्रा.डॉ.संग्राम सोपानराव गायकवाड** | 116-119 |
| 29 | अलीगढ़ जनपद का इतिहास (१८५७ के पूर्व)<br>**डॉ. सुधीर कुमार शर्मा** | 120-127 |

# मराठवाड्यातील पर्यटन उद्योगापुढील समस्या आणि उपाय योजना

**जोगदंड रमेश बापूराव**

साहाय्यक प्राध्यापक, कला महाविद्यालय, तीर्थपुरी ता. घनसावंगी जि. जालना

**DOI-10.5281/zenodo.6988511**

**प्रस्तावना** अनेक देशात पर्यटन उद्योगाचा विकास मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येतो एवढेच नाही तर त्यांची अर्थव्यवस्था पूर्णपणे पर्यटकांवरच आधारीत आहे, तसेच भारतातील काही राज्याची अर्थव्यवस्था अशाच प्रकारची आहे. पर्यटन हा आधुनिक जगातील एक प्रगत उद्योग आहे. हजारो लोक या व्यवसायाशी निगडीत आहेत. अनेकांच्या हाताला रोजगार देण्याचे काम या पर्यटन उद्योगाने केलेले दिसून येते. त्यामुळे मराठवाड्याने या पर्यटन उद्योगाचा अंगीकार करून आर्थिक परिवर्तन घडवून आणले पाहिजे. त्यासाठी पायाभूत सोयी सुविधा उभारणीकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले पाहिजे. मराठवाड्यातील मागसलेपणा दुर करण्याचा हा एक सुयोग्य मार्ग आहे. पर्यटन उद्योग उभारणीसाठी अनेक समस्या असल्यातरी त्यांच्यावर मात करून मराठवाड्यात देश — विदेशातुन पर्यटक कसा आकर्षित होईल याकडे स्थानिक रहिवाशापासून ते लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी, पालक, यांच्या सामुहिक जबाबदारीतुन एक चांगल्या प्रकारचा पर्यटन उद्योग आपण उभारू शकतो.

## शोध निबंधाची उद्‌दिष्टे

- मराठवाड्यातील पर्यटन उद्योगासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे.
- पर्यटन उद्योगासाठी पोषक वातावरण तयार करणे.
- ऐतिहासीक स्मारकांच्या आजच्या स्थितीकडे लक्ष वेधने

## संशोधनाची गृहितके

- मराठवाड्यात पर्यटन उद्योग विकसीत होवू शकतो
- ऐतिहासीक स्मारके पर्यटन उद्योगात अनेकांना रोजगार— स्वयंरोजगाराची संधी निर्माण करू शकतात.
- ऐतिहासीक पर्यटन उद्योगातून आर्थिक परिवर्तन होवू शकते.

## संशोधन पध्दती

सदर प्रस्तुत निबंधासाठी दुय्यम संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे. यामध्ये संदर्भग्रंथ लिखित साहित्य, वर्तमानपत्रे, मासिके ईत्यादीचा उपयोग करण्यात आला आहे.

## पर्यटन उद्योगासाठी पायाभूत सुविधा :—

पर्यटन उद्योग हा पायाभूत सोयी सुविधावर अवलंबून आहे. पर्यटन स्थळी अशा प्रकारच्या सुविधा आपण पुरविल्या पाहिजे की पर्यटक सुखावून गेला पाहिजे. त्यामध्ये आल्हाद दायक वातावरण, स्वच्छ पाणी, चोवीस तास लाईट, राहण्याची आणि जेवणाची उच्च दर्जाची व्यवस्था, चांगल्या प्रकारचे रस्ते आणि पर्यटकांना ऐनवेळी लागणा—या जिवनावश्यक वस्तु या सर्व सुविधामुळे पर्यटक सुखावनू जातो आणि पून्हा पून्हा पर्यटनस्थळी येण्याचा विचार करत असतो म्हणून प्रथम आलेल्या पर्यटकांना अशा सोयी सुविधा पुरविल्या पाहिजे की तो पून्हा येथे आला पाहिजे. त्यासाठी उच्च दर्जाच्या पायाभूत सोयी सुविधा आपण निर्माण करू शकतो.

## सुरक्षित आणि निर्भय स्थानिक परिस्थिती

पर्यटन उद्योगासाठी सुरक्षित आणि निर्भय वातावरण अत्यंत आवश्यक आहे. अनेक ठिकाणी पर्यटकांना लुटण्याचा, त्यांना मारहाण झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत हे भविष्यात येणा—या पर्यटकावरीही होवू शकतो. आपण नेहमी पाहतो. त्या अशा घटनेमुळे आपल्या देशाची बदनामी होत असते त्याच बरोबर पुढे येणा—या पर्यटकांवरही त्याचा परिणाम होत असतो. त्यासाठी पर्यटकांसाठीचे कायदे करण्याची आणि गुन्हेगारांना कडक शिक्षा करण्याची व्यवस्था या कायद्यामध्ये असली पाहिजे.

येणारा पर्यटक हा आपला पाहुणा आहे त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी फक्त पोलिसांचीच नाही तर आपल्या सर्वांची आहे.

पर्यटन वाढीसाठी या सर्व उपाय योजना अतिश महत्वाच्या आहेत. पर्यटकांना

सुरक्षित, निर्भय, वातावरण असेल तर देश—विदेशातील पर्यटक त्या पर्यटन स्थळाला पहिली पसंती देतील.

**आदरातिथ्य, शिष्टाचाराची जाणीवपूर्वक जोपासना :—**

भारतीय संस्कृती आदरातिथ्यासाठी प्रसिध्द आहे. अनेक आक्रमण आले, व्यापारी आले, साहसी प्रवासी आले ते सर्व भारतीय संस्कृतीशी एकरूप झाले तसेच भारतीय संस्कृतीची विविधतेतुन एकत्मता अनेक भाषा, आहार, विहार, पोशाख, रूढी, परंपरा त्यामुळे जगात आपली वेगळी ओळख निर्माण झालेली आहे. परंतु या सर्वांचा फायदा पर्यटन उद्योगासाठी आपण करून घेवू शकतो. पर्यटन उद्योगासाठी सर्वात महत्वाची आणि प्रभाव टाकणारी कृती म्हणजे पाहुणचार, आदरातिथ्य, शिष्टाचार, त्यांच्यात जर आपण कमी पडलो तर त्याचा परिणाम पर्यटकांवर होतो. जेथे आपुलकीची माणसे आहेत, आपलेपणा आहे, तेथेच पर्यटन उद्योग विकसीत झालेला दिसून येतो. पर्यटक आदरातिथ्याने इतका भारावून गेला पाहिजे की, त्याने आपल्याच पर्यटन स्थळांना पहिली पसंती दिली पाहिजे. त्यासाठी आपल्यात बदल करून घेतला पाहिजे. रहिवाशांना शिष्टाचार, पाहुणचार यांच्या कार्यशाळा घेवून जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत.

**ऐतिहासीक स्मारकाकडे होत असलेले दुर्लक्ष :—**

इतिहास आणि पर्यटन या एकाचा नाण्याच्या दोन बाजू आहेत आपला प्राचीन इतिहास समृध्द आहे. आपल्या पूर्वजांनी निर्माण केलेली ऐतिहासीक स्मारके ही आपली स्वाभिमानाची, प्रतिष्ठेची आणि आपल्या गत इतिहासाची साक्ष देणारी पर्यटन स्थळे आहेत. या सर्वाचा आपण पर्यटन उद्योगासाठी उपयोग करून घेवू शकतो. पर्यटन उद्योग हा पैसा निर्माण करणारा, बेकारी दुर करणारा आणि असंख्य तरूणांना सामावून घेणारा उद्योग आहे त्यामुळे आपल्या ऐतिहासीक वास्तुकडे दुर्लक्ष करून चालणार नाही आपल्या इतिहासाचे जनत संवर्धन आणि त्यांची मार्केटिंग करून देश, विदेशातील पर्यटकांना आपण आकर्षित करू शकतो. त्यासाठी आपल्या अवती भोवती असणा—या ऐतिहासीक लेण्या, मंदिरे, किल्ले, गढी, जुनी वाडे, प्राचीन बारव, तिर्थकुंडे, समाधीस्थळे यांना संरक्षण देण्याची नितांत आवश्यकता आहे. त्यांच्या संवर्धनामधूनच आपला पर्यटन उद्योग बहरणार आहे यात कसलीच शंका नाही. आपला इतिहास आपणच सुरक्षित करून पर्यटन उद्योग उभारला पाहिजे.

**सारांश :—**

मराठवाड्यातील पर्यटन उद्योगापुढील जी आव्हाने आहेत त्यावर मात करून मराठवाड्याचा सर्वांगीन विकास कसा होईल याकडे या शोध निबंधात चर्चा करण्यात आली आहे. आधुनिक जगातील अनेक देशाच्या अर्थव्यवस्था पर्यटनावर आधारीत आहे. मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल त्यामधून होत असते. आपण ही या पर्यटन उद्योगात पदार्पण करण्यासाठी आपल्यात मोठा बदल करण्याची आणि इतिहासाचे जतन संवर्धन करण्याची आवश्यकता प्रतिपादन केलेली आहे.

**संदर्भ :—**

१. इतिहासातील नवे प्रवाह — वांबुरकर जास्वंदी (संपा)

२. सातवाहन कालीन महाराष्ट्र — मोरवंचीकर रा. श्री.

३. व्यावसायीक भूगोल — भोळे ए. एस.

४. पर्यटन भूगोल — नागतोडे प्रभाकर

५. मराठावाडा, एक सांस्कृतीक मागोवा — पाठक अरूणचंद्र

६. मायबोलीचा मराठावाडा — पाटील श्रीराम

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, July 2022, Volume-14 Issue-8

# जनपद लखीमपुर खीरी में अवसंरचनात्मक विकास का भौगोलिक अध्ययन

डॉ पुष्पा सिंह[1] विकास सिंह[2]
[1]एसो० प्रोफेसर राजा हरपाल सिंह पी०जी कालेज, सिंगरामऊ, जौनपुर
[2]शोध छात्र, राजा हरपाल सिंह पी०जी० कॉलेज, सिंगरामऊ, जौनपुर

**DOI-10.5281/zenodo.6988518**

**संक्षेप**

अध्ययन क्षेत्र लखीमपुर खीरी में अवसंरचनात्मक विकास के परिवर्तन और वितरण के अध्ययन में द्वितीयक आँकड़ों का प्रयोग किया गया है। अवसंरचनात्मक विकास एक महत्वपूर्ण प्रक्रिया है जिसके माध्यम से किसी भी क्षेत्र अथवा जनसंख्या पर महत्वपूर्ण प्रभाव डालती है। यह सम्बन्धित क्षेत्र को भौगोलिक आर्थिक रूप में समृद्धि करती है जिससे उस क्षेत्र का सर्वांगीण तीव्र विकास होता है। यह विकास के क्रम की महत्वपूर्ण प्राथमिक आधारभूत संरचना की नींव रखती है जिसके साथ विभिन्न प्रकार के सामाजिक परिवर्तन को आधार प्राप्त होता है।

**कुंजी शब्द :** अवसंरचना, लखीमपुर, स्वास्थ्य, सड़क।

**प्रस्तावना**

अवसंरचना अथवा आधारित संरचना किसी क्षेत्र उद्योग के सुचारू रूप से व्यवस्थित कार्य करने के लिए मूलभूत भौतिक एवं संगठनात्मक संरचना को अवसंरचना कहा जाता है अथवा जिन सेवाओं और सुविधाओं के माध्यम से आर्थिक विकास को अति तीव्र गति मिले वह अवसंरचना ;प्दतिंजतनबजनतमद्ध कहलाता है। अवसंरचना विकास आर्थिक एवं सामाजिक विकास को सहयोग करती है जिससे आर्थिक गति मिल सके। अवसंरचना को मुख्यत: दो वर्ग आर्थिक एवं सामाजिक में विभक्त करके इसके महत्व एवं कारक को प्रदर्शित कर सकते हैं। अवसंरचना के विकास से आर्थिक गति को बढ़ावा मिलता है जिससे सम्बन्धित क्षेत्र के विभिन्न तत्व मानव के रहन सहन के स्तर, आर्थिक गतिविधियों को तीव्रता से बढ़ाते है। जैसे सम्बन्धित क्षेत्र के ऊर्जा, पेट्रोलियम पदार्थ परिवहन एवं संचार के स्तर को ऊँचा कर देते है। साथ ही अवसंरचना के विकास से सामाजिक स्थित को भी बढ़ावा मिलता है। इसके विकास से आवासीय क्षेत्र, शिक्षा, स्वास्थ्य के स्थित को बेहतर किया जा सकता है।

अवसंरचना विकास के तत्वों को समझने के लिए अथवा व्यक्त करने के लिए इसका गहराई से कई विधियों से अध्ययन किया जाता है। साथ ही अवसंरचना विकास के विभिन्न स्तर क्रम का अलग—अलग अध्ययन किया जाता है। साथ ही इसके विस्तार को समझने के लिए अध्ययन किया जाता है अवसंरचना के वितरण में यह देखा जाता है कि यह किन—किन क्षेत्रों की आर्थिक सामाजिक स्थित को परिवर्तित कर रहा है इससे प्रभावित होने वाली जनसंख्या अर्थात् मानवीय समुदाय के प्रतिशत का अभिकलन किया जाता है।

**अध्ययन के उद्देश्य**

प्रस्तुत शोध पत्र जनपद लखीमपुर खीरी के अवसंरचना विकास से सम्बन्धित है इसके अध्ययन के निम्नलिखित उद्देश्य हैं:—

१. जनपद लखीमपुर खीरी के अवसंरचनात्मक विकास के अन्तर्गत पक्की सड़क एवं स्वास्थ्य सुविधाओं का विश्लेषण करना।
२. जनपद लखीमपुर के आधार भूत संसाधनों की उपलब्धता का अध्ययन करना।
३. अवसंरचना के विकास से जनपद लखीमपुर खीरी के भौगोलिक प्रभाव का अध्ययन करना।
४. अवसंरचनात्मक विकास से जनपद लखीमपुर खीरी सड़क एवं स्वास्थ्य एवं सुविधा के प्रभाव का अध्ययन करना।

**आँकड़ा स्रोत एवं विधितंत्र**

अध्ययन क्षेत्र जनपद लखीमपुर खीरी के अवसंरचनात्मक विकास के अध्ययन के लिए द्वितीयक आँकड़ों का प्रयोग किया गया है। जिनका संकलन जिला संख्यिकीय पत्रिका, लखीमपुर खीरी लोक निर्माण विभाग, स्वास्थ्य विभाग लखीमपुर खीरी आदि के द्वारा किया गया है। द्वितीयक आँकडों के आधार पर अवसंरचनात्मक विकास परिदृश्य को प्रदर्शित करने के लिए प्रतिशत परिवर्तन का उपयोग किया गया है। इसके साथ ही आवश्यकता अनुसार सांख्यिकीय विधियों का प्रयोग किया गया है अवसंरचनात्मक विकास को सरलता से प्रदर्शित करने के लिए दण्डारेख का प्रयोग किया गया है।

**अध्ययन क्षेत्र**

अध्ययन क्षेत्र जनपद लखीमपुर खीरी २७°६’ उत्तरी अक्षांश से २८°६’ उत्तरी अक्षांश तथा ८०° ३४’ पूर्वी देशान्तर से ८१° ३०’ पूर्वी देशान्तर विस्तार के साथ उत्तर प्रदेश राज्य में एक जिला तथा लखनऊ मंडल में स्थित है। अध्ययन क्षेत्र लखीमपुर खीरी के उत्तर में नेपाल देश दक्षिण में हरदोई एवं सीतापुर जनपद पूरब में बहराइच जनपद तथा पश्चिम में पीलीभीत एंव शाहजहांपुर जनपद सीमाओं का निर्धारण करते है। अध्ययन क्षेत्र की समुद्र तल से ऊचांई १४७ मी॰ है। यहाँ की भौगोलिक क्षेत्रफल ७६८० वर्ग किमी है जनगणना २०११ के अनुसार जनपद लखीमपुर खीरी की कुल जनसंख्या ४०२१२४३ है जिसमें २१२३१८७ पुरुष जनसंख्या तथा १८९८०५८ महिला जनसंख्या है। जनपद का लिंगानुपात ८९४ है। अध्ययन क्षेत्र घाघरा एवं इसकी सहायक गोमती एवं शारदा नदियों द्वारा लाई हुई जलोढ़ मिट्टी से निर्मित उर्वर भाग है। तथा गौण रूप में बलुई मिट्टी दोमट मिट्टी भी पायी जाती है। प्रशासनिक दृष्टि से जनपद को ०६ तहसील १५ विकासखण्ड १५६ न्याय पंचायत ९९५ ग्राम




पंचायत तथा १७०४ ग्रामों में विभक्त किया गया है साथ दी ६ नगर पंचायत भी है। यहाँ मानसूनी जलवायु पायी जाती है तथा कृषि में गन्ने की कृषि व्यापक क्षेत्र में की जाती है।

**सड़क अवसंरचना का विकास**

सड़क ऐसे भूमि पर बने हुए मार्ग होते है जिसे समतल करके आवागमन के लिए प्रयोग में लाया जाता है। सड़क प्रायः आर्थिक विकास को तीव्रता प्रदान करते है सड़के मानव जीवन के स्तर को बेहतर करती है। मानव की प्रारम्भिक आवश्यकताओं को आधार प्रदान करती है। अगर सड़कों का विकास न होता तो एक दिन का कार्य एक माह में पूर्ण होता। यह मानव जीवन एवं दिनचर्या का एक हिस्सा है।

सड़क परिवहन को विश्व में अवसंरचना का आधार कहा जाता है क्योंकि सड़क परिवहन का विकास नहीं होगा तो कच्चे माल की आपूर्ति करने तथा तैयार पदार्थ को बाजार तक ले जाने में समस्या उत्पन्न होगी। यदि सर्वोत्तम गुणों वाली सड़क अवसंरचना का विकास किया जाय तो किसानों के कच्चे पदार्थ बाजार एवं विपणन केन्द्र तक आसानी से पहुँच सकते है तथा शहरों में सब्जी, ईधन, अनाज की आपूर्ति भी अवसंरचना विकास के कारण ही तीव्रता से उपलब्ध हो सकती है जैसे कच्चे पदार्थ से (सब्जी दूध, आदि) समय से बाजार अथवा गंतव्य स्थल तक नहीं पहुँचेगा तो सब खराब हो जायेगा।

सड़क अवसरंचना के विकास से किसी भी देश के आर्थिक, सामाजिक विकास को गति मिलती है तथा साथ ही नगरों के ऊपर दबाव भी कम हो जाता है तथा पहुँच भी आसान हो जाती है। सड़के सुदूर क्षेत्र को भी जोड़ने का कार्य करतीं है पिछड़े क्षेत्रों के विकास में सहायत होती है तथा रोजगार के अवसर को भी प्रदान करती है सड़क अवसंरचना प्रणाली के विकास से एयरपोर्ट, रेलवे स्टेशन पोर्ट, हास्पिटल आदि आपस में जुड़ जाते है। भारत का सड़क नेटवर्क लगभग ५८.९८ लाख वर्ग किमी॰ में फैला हुआ है है विश्व का दूसरा सबसे बड़ा सड़क नेटवर्क है इसमें राष्ट्रीय राजमार्ग, एक्सप्रेसवे, राज्यीय, राजमार्ग, जिला सड़के ग्रामीण, सड़के अन्य सड़के सम्मिलित है।

अध्ययन क्षेत्र जनपद लखीमपुर खीरी में अवंसरचना विकास के अन्तर्गत पक्की सड़कों का अध्ययन किया गया। वर्ष २००७—२००८ के आँकड़ों को विकास खण्डवार देखा जाय तो सर्वाधिक पक्की सड़के सम्पूर्ण जनपद की पक्की सड़कों का विकास पलिया विकासखण्ड में (९.७ प्रतिशत) पाया है हुआ और सबसे कम पक्की सड़क का विस्तार फूलबेहड़ (३.९ प्रतिशत) विकास खण्ड में पाया गया है। अन्य विकासखण्डों में सड़के अवसंरचना निधासन विकासखण्ड में ४.९ प्रतिशत, रामिया वेहड़ विकास खण्ड में ४.२ प्रतिशत कुम्भीगोला विकासखण्ड में ८.६ प्रतिशत, विजुआ

विकासखण्ड में ५.३ प्रतिशत वाकेगंज विकासखण्ड में ४.९ प्रतिशत, मोहम्मदी विकासखण्ड में ६.०७ प्रतिशत, मितौली विकासखण्ड में ४.९ प्रतिशत, पसगवां विकासखण्ड में ६.५ प्रतिशत बेहजम विकासखण्ड में ८.७ प्रतिशत लखीमपुर नगर में ६.८ प्रतिशत नकहा में ४.३ प्रतिशत धौरहरा में ४.९ प्रतिशत ईसानगर में ५.० प्रतिशत है इसके साथ ही सम्पूर्ण ग्रामीण क्षेत्र में सड़क सम्पूर्ण जनपद के सड़क अवसंरचना का ८९.४ प्रतिशत, नगरीय क्षेत्र में सड़क अवसंरचना १०.४ प्रतिशत है।

वर्ष २०१७—२०१८ के आँकड़ों के अध्ययन से जनपद लखीमपुर खारी में पक्की सड़कों का विस्तार अधिक हुआ। अध्ययन क्षेत्र में सर्वाधिक पक्की सड़क का विस्तार सम्पूर्ण जनपद की सड़क अवसंरचना का पलिया विकासखण्ड में ८.८ प्रतिशत सबसे कम नकहा विकासखण्ड में ४.३ प्रतिशत, पाया गया है। अध्ययन क्षेत्र के अन्य विकासखण्डों में सम्पूर्ण जनपद की सड़क अवसंरचना निघासन विकासखण्ड ४.६ प्रतिशत, रामिया बेहड़ में ५.० प्रतिशत कुम्भी गोला ६.१ प्रतिशत विजुआ ८.७ प्रतिशत बाकेगंज ८.२ प्रतिशत, मोहम्मदी ६.५ प्रतिशत, मितौली ७.६ प्रतिशत, परसवां ४.० प्रतिशत, बेहजम विकासखण्ड ५.६ प्रतिशत, लखीमपुर विकासखण्ड ८.० प्रतिशत, फूलबेहड़ विकासखण्ड ७.३ प्रतिशत, धौरहरा विकासखण्ड ३.५ प्रतिशत, ईसानगर विकासखण्ड ३.५ प्रतिशत पक्की सड़कों का विस्तार पाया गया। साथ ही ग्रामीण क्षेत्र में सड़क अवसंरचना सम्पूर्ण जनपद के सड़क अवसंरचना ९३.५ प्रतिशत तथा नगरीय क्षेत्र में सड़क अवसंरचना सम्पूर्ण जनपद की ६.४ प्रतिशत है।

**सारिणी (अ)ए जनपद लखीमपुर खीरी**
**विकासखण्डवार पक्की सड़क अवसंरचना (२००७—२००८—२०१७—१८)**

| क्रम संञ | विकास खण्ड | २००७—२००८ | २०१७—१८ | अन्तर |
|---|---|---|---|---|
| १. | पलिया | ९.७ | ८.८ | ४६.७ |
| २. | निधासन | ४.९ | ४.६ | ४९.६ |
| ३. | रामिया बेहड़ | ४.२ | ५.० | ९०.५ |
| ४. | कुम्भी गोला | ८.६ | ६.१ | १४.८ |
| ५. | विजुआ | ५.३ | ८.७ | १६२.३ |
| ६. | वाकेगंज | ४.९ | ८.२ | १६८.१ |
| ७. | मोहम्मदी | ६.०७ | ६.५ | ७२.५ |
| ८. | मितौली | ४.९ | ७.६ | १४७.० |
| ९. | परसवां | ६.५ | ४.० | ०० |
| १०. | वेहजम | ६.७ | ८.७ | ४.६ |
| ११. | लखीमपुर | ६.८ | ८.० | ८९.५ |
| १२. | फूलबेहड | ३.९ | ७.३ | २०१.८ |
| १३. | नकहा | ४.३ | ३.१ | १७.० |
| १४. | धौरहरा | ४.९ | ३.५ | १४.० |
| १५. | ईसानगर | ५.० | ३.५ | १४.२ |
| | योग ग्रामीण | ८९.४ | ९३.५ | ६८.५ |
| | योग नगरीय | १०.३ | ६.४ | ०० |
| | योग जनपद | १०० | १०० | ६०.९ |

**स्रोत :** जिला सांख्यिकीय पत्रिका, जनपद लखीमपुर खीरी (२००७—२००८—एवं २०१७—२०१८)

सारणी (अ) के अनुसार अध्ययन क्षेत्र लखीमपुर खीरी के फूलवेहड़ विकासखण्ड में सर्वाधिक पक्की सड़क का परिवर्तन प्रतिशत (२०१.८) प्रतिशत सबसे कम परिवर्तन परसवां विकासखण्ड में ० प्रतिशत है। जनपद लखीमपुर खीरी के अन्य विकासखण्डों में पक्की सड़कों का परिवर्तन प्रतिशत पलिया विकासखण्ड ४६.७ प्रतिशत, निघासन विकासखण्ड में ४९.६ प्रतिशत, रामिया बेहड़ में ९०.५ प्रतिशत, कुम्भीगोला में १४.८ प्रतिशत, विजुआ विकासखण्ड में १६२.३ प्रतिशत, बाकेगंज में १६८.१ प्रतिशत, मोहम्मदी विकासखण्ड में ७२.५ प्रतिशत, मितौली विकासखण्ड में १४७.० प्रतिशत, बेहजम विकासखण्ड में ४.६ प्रतिशत, लखीमपुर विकासखण्ड में ८९.५ प्रतिशत, नकहा विकासखण्ड में १७.० प्रतिशत, धौरहरा में

१४.० प्रतिशत, ईसानगर में १४.२ प्रतिशत, सम्पूर्ण जनपद में ६०.९ प्रतिशत पक्की सड़कों का परिवर्तन हुआ जनपद लखीमपुर खीरी की पक्की सड़कों के परिवर्तन प्रतिशत को विकासखण्डवार तीन वर्गों में वर्गीकृत किया जा सकता है।

**१. उच्च पक्की सड़क विकास वाले क्षेत्र (८० प्रतिशत से अधिक)**

इस वर्ग में अध्ययन क्षेत्र लखीमपुर खीरी के उन विकासखण्डों को सम्मिलित किया जाता है जिनका उच्च पक्की सड़क विकास परिवर्तन ८० प्रतिशत से अधिक है। इस वर्ग में जनपद लखीमपुर खीरी के लखीमपुर विकासखण्ड (८९.५) प्रतिशत रामिया बेहड़ विकासखण्ड (९०.५) प्रतिशत फूल बेहड़ विकासखण्ड (२०१.८) प्रतिशत बाकैगंज विकासखण्ड (१६८.५) प्रतिशत विजुआ विकासखण्ड (१६२.३) प्रतिशत मितौली (१४७.७) प्रतिशत सम्मिलित है। इस वर्ग में जनपद लखीमपुर खीरी के कुल ६ विकासखण्ड (४० प्रतिशत) क्षेत्र सम्मिलित है।

**२. मध्यम पक्की सड़क विकास वाले क्षेत्र (४० से ८० प्रतिशत)**

इस वर्ग के अन्तर्गत अध्ययन क्षेत्र लखीमपुर खीरी के उन विकासखण्डों को सम्मिलित किया गया है जिनका प्रतिशत परिवर्तन ४० से ८० प्रतिशत होता है। इस वर्ग के अन्तर्गत लखीमपुर खीरी के पलिया विकासखण्ड (४६.७) प्रतिशत निधासन विकासखण्ड (४९.६) प्रतिशत मोहम्मदी विकासखण्ड (७२.५) प्रतिशत, सम्मिलित है। इस वर्ग में अध्ययन क्षेत्र लखीमपुर खीरी के कुल ३ विकासखण्ड (२० प्रतिशत) क्षेत्र सम्मिलित है।

**३. निम्न पक्की सड़क विकास वाले क्षेत्र (४० प्रतिशत से कम)**

इस वर्ग के अंतर्गत अध्ययन क्षेत्र लखीमपुर खीरी के उन विकासखण्डों को शामिल किया जाता है। जिनका पक्की सड़क के विकास परिवर्तन प्रतिशत ४० प्रतिशत से कम है। इस वर्ग के अन्तर्गत अध्ययन क्षेत्र लखीमपुर खीरी के परसवां विकासखण्ड ० प्रतिशत, बेहजम विकासखण्ड ४.६ प्रतिशत ईसानगर विकासखण्ड १४.२ प्रतिशत, कुम्भीगोला विकासखण्ड १४.८ प्रतिशत नकहा विकासखण्ड (१७.०) प्रतिशत, सम्मिलित है। इस वर्ग में अध्ययन क्षेत्र के कुल ६ विकासखण्ड (४० प्रतिशत) क्षेत्र सम्मिलित है। चार्ट संख्या (अ) में अध्ययन क्षेत्र लखीमपुर खीरी के पक्की सड़क के विकास के प्रतिशत के विकासखण्डवार दिखाया गया है। चार्ट अ में वर्ष २००७ तथा वर्ष २०१८ पक्की सड़क का विकास प्रतिशत लगभग समान है। कहीं कहीं दोनों वर्षों के पक्की सड़क के विकास के प्रतिशत में अन्तर है।




**स्वास्थ्य अवसंरचना का विकास**

वर्तमान में स्वास्थ्य संबंधी प्राथमिकताऐं बदल रही है। विश्व एवं भारत में लगातार मृत्युदर में गिरावट में देखी जा रही है फिर भी कुल संक्रामक रोग के कारण बोझ बढ़ रहा है तथा साथ ही मजबूत स्वास्थ्य परिचर्या उद्योग का उभरना है तथा स्वास्थ्य परिचर्या संबंधी लागतों के कारण आपाती व्यय की घटनाएँ बढ़ी है जिसे गरीबी के मुख्य कारणों में से एक माना जाता है तथा बढ़ता आर्थिक विकास राजकोषीय क्षमता को मजबूत बनाता है। अत: वर्तमान में ऐसी स्वास्थ्य नीति की आवश्यकता है जो इन प्रांसगिक परिवर्तनों के प्रति उत्तरदायी हो। राष्ट्रीय स्वास्थ्य नीति (२०१७) का प्रमुख उद्देश्य प्रणाली के सभी आयामों— जैसें स्वास्थ्य क्षेत्र में निवेश ;थ्वदण्द्धए स्वास्थ्य सेवा सुविधाओं के व्यवस्थापन और वित्तपोषण रोगों की रोकथाम,

नवीनतम तकनीक तक पहुँच मानव संसाधन विकास विभिन्न चिकित्सीय प्रणाली को प्रोत्साहन, बेहतर स्वास्थ्य सुविधाओं हेतु अपेक्षित ज्ञान आधार तैयार करना विभिन्न विभागों से सहयोग, वित्तीय संरक्षण सम्बन्धित कार्यनीति तथा स्वास्थ्य क्षेत्र के विनियम आदि में सरकार की भूमिका और प्राथमिकता स्पष्ट होनी चाहिए।

**सारणी (ब)ए जनपद— लखीमपुर खीरी**

**विकासखण्डवार स्वास्थ्य अवसंरचना का विकास वर्ष (२००७—२००८—२०१७—१८)**

| क्र०सं० | विकासखण्ड | वर्ष २००७—२००८ | २०१७—२०१८ | अन्तर |
|---|---|---|---|---|
| १. | पलिया | ७.८ | ९.९ | ४५.५ |
| २. | निघासन | ८.५ | ८.० | ८.३ |
| ३. | रामिया बेहड़ | ४.२ | ३.७ | ० |
| ४. | कुम्भिगोला | ६.३ | ५.५ | ० |
| ५. | विजुआ | ४.२ | ४.३ | १६.६ |
| ६. | वाकेगंज | ४.९ | ४.३ | ० |
| ७. | मोहम्मदी | ४.९ | ४.९ | १४.२ |
| ८. | मितौली | ६.३ | ६.२ | ११.१ |
| ९. | परगवां | ८.५ | ७.४ | ०० |
| १०. | बेहजम | ३.५ | ३.१ | ० |
| ११. | लखीमपुर | ७.० | ९.३ | ५०० |
| १२. | फूलबेहड़ | ४.९ | ५.५ | २८.५ |
| १३. | नकहा | ३.५ | ३.७ | २०.० |
| १४. | धौरहरा | ३.५ | ३.१ | ० |
| १५. | ईसानगर | ४.९ | ४.३ | ० |
| | योग ग्रामीण | ८३.६ | ८३.८ | १४.४ |
| | नगरीय | १६.३ | १६.१ | १३.० |
| | योग जनपद | १०० | १०० | १४.०१ |

**स्रोत** : जिला सांख्यिकीय पत्रिका, जनपद लखीमपुर खीरी (२००७—२००८—एवं २०१७—२०१८)

सार्वजनिक क्षेत्र में स्वास्थ्य अवसंरचना का विशेष ढांचा तैयार किया जाय साथ ही देश के अन्तिम व्यक्ति को त्वरित एवं आसानी से स्वास्थ्य सुविधा का लाभ प्राप्त हो। भारत सरकार का विशेष प्रयास आयुष्मान भारत योजना निश्चित ही गरीब व्यक्ति के जीवन को बदल सकता है। साथ ही उत्तर प्रदेश सरकार का अभियान प्रत्येक जिले में मेडिकल कालेज स्वास्थ्य अवसंरचना को अति मजबूती प्रदान करता है। साथ ही रोजगार के अवसर एवं स्वास्थ्य लाभ आसानी से प्राप्त हो सके।

सारणी संख्या (ब) में अध्ययन क्षेत्र जनपद लखीमपुर खीरी के स्वास्थ्य अवसंरचना के अन्तर्गत आयुर्वेदिक यूनानी, होम्योपैथिक, सामुदायिक स्वास्थ्य केन्द्र, प्राथमिक स्वास्थ्य केन्द्र आदि के संख्या को व्यक्त किया गया है वर्ष २००७—२००८ एवं २०१७—२०१८ में स्वास्थ्य सुविधाओं का तुलनात्मक अध्ययन किया गया वर्ष २००७—२००८ के आँकड़ों को विकासखण्ड वाद देखा जाय तो सर्वाधिक स्वास्थ्य सुविधाएँ सम्पूर्ण जनपद के स्वास्थ्य अवसंरचना में लखीमपुर विकासखण्ड (८.५ प्रतिशत) है सबसे कम स्वास्थ्य और अवसंरचना का विकास नकहा विकासखण्ड ३.५ प्रतिशत धौरहरा में ३.५ प्रतिशत बेहजम विकासखण्ड में ३.५ प्रतिशत है अन्य विकासखण्ड स्वास्थ्य अवसंरचना में पलिया विकासखण्ड में ७.८ प्रतिशत, रामिया बेहड़ विकासखण्ड में ४.२ प्रतिशत कुम्भीगोला विकासखण्ड में ६.२ प्रतिशत, विजुआ विकासखण्ड में ४.२ प्रतिशत, बाकेगंज विकासखण्ड में ४.९ प्रतिशत, मोहम्मदी विकासखण्ड ४.९ मितौली विकासखण्ड ६.३ विकासखण्ड में ६.३ प्रतिशत, पसगवां विकासखण्ड में ८.५ लखीमपुर विकासखण्ड में ७.० प्रतिशत फूलबेहड़ विकासखण्ड में ४.९ प्रतिशत इसानगर विकासखण्ड में ४.९ प्रतिशत है। इसके साथ ही ग्रामीण क्षेत्र स्वास्थ्य अवसंरचना सम्पूर्ण जनपद की स्वास्थ्य अवसंरचना का ८३.६ प्रतिशत, नगरीय क्षेत्र सम्पूर्ण जनपद के स्वास्थ्य संरचना १६.३ प्रतिशत है।

वर्ष २०१७—२०१८ के आँकड़ों के अवलोकन से अध्ययन क्षेत्र लखीमपुर खीरी के पलिया, विकासखण्ड में स्वास्थ्य सुविधाओं

(अवसंरचना) का सम्पूर्ण जनपद में सर्वाधिक ९.९ प्रतिशत है। तथा धौरहरा विकासखण्ड में ३.१ प्रतिशत बेहजम विकासखण्ड में भी ३.१ प्रतिशत सबसे कम है। अध्ययन क्षेत्र में अन्य विकासखण्ड में निधासन विकासखण्ड में ८.० प्रतिशत, रामिया बेहड़ विकासखण्ड में ३.७ कुम्भिगोला विकासखण्ड में ५.५ प्रतिशत, विजुआ विकासखण्ड में ४.३ प्रतिशत, बाकेगंज विकासखण्ड ४.३ प्रतिशत, मोहम्मदी विकासखण्ड में ४.९ प्रतिशत, मितौली विकासखण्ड में ६.२ प्रतिशत, परसंवा विकासखण्ड में ७.४ प्रतिशत, लखीमपुर विकासखण्ड में ९.३ प्रतिशत, फूलबेहड़ विकासखण्ड में ५.५ प्रतिशत नकहा विकासखण्ड में ३.७ प्रतिशत, ईसानगर विकासखण्ड में ४.३ प्रतिशत स्वास्थ्य सुविधाओं (अवसंरचना) है। इसके साथ ही ग्रामीण क्षेत्र स्वास्थ्य अवसंरचना सम्पूर्ण जनपद की स्वास्थ्य अवसंरचना का ८३.८ प्रतिशत, नगरीय क्षेत्र सम्पूर्ण जनपद के स्वास्थ्य संरचना १६.१ प्रतिशत है।

सारणी (ब) के अवलोकन से यह स्पष्ट होता है कि २००७ की तुलना में २०१७ में स्वास्थ्य अवसंरचना के विकास में परिवर्तन हुआ, अध्ययन क्षेत्र जनपद लखीमपुर खीरी के लखीमपुर विकासखण्ड में सर्वाधिक ५०.० प्रतिशत वृद्धि हुयी तथा अध्ययन क्षेत्र के विकासखण्ड रामिया बेहड़ में ० प्रतिशत कुम्भिगोला, बाकेगंज, पसगंवा, बेहजम, धौरहरा, ईसानगर विकासखण्ड में भी ० प्रतिशत की वृद्धि हुयी। अन्य विकासखण्ड में निधासन विकासखण्ड में ८.३ प्रतिशत विजुआ विकासखण्ड में १६.६ प्रतिशत, मोहम्मदी विकासखण्ड में १४.२ प्रतिशत, मितौली में ११.१ प्रतिशत, पालिया विकासखण्ड में ४५.५ प्रतिशत फूलबेहड़ विकासखण्ड में २८.५ प्रतिशत नकहा में २०.० प्रतिशत तथा सम्पूर्ण जनपद में १४.१ प्रतिशत की वृद्धि हुयी।

अध्ययन क्षेत्र लखीमपुर खीरी के विभिन्न विकासखण्डों के स्वास्थ्य सुविधाओं की पिछले १० वर्षों में वृद्धि हुयी जिसके आधार पर स्वास्थ्य अवसंरचना के वृद्धि प्रतिशत को विकासखण्डवार तीन वर्गों में वर्गीकृत किया जा सकता है।

**१. उच्च स्वास्थ्य अवसंरचना विकास वाले क्षेत्र (२० प्रतिशत से अधिक)**

इस वर्ग के अन्तर्गत अध्ययन क्षेत्र लखीमपुर खीरी के उन विकासखण्ड को सम्मिलित किया जाता है जिनका स्वास्थ्य अवसंरचना में सर्वाधिक विकास २० प्रतिशत से ऊपर होता है। इस वर्ग में अध्ययन क्षेत्र लखीमपुर खीरी के लखीमपुर विकासखण्ड में (५०.० प्रतिशत), फूलबेहड़ विकासखण्ड में (२८.५ प्रतिशत), पालिया विकासखण्ड में (४५.५) प्रतिशत, नकहा विकासखण्ड (२०.० प्रतिशत) सम्मिलित है। इस वर्ग में जनपद लखीमपुर खीरी के कुल ४ विकासखण्ड (२६.६ प्रतिशत) क्षेत्र सम्मिलित है।

**२. मध्यम स्वास्थ्य अवसंरचना विकास वाले क्षेत्र (१० से २० प्रतिशत)**

इस वर्ग में अध्ययन क्षेत्र जनपद लखीमपुर खीरी के उन विकासखण्डों को सम्मिलित किया जाता है जिनका प्रतिशत वृद्धि १० से २० प्रतिशत होता है। इस वर्ग में जनपद लखीमपुर खीरी के विजुआ विकास खण्ड (१६.६ प्रतिशत), मोहम्मदी विकासखण्ड १४.२ प्रतिशत, मितौली विकासखण्ड ११.१ प्रतिशत क्षेत्र सम्मिलित है। इस वर्ग में अध्ययन क्षेत्र के ३ विकासखण्ड (२० प्रतिशत) क्षेत्र सम्मिलित है।

**३. निम्न स्वास्थ्य अवसंरचना विकास वाले क्षेत्र (१० प्रतिशत से कम)**

इस वर्ग के अन्तर्गत अध्ययन क्षेत्र लखीमपुर खीरी के उन विकास खण्डों को सम्मिलित किया जाता है। जिनका स्वास्थ्य अवसंरचना विकास वृद्धि १० प्रतिशत से कम है। इस वर्ग के अन्तर्गत अध्ययन क्षेत्र लखीमपुर खीरी के निधासन विकासखण्ड (८.३ प्रतिशत), रामिया बेहड़ विकासखण्ड, कुम्भिगोला विकासखण्ड बाकेगंज विकासखण्ड परसगवां विकास खण्ड, बेहजम विकासखण्ड धौरहरा विकासखण्ड, ईसानगर विकासखण्ड, (० प्रतिशत) सम्मिलित है इस वर्ग में अध्ययन क्षेत्र के कुल ८ विकासखण्ड के (५३.३ प्रतिशत) क्षेत्र सम्मिलित है।




**निष्कर्ष**

उपरोक्त विवरण से यह स्पष्ट होता है कि अध्ययन क्षेत्र जनपद लखीमपुर खीरी सड़क अवसंरचना विकास में वृद्धि से जनपद के विकासखण्ड को विशेष आयाम मिलते है। पक्की सड़कों के विकास से रोजगार सृजन, उद्योग को बढ़ावा, नगरीकरण आदि कारकों को बल मिलता है जनपद लखीमपुर खीरी के लखीमपुर विकास खण्ड में सर्वाधिक पक्की सड़कों का विस्तार पिछड़े १० वर्षो में पाया गया तथा सड़कों के साथ स्वास्थ्य सुविधाओं का विकास २००७ की तुलना में २०१७—१८ में १४.१ प्रतिशत की वृद्धि हुयी है सड़क अवसंरचना विकास के साथ स्वास्थ्य अवसंरचना को और बेहतर करने जरूरत है जिस तरीके से जनसंख्या में वृद्धि हो रही है उस तरह से अवसंरचना को विकसित करने की जरूरत है। अवसंरचना के विकास से दूरगामी परिणाम खासकर अध्ययन क्षेत्र जनपद लखीमपुर खीरी में होगा रोजगार तीव्रता से सृजित होगें विदेशी निवेश ;थ्क्प्द्ध की संभावना बढ़ेगी साथ ही सड़को के जुड़ाव से दूरी भी कम होगी जिससे कृषकों की फसलों को अच्छी कीमत प्राप्त होगी स्वास्थ्य अवसंरचना में वृद्धि से किसी भी संक्रमणकारी रोगों एवं विभिन्न बिमारियों को नियंत्रित करके जीवन को बचाने में सहायक होगें। इसके साथ ही टीकाकरण द्वारा भविष्य में होने वाली बीमारियों को सुरक्षा प्रदान करेगें। जनपद लखीमपुर खीरी के विकासखण्ड में २००७—२००८ की तुलना में २०१७—१८ में अपेक्षाकृत अवसंरचना विकास में तीव्रता देखी गयी जो कि वहाँ की आर्थिक भौगोलिक स्थित को प्रभावित करती है।

**संदर्भ ग्रन्थ सूची**

1. Agénor P.-R. and B. Moreno-Dodson (2006), “Public Infrastructure and Growth: New Channels and Policy Implications”, World Bank Policy Research Working Paper4064.
2. Canning D. (1998), “A Database of World Infrastructure Stocks, 1950-95”, Policy Research Working Paper 1929, World Bank, Washington D.C.
3. Calderón, C. and L. Servén (2004), “The Effects of Infrastructure Development on Growth and Income Distribution” Central Bank of Chile, Working Papers N° 270.
4. Duggal V., C. Saltzman and L. Klein (1999), “Infrastructure and productivity: a Nonlinear Approach”, Journal of Econometrics, 92, 47-74.
5. Estache A. and M. Fay (2007), “Current Debates on Infrastructure Policy”, World Bank Policy Research WPS 4410.
6. Ford R. and P. Poret (1991), “Infrastructure and Private-Sector Productivity”, OECD Economic Studies, 17, 63-89.
7. Gramlich E.M. (1994), “Infrastructure Investment: A Review Essay”, Journal of Economic Literature, 32, 1176-1196.
8. Haughwout, Andrew F. 2002 “Public infrastructure investments, productivity and welfare in fixed geographic areas”, Journal of Public Economics, Volume 83, Issue 3, Pages 405-428.
9. Hulten C.R., Bennathan E. and S. Srinivasan (2005) “Infrastructure, Externalities, and Economic Development: A Study of Indian Manufacturing Industry”, mimeo, World Bank.
10. Limao N. and Venables A., 2001, “Infrastructure, Geographical Disadvantage, Transport Costs and Trade”, World Bank Economic Review, 15, 451-479.

11. BOOPEN, Seetanah. Transport infrastructure and economic growth: evidence from Africa using dynamic panel estimates. *The empirical economics letters*, 2006, 5.1: 37-52.
12. BURNSIDE, Craig; DOLLAR, David. Aid Policies and Growth [*Policy Research Working Paper No. 1777*]. Washington, DC: World Bank, 1997.
13. CALDERÓN, César; EASTERLY, William; SERVÉN, Luis. Infrastructure compression and public sector solvency in Latin America. *The Limits of Stabilization: Infrastructure, Public Deficits, and Growth in Latin America. Stanford University Press and the World Bank*, 2003, 119-38.
14. CALDERON, Cesar; SERVEN, Luis. The effects of infrastructure development on growth and income distribution. *World Bank Publications*, 2004.
15. CALDERÓN, César; SERVÉN, Luis. Infrastructure and economic development in Sub-Saharan Africa. 2008.
16. Dutta, I, and S. Bawari (2007): Health and Healthcare in Assam: A Status Report. Centre for Enquiry into Health and Allied Themes, Mumbai. 108pp. ISBN: 81-89042-51-3
17. Lall, S V (2007): Infrastructure and regional growth, growth dynamics and policy relevance for India.
18. Annals of Regional Science. V. 41. 581–599
19. Majumder, R. (2005): Infrastructure and Regional Development: Interlinkages in India. (Indian Economic Review, V. 40(2). 167-184
20. Wu, W. (2010): Urban Infrastructure Financing and economic performance in China. UrbanGeography, v. 31(5). 468-467
21. सिंह, जगदीश काशीनाथ : आर्थिक भूगोल के मूल तत्व, ज्ञानोदय प्रकाशन, गोरखपुर, २०१७, पृ॰ ४४९
22. गौतम, अलका : आर्थिक भूगोल के मूल तत्व, शारदा पुस्तक भवन, प्रयागराज, २०२०, पृ॰ ५४७
23. जिला सांख्यिकीय पत्रिका, जनपद लखीमपुर खीरी, वर्ष २००७—०८ एवं २०१७—१८
24. गजेटियर लखीमपुर खीरी १९९५

# आधुनिक काळातील ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण एक काळाची गरज

**प्रा. डॉ. सौ. एस. पी. लाखे**
इतिहास विभाग प्रमुख नुतन आदर्श कला, वाणिज्य आणि श्रीमती म.ह. वेगड विज्ञान महाविद्यालय उमरेड जि. नागपूर
**DOI-10.5281/zenodo.6988530**

**अंधाराच्या फलकावर—प्रकाशाचा वेध घे।**
**सामर्थ्याच्या शस्त्राला—अस्मितेची धार दे।**
**दास्याच्या श्रृखंलाना—विवेकाने सार दे।**
**परंपरेच्या वेदनांना कंठातून वाट दे।**
**हे मानवा उद्याच्या भगिनींना खऱ्या स्वातंत्र्याची भेट दे।**

**सार:** ''बेटी बचाओ, बेटी पढाओ'' या योजनेतून मुलगी किती महत्वाची आहे हे समाजाला पटवून देण्याचे कार्य विविध संस्था, संघटना एवढेच नव्हे तर शासनाच्या मदतीने सर्व स्तरावरून होत आहे. जर आपल्या देशात सबल आणि कृतिशील असलेला समाज धारण करणारी भारतीय संस्कृती जोपासायची असेल तर महिलांना पुरूषा इतका समान दर्जा मिळणे गरजेचे आहे मग ती स्त्री शहरी असो वा ग्रामीण. आधुनिक काळाची आव्हाने पेलण्यासाठी ती समर्थ असायला हवी. आज शहरी क्षेत्रात शालेय शिक्षणापासून मुलगा किंवा मुलगी असा भेदभाव न करता त्यात समानता आणण्यात भारताला यश येत आहे. राजकीय, प्रशासकीय, वैद्यकीय, माहिती व तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, व्यवसायिक शिक्षणातही महिला प्रतिनिधित्वात लक्षणीय वाढ झाली आहे. १९५१ ला महिला साक्षरतेचे प्रमाण ९: होते ते २०११ मध्ये ६५: झालेले आहे. शासनाच्या विविध योजनाच्या माध्यमातून २५ लाख कुटूंबे आपल्या उदरनिर्वाहाचा, आर्थिक समस्याचा प्रश्न सोडवत आहे हे सकारात्मक चित्र आज जरी आपल्याला दिसत असले तरी ग्रामीण क्षेत्राचा जोपर्यंत सर्वांगाने विकास साधल्या जात नाही तोपर्यंत देशाचा समग्र विकास झाला असे म्हणता येत नाही. आपल्या राष्ट्राचा समग्र विकास जर साधायचा असेल ग्रामीण क्षेत्रातील 'अन्नदात्या' श्रमिक महिलेला स्वत:चे निर्णय स्वत: घेवून पुरूषाच्या बरोबरीने समान वागणूक, समान हक्क मिळणे गरजेचे आहे.

भारत हा शेतीप्रधान देश आहे. जवळजवळ ६०: महिला या शेती आणि शेतीशी संबंधीत पुरक व्यवसायाशी निगडीत आहे. संयुक्त कुटूंबपद्धती आणि पुरूष प्रधान संस्कृतीमुळे ग्रामीण क्षेत्रात अजुनही लिंगभेद कायम आहे. भारतीय ग्रामीण समाजात स्त्री पुरूष विषमता आहे. ती पूर्णपणे दूर झाल्याशिवाय आणि स्त्रीला तीच्या आर्थिक स्वातंत्र्याचा, तिच्या निर्णय क्षमतेनुसार लाभ मिळाल्याशिवाय स्त्री सक्षमीकरण झाले असे म्हणता येणार नाही. बदलत्या आधुनीक युगात यंत्र, तंत्र, विज्ञानाच्या युगात नवनवीन आव्हाने पेलण्याचे सामर्थ्य ग्रामीण स्त्रीमध्ये निर्माण व्हावे, ग्रामीण स्त्रीला लिंगभेद विरहीत समाजात खरे स्थान प्राप्त झाले तर ती सक्षम झाली असे म्हणता येईल. स्त्री सक्षमीकरण प्रक्रिया म्हणजे स्त्रीच स्वयंनिर्भर होणे होय. तीच आत्मनिर्भरता आधुनिक काळात ग्रामीण महिलेला मिळवून देणे गरजेचे आहे. आजच्या युगात स्त्रीयांनी अंतराळात छेप घेतली असली, स्त्री सैन्यात पोहचली असेल देशाच्या सर्वोच्च पदावर विराजमान झाली तरी ग्रामीण क्षेत्रातील स्त्री ही आपल्या कौटूंबिक चौकटीतच बंदिस्त आहे. १५ ऑक्टोंबर २०१६ ला 'महिला किसान दिवस' भारतात जाहीर झाला. शेतकरी महिलांच्या हक्क आणि अधिकारावर काम करत असलेल्या 'किसान अधिकार मंचाने' महिलाच्या श्रमाची दखल शासन दरबारी घ्यावयास लावल्याने हा दिवस साजरा करण्यात आला. ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणाकडे लक्ष देणे अधिक गरजेचे आहे. त्यामुळे ''आधुनिक काळातील महिला सक्षमीकरण एक काळाची गरज'' या विषयावर सखोल संशोधन करण्याच्या हेतूनेच हा शोध निबंध आहेत. महिला सक्षमीकरण आणि आधुनिक काळात ग्रामीण क्षेत्राची स्थीती यावर या अनुंषगाने प्रकाश टाकणे आवश्यक आहे.

### महिला सक्षमीकरण म्हणजे काय?

मानव समुहात स्त्री जातीचा जवळपास निम्मा हिस्सा आहे. स्त्रीयांना हतोत्साहित करणारे वर्तन करून त्यांचा जीवनस्तर उंचावण्याकडे दुर्लक्ष करण्यापासून ते त्यांचा छळ आणि अत्याचार

करण्यापर्यंत अनेक प्रकारची हिनत्वाची, अपमानाची वागणूक स्त्री जातीला मिळत आली आहे. आजही ग्रामीण भागात बऱ्याच अंशी हे चित्र कायम आहे. त्यामुळेच, ''स्त्रीयांच्या प्रगतीस पोषक वातावरणाची निर्मिती व त्यांचे सुचालन करणे आणि लैंगिक समतेद्वारा समाजाचे संतुलन साधने यासाठी पुरोगामी आणि विवेकी समाजाने बाळगलेला दृष्टिकोन, केलेली कृती याचा समन्वय म्हणजे स्त्री सक्षमीकरण होय'' याचबरोबर दुसऱ्या शब्दात ''महिलांची सामाजिक, आर्थिक स्थीती सुधारणे, त्यांना रोजगार, शिक्षण आणि आर्थिक प्रगतीसाठी समान संधी उपलब्ध करून देणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय'' महिला सक्षमीकरण बाबत बऱ्याच विद्वानांनी आपली मते मांडलेली आहेत. ''कायदे आणि कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय सर्व क्षेत्रामध्ये महिलांना पुरूषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करून देणे, विकासाची संधी उपलब्ध करून देणे आणि स्त्री—पुरूष असमानता नष्ट करणे हीच महिला सक्षमीकरणाची प्रक्रिया मानता येईल.''

मात्र महिलांचे सबलीकरण करतांना पुरूषांना हिणविणे किंवा त्यांच्यापेक्षा महिलांचे श्रेष्ठत्व सिद्ध करणे नव्हे तर महिलांना त्यांच्या नैसर्गिक गुणधर्म, क्षमता, परंपरा यांच्यासह समानतेने वागविले जावे एवढेच अपेक्षीत आहे. त्याचे वास्तविक हक्क त्यांना मिळायला हवे. मानव हा निसर्गत:च स्वतंत्र आहे. त्यांना जगण्याचा जर अधिकार आहे तर त्याचे हक्क त्याला मिळायला पाहिजे. मात्र महिला सक्षमीकरणाचा जेवढा लाभ शहरी स्त्रीयांना मिळाला तेवढा ग्रामिण स्त्रीयांना मिळाल्याचे दिसत नाही याला सुविधांचा अभाव. ग्रामीण भागातील लोकांची पारंपारिक मानसिकता, ग्रामीण क्षेत्रात स्त्रीयांकडे पाहण्याचा दृष्टीकोन, ग्रामीण क्षेत्रातील सामाजिक रचना, अपुऱ्या सोयी सुविधा यासारखी अनेक कारणे कारणीभूत ठरली तरी ग्रामीण क्षेत्रातील महिलांच्या सक्षमीकरणा शिवाय संपुर्ण देशाचा विकास झाला म्हणता येत नाही.

समाजाने स्त्रीपुरूष या समान घटकांचा शिक्षणातून समान विकास साधला पाहिजे नाही तर समाजाची हानी होते हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या ग्रामगीतेत सांगीतले होते.

तेथेची समाजाचे चुकले। एकास उचलोनी
दुसऱ्यास दाबले।
याचे कटू फळ भोगणे आले। कितीतरी
स्थानी।
परि लक्ष नाही आज तिकडे। नाहीत
मुली बाळींना उत्तम धडे।
मुली महिलांचे जीवन जागविले। तरीच
जगले रामराज्य।

राष्ट्रसंतानी स्त्रीयांना बंधमुक्त करण्याचा विचार मांडला. स्त्रीसक्षम झाली पाहिजे, स्वत:चे संरक्षण स्वत: करू शकली पाहिजे असे त्यांना वाटत. मात्र त्यासाठी ग्रामीण महिलांनी स्थीती बदलायला हवी असे ते म्हणत.

**ग्रामीण महिलांची स्थीती :**

१५ ऑक्टोंबर हा दिवस 'आंतरराष्ट्रीय ग्रामीण महिला दिवस' म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाच्या १८ डिसेंबर २००६ च्या आमसभेत या संबंधाने ठराव पास करण्यात आला. या ठरावात शेतकी व्यवसायात ग्रामीण विकास अन्नसुरक्षितता आणि दारिद्र्य निर्मुलन ही संकल्पना मांडण्यात आली. १९९५ च्या बिंजिगच्या जागतिक महिला परिषदेत या संकल्पनेला कार्यान्वित करण्यात आले. ''ग्रामीण महिला या खऱ्या अन्नदात्या आहेत. त्यांच्या कार्याची दखल घ्यावी आणि या दिनाचे औचित्य साधून त्यांना प्रोत्साहित करावे. सर्वांची अन्नधान्याची गरज पूर्ण व्हावी यासाठी शेतीत राबराब राबणाऱ्या या श्रमीक महिलेच्या श्रमाचा गौरव व्हावा हा या दिन साजरा करण्यामागील उद्देश आहे. त्यामुळे प्रथमच १५ ऑक्टोबर २००८ हा 'आंतरराष्ट्रीय ग्रामीण महिला दिवस' म्हणून साजरा करण्यात आला.

भारताची सध्याची लोकसंख्या १ अब्ज ३८ करोड आहे व भारत हा कृषीप्रधान देश असून भारतात ६,४१,००० गावे आहेत आणि एकुण लोकसंख्येच्या ६२.२ लोकसंख्या ग्रामीण भागात आहे तर स्त्री पुरूष प्रमाण १००० ला ९४० असे आहे. संपूर्ण भारताच्या अन्नधान्याचा प्रश्न या ग्रामीण जनतेवर अवलंबून आहे. यात ग्रामीण स्त्रीयांचा फार मोठा सहभाग आहे. परंतु या स्त्रीयांची स्थीती जाणून घेतल्यास ग्रामीण भागातील बहूसंख्य स्त्रीया या घरकाम, शेती आणि शेतमजूर म्हणूनच गुंतलेल्या आहेत. शहरी आणि ग्रामीण स्त्रीया यांची तुलनाच होवू शकत नाही. ग्रामीण भागात दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्याची संख्या २२ कोटी २२ लाख आहे हे शासकीय आकडेवारी वरून कळत असले तरी अर्थतज्ञांच्या मते ती संख्या त्याहून जास्त आहे. या दारिद्र्याची झळ सर्वाधिक कुणाला पोहचत असेल तर ग्रामीण स्त्रीला. ग्रामीण भागातील स्त्री आई, बहिण, पत्नी, मुलगी या सगळ्या भुमिका यशस्वीरित्या पार पाडत असली

तरी पुरूषप्रधान समाजरचनेमुळे आजही ती पुरूषांवर अवलंबून आहे. तिला निर्णय घेण्याचे फारसे अधिकार नाही. त्यामुळे तीचे स्थान नगण्यच आहे. आजही ग्रामीण भागात मुलगा झाल्याचा जेवढा आनंद होतो तेवढा मुलगी झाल्याचा होत नाही. मुलगी जन्माला येणे म्हणजे अनेक समस्या निर्माण होणे असे मानले जाते त्यामुळे स्त्रीभृणहत्या केल्याची कित्येक उदाहरणे आहेत. पुरूषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रीयांच्या निर्णय क्षमतांना तेथे वावच मिळत नाही. याला कारण स्त्रीयांविषयी समाजाची असलेली परंपरागत मानसिकता होय. प्राचीन ऋगवेदकाळ हा भारतीय स्त्रीच्या दृष्टीने सुवर्णकाळ जरी मानल्या गेला तरी मध्ययुगात आणि पुढे पेशवेकाळात तिचे आयुष्य उंबरठ्याच्या आतच बंदिस्त झाले होते. सतीप्रथा, बालविवाह, बहुपत्नी विवाह, विधवा विवाह समस्या, नियोग प्रथा, स्त्रीयांची खरेदी विक्री, देवदासी प्रथा, बाला—जरठ विवाह, केशवपन अशा अनेक रूढी प्रथा परंपरा ती एवढी जखडल्या गेली होती की तीला आपले, स्वतःचे अस्तित्व आहे हेच विसरावे लागले होते. जन्माला येणाऱ्या मानव जातीला जे हक्क आणि अधिकार आहे ते आपल्याला ही आहे हे तीला नाकारावयास भाग पाडले होते. पुढे इंग्रजांचे भारतात आगमन झाले जे स्त्रीयांसाठी वरदान ठरले. पाश्चात्यांच्या प्रभावाने भारतीय समाजात एक बुद्धीजीवी वर्ग उदयाला आला. त्यांनी समाजातील इतर प्रश्नांबरोबर स्त्रीप्रश्न स्त्रीविकासाकडे लक्ष वेधले. ब्रिटिश काळात भारतीय स्वतंत्रता आंदोलनाचा प्रारंभ झाला. या आंदोलनात स्त्रीयांचा वाढता सहभाग आणि त्यामुळे आंदोलनाला आलेली तीव्रता बघता स्त्रीयांच्या अधिक सहभागाची गरज सर्व नेत्यांना वाटू लागली. महात्मा गांधीनी ही स्त्री स्वातंत्र्याचा, स्त्री विकासाचा विचार स्त्रीबाबत समग्र परिवर्तनाशी जोडला होता. त्यामुळे या आंदोलनातील स्त्रीयांनी केलेल्या भरीव कामगिरीमुळे स्त्रीयांकडे पाहण्याचा दृष्टीकोनच बदलला. स्त्रीयांनाही आपल्या अस्तित्वाची जाणीव झाली, जी स्त्री सक्षमीकरणासाची नांदी ठरली.

स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानात तीला तीचे मुलभूत अधिकार बहाल करण्यात आले. तरी बऱ्याच क्षेत्रात स्त्रीविषयी असलेल्या मानसिकतेत फारसा बदल झाला नाही. स्वातंत्र्य लढ्यात योगदान जरी दिले असले तरी भारतातील ग्रामीण स्त्रीचा दर्जा परंपरागत आहे. चुल आणि मुल हे तीचे कार्यक्षेत्र ठरलेले आहे. ग्रामीण भागातील लोकसंख्येच्या ८०: महिला आजही शेती आणि शेतीपुरक व्यवसायातून मिळणाऱ्या रोजंदारीवर अवलंबून आहे. याशिवाय घरकाम, स्वच्छता, स्वंयपाक करणे, पाणी भरणे, घरातील नित्याची कामे, वडीलधाऱ्यांची काळजी घेणे, मुलांचे संगोपन, कक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय, पाळीव जनावरांची व्यवस्था, ही नित्याची कामे तीला करावी लागतात. यात ना तीच्या श्रमाची दखल, ना श्रमाचा मोबदला. शेती, घराच्या मालकी हक्कावरही तीचे नाव नसायचे. घरच्या जबाबदाऱ्या साभाळूनही शेतीची कामे करणाऱ्या स्त्रीला ना धड शिक्षण मिळते, ना धड पैसा मिळतो. भारताच्या ग्रामीण क्षेत्रात शेतीची कामे करणाऱ्या महिलेचे प्रमाण ६२.२ टक्के आहे. त्यापैकी १८.८ टक्के महिलेच्या नावे शेतजमीन आहे. जमीनीची मालकी नसल्याने महिला शेती योजनांपासुन वंचित राहतात. सामाजीक सांस्कृतिक, घडामोडीतुन त्यांचा क्वचित सहभाग असतो. अनेक रूढी, प्रथा परंपरामुळे या भारतीय ग्रामीण समाजात आजही समाविष्ट आहे. ग्रामीण स्त्रीया शिक्षण आणि नोकरीच्या निमीत्ताने घराबाहेर पडू शकत नाही. घरच्यांची संमती मिळणे पण कठीण असते. रूढीवादी विचारसरणीमुळे स्त्रीयांमध्येही एक न्युनगड निर्माण झाला आहे. पुरूषाच्या तुलनेत त्या स्वतःला कमी लेखतात. त्यामुळे आधूनीक काळात सामाजिक, आर्थिक बदलाला त्या सामोरे जात नाही. अशातच ग्रामीण भागातही कामाच्या ठिकाणी होणारा लिंगभाव, त्यातुन होणारा हिंसात्मक शोषण करणाऱ्या घटना, समाजाविषयी मनात असलेली अनामिक भिती, स्वतःच्या सुरक्षेचा प्रश्न या सर्वांचा सामना करण्याची निडरता आजही ग्रामीण स्त्री मध्ये आलेली नाही. स्त्रीपुरूष वेतनात असमानता, ग्रामीण क्षेत्रात स्त्रीयांच्या शिक्षणाचे अल्पप्रमाण, मुलींना सुनांना, शिकविण्याची नसलेली मानसिकता यामुळे स्त्री शिक्षण क्षेत्रात पुढे जावू शकत नाही. उच्च शिक्षण क्षेत्रात ग्रामीण मुलीचे प्रमाण बरेच कमी आहे. विवाहानंतर ग्रामीण मुलींना आपले संपुर्ण आयुष्य संसाराचा गाडा ओढण्यातच घालवावे लागते. शिक्षीत कुटूंब असेल आणि सोयी सुविधा उपलब्ध असतील तरच मुलींना पुढे आपले करिअर करण्याची संधी मिळते. मात्र गावाच्या तुलनेत असे सरासरी प्रमाण ४.५ टक्के असावे.

मुळातच ग्रामीण भागात स्त्रीयांचे कुटूंबातील स्थान त्याचे विवाहाचे वय, आरोग्यविषयक सोयी, पाणी, संडास, आहाराच्या बाबतीत उपेक्षा, पती व्यसनी असल्यास होणारा छळ, संयुक्त कुटूंब पद्धतीत तिच्या निर्णयाला नसलेले महत्त्व,

हुंडा पद्धती, रोजगाराच्या अपुरी साधने, वेतनातील विषमता, यामुळे स्त्रीच्या वाट्याला आर्थिक परावलंबन, माहेरून पैसे आणण्यासाठी होणारी मारझोड, अल्पवयात होणारी बाळंतपणे, कुपोषण, आरोग्य, अशा अनेक समस्यांचा सामना करणारी स्त्री सक्षमीकरणाकडे कशी वाटचाल करणार? त्यासाठी त्यांना शिक्षणासंबंधी, त्यांना मिळणाऱ्या योजनासंबंधी जागृत करणे, त्यांना माहीती देणे गरजेचे आहे.

**ग्रामीण महीला सक्षमीकरणासाठी शासकीय स्तरावर प्रयत्न व योजना :**

महाराष्ट्रात शासनाने १९९४ मध्ये पहिले महिला धोरण जाहीर केले. त्यात काळाला अनुरूप बदल करत २००१ मध्ये दुसरे तर २०१४ मध्ये तिसरे महिला धोरण निश्चित केले गेले. या सर्व धोरणाच्या माध्यमातुन राबवल्या जाणाऱ्या योजनांमध्ये प्रामुख्याने स्त्रीयांवरील हिंसा, अत्याचार, स्त्रीविषयक कायदे, स्त्रीयांच्या आर्थिक सामाजीक दर्जात सुधारणा, स्त्रीप्रश्न, स्त्रीविकास, याबाबत प्रसार माध्यमांची भुमिका, स्वयंसेवी संस्थाचा वाढलेला सहभाग, स्त्रीयांन केंद्रस्थानी मानून शासकीय स्तरावर योजनांची निश्चिती, स्वयंसहायता बचत गट आणि त्या माध्यमातुन ग्रामीण क्षेत्राचा साधावयाचा विकास याचा प्रामुख्याने विचार केला गेला आहे. याच शासकीय धोरणातुन स्त्रीयांना नोकरीत ३० टक्के आणि स्वराज्य संस्थामध्ये ५० टक्के आरक्षण मिळाले आहे. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या माध्यमातुन ग्रामीण स्त्रीयांना शिक्षण, प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध आहे. त्यांच्याच अभियाना अंतर्गत ग्रामीण महिलांचा सर्वागीण विकास होवुन त्याचे सक्षमीकरण व्हावे यासाठी शासनाच्या विविध योजनांचा संगम घडवुन आणण्याचा प्रयत्न झाला आहे. ८ मार्च ते ५ जुन २०२१ या कालाधीसाठी राज्यात ग्रामीण पातळीवर 'महासमृद्धी महिला सक्षमीकरण अभियान' राबविण्यात येत आहे. २३ फेब्रुवारी २०२१ रोजी शासन निर्णय काढुन राज्य शासनाने मान्यता दिली आहे. पुर्वीच्या ज्या कार्यान्वित योजना आहेत. उदा. निराधार महिलांसाठी शासनाची आधार योजना, बालिका समृद्धी योजना, महिला बचत गट योजना, इंदिरा गांधी महिला संरक्षण योजना, महिलांसाठी व्यावसायीक योजना, देवदासी पुर्नवसन योजना यांना आधिक क्रियाशील केल्या जात आहे. या योजना स्त्री सक्षमीकरणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या योजना आहेत. बऱ्याच योजना शेती, आर्थिक विकास, आरोग्य या गोष्टीशी संबंधित आहे.

भारतीय महिलांच्या सक्षमीकरणासाठी महिला व बालविकास मंत्रालय आणि भारत सरकारद्वारे बऱ्याच योजना राबविल्या जातात. यामागे एक उद्देश, एकच आशा दडलेली असते की एक दिवस भारतीय समाजातील महिलांना पुरूषाच्या बरोबरीने संधीचा लाभ मिळेल. बलात्कार व हुंडा पिडीत महिलांकरीता मनोधैर्य योजना, सिंगल विन्डो सिस्टीम, माझी कन्या भाग्यश्री योजना, बेटी बचाओ, बेटी पढाओ योजना, बाल संगोपन योजना, काम करणाऱ्या महिलांच्या मुलांकरीता राजीव गांधी राष्ट्रीय पाळणाघर योजना, इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना, किशोरीवयीन मुलींसाठी योजना, निराश्रीत महिलांसाठी आधारगृहे, शुभमंगल सामुहिक योजना अशा विविध योजनांच्या माध्यमातुन ग्रामीण असो वा शहरी महिलांना वेगवेगळ्या वयापरत्वे, गरजानुरूप सक्षम करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मुली व स्त्रीयांना आर्थीक दृष्ट्या आत्मनिर्भर करण्यासाठी व्यावसायीक व तांत्रीक प्रशिक्षण, केटरिंग, ब्युटिपार्लर, दुग्धजन्य पदार्थाचे उत्पादन, अन्न प्रक्रिया व्यवसायाचे प्रशिक्षण, संगणक दुरूस्ती, मोटार ड्रायव्हींग, परिचारिका प्रशिक्षण, शिवणकाम, विणकाम प्रशिक्षण, हस्तकौशल्य प्रशिक्षण, विमा एजंट, ज्वेलरी मेकिंग, कचऱ्याचे विभाजन व व्यवस्थापन, रोप वाटीका प्रशिक्षण, स्वसंरक्षण शारिरीक विकास प्रशिक्षण, महिलांसाठी घरकुल योजना, जिजाऊ वसतीगृह योजना, महिला हेल्पलाईन योजना, उज्वला योजना, पंचायती राज योजनांमध्ये महिलांना संरक्षण अशा अनेक योजनांचा लाभ ग्रामीण महिलाही घेत आहे. स्वयं सहायता बचत गटाच्या माध्यमातुन त्या अर्थाजनाकडे वळुन इतर महिलांना आपल्या गटात सहभागी करून त्यांनाही आर्थीक दृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न केल्या जात आहे. स्वयं सहायता बचत गट आणि इतर योजनाच्या माधमातून स्त्रीया 'चुल आणि मुल' यातून बाहेर पडू पाहत आहे. शासकीय योजना आणि स्वयं सहायता बचत गटाच्या माध्यमातून स्त्रीया पोल्ट्रीफार्म, वसतीगृह, शिवणक्लास, काजू फॅक्टरी, शेळी पालन उद्योग, गावातील पाणीपुरवठा प्रश्नांची सोडवणूक, सामुहीक शेतीचा प्रयोग, सामुहीक दुग्ध व्यवसाय, सॅनिटरी नॅपकिन उद्योग, सायकल, स्कुटी स्टॅन्ड चालविणे, अंगणवाडी आहार पुरविणे, आयुर्वेदिक औषध बनविणे, साठवणीचे पदार्थ, वाळवणे बनविणे, तयार वस्त्र व साड्या, अगरबत्ती, बांबुच्या शोभीवंत वस्तु बनविणे, विक्रीस ठेवणे, या सेवा पुरवत आहे. ट्रक, ट्रेन चालविण्यापर्यंत स्त्रीयांची मजल गेली आहे.

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुली आपल्या वडीलांसाठी लढायला पुढे येत आहे. या सर्व घटनांशी संबधीत उदाहरणे पाहिल्यानंतर भारतातील ग्रामीण स्त्री सक्षमीकरणाच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे दिसत आहे. मात्र ग्रामीण क्षेत्रातील लोकसंख्येच्या केवळ १० टक्के महिलांची ही उदाहरणे असावीत असे दिसते.

त्यासाठी ग्रामीण समाजातील स्त्री विषयक मानसिकता बदलविणे अत्यंत गरजेचे आहे सध्याच्या काळ हा संक्रमणाचा आहे, रोज घडणाऱ्या सामाजीक आर्थीक बदलाचा आहे. पारंपारीक कल्पना समजुतींना छेद दिला जात असतानाच समाजानेही त्या गतीने नवनविन बदल स्विकारणे गरजेचे आहे. स्थानिक प्रशासन पंचायत राज यात लोकांचे प्रतिनिधीत्व करताना त्या पदाचे महत्व पदामार्फत केल्या जाणाऱ्या कार्याची माहीती, आपले स्थान याचे सर्वांगीण ज्ञान स्त्रीयांना मिळणे गरजेचे आहे. पोलिस पाटील, सरपंच, उपसरपंच, सदस्य जील्हा परिषद सदस्य राजकीय क्षेत्रात प्रवेश केल्यानंतर आपले स्थान पतीला देणे आपले अधिकार वापरू देणे आणि पुरूषसत्ताक पद्धतीला प्रोत्साहन देणे चुकीचे ठरते. ग्रामीण भागात शिक्षणाचा दर वाढायला हवा. उच्च शिक्षणाबाबत असलेली अनास्था दूर करायला हवी. मुलगीही कुटूंबाचा आधार बनु शकते हे रूजवायला हवे. ग्रामीण क्षेत्रातील प्रत्येक स्त्री खरेच आर्थिकदृष्टया सक्षम आहे का? कोणत्या मार्गाने ती अर्थाजन करते आहे, ती यशस्वी ठरली आहेत का? यासाठी ग्रामपंचायत स्तरावर सर्वेक्षण व्हायला पाहीजे. प्रशिक्षण शिबीरे, कायद्याबाबत जाणीव होण्यासाठी मार्गदर्शन वर्ग, आरोग्य विषयक, संरक्षण विषयक प्रशिक्षण मिळायला हवे. त्याची अंमलबजावणी व्हायला हवी. शासनाच्या योजनांचा ग्रामीण क्षेत्रातील मोजक्या लोकांपुरती सीमीत नसाव्या. त्यांची अंमलबजावणी कितपत झाली, प्रत्येक गावातील स्त्रीयांची संख्या आणि त्याचे अर्थाजनाचे मार्ग यांची सांगड घालायला हवी. आजच्या तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रत्येक ग्रामीण स्त्री संगणकाच्या माध्यमातून जगाशी संवाद साधू लागली, ती आत्मनिर्भर होवून व्यवहार करू लागली, आधुनिक पुर्व काळातील ग्रामीण स्त्रीयाचे खरे सक्षमीकरण ठरेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही त्यांच्या जिवनामध्ये स्त्रीयांच्या प्रगतीला, विकासाला अत्यंत महत्वाचे स्थान दिले. त्यांच्याच शब्दात 'एखाद्या समाजाची, देशाची प्रगती मोजायची असेल तर त्या समाजातील महिलांची प्रगती किती झाली हे मी मोजतो' डॉ. बाबासाहेबांना ही स्त्री सक्षम व्हावी असे वाटत होते.

## संदर्भ ग्रंथ सुची

१) कवी डॉ. स्वाती :स्त्री विकासाच्या पाऊलखुणा प्रतिमा प्रकाशन औरंगाबाद २१०

२) नेहेते डॉ. स्मीता : भारतीय स्त्री आणि मानवाधिकार साईनाथ प्रकाशन, धरमपेठ नागपूर जुलै २०११

३) परूळेकर डॉ. आशा : आधुनिक स्त्रीयांच्या समस्या मेहता पब्लिशिंग हाऊस सदाशिव पेठ पुणे १९९२

४) साने गीता : भारतीय स्त्री जीवन मौंज प्रकाशन गृह, दादर मुबंई १९९६

५) वैरागडे डॉ. उज्वल मुळे प्रा. विधुल्लता : सामुदायिक विकास व महिला सबलिकरण विद्या बुक पब्लिशर्स औरंगाबाद २०१२

६) नानिवडेकर मेघा (संपा) महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा प्रतिमा प्रकाशन सदाशिवपेठ पुर्ण २००६

७) अहिरे डॉ. प्रतिमा समाजशास्त्रीय प्ररिप्रेक्ष्यातून स्त्रीयांची आत्मकथने कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद जाने मे २०१२

८) सावरकर विनायक दामोधर : प्राचीन अर्वाचीन महिला रिया पब्लिकेशन्स कोल्हापूर मे २०१२

९) गाडगीळ मालती : समानतेचा वाटेकर दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे ३०

१०) टिळक कमलाबाई :स्त्री जीवनाची नवी क्षितीजे जग्गनाथ प्रकाशन पुणे जाले २०११

११) गोटे डॉ. शुभांगी : स्त्री परिवर्तनाची आव्हाने व्हीनस प्रकाशन पुणे २०१३

१२) कऱ्हाडे डॉ. बी.एम. : भारतीय समाज प्रश्न आणि समस्या पीपंळापुरे प्रकाशन महाल नागपूर २००९

१३) लांजेवार ज्योती : भारतीय समाज आणि स्त्री सुगावा प्रकाशन पुणे २००३

१४) देशमुख शारदा : शिवकाळातील व पेशवाईतील स्त्री जीवन आनंद मुद्रणालय सदाशिवपेठ पुणे १९६३

१५) काळे अक्षयकुमार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व्यक्ती वाड;मय सुविचार प्रकाशन मंडळ धंतोली नागपूर २००८

१६) पवार एस.बी. बचत गटासाठी स्वयंरोजगाराचे ५१ मार्च ऑगसट २००९ निशिता पब्लीकेशन्स गोखले नगर पुणे

१७) राऊत प्रा. गणेश राऊत प्रा. ज्योती : महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास डायमंड पब्लिकेशन्स पुणे २००७

१८) कोलारकर शं.गो. : आधुनिक विदर्भाचा इतिहास श्री. मंगेश प्रकाशन रामदापेठ नागपूर २००३

१९) पाठक डॉ. दमयंती : वैदर्भीय महिलांचे स्वातंत्र्य संग्रामातील सहकार्य मंगेश प्रकाशन, रामदासपेठ नगापूर २००३

२०) मुलाणी प्रा. एम.यु. : महिला स्वयं सहाय्यती बचत गट डायमंड पब्लिकेशन्स सदाशिवपेठ पुणे डिसेंबर २००६

२१) इंटरनेटवरील उपलब्ध माहिती व विषयाशी संबंधीत लेख

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, July 2022, Volume-14 Issue-8

# मराठी वाङ्मयातील सामाजिक जाणीवांचे स्वरूप

**प्रा. डॉ. पुरूषोत्तम नंदेश्वर**
मराठी विभाग प्रमुख) स्व. निर्धन पाटील वाघाये, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सानगडी
ता. साकोली, जि. भंडारा

**DOI-10.5281/zenodo.6988539**

**प्रास्ताविक** आधुनिक मराठी साहित्याचा उदय अव्वल इंग्रजी कालखंडात झाला. ब्रिटीशांनी निर्माण कलेले कायदे, सुधारणावादी भूमीका, शिक्षणाचा प्रसार यामुळे वैचारिकतेला, सुधारणावादाला गती मिळाली. चिपळुणकरांच्या निबंधमालेने महत्वाची भूमिका बजावली. समाजसुधारकांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्यक्ष विचार व कृतीव्दारे प्रबोधनाला तीव्रपणे चालना दिली. नवा विचार तळागाळापर्यंत नेऊन पोहचवला. यामध्ये महात्मा फुले, न्या. रानडे, महर्षी कर्वे विठ्ठल रामजी शिंदे, लोकहितवादी, गो.ग. आगरकर,सावित्रीबाई फुले आणि पंडीता रमाबाई हे आधुनिक मराठी साहित्याचे खरे शिल्पकार ठरले.

भारतातील समाज परंपरेविरूद्ध न्यायासाठी बंड करणारे पहिले पुरूष जोतीबा फुले आहेत. हजारो वर्षापासून येथिल जनमनात ईश्वरी संकेतानुसार बसून असलेले उच्च—निचतेचे भाव आणि पूर्वकर्माचे संबंध त्यांनी पूर्णपणे नाकारले. जनमानसात कायमचे घर करून बसलेली महापापाची आणि अपवित्रतेची भीती त्यांनी क्रांतिकारक, पुरोगामी विचारांनी उलगडून दाखविली. त्यामुळे मानवी जीवनाचे नैतिक सत्य हेच चिरंतन सत्याचे स्वरूप आहे. विश्वमानवाच्या मुक्ततेचा सिद्धांत आहे हे ठाम मत त्यांनी प्रतिपादित केले.

भारतीय लोकशाही क्रांतीची मूलभूत तत्वे विशद करून सांगणारा महात्मा फुल्यांचा ‘सार्वजनिक सत्यधर्म’ म्हणजे विश्व कुटुंबवादाचा जाहीरनामाच आहे. त्यामध्ये मानवी हक्क, त्यावर आधारलेला विश्व कुटुंबवाद आणि जीवनाचे व विश्वाचे सत्य स्वरूप प्रकट करणारी बुद्धीप्रामान्यवादी जीवनदृष्टी अभिव्यक्त होतांना दिसते. सत्यवर्तनाच्या संदर्भात महात्मा फुले म्हणतात, ‘‘एकंदर सर्व स्त्रियास अथवा पुरूषास एकंदर सर्व मानवी हक्काविषयी आपले पाहिजेत तसे विचार आपली पाहीजेत तशी मते बोलून दाखविण्यास, लिहीण्यास आणि प्रसिद्ध करण्यास स्वतंत्रता दिली आहे. परंतु ज्या विचारापासून व मतांपासून कोणत्याही व्यक्तीचे कोणत्याच प्रकारचे नुकसान मात्र होऊ नये म्हणून ते खबरदारी ठेवतात. त्यास सत्य वर्तन करणारे म्हणावेत. ’’[१] फुल्यांनी सामाजिक विचाराप्रमाणेच सत्यवर्तनालासुद्धा महत्वपूर्ण मानले आहे.

मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी ज्याप्रमाणे स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक मूल्यांची आवश्यकता भासत असते. त्याचप्रमाणेच प्रखर वैचारिकतेचीही आवश्यकता भासते. तळागाळातील शूद्र—अतिशूद्र, शेतकरी—कामकरी, श्रमिक वर्गाचे उच्चाटन सर्वांगीणरीत्या करावयाचे असेच तर प्रथमतः त्याला आपल्या मानवी हक्काची जाणीव असणे आवश्यक आहे. तेव्हाच तो खऱ्या अर्थाने आपल्यावरील अन्यायाविरूद्ध पेटून उठेल. आपला शत्रू कोण आहे याची जाणीव होऊन नव्या जीवनाच्या शोधमार्गाकडे जाण्याचा पर्यत्न करील. यासाठीच फुल्यांना सत्यवर्तनी माणूस खऱ्या अर्थाने महत्वपूर्ण वाटत असल्याचे दिसते. ही विचारसरणी मानवतेचा खऱ्या अर्थाने सर्वांगीण विचार करणारी आहे. याच प्रवाहाच्या दिशेने न्या. रानडेसुद्धा विचार करतांना दिसतात.

महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाच्या जडणघडणीत न्या. रानडयांनी सक्रियरीत्या सहभाग घेतला. समाजसुधारक, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, दूरदृष्टीचे विवेचक व स्वतंत्र भारताचे द्रष्टे म्हणून त्यांची प्रसिद्धी होती. तत्कालीन समाजजीवनाच्या परिवर्तनाशी आणि प्रमुख चळवळीशी त्यांचा संबंध होता. इ.स.१८७० साली त्यांनी ‘सार्वजनिक सभेची’ स्थापना केली. सनदशीर मार्गाने राजकत्यापुढे समाजाची गाऱ्हाणी मांडावी व राजकर्त्याच्या सदसद्विवेकबुद्धीला आव्हान करावे हा एक उपक्रम त्यांनी चालविला. महाराष्ट्रातील निरनिराळया जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीची

पाहणी करण्याचे काम सार्वजनिक सभेने केले. ज्ञानप्रसारासारखे उपक्रम राबविले. ग्रंथकारांनी एकत्र येऊन विचारविनिमय करावा ही प्रेरणा दिली. या जाणिवेचे परिणाम नंतरच्या साहित्यकृतीतील वैचारिकतेवर सकसपणे झाल्याचे जाणवते. सामाजिक जाणिवेचा विचार समर्थपणे अभिव्यक्त होण्यासाठी ही पार्श्वभूमी महत्वाची ठरली आहे.

महर्षी कर्व्यांनी स्त्री—शिक्षणासाठी सामाजिक समस्या हाताळून फुल्यांच्या चळवळीला मतिमानता मिळवून दिली. सामाजिक प्रश्नांचे निर्मूलन करण्यासाठी शिक्षणाची खऱ्या अर्थाने गरज आहे. याची जाणीव त्यांनी दिली. त्यासाठी त्यांनी हिंगणा येथे शाळा काढली. याच दरम्यान भाऊ महाजन यांच्या 'प्रभाकर' मधून लोकहितवादींची शतपत्रे प्रकाशित झाली. या शतपत्रांनी एक नवी प्रबोधनाची दृष्टी दिली. त्यातून त्यांनी ब्राम्हणावर, ब्राम्हणी वर्चस्वावर, जातिभेदाच्या कल्पनांवर, धार्मिक अंधश्रद्धांवर, वाईट चालीरीतीवर आणि निरूपयोगी पुराण ग्रंथावर अंत्यत परखडपणे विवेचन केले. तसेच ज्ञानाविषयीसुद्धा त्यांनी आधुनिक विचार मांडले. या संदर्भात ते म्हणतात, '' ज्ञान हे सर्व रोगांचे औषध आहे आणि ज्यास ज्ञान आहे त्यास आपली स्थिती सुधारण्यास पुष्कळ वाटा सापडतात. यास्तव जे गरीब लोकांची स्थिती चांगली व्हावी अशी इच्छा करतात. त्यांनी गरीब लोकांमध्ये ज्ञानप्रसृती करावी व सरकारचा हा मुख्य धर्म आहे. सरकारने अपराधाचे मूळ तोडले पाहीजे. कैदखाने व शिपाई मूळ तोडीत नाहीत.''[२] अशा प्रकारे ते सोप्या, सरळ आणि सडेतोड शब्दांत विचार मांडताना दिसतात.

गो. ग. आगरकरांनी प्रारंभी 'केसरी' मध्ये लेखन केले. परंतु नंतर लोकमान्य टिळकांशी वैचारिक मतभेद झाल्यामुळे १८८७ मध्ये त्यांनी केसरीशी संबंध तोडला आणि 'सुधारक'काढून त्यातून सामाजिक समस्यावर प्रहार करणारे पूरोगामी विचारधारेचे, परिवर्तनवादी लेखन प्रखरपणे मांडले. आगरकरांनी आपल्या बुद्धीप्रामाण्यवादी तत्वज्ञानाव्दारे नवी जीवनदृष्टी व वाङ्मयीन दृष्टी दिली. तर्कशुद्ध विचारसरणी, सामाजिक समस्यांना प्राधान्य, स्वातंत्र्यांची तळमळ व स्वार्थत्याग हे आगरकरांनी आपल्या व्यक्तिमत्वानिशी लेखनात जोपासलेले गुणविशेष होते. याविषयी डॉ. निर्मलकुमार फडकुले म्हणतात, ''आगरकरांची राजकीय दृष्टी संपूर्ण स्वातंत्र्याच्या पुरस्काराची असली तरी सामाजिक सुधारणांना अग्रक्रम दिला पाहिजे, असे लोकहितवादी प्रमाणेच त्यांनाही वाटत होते. ऐहिक जीवनावरील निष्ठा, धर्मातील प्रतिगामी आचार—विचारावर टीका व बुध्दिवाद ही या दोन्ही विचारवंतात समानच आहेत. दोघांचाही व्यक्तिप्रामाण्याला, ग्रंथप्रामाण्याला कडवा विरोध होता. दोघांचे वैचारिक अधिष्ठान एकच असूच बुध्दिवादावरील विश्वास उत्कट आहे. आगरकरांच्या विचारांना लोकहितवादींच्या वाङ्मयातून नि:संशय प्रेरणा मिळाली असे म्हणता येईल. कारण दोघांचे विचार सारखेच तीव्र असून त्यांचा कणा एकच आहे. आगरकरांच्या आधी कितीतरी वर्षे बुध्दिवादांची गर्जना लोकहितवादींनी केली. या विचारांचा परिणाम आगरकरांवर झाला यात शंका नाही.''[३] ही त्यांची लोकहितवादी आणि आगरकरांच्या वैचारिकतेविषयी मीमांसा सामाजिक जाणिवेच्या दृष्टीने महत्वाची आहे.

पुढील कालखंडात लोकहितवादी आणि आगरकरांच्या विचारसरणीचा परिणाम केशवसुत आणि ह.ना. आपटयांच्या व्यक्तिमत्वावर आणि वाङ्मयीन लेखनावर झाल्याचे दिसते. त्यामुळेच त्यांच्या साहित्यनिर्मितीत सामाजिक जाणीव प्रखरपणे साकार झालेली आढळते. जी सुधारणावादी विचारांची पायाभरणी या दोनही महान साहित्यिकांच्या साहित्यातून अंकित झाली आहे. त्या सामाजिक जाणिवेने मराठी साहित्य श्रेष्ठ ठरले आहे. या संदर्भात अ.ना. देशपांडे म्हणतात, ''या कालखंडातील सर्व कथा कादंबरीकारांचे हरिभाऊ आपटे हे अनभिषिक्त सम्राट आहेत. कथानकांची गुंफण, स्वभाव रेखाटन, मनुष्य स्वभावाचे सूक्ष्म अवलोकन, जीवनदृष्टीचे व्यापकपण, वास्तवतावाद आणि ध्येयवाद यांचे रम्य आणि स्फूर्तिदायक समीलन या सर्व गुणाच्या दृष्टीने हरिभाऊंच्या कादंबऱ्यांचे स्थान या कालखंडात केवळ आद्वितीय व अन्यन्य श्रेष्ठ आहे.''[४] यावरून आपटयांच्या

कथा—कादंबऱ्यांतील सामाजिक जाणिवेचे प्रगल्भता आपल्याला लक्षात आल्याशिवाय राहात नाही.

या समाजसुधारकांच्या वैचारिक संघर्षातून आधुनिक मराठी साहित्यप्रवाहाला खऱ्या अर्थाने एक नवी सामाजिक मूल्यांची पार्श्वभूमी लाभली. केशवसुतांची कविता ही अर्वाचीन मराठी कवितेची जनक ठरली. त्याचप्रमाणे ह.ना. आपटयांची कथा—कादंबरी आधुनिक मराठी साहित्याची जनक ठरल्याचे दिसते. या सामजिक जाणिवेमुळेच त्यांचे साहित्य श्रेष्ठ ठरले आहे. त्यांच्या कविता, कथा, कादंबरीतून परंपरावादी सूत्रे नाकारून नवी सुधारणावादी, समाज परिवर्तनाची सूत्रे जन्माला आली. ती सर्वसामान्यांना आपलीच वाटू लागली. त्यांनी जातिभेद, वर्ग, वर्ण, परंपरा, धर्म आणि अध्यात्मवादासारख्या अमानवी मूल्यांना नाकारले. त्यामध्ये 'ब्राम्हण नाही, हिंदूही नाही, न मी एक पंथाचा' असे ठणकावून सांगणारे मानवतावादी केशवसुतांचे तत्वज्ञान होते. नवी मानवी मूल्ये आणि जीवनमूल्ये हिच समाजाला खऱ्या अर्थाने प्रगतीच्या मार्गाकडे संक्रमित करू शकतात ही जाणीव यामध्ये होती.

स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि सामाजिक न्यायाच्या पुरोगामी प्रवाहाला प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न फुले—लोकहितवादींच्या कालखंडापासून झाला. परंतु हाच प्रवाह पुढील कालखंडातसुध्दा मानवी उध्दारासाठी आणि समजोद्धारासाठी नानाविध माध्यमांतून अभिव्यक्त झाला. त्यांचा संस्कार हेच सामजिक प्रबोधन ठरले. जुन्या विचारांची चौकट मोडून नवे विचार, नव्या आशा—आकांशा मराठी कथा, कादंबरी, सामाजिक वैचारिकतेला व जडणघडणीला द्यावे लागते. इथूनच मराठी साहित्यातील वाङ्मयप्रवाहामध्ये सामाजिक जाणिवेचा प्रांत खऱ्या अर्थाने समृध्दशील बनला.

**अव्वल इंग्रजी काळात सामाजिक जाणिवांचा उदय**

आधुनिक मराठी वाङ्मयातील सामाजिक जाणिवांचा उदय इंग्रजी राजवटीपासून खऱ्या अर्थाने प्रारंभ झाल्याचे दिसून येते. इ.स. १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त होऊन इंग्रजी अंमल सुरू झाला. परिणामी त्यांच्या आगमनाने महाराष्ट्रात एक 'नवे युग' घडून वैचारिक उत्क्रांतीची दारे मोकळी झालीत. या वैचारिकतेचा प्रभाव भारतीय जनमानसावर पडून तो व्यक्तिगत आणि सामाजिक विचार करू लागला. सर्वसामान्य मानवी विकासासाठी ज्याप्रमाणे शिक्षण आवश्यक आहे, त्याचप्रमाणेच समाज विकासासाठी वैज्ञानिक दृष्टिकोनसुध्दा आवश्यक ठरतो याची जाणीव भारतीयांना झाली. इंग्रजांनी नवीन विचारांना प्राधान्य दिले. त्यामधून शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक विचारामध्ये बऱ्याच प्रमाणात परिवर्तन घडवून आणले जाऊ शकते, याची जाणीव त्या कालखंडात काही भारतीय समाजसुधारकांना झाली. एकीकडे त्यांच्या नजरेसमोर परंपरावादी जाती, धर्मव्यवस्थेला कवेत घेऊन अंधश्रध्देत जगणारा समाज दिसत होता; तर दुसरीकडे युरोपातील औद्योगिकीकरणातून पुढे आलेली वैज्ञानिक क्रांती दिसत होती; अशा परिस्थितीत सामाजिक सुधारणांना केंद्रस्थानी मानून काही सुधारकांनी भारतीय स्त्री—पुरूष सुधारणेचा वसा हाती घेतला. परिणामी यातून सामाजिक क्रांती होऊन मानवी जीवन परिवर्तन व समाज परिवर्तनाला एक नवी दिशा प्राप्त झाली. त्यामधूनच सामाजिक जाणिवांचे वाङ्मय निर्माण झाले.

१७ व्या शतकात झालेल्या युरोपातील वैज्ञानिक क्रांतीचे खोलवर पडसाद सामाजिक आणि वैचारिक मूल्यांवरही जाणवू लागले. यातूनच नवी विचारमूल्ये, नवी जीवनमूल्ये, नवी सांस्कृतिक मूल्ये हळूहळू गतिशील होऊ लागली. युरोपातील औद्योगिकीकरणाचा परिणाम हळूहळू भारतीय सर्वसामान्य जनतेवर पडू लागला. परंतु एकीकडे नवी विचारमूल्ये आणि दुसरीकडे मानसिक गुलामगिरी अशी दुहेरी मिश्रणाची अवस्था प्रत्यक्षरीत्या निर्माण झाली. ही दरी दूर करून नव्या युगधर्माची संस्थापना करण्यासाठी विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी 'निबंधमाले' चा (इ.स. १८७४) आधार घेतला. याच कालखंडात न्या. रानडे, महात्मा फुले, लोकहितवादी, महर्षी कवे, आगरकर यांनी समाज सुधारणेची एक नवी पार्श्वभूमी गतिशील केल्याचे दिसते. सामाजिक सुधारणेचा एक नवा ध्यास घेऊन परंपरावादी भारतीय समाजव्यवस्थेला ते जागृत करताना

दिसतात. यामधूनच स्वातंत्र्यपूर्व काळात सामाजिक जाणिवांचा उदय झाला आहे.

इ.स. १८१८ ते १८७४ या कालखंडात एकीकडे शिक्षण व समाज परिवर्तन गतिमान होत होते, तर दुसरीकडे परिवर्तन परिस्थितीला विरोधही केला जात होता. जीवनातील आचार, विचार आणि व्यवहाराच्या क्षेत्रात सुधारणातून प्रेरणा घेऊन जो एक नवा वर्ग निर्माण झाला त्याने परंपरेविरूध्द संघर्ष देत रूढी, अंधश्रध्दा, व्रतवैकल्ये यांना नाकारले आणि समाज सुधारणेला महत्व दिले. परंपरावाद्याने केलेल्या अन्यायाला विरोध करण्याची जाणीव समाज सुधारकांकडे निर्माण झाली. यामध्ये महात्मा फुलेंनी केलेल्या स्त्री—शिक्षणाच्या क्रांतीने स्त्री वर्गाला ज्ञानाचा नवा प्रकाश प्राप्त झाला. तर दुसरीकडे पुरोहित वर्गाच्या लोकांनी धर्म बुडत असल्याची भूमिका घेतली. या कालखंडातील विचाराचे वर्णन करतांना लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, ''मानवाच्या मूलभूत समतेच्या कल्पनेमुळे बंधनाचा उच्छेद करणारी स्फूर्ती असलेला पूर्वग्रह नष्ट झाला व सर्व संस्कृ तीचा सारभूत अंश ग्रहण करण्याइतकी उदारतापूर्ण सारासार बुध्दी जागृत झाली. या विविध मूल्यांमुळे ऐहिकताप्रधान विचारसरणी उत्पन्न झाली. त्यामुळे इहलोकातील जीवनक्रमाचा ऐहिक मानवी हिताच्या कसोटीवर बुध्दिवादी विचार सुरू झाला आणि पारलौकिक हिताहिताचा संबंध केवळ सुध्द व व्यापक अशा नैतिक तत्वाशीच जोडला गेला. धर्मग्रंथांमधील व रूढीमधील अंधश्रध्देवर आधारलेले आचारविचारांचे नियमन म्हणजे खरा धर्म नव्हे, अशी जाणीवही दृढ होऊ लागली.''[५] या जाणिवेमुळे महाराष्ट्रीय जनसामान्यांमध्ये एक वेगळे सामाजिक प्रबोधनाचे वातावरण निर्माण झाले. या विचाराने सामाजिक जाणिवांच्या वाङ्मयनिर्मितीला वेग प्राप्त झाला.

एकीकडे वैज्ञानिक जीवनदृष्टीतून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाचे आधुनिक विचार गतिशील होत होते तर दुसरीकडे परंपरावादी विचारही यातूनच पुढे येत होता. त्यांचे नेतृत्व ढोबळमानाने फुले आणि विष्णुशास्त्री चिपळूणकर हे दोन प्रवाह करतांना दिसून येतात. यातूनच पुढे वैचारिकतेतून सांस्कृतिक—सामाजिक जीवनात स्थिती—गतीची द्वंद्वात्मकता अस्तित्वात आली. सुधारणाविरूध्द सुधारणेला विरोध करणारे ईश्वरवादीविरूध्द निरीश्वरवादी अशा दोन वैचारिक संघर्षातून मानवतेच्या मूल्याची निर्मिती होऊ लागली.

इ.स. १८८५ मध्ये राष्ट्रीय सभेची स्थापना झाली. त्यानुसार आपण भारतीयांच्या प्रगतीसाठी आवश्यक असलेले अधिकार सनदशीर मार्गाने प्राप्त करून घ्यावयाचे असे मत प्रतिपादित करणारा एक मवाळ गट उदयाला आला तर ब्रिटिशांकडून आपले अधिकार हिसकावून घेतले पाहिजे, असे मत मांडणारा दुसरा जहाल गट होता. या जहाल गटात लोकमान्य टिळकांचाही समावेश होता. विशेषत: राजकारणाची धुरा त्यांनी सांभाळण्याचा प्रयत्न केला.

आधी राजकीय की सामाजिक हा प्रश्न राष्ट्रीय सभेच्या राजकारणात प्रबळ ठरताना दिसतो. अर्थात त्यामध्ये सुधारणावादी पक्षाची भूमिका आगरकरांनी अत्यंत निर्भयपणे व नि:संदिग्धपणे घेतली. टिळकांप्रमाणे तेही ध्येयवादी व चिपळूणकरांच्या 'निबंधमालेने' प्रेरित झालेले होते. शिक्षण संस्था काढण्यातही टिळकांना त्यांनी सहकार्य केले. 'केसरी' तही सहकार्य केले. परंतु टिळक हे सनातन्यांचे अग्रणी असल्यामुळे त्यांचा पिंड व्यवहारी राजकारण्याचा होता.

परिणामी टिळकांनी प्रथमत: सामाजिक सुधारणेऐवजी राजकीय सुधारणा आवश्यक असल्याची भूमिका घेतली तर समाज परिवर्तनासाठी सर्वंकष सुधारणा, सर्वांगीण सामाजिक सुधारणा आवश्यक आहे ही सुधारणावादी भूमिका आगरकरांनी घेतली. ते तत्वनिष्ठ क्रांतिकारक असल्यामुळे बुध्दिप्रामाण्यवादी वैचारिकतेला मोठया प्रमाणावर भर देत असत. सत्य असेल ते बोलणार आणि इष्ट असेल तेच करणार ही त्यांची वृत्ती होती. परिणामी टिळक — आगरकरांच्या वृत्तीविरोधामुळे मतभेद होऊन १८८७ मध्ये त्यांनी केसरीशी संबंध तोडला आणि 'सुधारक' सुरू केले. या सुधारकमधून त्यांनी प्रामुख्याने जे बुध्दिप्रामाण्यवादी विचार मांडले त्यातून मध्यमवर्गाला एक नवी प्रेरणा मिळाली. तत्कालीन स्त्री—वर्गाचे सामाजिक प्रश्न त्यांनी सुधारकातून समर्थपणे वाचकांसमोर आणले. म्हणूनच मध्यमवर्गाने

आगरकांना आपला तत्ववेत्ता मानल्याचे दिसून येते.

**मराठी साहित्यातील सामाजिक जाणिवांच्या प्रेरणा**

अव्वल इंग्रजी कालखंडाच्या या पार्श्वभूमीवर मराठी साहित्यात सुधारणावाद, विवेकवाद, मानवतावाद, परंपरावार, इत्यादी विचारांनी साकार झालेले साहित्य उदयास येऊ लागले. त्यामागे महात्मा फुले, लोकहितवादी, न्या. रानडे, महर्षी कर्वे, सावित्रीबाई फुले आणि आगरकरांसारख्या समाजसुधारकांच्या प्रेरणा होत्या. त्याचप्रमाणे विष्णुशास्त्री चिपळूणकर, लो. टिळक यासारख्या विचारवंताच्या प्रेरणेतून वाङ्मय निर्माण होत होते. त्यांचा परिणाम पुढील कालखंडातील कविता, कथा, कादंबरी, नाटक आणि वैचारिक निबंधासारख्या वाङ्मयप्रकारावर घडून आला आणि मराठी साहित्यात सामाजिक जाणिवांच्या प्रेरणा उदयास आल्या. त्या प्रामुख्याने सुधारणावादी व परंपरावादी या दोन प्रवाहाने गतिमान झाल्या.

नव्या जीवन जाणिवेची आणि समाज जाणिवेची आधुनिक मूल्य ही वाङ्मयीन जाणिवेची प्रमुख अंगे बनली. याच प्रेरणेतून केशवसुतांच्या कवितेनी सामाजिक क्रांतीचे रणशिंग फुंकले. नव्या मनूतील नव्या युगाचा शूर शिपाई उभा केला तर ह.ना. आपटयांनी कथा—कादंबरीला समर्थपणे हाताळून स्त्रीमनाच्या वेदना आण सामाजिक समस्यांना तीव्रतेने मांडले. वैचारिक निबंधाची पार्श्वभूमी लोकहितवादी आणि आगरकरांनी सशक्त करून ठेवली आणि तीच आधुनिक साहित्याची मुख्य प्रेरणा झाली.

अर्वाचीन कालखंडाचा विचार करता राजकीय स्वातंत्र्याचा प्राप्तीसाठी चिपळूणकर टिळकांची प्रेरणा होती. त्याचप्रमाणे सामाजिक समतेच्या निर्मितीसाठी आगरकरांची प्रेरणाही कारणीभूत ठरत होती. या प्रेरणेतूनच जीवनाविषयीच्या नव्या जाणिवांतून आदर्शवाद निर्माण झाला. मानवी जीवन कसे असावे, कसे असले पाहिजे. या प्रेरणेतूनच या दृष्टिकोनातून लेखकांनी आपल्या लेखण्या गतिमान केल्या. परिणामी नवी मूल्ये आणि नवे आदर्श निर्माण झाले. या जाणिवेतून निर्माण झालेले साहित्य हे मध्यमवर्गीयांनी मध्यमवर्गीय मनोवृत्तीने मध्यमवर्गीय वाचकांसाठीच लिहिलेल्या स्वरूपाचे होते. येथील बहुजन समाजाच्या दैन्य दारिद्रयाविषयी परंपरावाद्यांनी फारसे लेखन केले नाही. परंपरावादी महर्षी आणि ब्रिटिशांच्या संदर्भात अविनाश सहस्त्रबुध्दे म्हणतात, ''१८७५—१९२० या काळातल्या वाङ्मयाबाबत असे म्हणता येईल की त्या वाङ्मयाचे प्रेरक तत्व व्यक्तिस्वातंत्र्याधिष्ठित मानवी स्वातंत्र्य हे होते. या कालखंडातील लेखकांना व्यक्तीच्या सर्जनशील वृत्तींना मोकळा वाव देणाऱ्या नवसमाजाचे स्वप्न सतत प्रेरणा देत होते. समकालीन जीवनात जो नव्या—जुन्या मूल्यांचा, विचारांचा, प्रवृत्तीचा संघर्ष चालू होता त्यामध्ये त्या लेखकांची भूमिका तटस्थ उदासीनतेची नव्हती तर समाजात रूजू पाहात असलेली सामाजिक सुधारणेची आधुनिक विज्ञाननिष्ठ दृष्टी अंगीकारणारी होती.''[६] हे म्हणणे संयुक्तिकपणाचे वाटते.

**स्वातंत्र्यपूर्व काळातील सामाजिक जाणिवा**

१९२० नंतर गांधी—आंबेडकर यांची विचारसरणी उदयास आली तर १९३० च्या दरम्यान मराठी साहित्यामध्ये मार्क्सवादाबद्दल चर्चा सुरू झाली. कथा—कादंबऱ्यांच्या क्षेत्रात ना.सी. फडक्यांनी मनोरंजनवादी 'कलावादी' तर वि.स. खांडेकरांनी 'जीवनवादी' तत्वज्ञानाचे नेतृत्व केले. याच कालखंडात गांधीजीच्या प्रत्यक्ष अध्यात्मवादी जीवन आणि विचारांचासुध्दा प्रभाव जनसामान्यांवर पडत होता तर दुसरीकडे डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक व वैचारिक क्रांतीने बहुजन समाजाचे नेतृत्व केले. गांधी व आंबेडकरांच्या वैचारिक संघर्षातून सामाजिक — राजकीय जीवन ढवळून निघत होते. या धकाधकीच्या कालखंडात महाराष्ट्रामध्ये साहित्यकारण, राजकारण आणि समाजकारण या तिन्ही गोष्टीतून सामाजिक वैचारिक मंथन होत होते.

एकंदरीत मानवी समाजाच्या उत्कर्षासाठी डॉ. आंबेडकरांनी ते नवे तत्वज्ञान मांडले त्यातून पुढे मराठी वाङ्मयात 'दलित साहित्या'ची चळवळ गतिमान झाली. याच कालखंडात गांधीवादी विचारसरणीतूनही मराठी साहित्य घडत होते. तरीसुध्दा अवघ्या १५—२० वर्षांच्या कालखंडात आंबेडकरांच्या प्रेरणेतून ही चळवळ भारतीय पातळीवर

गतिमान झाली. एकूणच वैचारिक संघर्षातून मराठी वाङ्मयीन प्रवाहाची जडणघडण होण्यासाठी गांधीवादी व आंबेडकरवादी विचारसंघर्ष आणि कलावादी, जीवनवादी वैचारिक संघर्ष महत्वपूर्ण ठरतांना दिसतो आणि सामाजिक जाणिवांची नवी गतिमानता वाङ्मय व लेखक यांना प्रभावित करताना आढळते. एक नव्या जाणिवांची दिशा साठोत्तरी मराठी साहित्यात गतिमान झालेली दिसते. त्यामधून नवे वाङ्मयप्रकार साकार झाले. नवीन सामाजिक जाणिवांचा अविष्कार झाला. सामाजिक जाणिवांच्या नव्या वाटा आणि वळणे विकसित झाली.

**संदर्भ टिपा**

१) य.दि. फडके (संपादक), 'महात्मा फुले समग्र वाङ्मय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, प्र.आ. १९९१, पृ.क्र. ४९९

२) गोवर्धन पारीख : इंदुमती पारीख (संपा.), 'लोकहितवादी समग्र वाङ्मय', खंड महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, १९८८, पृ.क्र. ५२

३) डॉ. निर्मलकुमार फडकुले, 'लोकहितवादी : काल आणि कर्तृत्व', कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे, १९७३, पृ.क्र. १०५

४) अ.ना. देशपांडे, 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास', भाग पहिला, व्हीनस प्रकाशन पुणे, दुसरी आवृत्ती १९६७, पृ.क्र. १८२

५) रा.ग. जाधव (संपा.), 'विचारशिल्प', कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे, दु.आ. १९९४, पृ.क्र. ८७—८८.

६) अविनाश सहस्त्रबुध्दे, 'समाज आणि साहित्य', लोकवाङ्मयगृह मुंबई, १९८०, पृ.क्र. ६०—६१.

# लोकप्रशासनातील आधुनिक विचारप्रवाहः नागरिकांची सनद

**डॉ. बाळासाहेब निर्मळ**
देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद

**DOI-10.5281/zenodo.6988551**

**गोषवारा:** आज उदारीकरण व जागतिकीकरणातून निर्माण झालेली परिस्थिती आणि जनतेच्या मागण्यांना अनुरूप लोक प्रशासनावर पडणाऱ्या नवनवीन जबाबदाऱ्या व आव्हाने पेलण्यासाठी लोक प्रशासनात नवनवीन विचारप्रवाह अस्तित्वात आले आहेत. यामध्ये नवलोकप्रशासन, लोकनिवड दृष्टीकोन, नवलोक व्यवस्थापन, नागरी समाज, नागरिकांची सनद, ई-प्रशासन आणि सुप्रशासन इत्यादी प्रवाह निर्माण झाले आहेत. हे सर्व प्रवाह प्रशासनात परिणामोन्मुखी, विकासात्मक स्वरूप असणारे प्रशासन, लक्ष्योन्मुखी व आधुनिकीकरणाच्या आव्हानास सामोरे जाणारे व त्याचा स्वीकार करणारे प्रशासन, त्याचबरोबर प्रजातांत्रिक मूल्यांशी संबंधित असलेले प्रशासन, प्रशासनात लवचिकतेवर भर देऊन सहभागी तत्त्वास प्राधान्य व कार्यकुशलतेसह लोकांच्या इच्छांची पूर्तता, आर्थिक विकास साधणे, नवाचार आणि प्रभावी एकीकरण असलेली प्रगतशील प्रशासनाची निर्मिती करण्यासाठी वरील सर्व विचारप्रवाह प्रयत्नशील आहेत. कारण हे सर्व विचार प्रवाह चांगले शासन (गुड गव्हर्नन्स) मध्ये समाविष्ट आहेत. म्हणून चांगले शासन निर्मितीसाठी आलेल्या विविध विचार प्रवाहात नागरिकांची सनद हा एक प्रमुख महत्त्वाचा विचारप्रवाह आहे.

नागरिकांची सनदेचा पहिला प्रयोग इग्लंड या राष्ट्राने केला. सन 1990 पासून ग्राहकांचे समाधान वृद्धिंगत करण्यासाठी इंग्लंडमध्ये नागरिकाच्या सनदेचा प्रसार केला गेला. लोकसेवेचा दर्जा उंचावणे वितरण व्यवस्थेत सुधारणा करणे आणि त्याद्वारे लोकसेवा उपभोगणाऱ्या व्यक्तिच्या जवळ जाणे यासाठीची धडपड किंवा प्रयत्न नागरिकांच्या सनदेमधून व्यक्त होतो. 'नागरिकांची सनद' नागरिक प्रशासकीय संघटनांशी व्यवहार करीत असताना त्यांना येणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्याच्या आवश्यकतेला मिळालेला प्रतिसाद असून ही संकल्पना सेवा प्रदाता आणि ग्राहक / जनता यांच्यामधील विश्वास दर्शवते आणि या विश्वासावर अधिक भर देते. 'सनद' या संज्ञेची सर्वसाधारण व्याख्या करताना असे म्हणता येईल की, 'सार्वभौम राजाने किंवा कायदे मंडळाने प्रस्तुत केलेला एक लिखित दस्तऐवज होय.' सनद हा शब्द ऐतिहासिक दस्तऐवजाव्दारे 'मॅग्नाकार्टा' यांच्याशी जोडलेला असून या ऐतिहासिक दस्तऐवजाव्दारे राजा जॉन याने इंग्लंडमधील जनतेला मूलभूत स्वातंत्र्याची हमी दिली. हा अर्थ नागरिकांची सनद या संकल्पनेचा गाभा आहे.

नागरिकांची सनद ही सूक्ष्मदर्शी संकल्पना असून ती संघटनेमार्फत उपयोगात आणली जाते. नागरिकांची सनद दैनंदिन व्यवहार करणाऱ्या व त्यांच्या संपर्कात असणाऱ्या संघटनाकडूनच एक नियम म्हणून घोषित केली जाते. आणि त्यामधून संघटना नागरिकांना विशिष्ट दर्जाची व निर्देशित केलेल्या वेळेत सेवा पुरविणे आवश्यक असते. कारण त्यांनी अशा सेवा नागरिकांना पुरविण्याची संस्थेच्या माध्यमातून हमी दिलेली असते. नागरिकांच्या सनदेची एक अतिशय उल्लेखनीय बाजू म्हणजे नागरिकांच्या सनदेला मान्यता आहे ती प्रामुख्याने नैतिक आहे, अन्य कोणतीही नाही. नागरिकांची सनद जाहीर करणाऱ्या संघटनेकडून ही बाब निसंदिग्ध शब्दात स्पष्ट केलेली असते की, त्याला न्यायालयीन संरक्षण नाही. संघटनेकडून या संनदेचा भंग झाल्यास त्याविरुद्ध नागरिकांना न्यायालयात जाता येत नाही. या दृष्टीने विचार करता नागरिकांची सनद म्हणजे सनदी सेवकांच्या उत्तरदायित्वाच्या नैतिक पैलूवर भर देणारी तरतूद आहे.

'नागरिकांची सनद' ही संकल्पना सर्वप्रथम ब्रिटनमध्ये जॉन मेजर यांच्या नेतृत्वाखाली हुजूर पक्षांच्या शासनाने सन 1991 मध्ये तयार केली. जॉन मेजर यांच्या रूढीवादी शासनाने सन 1991 मध्ये राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत एका ध्येयाने प्रेरित होऊन ही संकल्पना अंमलात आणली. 'या देशातील जनतेसाठी लोकसेवेच्या गुणवत्तेत सातत्याने सुधारणा करणे आणि इंग्लंडमधील लोकसेवांना जगातील पहिल्या क्रमांकाच्या सेवा बनवणे या एका साध्याने प्रेरित होऊन मी नागरिकांची सनद प्रस्तुत केली आहे' असे त्यांनी म्हटले होते.

हे ध्येय साध्य करण्यासाठी देशातील जनतेसाठी असलेल्या सार्वजनिक सेवांची गुणवत्ता सुधारण्यांसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करणे कारण त्या सर्व सेवा जनतेच्या गरजेशी आणि इच्छेशी निगडित असतात. त्यामुळे सनदेच्या माध्यमातून ग्राहकांच्या किंवा जनतेच्या गरजा व आकांक्षांना उत्तम प्रकारे प्रतिसाद देता येईल. व जनतेला अधिक अधिकार प्रदान करता येतील. या ध्येयाने प्रेरित होऊन सनदेमध्ये सहा तत्वांना प्राधान्य देण्यात आले.

**गुणवत्ताः** सेवेची गुणवत्ता सुधारणे.

**निवडः** शक्य होईल तेवढे निवडीसाठी स्वातंत्र्य

**प्रमाणेः** ज्या ठिकाणी प्रमाणाची पूर्तता होत नाही अशा वेळी काय करावे हे सुचविणे.

**मूल्यः** करदात्यांच्या पैशासाठी.

**जबाबदारीः** व्यक्तिगत आणि संघटनात्मक जबाबदारी.

**पारदर्शकताः** नियम/ प्रक्रिया/ योजना/ तक्रारीच्या बाबतीत.

हिच तत्वे 1998 मध्ये श्रमिक सरकारने यामध्ये सुधारणा करून 'पहिली सेवा' या नावाने सेवा प्रदान करण्याची प्रमुख नव्हते म्हणून अमलात आणली ती पुढीलप्रमाणेः

एक सेवेचे प्रमाण प्रमाणके निर्धारीत करणे.
सेवांची संपूर्ण माहिती पुरविणे.
विचारविनिमय करणे सहभाग वाढविणे.
निवडीला प्रोत्साहन देणे.
सर्वांना उत्तम समान वागणूक देणे.
चुका दुरुस्त करणे त्या योग्य करणे.
संसाधनाचा परिणामतः वापर करणे.
नाविन्यता आणि सुधारणा करणे.

इतर सेवा दात्यासोबत काम करणे. या प्रमुख तत्त्वाचा स्वीकार करून नागरिकांच्या सनदेच्या माध्यमातून सेवेची व गुणवत्तेची हमी देण्यात आली.

**नागरिकांची सनद आंतरराष्ट्रीय परिस्थितीः**

ब्रिटनमधील 'नागरिकांची सनद' या कार्यक्रमाने जगामध्ये अनेक राष्ट्रांमध्ये उत्सुकता निर्माण केली. व अनेक राष्ट्रांनी असे समान कार्यक्रम आपल्या राष्ट्रांमध्ये राबवण्यास सुरुवात केली. यामध्ये ऑस्ट्रेलिया (सेवा सनद 1997) बेल्जियम (शासकीय सेवा वापरणाऱ्या नागरिकांची सनद1992) कॅनडा (सेवा प्रमाणके कार्यक्रम 1995) फ्रान्स (सेवा सन1992) भारत (नागरिकांची सनद1993) पोर्तुगाल (शासकीय सेवेमध्ये गुणवत्तेची सनद1993) इत्यादी नावाने विविध देशांनी नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली. यापैकी काही कार्यक्रम ब्रिटनच्या प्रारुपाशी अत्यंत साधर्म्य साधणारी होती तर इतर काही राष्ट्राचे प्रारूप 'संपूर्ण गुणवत्ता व्यवस्थापन' (Total Quality Management) चळवळीमधील सेवा गुणवत्ताकडे झुकलेले होते. तर काही देशांचे प्रयोग दोन्ही याबद्दल साधर्म्य साधणारे होते. या विविध देशातील सनदेचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, सर्वच सनदेमध्ये सेवांच्या बाबतीत 'दर्जा' हा दृष्टिकोन त्यांच्या विविध स्तरावर स्पष्ट केला आहे. एखादा लोकसेवा नागरिक केंद्रित बनण्याचा निर्णय घेतला की, नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवापासून संपूर्ण दर्जा व्यवस्थापन अलिप्त राहू शकत नाही. संपूर्ण गुणवत्ता व्यवस्थापन व नागरिकांची सनद या संकल्पना जवळपास एकमेकास मिळत्या जुळत्या आहेत आणि दोन्ही संकल्पना नागरिकांच्या कल्याणाकरिता उपयुक्त असून त्यात व्यापक सुधारणा होत आहेत.

**नागरिकांची सनद आणि भारतः**

जगभरामध्ये लोक प्रशासनाला अधिक अधिक नागरिक प्रवण करण्याच्या गरजेतून जे प्रयत्न करण्यात आले त्यामध्ये इंग्लंडमध्ये एक वेगवान परंतु टिकाऊ अशी सुधारणेची चळवळ उभी राहिली. सन 1991 मध्ये सर्वप्रथम नागरिकांच्या सनदेची सुरुवात केली. व प्रशासनात पारदर्शकता व सेवेची हमी देण्यात आली. अपेक्षेप्रमाणे भारतातही त्यांच्या प्रतिध्वनी उमटल्याशिवाय राहिल्या नाहीत.1990 च्या सुरुवातीपासूनच भारतातील राजकीय नेतृत्वाकडून प्रतियोगी प्रशासनाबाबत बोलले जात होते. त्यास पूरक काही संस्थादेखील निर्माण करण्यात आल्या.

मागील काही दशकापासून भारताने आर्थिक विकासाबरोबरच सर्व क्षेत्रांमध्ये नेत्रदीपक प्रगती केली आहे. त्याचबरोबर साक्षरतेच्या प्रमाणात मागील पंचवार्षिक मध्ये 5.38% प्रगती झाली आहे. त्यामुळे भारतीय नागरिक आपल्या हक्काबाबत अधिक जागृत झाले आहेत. नागरिक आता केवळ त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याची अपेक्षा न करता शासनास मान्य करण्यास भाग पाडत आहेत. सन 1990 च्या दशकापासून हा प्रभाव शासनावर मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. याच काळात विविध ग्राहक चळवळी, स्वयंसेवी संस्था, नागरिकांच्या विविध संघटनांनी सनदेची मागणी करुन आंदोलन करण्यास सुरुवात केली. यावर विचारविनिमय करण्यासाठी 1996 मध्ये नवी दिल्ली येथे मुख्य सचिवांचे संमेलन भरले होते. यामध्ये नागरिकांचे समाधान करण्यासाठी अधिक कुशल कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची आवश्यकता आहे यावर एकमत झाले. यामध्ये खालील उपाययोजना ची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली.

अधिक सार्वजनिक स्वरूपाच्या संस्था किंवा शासनाचे विभाग यांच्यामार्फत दीर्घकालीन आणि अल्पकालीन योजना निर्माण करणे

प्रत्येक विभाग व मंत्रालयात स्वतंत्र लेखापरीक्षण आणि अंमलबजावणी प्रक्रियेवर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा स्थापन करणे.

ग्राहक संघटना, नागरिकांचे समूह, निर्वाचित प्रतिनिधी यांचे एकत्रीकरण करून अंमलबजावणी आणि देखरेख करण्यास मदत करणे. नागरिकांच्या सनदेव्दारे नागरिकांना अधिक सशक्त बनविण्यासाठी सनदेचा प्रचार करणे. कॅबिनेट सचिव यांच्या अध्यक्षतेखाली या प्रक्रियेवर नियमित देखरेख ठेवण्यासाठी एक कोर ग्रुपची स्थापना करणे.

इत्यादी महत्वपूर्ण शिफारसींचा विचार करण्यासाठी व प्रशासनात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि स्वच्छ प्रशासनास, गती प्रदान करण्यासाठी 24 मे 1997 मध्ये नवी दिल्ली येथे पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली विविध राज्य व केंद्रशासित प्रदेशातील मुख्यमंत्र्यांची बैठक पार पडली. यामध्ये केंद्र व राज्य स्तरावर **'परिणामात्मक व प्रतिसादात्मक शासनाचा कृती आराखडा'** स्वीकार केला. याच बैठकीमध्ये नागरिकांची सनद सुरू करण्याचाही निर्णय घेण्यात आला जय विभाग जनतेच्या सेवा व सुविधा पुरवितात व त्यांचा दैनंदिन जनतेशी संबंध आहे, असे विभाग यांच्यामार्फत नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी करण्याचे निश्चित करण्यात आले. आजपर्यंत भारत सरकारची १०५ मंत्रालये, विभाग, खाती, संस्था यांनी 'नागरिकांची सनद' जाहीर केली आहे. तसेच सर्व घटकराज्य आणि केंद्रशासित प्रदेशामध्ये देखील नागरिकाच्या सनदेची अंमलबजावणी केली जात आहे.

**नागरिकांची सनद आणि महाराष्ट्रः**

केंद्र शासनाने नेमलेल्या दुसऱ्या प्रशासकीय सुधारणा अयोगाने सन 2005 च्या अहवालामध्ये नागरिकांना लोकसेवा सहज,सुलभ व कालबध्द पध्दतीने उपलब्ध करुन देण्याची शिफारस केली. त्यानुसार केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध विभागांनी नागरिकांची सनद तयार केली. परंतु नागरिकांच्या सनदेमध्ये नमूद केलेल्या कालमर्यादेचे पालन न झाल्यास संबधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यावर कार्यवाही करण्याची स्पष्ट तरतुद करण्यात आली नव्हती. ही उणीव दुर करण्यासाठी महाराष्ट्र राज्याने 2005 साली महाराष्ट्र राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, 2005 मधील कलम 8(1) मधील तरतुदीनुसार नागरीकाच्या सनदेला कायदेशिर अधार देवुन अंमलबजावणी करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य सुशासनाबाबत नेहमी अग्रेसर राहिले आहे. नागरिकांना लोकाभिमुख प्रशासन देण्याकरिता विधानसभेत 2009 साली अशासकीय विधेयक मांडण्यात आले होते. त्यानंतर सन 2015 मध्ये महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क अधिनियम पारित करण्यात आला. हा अधिनियम दिनांक 28 एप्रिल 2015 पासुन अंमलात आला. हा अधिनियम देशातील अन्य राज्यातील अधिनियमापासुन वेगळा आहे. यामध्ये डिजिटल मंचाचा उपयोग करुन व सर्वनजिक वितरण प्रणालीच्या गुणवत्तेत सुधारणा करणाऱ्या कार्यसंस्कृतीवर भर देणारा आहे. पात्र व्यक्तीना लोकसेवांची उपलब्धता ही पारदर्शक व कालबध्द पध्दतीने झाली पाहीजे यावर भर दिला आहे.

जनतेच्या गाऱ्हाण्यांचे प्रभावी निराकरण प्रणाली, सार्वजनिक वितरण प्रणालीची कार्यक्षमता वाढविणे यावर या अधिनियमात भर दिला आहे. लोकसेवेची मागणी करण्यांचा हक्क नागरिकांना दिल्यामुळे कार्यक्षम व पारदर्शक पध्दतीने विवित कालावधीत लोकसेवा देण्यांचे वैधानिक उत्तरदायित्व शासनावर असल्यामुळे हा अधिनियम म्हणजे पुर्वीच्या कामकाजाच्यापध्दतीत केलेला अमुलाग्र बदलच आहे. नागरिकांना ऑनलाईन सेवा सहज उपलब्ध करुन देण्याकरिता राज्य शासनाने आपले पोर्टल व आरटीएस मोबाईल अप्लिकेशन वर ऑनलाईन सेवा उपलब्ध आहेत. तसेच राज्यामध्ये 26 हजारापेक्षा अधिक आपले सरकार केंद्र नागरिकांना ऑनलाईन सेवा उपलब्ध करुन देत आहे. या अधिनियमाअर्तगत राज्यांच्या एकुन 37 विभागाच्या एकुन 409 सेवा अधिसुचित करण्यात आल्या आहेत.तर आज पर्यत या सेवा घेण्यासाठी 80134871 अर्ज करण्यात आले. त्यापैकी 774,35,386 अर्ज स्विकृत करण्यात आले.यामधील नियमीत कालवधीमध्ये निकाली काढलेल्या प्रकरणाचे प्रमाण 54% आहे.

**नागरिकांच्या सनदेच्या अंमलबजावणीत अडचणीः**

भारतातील नागरिकांचा सनदेची अमंलबजावणी 1997 मध्ये सुरू झाली असली तरी वास्तवात अंमलबजावणी फक्त कागदावरतीच होती. कोणत्याही संस्थेमध्ये नवीन विचारांचा परिचय नेहमीच कठीण असतो. जुन्या नोकरशाहीची कार्यपद्धती आणि कार्य शक्तीच्या कठोर मनोवृत्तीमुळे भारत सरकारमध्ये नागरिकांच्या सनदेची ओळख आणि अंमलबजावणी करणे अधिक जटिल आहे. त्यामध्ये पुढील अडचणी किंवा समस्यांचा सामना करावा लागत आहे. कोणत्याही सनदेच्या अंमलबजावणीसाठी जबाबदार असलेल्या कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षण आणि अभिमुखता असणे आवश्यक आहे. परंतु सनदेबाबची माहिती नसलेल्या कर्मचाऱ्याला तिची जबाबदारी देण्यात आली. त्यामूळे बऱ्याच प्रकरणांमध्ये संबंधित कर्मचारी पुरेसे प्रशिक्षित आणि संवेदनशील नसतात.

काही संस्थेमध्ये नागरिकांच्या चार्टरच्या अंमलबजावणीच्या गंभीर टप्प्यावर संबंधित अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि फेरबदलांमुळे निर्धारित धोरणात्मक प्रक्रियेस अस्थिर केले जाते. त्यामूळे अंमलबजावणीत अडथळा निर्माण होतो.

ग्राहकांना सनदेविषयी माहीती, जागरूकता मोहीम पद्धतशीररित्या राबविल्या गेल्या नाहीत.

काही संस्थानी आपल्या नागरिकांच्या सनदेमध्ये उल्लेख केलेल्या सेवांचे मानके / वेळेचे निकष एकतर अत्यंत निष्काळजी किंवा कडक होते आणि ते अव्यवहार्य होते त्याचा प्रतिकूल प्रभाव सनदेच्या अमंलबजावणीवर पाडला.

सामान्य जनतेला नागरिकांच्या सनदेमागील कल्पना अचूकपणे समजली नाही. संस्थांद्वारे पूर्वी तयार केलेली माहिती पुस्तिका, प्रसिद्धी साहित्य, पत्रके यामध्ये नागरिकांच्या सनदेविषयी चुकीची होती.

जागरूकता आणि ज्ञानाचा अभाव आणि अपुरी प्रचार, म्हणून सेवा साधकांमध्ये विश्वास कमी होणे.

सनदेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पायाभूत सुविधांचा अभाव आणि प्रशासकीय नेतृत्वाचा उदासिन दृष्टीकोन.

अधिकारी आणि कार्यकारी कर्मचारी यांच्यातील श्रेणीबद्ध अंतर - कार्यसंघ प्रयत्नांची आवश्यकता.

प्रेरणा आणि जबाबदारी न मिळाल्यामुळे कर्मचारी जबाबदारी सांभाळण्यास तयार नाहीत.

**नागरिकांच्या सनदेच्या अंमलबजावणीत सुधारणा करण्यासाठी सूचना शिफारशीः**

नागरिकांच्या सनदेला कायदेशिर अधार देन्यात यावा.

नागरिकांची सनद तयार करताना सर्व स्तरातील सार्वजनिक अधिकाृयांचा सल्ला घ्यावा.

नागरिकांची सनद व्यावहारिक आणि वास्तववादी अपेक्षा असणे आवश्यक आहे

नागरी सनदेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सरकारी अधिकाऱ्यांना पुरेश्या पायाभूत सुविधा व प्रशिक्षण दिले जावे.

माहिती, शिक्षण आणि दळणवळण अभियानांच्या माध्यमातून नागरिकांना जागरूक केले पाहिजे.

प्रभावी तक्रार निवारण यंत्रणा असावी.

**सारांशः**

नागरिकांची सनदेचा सामान्य माणूस हा केंद्रबिंदू आहे. नागरिकांना कार्यक्षम, पारदर्शकव कालबध्द पध्दतीने लोकसेवा उपलब्ध व्हाव्यात हा सनेचा खरा हेतु आहे. या नागरिकांची सनद योग्य अंमलबजावणी काटेकोरपणे केल्यास प्रशासनात अमुलाग्र परिवर्तन होऊन प्रशासन अधिक लोकाभिमुख होईल. त्यासाठी सनदेविषयी लोकामध्ये जनजागृती मोहिमा राबविल्या पाहिजेत तसेच सर्व शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, लोकप्रतिनिधी, नागरी समाज, सामाजिक माध्यमे, स्वयंसेवी संस्था यांनी नागरिकांची सनदेची प्रभावी अंमलबजावणी आणि लोकांमध्ये जनजागृती साठी अग्रेसर असण्याची गरज आहे.

**संदर्भ ग्रंथः**

1. Avasthi & Maheshwari (2006), Public Administration, lakshmi Narain Agarwal, New Delhi.
2. कटारिया सुरेन्द्र (2007) 'आर्थिक नीती एवं प्रशासन' मलिक एण्ड कम्पनी जयपूर.
3. फाडिया बी.एल. (2011) भारत में लोकप्रशासन, साहित्य भवन पब्लिकेशन आग्रा.
4. माथुर बी.एल. 2006 आर्थिक निती एवं प्रशासन, आर बी एस ए पब्लिशर्स, जयपूर.
5. त्यागी महाबीर सिंह (1992) लोकप्रशासन ,राजीव प्रकाशन ,दिल्ली.
6. शर्मा एम.पी., सडाना बी.एल. (2010),लोकप्रशासन सिध्दान्त एवं व्यवहार,किताब महल,इलाहाबाद.
7. पवन कुमार,(2011), लोकप्रशासन सिध्दान्त एवं व्यवहार. वंदना पब्लीकेशन्स दिल्ली.

# यशपाल के 'झूठा सच' उपन्यास में साम्प्रदायिक संघर्ष

**डॉ.पठान जलालखान**
हिन्दी विभागाध्यक्ष, शंकरराव चव्हाण महाविद्यालय,अर्धापूर ता.अर्धापूर जि.नांदेड़(महाराष्ट्र)
**DOI-10.5281/zenodo.6988563**

**सार:** भारतीय स्वाधीनता संग्राम में एक क्रांतिकारी व्यक्तित्व के रूप में यशपाल जी की पहचान है। क्रांतिकारी व्यक्तित्व होते हुए भी लेखक के रूप में उनकी संवेदनशीलता बोध हमें होता है। यशपाल जी ने सामाजिक जीवन की अनेक समस्याओं पर अपनी कलम चलाई है। सामाजिक परिस्थितियों की गहराइयों में पहुँचकर उन्होंने मानव समाज के लिए अनेक उपयोगी तथ्यों व जीवन मूल्यों को प्रकाशित किया है। उनकी प्रगतिशील जीवन दृष्टिने समतावाद के आधार पर नये मानवीय मूल्यों की स्थापना की है। उन्होंने अपने उपन्यासों के माध्यम से विविध समस्याओं का चित्रण किया है। यशपाल जी का 'झूठा सच' उपन्यास भारत विभाजन की त्रासदी और उसके बाद जनता के बीच उपजे मोहभंग को अंकित करता है। देश विभाजन के साथ ही सांप्रदायिक संघर्ष की जो ज्वाला भडक उठी उसे इस उपन्यास के माध्यम से चित्रित किया है। भारत देश आजाद होते ही उसका भारत-पाकिस्तान का निर्माण केवल भौगोलिक दृष्टि से बंटवारा नहीं था। वह हिन्दू-मुस्लीम प्रश्न को हमेशा के लिए एक जीवित समस्या बना देने वाली घटना थी। जिसकी अनुभूति हमें आज भी सांप्रदायिक संघर्ष के माध्यम से होती है। सांप्रदायिक भावना हमारे सामाजिक जीवन मे विष घोलकर उसे कटु और भयानक बना देती है। वह किसी देश की एकता और राजनीति को भी दूष्प्रभावित करती है। जिस देश में अनेक संप्रदायों के लोग रहते है, वहाँ उनकी सांप्रदायिक उत्तेजना राष्ट्रीय एकता तथा नागरिक जीवन के लिए भयंकर अभिशाप बन जाती है। हिन्दू-मुसलमान की साम्प्रदायिक भावना ने ही अंग्रेजी राज्य की जड़ो को गहरा और दृढ किया था। स्वतंत्रता के लिए संघर्षरत काँग्रेस एक धर्मनिरपेक्ष व राष्ट्रीय संस्था थी लेकिन हिन्दू-मुस्लीमों ने कभी एक होकर विदेशी सत्ता का विरोध नहीं किया। उनकी शक्तियाँ राष्ट्रीय स्वतंत्रता के लक्ष्य से भ्रष्ट होकर पारंपारिक संघर्ष में ही नष्ट होती रही।

भारत-पाकिस्तान विभाजन के पूर्व हिन्दू-मुस्लीम दंगो का घृणित और बीभत्स रूप 'झूठा सच' भाग-१ में चित्रित किया है। भारत के राजनीतिक जीवन में सांप्रदायिकता के कारण बहुत खाइयाँ उत्पन्न हुई। अंग्रेजों ने इस मानसिक अंतराल को साधन मानकर अपनी सत्ता पक्की की। 'फुट डालों और शासन करो' उनका राजनीतिक सूत्र रहा है। 'झूठा सच' उपन्यास में स्थापित राजनीतिक परिस्थितियों के चित्र भयंकर और दर्दनाक है। सांप्रदायिक दंगो में डूबे हूए हिन्दू-मुस्लीम दोनों समाज खून की नदियाँ बहाते हैं। मानव मानव न रहकर दानव बन जाता है। झूठा सच के प्रथम भाग में देश का बटवारा और बटवारें की वजह से जो लोग बेघर हो गए, जो यातनाए भूगतनी पड़ी उसका यथार्थवादी चित्रण यशपाल जी ने किया है। देश विभाजन के कारण जो दंगे हुए, साम्प्रदायिकता पनपने लगी। इन सारी परिस्थितियों को देखते हूए 'झूठा सच' उपन्यास की समीक्षा करते हूए डॉ.पुरूषोत्तम दुबे जी ने उचित ही कहा है- "झूठा सच मुलतः संकट का उपन्यास है। विभाजन के पूर्व और विभाजन के पश्चात देश पर जो संकट पड़े, एक के बाद एक जो नई स्थितियाँ पैदा होती गयीः उन्हीं के तथ्यों की बहुत बड़ी पूंजी लेकर यशपाल ने इस रचना को संजोया संवारा है। अपने इस प्रवास में घटनाओं और पात्रों के प्रति तटस्थ रहे है। पात्रों, घटनाओं और दृष्टिकोनो के भीड़ में उन्होंने अपने आपको अनुपस्थित ही रखा है।"[१]

मनुष्य में जब सांप्रदायिकता का भूत संवार होता है, तब उसे दूसरे धर्म का मनुष्य, मनुष्य नहीं दिखाई देता। वह दानव बनकर दूसरों का खून पी लेना चाहता है। सांप्रदायिक भावना मनुष्य के हदय की प्रेम और करूणा की मानवीय भावनाओं को नष्ट कर देती है। 'झूठा सच' उपन्यास में 'दौलू मामा' जिसने कभी भी किसी के लिए बुरा नहीं सोंचा। वह न हिन्दू बनकर जिया न मुसलमान, वह तो मानवता का पूजारी था। फिर भी वह सांप्रदायिक प्रतिहिंसा का शिकार बन जाता है। 'दौलू' मामा की हत्या की घटना को लेकर 'परोपकार' पत्र के संपादक इस हत्या पर शोक व्यक्त करते हुए लिखते है- "दौलू मामा, तुम लाहौर की कितनी गलियों के, कितने बच्चों के मामा थे। तुम उम्र पर रोजाना सैकडों बच्चों को हंसा-हंसा कर आज उन्हे फुट-फुट कर रोते छोड़ गए हो। इन भोले बच्चों का खिलौना किस जालिम ने छीन लिया, मामा किसका दुश्मन था, मामा न युनियनिष्ट मंत्रीमंडल से मतलब रखता था, न लीग से। वह तो मानव था, केवल निरोह मानव। उसका खून मानवता का खून है। बेबस मानवता का खून है। मानवता के खून की

इस प्यास को कौन भडका रहा हैद्द दौलू मामा ने एक खाट की जगह के लिए भी, एक रोटी के लिए भी कभी किसी से झगड़ा नहीं किया। वह किसी की वजारत और रियासत की राह में रूकावट नहीं बन रहा था।"[२] इस प्रसंग से हमें यह बोध होता है कि जब सांप्रदायिक संघर्ष का आरंभ होता है तब हिन्दू हो या मुस्लीम कई बेगूनाह लोग मारे जाते है। इसलिए आज के बदलते युग में युवाओं को इस हीन भावना से मुक्त होना जरूरी हैं।

'झूठा सच' उपन्यास में यशपाल जी ने भारत-पाक विभाजन के समय के हिंदू-मुस्लीम सांप्रदायिक संघर्षो का ह्दय विदारक चित्रण किया है। जिससे हमें धार्मिक विष कितने लोगों की जान लेता है इस बात का बोध होता है। साम्प्रदायिक संघर्ष जब प्रारंभ होते है तब एक संप्रदाय दूसरे संप्रदाय से बदला लेने के लिए विवेकहीन होकर घृणित अनाचारों पर भी उतर आता है। पुरूषों के इस लढ़ाई में बेबस औरतों को भी शिकार होना पड़ता है। 'झूठा सच' उपन्यास में चित्रित 'तारा' अपने पति के अमानवीय दुर्व्यवहार से दुःखी होकर आत्मरक्षा के लिए ससुराल से भाग निकलती है। साम्रदायिक संघर्ष के वातावरण में वे 'नब्बू' के जाल में फंस जाती है। 'तारा' ने नब्बू का कुछ नहीं बिगाडा था लेकिन नब्बू के सोंच में वह दूसरे संप्रदाय की औरत थी। नब्बू विवेकहीनता से तारा को अनाचारों का शिकार बना लेना चाहता है। नब्बू के पड़ौसी मुसलमान यह नहीं चाहते की तारा पर कोई जुल्म हो लेकिन नब्बू पडोसीयों के इस हस्तक्षेप का विरोध करता हुआ उन्हें कहता है- "तुम लोगों को क्या मतलब, किसी मुसलमान औरत की तरफ तो आँख नहीं उठाई मैने, हिन्दू औरत है। वे लोग नहीं हमारी औरतों को खराब कर रहे है, उन लोगों ने कितनी जगह आग लगाई है, रोज बम गिराते हैं।"[३] नब्बू जैसे सोंच के लोग हिन्दू और मुस्लीम दोनों संप्रदाय में पाए जाते है। जिन पर धर्म का भूत संवार रहता है। मस्तिष्क में बदले की आग भडकते रहती है। भारत-पाक विभाजन के समय शरणार्थियों को पाकिस्तान से भारत में ढोनेवाली एक गाडी का ड्रायवर बिगडती हुई साम्प्रदायिक परिस्थिति पर खेद प्रकट करता हुआ कहता है- "...... रब्बने जिन्हें एक बनाया था, रब्ब के बंदो ने अपने वहम और जुल्म से उसे दो कर दिया।"[४]

यशपाल जी ने 'झूठा सच' उपन्यास में उन साम्प्रदायिक वर्गों का भी चित्रण किया है। जिन में मुस्लिम लीग और राष्ट्रीय स्वयं सेवक संघ व्दारा 'अल्लाह-ओ-इ-अकबर' और 'हर-हर महादेव' के नारों के गुंज से सम्पूर्ण वातावरण तनावपूर्व बन जाता है। एक ओर आजादी की खुशी थी लेकिन कई लोगों ने साम्प्रदायिक दंगो के कारण अपने प्राणों की आहुति दी है। विभाजन के इस त्रासदी को यशपाल जी ने 'झूठा सच' उपन्यास के माध्यम से चित्रित किया है। राजनीतिक, सामाजिक, सांप्रदायिक उथल-पुथल का यथार्थवादी चित्रण इस उपन्यास में हुआ है।

'झूठा सच' उपन्यास 'वतन और देश' तथा 'देश का भविष्य' इन दो भागों में विभाजित है। यह उपन्यास विभाजन की त्रासदी और उसके बाद जनता के बीच उपजे मोहभंग को चित्रित करता है। हमारे भारत देश को आजदी मिली है लेकिन आजादी के बात भी कई समस्याओं से देशवासी पीड़ित है। साम्प्रदायिक संघर्ष के कारण आज भी बस्तियों में आग लगाई जाती है। साम्प्रदायिक संघर्ष जैसे प्रश्न देश की अखंडता, सुख एवं समृध्दि के लिए चुनौती बन जाते है। यशपाल जी ने उनके समय में इस समस्या पर विचार किया था। उनके विचार आज भी यथार्थवादी है। उन्होंने मानवतावादी दृष्टि से साम्प्रदायिकता पर कटू प्रहार किया है। वे राष्ट्रप्रेम, मानवतावाद को जगाना चाहते थे। वे समाज को धर्म, जाति, संप्रदाय के बंधन से मुक्त करना चाहते थे। साम्प्रदायिक संघर्ष के कारण भारतियों का जीवन अस्वस्थ बनता जा रहा था। इस कारण यशपाल जी मानवीय आस्था तथा परस्पर प्रेम के जीवन मूल्यों को बोना चाहते थे।

'झूठा सच' उपन्यास के प्रारंभ के चित्रण में देश का माहोल सौहार्दपूर्ण और शांत है। विभिन्न वर्गों, धर्मों के लोग आपस में बिना किसी व्देष के मिलझूलकर रहते थे। सब लोग त्योहार, जन्म-मृत्यू शादी के प्रसंग में एक दूसरे के घर आते-जाते है। दूसरों के धर्मो का सम्मान करते है। सन १९४७ की आजादी और देश विभाजन से तनावपूर्ण माहोल बन जाता है। गली-मोहल्लों में धार्मिक हिंसा को प्रोत्सान दिया जा रहा था। कई मोहल्लों में कर्फ्यू लगता है। कुछ राजनीतिक नेताओं के भडकाऊ बयान से हिन्दू-मुस्लीम एक दूसरे को व्देष की भावना से देखने लगे। अब लाहौर पाकिस्तान का हिस्सा होगा, यह समझकर हिन्दू और सिख समुदाय लाहोर छोड़कर आने लगे। साम्प्रदायिक हिंसा बढ़ती गयी। कत्लें होने लगी, बस्तियाँ जलने लगी। यशपाल जी ने इस उपन्यास के माध्यम से भारत देश के आजादी के बाद देश के बंटवारे के परिणामस्वरूप जो परिस्थितियाँ बनी उसका यथार्थ चित्रण किया है।

यशपाल जी का साप्रदायिक हिंसा का चित्रण दिल को दहला देता है।

सामप्रदायिक संघर्ष के कारण मानवता पर से मनुष्य का विश्वास न दिखाई देने लगा। मजहब की मूल प्रेरणा को भूलकर आपसी संघर्ष बढने लगा। कोई मजहब हिंसा का पुरस्कार नही करता लेकिन कुछ लोगों ने अपने स्वार्थ के लिए धर्म की विक्रत व्याख्याएँ की है। हर धर्म की सीख है कि मनुष्य मात्रा पर प्रेम करें। जो लोग धर्म को सही रूप में समझते है वह साम्प्रदायिकता को बढ़ावा नही देते। यशपाल जी के 'झूठा सच' उपन्यास के माध्यम से कई सारे यथार्थ बोध का परिचय होता है। कुछ लोग अपने स्वार्थ के लिए लोगों के मन-मस्तिष्क में एक अबोध अपराध भावना को विकसीत करते हुए खून खराबा करने के लिए प्रेरीत करते है। भारत पाक विभाजन के त्रासदी ने हमारे मन में एक ऐसी कल्पित दीवार खड़ी कर दी है जिसकी कटुता हम आज भी अनुभव कर रहे हैं। यशपाल जी ने 'झूठा सच' उपन्यास में सांप्रदायिक्ता, रक्तपात को सजीव रूप में प्रस्तुत किया है।

**संदर्भ सूची :**

१. डॉ.पुरूषोत्तम दुबे : 'व्यक्ति चेतना और स्वातंत्र्योत्तर उपन्यास'।
२. यशपाल - 'झूठा सच' भाग-१ पृ.१२१
३. यशपाल - 'झूठा सच' भाग-१ पृ.३७१
४. यशपाल - 'झूठा सच' भाग-१ पृ.४८२
५. यशपाल - 'झूठा सच' भाग-२

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, July 2022, Volume-14 Issue-8

# महाराष्ट्रातील सहकार चळवळ

**श्री.एच.आर.आहेर[1] डॉ.जयवंत भदाणे[2]**

[1]संशोधक विद्यार्थी, ओपीजेएस युनिव्हर्सिटी, सादुलपूर, राजस्थान.

[2]संशोधन सहमार्गदर्शक, ओपीजेएस युनिव्हर्सिटी, सादुलपूर.

e-mail: jaykarmaveer@gmail.com

e-mail: jaywantrekha@gmail.com

**Doi-10.5281/zenodo.6988570**

**गोषवारा (Abstract):** सहकार हे मानवीजीवनात संस्कृतीसातत्यात महत्त्वाचे तत्त्व आहे. सहकार ही जीवनप्रणाली आहे. व्यक्ती व्यक्ती मिळून समाज निर्माण होतो. व्यक्ती समष्टी हे नातेही देवघेव -सहकार्य -संघभावना यावरच आधारलेले असते. आदिमकाळापासून समाजसंधारणेच्या प्रक्रियेत सहकारी तत्त्वाचे अनुसरण होत आले आहे. पस्तुत शोधलेखात महाराष्ट्रातील सहकार चळवळीची वाटचाल, वाटचालीचे टप्पे निर्धारित केले आहेत. भारतात १९०४ च्या सहकारी कायद्याने या चळवळीची दिशा ठरवली गेली. वित्तीय पुरवठा-बँका-पतसंस्था यांच्या अनुरोधाने ही चळवळ महाराष्ट्रात चांगली रुजली. जागतिकिकरणाच्या प्रक्रियेत सहकारक्षेत्राकडे काहीसे दुर्लक्षाने पाहिले जाते. परंतु विविध जीवनक्षेत्रांत, उद्योग आस्थापनांमध्ये महाराष्ट्रातील सहकार चळवळ रुजली, वाढली आहे. सामान्य माणसांच्या विकासामध्ये ही चळवळ प्रेरक व हितवर्धक ठरली आहे.

**सूत्र संकल्पना (Key - words):** सहकार, सहकारी संस्था, विकास, कल्याणकारी योजना, आर्थिक सहकार्य.

## प्रास्ताविक (Introduction):

अलीकडेच सहकार हे नवे खाते केंद्र सरकारने संस्थापित केले आहे. सहकार हे लोकसमूहजीवनातले महत्त्वाचे तत्त्व आहे. महाराष्ट्रात सहकारी चळवळीने विकासाचा मानदंड प्रस्थापित केला आहे. या संशोधन निबंधात ढोबळमानाने महाराष्ट्रातील सहकार चळवळीचे ठळक टप्पे संशोधिले आहेत.

## उद्दिष्टे (Objectives):

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे अध्ययन करणे.

महाराष्ट्रातील सहकार चळवळीचे टप्पे मांडणे.

सहकार चळवळीचे महत्व विशद करणे.

सहकार चळवळीची वास्तविकता शोधणे.

## पूर्वाभ्यास (Past study):

सहकार ही संकल्पना सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत महत्वाची ठरते. एकसंध आणि परस्पर विकासाच्या दिशेने सहकार तत्व राबवले गेले तर कोणती किमया घडू शकते याचा अभ्यास सहकारी संस्था, पतसंस्था, शेतीसंस्था, साखर कारखाने, सुत गिरण्या, पाणीसंस्था वित्तीय संस्था आदिंच्या संदर्भात होत आला आहे. जागतिकीकरण, खुली बाजारव्यवस्था, खाजगीकरण यांचे सहकार चळीवर कोणते परिणाम झाले आहेत याचाही अभ्यास होत आला आहे. येथे सूक्ष्म अभ्यासापेक्षा सूत्र-ठशांचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## संशोधन पध्दती (Research Methodology):

सैध्दांतिक विश्लेषण व आशय स्पष्टीकरण.

## सहकार: सामाजिकीकरण:

शिकारी अवस्थेपासून आजपर्यंतच्या मानवाच्या प्रगतीचा विचार केला तर असे दिसते की, एकत्रितपणे विचार करणे आणि काम करणे ही मानवाची नैसर्गिक प्रवृत्ती आहे. सामाजिकीकरण प्रक्रियेत कुठलेही काम करताना परस्परांची मदत घेणे आवश्यक असते. शिवाय मानवाच्या गरजाही एकमेकांच्या सहकार्यानेच पूर्ण होत असतात. मिळून मिसळून परस्परांच्या हितासाठी परस्परांच्या मदतीने एकत्रित काम हे सहकाराचे महत्वाचे तत्व आहे. सहकारी चळवळ ही गरजवंतांची चळवळ आहे. जी एकता, समानता, स्वातंत्र्य आणि लोकशाही या तत्वांवर आधारलेली आहे. समान गरजा, समान उद्दिष्टये आणि स्वेच्छा ही सहकाराची महत्वाची लक्षणे आहेत. सहकार ही सहजीवनाची प्रगत अवस्था आहे आणि सहकार हाच मानवाच्या जीवनप्रणालीचा इतिहास आणि मानवाच्या अस्तित्वाची एक प्रणाली आहे.

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली. त्यामुळे इंग्लंडच्या विकासाला गती मिळाली. मात्र यामुळे भांडवलशाही प्रवृत्ती आणि आर्थिक विषमता वाढली. ग्रामीण उद्योगांचा –हास होऊन बेकारी वाढली. कामगारांचे शहराकडे स्थलांतर वाढले. याचा परिणाम रोजगारावर झाला, कमी वेतन, जादा कामाचे तास, आर्थिक शोषण यामुळे कामगारांच्या दारिद्र्यात याद झाली. अधिक नफा मिळवून भांडवलदार वर्ग श्रीमंत झाला. गरीब श्रीमंत यांच्यातील दरी वाढली. ग्राहकांचेही शोषण होऊ लागले. यावर उपाय शोधताना भांडवलशाही

समाजव्यवस्था आणि नफेखोरीच्या प्रवृत्तीनेच सहकार या संकल्पनेला जन्म दिला. सुरुवातीला इंग्लंडमध्ये सहकारी तत्वावर असणारी शेतक-यांची संघटना होती. इंग्लंडमधील मँचेस्टरच्या रोशडेल येथे अठ्ठावीस विणकर कामगारांनी एकत्रीतरित्या सहकारी तत्वावर जीवनावश्यक वस्तू स्वस्त दरात विकण्याच्या उद्देशाने एक संस्था आणि सहकारी ग्राहक भांडार सुरु केले आणि १८४४ मध्ये सहकाराचा पाया रचला गेला. याच काळात जर्मनीमध्ये रेफेझन पतपुरवठा सोसायटी सुरु झाली. कॅनडा, चीन, रशिया या देशात विविध क्षेत्रात सहकारी चळवळी यशस्वीपणे सुरु झाल्या. डेन्मार्कमध्येही दुग्ध व्यवसायात सहकारी चळवळ आणि सहकारी संस्था सुरु झाल्याने डेन्मार्कची ओळख सहकारी डेन्मार्क अशी झाली. यातूनच १८९५ मध्ये आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना स्थापन झाली. आज इंग्लंडमध्ये कृषी, विमा, गृहनिर्माण, ग्राहक भांडारे अशा विविध क्षेत्रात सहकारी चळवळीने मोठे काम केले आहे. सध्या मात्र सहकार म्हणजे व्यक्तींचे संघटन मानले जात आहे. यापुढच्या काळात मात्र भांडवलाला अधिक महत्व येणार आहे.

**भारतः सहकारी संस्था कायदा:**

भारतात सर्वप्रथम १९०४ च्या सहकारी संस्थांच्या कायद्यानुसार मर्यादित उद्दिष्टांसाठी सहकारी चळवळ सुरु झाली. पुढे १९१२ मध्ये सहकारी संस्थांचा कायदा झाल्यानंतर सहकारी संस्थांची नोंदणी आणि कायद्याच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी निबंधकाची नियुक्ती आणि सहकारी विभागाची स्थापना झाली. केंद्राच्या अखत्यारीतला हा विभाग पुढे प्रांतिक सरकारांकडे सोपविला गेला. प्रांतिक सरकारांनी आपापले कायदे करून घेतले. १९१४ मध्ये मद्रासला सहकारी संघाची स्थापना झाली. मुंबई प्रांतासाठी १९२५ या सहकारी संस्थांचा कायदा संमत झाला. बॉम्बे प्रोडयूस मार्केट रेग्युलेशन अँक्ट आणि बॉम्बे मनी लेंडर अँक्ट हे कायदे झाले यामुळे सहकारी चळवळीला कायद्याची चौकट लाभली. १९१९ ते १९२९ दरम्यान सहकारी संस्थांची वाढ केवळ संख्यात्मक झाली. जागतिक मंदीमुळे कर्ज हे विनावसुलीत असल्याने बऱ्याच संस्था बंदही पडल्या होत्या. आज भारतात सहकाराची साधारणतः ११८ वर्ष फार दैदिप्यमान असूनही सहकारी क्षेत्राचा पाहिजे तसा विकास झालेला नाही. पूर्वेकडच्या काही राज्यांमध्ये तर सहकारी चळवळ अजूनही प्राथमिक अवस्थेतच असल्याचे दिसते.

**राज्य सहकारी बँक:**

स्वातंत्र्यापूर्वीच आजची महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. ही संस्था मुंबई जिल्हा मध्यवर्ती संस्था या नावाने स्थापन झाली होती. १९३५ ला रिझर्व्ह बँक स्थापन झाल्याने सहकार विभागाने सहकारी संस्थांना अग्रक्रम दिला. शेती आणि शेतीतर संस्थांची सुरुवात झाली. दुधाची टंचाई असलेला देश ही भारताची ओळख पुसून देशात धवलक्रांतीची सुरुवात म्हणून गुजरात सहकारी दुध महासंघही (अमूल: डॉ. वर्गिस कुरियन) अस्तीत्वात आला. राष्ट्रीय शेती व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) ही संस्था सहकारी बँकांवर लक्ष ठेवण्यासाठी अस्तित्वात आली. अमूलच्या धर्तीवर अनेक संस्था अस्तित्वात आल्या आणि झपाट्याने प्रगती होऊ लागली.

**सहकारी साखर कारखानाः स्थापना:**

इ.स. १९१९ मध्येच महाराष्ट्रात बेलापूर शुगर नावाचा कारखाना श्रीरामपूरच्या हरेगाव येथे सुरु झाला होता. त्यानंतर काही शेतकऱ्यांनी एकत्रितपणे जॉइंट स्टॉक कंपनी म्हणून १९३२ मध्ये माळीनगर येथे शेतकऱ्यांचा मालकीचा कारखाना सुरु केला होता. पुढे स्वातंत्र्यानंतर १९४८ मध्ये प्रा. धनंजयराव गाडगीळ व पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखेपाटील यांच्या मार्गदर्शनाने पायाभारणी झालेला महाराष्ट्राला अभिमान वाटावा असा आशिया खंडातला पहिला सहकारी तत्वावरचा साखर कारखाना १९५१ मध्ये लोणी-प्रवरानगर येथे चालू झाला आणि सहकारी चळवळीच्या एका नव्या पर्वाची सुरुवात झाली. पुढे पंचवार्षिक योजनांमध्ये सहकाराला प्राधान्य दिले गेले. वैकुंठभाई मेहता, नामदार गोखले, श्री.दे. गो.कर्वे, तात्यासाहेब केळकर, डॉ. धनंजराव गाडगीळ व विखे-पाटील आदींच्या समर्थ नेतृत्वाखाली संपूर्ण देशात सहकारी चळवळीचा विकास सुरु झाला. त्यानंतर मा. यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, शंकरराव चव्हाण, यशवंतराव मोहिते, मा.शरदरावजी पवार या सहकारधुरिणांनी सहकाराला अनुकूल धोरणे आखून सहकाराची गंगा स समाजटकांपर्यंत पोहचविण्याचे काम केले.

**विविध सहकारी संस्था:**

**गोषवारा:** नाटकाची परिपूर्णता त्याच्या प्रस्तूतीकरणावर अवलंबून असते. नाट्य प्रस्तुती करिता त्याला प्रयोगरूप प्राप्त होण्यासाठी अनेक घटकतत्वांचा आधर घ्यावा लागतो. त्यापैकीच नाटकाचे सौंदर्य वाढविणारे महत्व पूर्ण घटक तत्व म्हणजे संहिता होय. संहिता खऱ्या अर्थाने कलेच्या साहित्य रूपातील प्रमूख अंग म्हणून पूढे येते. या प्रमूख तत्वामूळे नाटकातील अभिनयात अनेक सुधारणा होत असतात. त्यामुळे संहिता ही नाट्य प्रस्तूतीकरणाची पहिली पायरी समजली जाते. या संहितेतील गहनता समजून दिग्दर्शक आपले सृजनात्मक विचार नाटकाच्या अनुषंगाने पुढे आणतो. आजपर्यंत अनेक संहितेतून शेतकऱ्यांची व्यथा, त्यांची गाथा, त्यांच्या आयुष्यात घटीत होणाऱ्या घटना नाट्य स्वरूपातून पुढे आल्या आहेत. अशाच एका संहितेवर आज आपण इथे विचार करणार आहोत. नाटकाचे खरे फलीत त्याच्या सादरीकरणातूनच पुढे येत असते. त्यामुळे साहित्यातून पुढे आलेले संहितेतील विचार दिग्दर्शकाच्या दृष्टीने समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे. संहितेचे सौंदर्य जर त्याला समजले तरच तो प्रेक्षकांपर्यत नाटकातील विचार लेखकाचे विचार त्याचे विचार पोहचू शकतो.

शेतकऱ्यांचे आयुष्य हे खऱ्या अर्थाने नाटकाच्या पद्धतीने पूढे आलेले आहे. उपजिवीकेचा प्रश्न हाताळत असतातना ग्रामीण भागातील अनेक लोकांना व्यवसाय उद्योग उपलब्ध होत नसल्याने बऱ्यापैकी शेती ही पोटापाण्याचा व्यवसाय म्हणून शेतीकडे वळतात. मात्र तिथेही खूप तफावत पाहायला मिळते. 'शेतकरी स्वातंत्र्याची रणनिती' या पुस्तकातून लेखक म्हणतात, "एकूणच शेती धोरणाचे फायदे शेतकरी सोडून शेतीशी निगडीत सर्व व्यावसायिकांना आणि व्यसायांना होतो. शेती संबंधीच्या धोरणांचा फायदा बियाणे कंपन्याना होतो रासायनिक खताच्या कंपन्यांना होतो सिंचनाच्या सोयी पूरविऱ्या कंपन्यांना होतो विमा कंपन्यांना होतो, बँकांना होता, सावकारांना होतो, व्यापारांना होतो, अडत्यांना होतो सावकारांना होतो आणि ग्राहकांनाही होतो! या सगळयांचे व्यवसाय जितके फोफावतात तितका शेती व्यवसाय रसातळाला जातो असे म्हणतात की शेती व्यवसायात तोटाच होत असल्याने शेतकरी भांडवल खाऊन जागतो. पण शेतकऱ्यांच्या भांडवलावर शेतकऱ्यापेक्षा अधिक वर सांगितलेली वंशावळच जगते" (पृ.क्र. 13, शेतकरी स्वातंत्र्याची रणनिती, ले-सुधारक जाधव – तेजस पब्लिकेशन) 'साहित्यवाले' आणि 'नाटकवाले' ही खऱ्या अर्थाने भेद निर्माण करणारी गोष्ट आहे. नाट्यनिर्मितीची पावले साहित्यातूनच पूढे येतात पण त्याला प्रयोगरूप प्राप्त झाल्याशिवाय संहितेला अर्थच प्राप्त होन नाही प्रसिद्ध समाजसुधारक महात्मा फुले यांनी अनेक वर्षांपूर्वी "शेतकऱ्यांचा आसूड" लिहून शेती व्यवसायातील अनेक समस्या समाजापूढे आणल्यात साहित्याने संहितेला जन्म दिला आणि संहितेतून नाटकांचा जन्म झालेला आपण बघतो. ग्रीक संस्कृतीतील नाटकांची किंवा लोकरंगभूमीवरील वारसा परंपरा बघितल्यास लक्षात येईल की आनंदोत्सव साजरा करण्याचा उद्देशातून शेतीला चांगले पीक आले असल्यास, सुगीच्या दीवसात शेतकरी त्याचा आंनद आणि उत्साह नाचून गावून भावाच्या अभिव्यक्तीतून व्यक्त करायचे या परंपरेतूनच अनेक लोकनाट्य शैलींचा जन्म झालेला आपण बघतो. खऱ्या अर्थाने आदिम संस्कृतीपासून नाट्यकलेची पाळेमुळे पाहायला मिळतात. या संस्कृतीचा प्रमुख व्यवसाय शेती हा होता, शिकारी करणे आणि नाचून गाऊन त्यांचा उत्सव समूळ पध्दतीने साजरा करणे यातून पूढे यायचे. याच धर्तीवर राजकूमार तांगडे यांच्या आकडा या एकांकिकेतून त्यांनी शेतकऱ्यांच्या अनेक समस्यांवर प्रकाश टाकल्याचे चित्र आपणास समजते नाटकाच्या सुरुवातीलाच शाहीर मुजरा करतांना भारत मातेच्या सर्व पूत्रांना वंदन करतो. ज्यामध्ये

भारताची लोकशाही वीर, जवान शेतकरीबंधू, कर्मचारी नेते यासर्वांचा उल्लेख हा शाहीर मोठ्या सन्मानाने करतो. मात्र त्याचे मन मन गहिवरते आणि तो पुढे म्हणतो, "भारत देश एक कृषीप्रधान राष्ट्र जागतीक सर्वात मोठे गणराज्य या देशत सोन्याचा धूर निघत होता, खेडी स्वयंपूर्ण होती या समृद्धीला परकियांची नजर लागली, आणि त्या सोन्याचं रुपांतर कोळशात झालं. पण याही पुढे जाऊन स्वदेशी नितीभ्रमांनी त्या कोळशाचीही राख केली सर्व ठिकाणी भ्रष्टाचार बोकाळला मग नमन भ्रष्ट पुढाऱ्याला लाचखोरांना कर्मचाऱ्यांना, भेसळखोरांना, ज्यांनी कर्जात बुडविला देश विकासाचा केला सत्यानाश, फेडून घेतली जीवाची हौस, गरिबांचे हिसकावले घास, केला राष्ट्र संपत्तीचा नाश जी रं हा जी.... जी... सारी जनता जगते ज्याच्यावरी बळीराजा तो शेतकरी, या जगाचा अन्नदाता शेतकरी, बनला तोच आज भीकारी, झाली डोईजड सावकारी, जप्ती आणि घरदारावरी." असा खडा सवाल समाजापुढे उपस्थित केल्याचे आपणास या एकांकिकेतून पुढे आल्याचे दिसते. (आंकडा – ले. राजकुमार तांगडे, जनशक्ती चळवळ प्रकाशन, पृ.क्र. 10)

शेतकऱ्यांना त्यांच्या आयुष्यात अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यापैकीच एक म्हणजे शेतपीकाला सरकारकडून रास्त भाव प्राप्त होत नाही. कधी-कधी कोरडा दुष्काळ तर कधी ओला दुष्काळ, कधी महापूर, कधी सावकाराने केलेला छळ त्यापैकीच आणखी एक महत्त्वाची समस्या ती म्हणजे विजेची समस्या होय. या विजेच्या समस्येमुळे शेतकऱ्याला कशा प्रसंगांना सामोरे जावे लागते याचा परामर्श प्रस्तुत 'आंकडा' या एकांकिकेतून लेखकाने केला आहे. विजेवर शेतकऱ्यांची अनेक कामे अवलंबून असतात. रात्रंदिवस रानात काबाडकष्ट करणाऱ्या शेतकऱ्याला विजेमुळे शेतीची अनेक कामे साध्य करता येतात. अशातच गावात सर्वत्र दवंडी दिली जाते, "ज्या-ज्या शेतकऱ्यांनी विजबील भरलं नाही. त्यांची लाईन कट करण्यात आलेली हाई. जर कोणी बिल न भरता चोरुन लाईन वापरील तर त्याच्यावर पोलीस कार्यवाही करण्यात येणार हाई ओ... डंग... डंग.... डंग..." एकंदर विजेची कपात झाल्या मुळे शेतकऱ्यांचे मन सून्न झाले आणि सर्वत्र स्तब्धता गावात पसरली. समस्या कधीही सांगून येत नाही. पण इथेतर समस्यानेच दवंडी पिटलेली नाटकातून पुढे येते. त्यामधून शेतकऱ्यांची निद्राच भंग होऊन जाते. शेतकरी वर्गातील अनेक लोकांना जिथे कष्ट करण्याशिवाय पर्याय नसतो, तिथे लोडशेडींग ही ग्रामीण भागात कायम स्वरुपात ढाण मांडून बसलेली गोष्ट होय. ज्यामुळे शेतकरी राजा आपल्या कार्याला पाहिजे त्या पद्धतीने यश मिळून देऊ शकत नाही आणि अनेक संकटे त्यातून उद्भवतात. स्वत: लेखक आपल्या कथेतून सांगतात, "समाज बदलाची धमक आजच्या तरुणाईत आहे. पण त्यांच्यापर्यंत पोचणं गरजेचं त्यासाठी विचारांची आदान-प्रदान व्हायला पाहिजे. त्यामुळे नाटक समजलं की इतरांना त्याबद्दल जागरुक करणे हे यातून साध्य व्हायला हवे असे विचारही लेखक व्यक्त करतात. शेतकरी आत्महत्येचे प्रमाण आज मोठ्या प्रमाणात पुढे आले आहे. कर्जमुक्ती होऊनही अनेकदा शेतकरी आत्महत्येचा निर्णय कसा घेतो, हा देखील सध्या उपस्थित झलेला प्रश्नच आहे. अशा अनेक गोष्टींमधून फक्त आणि फक्त शेतकऱ्यांचीच निराशा होते आहे. त्यापैकी एकूण 7/12 ज्याला आज काही किंमत उरली नाही. आपल्या शेतकऱ्यामधून शंकर सखाराम लिहितात, "भांडवलदारांच्या फायद्यासाठी देशातील सत्ता रुढ सरकार आणि स्थानिक पुढारी ह्या शेतकरी राजाला मांजर कुत्र्यासारखे समजून त्यांची जमीन त्याला न विचारता विकास प्रकल्पांच्या नावाखली लाटून त्याला कुत्र्यासारखे बेवारसपणे हाकलून देत आहेत. शेतकरी इमाने इतबारे शेती पिकवून सरकारचे सारे कर भरुन उरलेल्या धान्यातून साऱ्या जनतेचे पोषण करीत आहे. कुणाला त्रास न देता भूमातेची सेवा करीत शेती संस्कृती जपत आहे. लोकसाहित्याचे जतन करित आहे. जय जवान – जय किसान अशी त्यांची अवस्था आहे." असे शाश्वत विचार व्चयक्त करतच त्यांनी साहित्यातून शेतकऱ्यांचे विचार आणखी मोठ्या प्रमाणात पुढे यावे असे प्रतिपादन

केले आहे. (शेतकरी राजा लेखक शंकर सखाराम, कोमल प्रकाशन, प्रस्तावना)

एका अर्थाने साहित्य असो वा नाट्य शेतकऱ्यांची व्यथा अनेक भागातून पुढे येणे आज काळाची गरज आहे. याच दृष्टिकोनातून लेखक राजकुमार तांगडे यांनी 'आकडा' या एकांकीकेतून शेकऱ्याला कडाडून जागृत करताना म्हटले आहे की, शेतकऱ्यांना वाचायला सवड नसते, त्याला कष्टाची सवय असल्यामुळे ते नाट्यरुपात आपले विचार इतरांपर्यंत पोहचवितात. कारण नाटकाचा जन्म जरी साहित्यातून झाला असला तरी त्याचे अंतीम उद्देश त्यांच्या सादरीकरणातून होय आणि सादरीकरणाच्या माध्यमातून जो विचार जी जनजागृती साधली जाते ती भाषणातून अथवा इतर कुठल्याही साहित्य प्रकारातून प्रभावीपणे पुढे येत नाही. त्यामुळे नाटकातून अनेक गोष्टींची जनजागृती शक्य होते. प्रश्न मांडता आणि सोडता ही येतात. या दृष्टीने नाटक हे अत्यंत प्रभावी माध्यम आहे. असे ही ते म्हणतात. एकंदर नाटकाचे सौंदर्य त्याच्या प्रस्तुतीकरणावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. लिखित संहिता साहित्याच्या दृष्टीने तेव्हाच पूर्णत्त्वास येते जेव्हा ते प्रयोगरुपात पुढे येत असते. त्यांचे 'आकडा' हे नाटक 2003 मध्ये त्यांनी लिहिले. त्यात प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या जीवनात अनेक समस्यांना सामोरे तसेच तोंड द्यावे लागते. शेतकरी विजेची चोरी करण्यामागे काय कारण आहे. यात खऱ्या अर्थाने शासन जबाबदार आहे, प्रशासन की खूद्द शेतकरी या प्रश्नांच्या अवतीभवती नाटक फिरते. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे जो प्रश्न लेखकाने या नाटकातून उपस्थित केला त्याचे पावणे दोनशे प्रयोग करताना वीज न वापरता अंधारात त्यांनी त्याचे प्रयोग साकारले होते. खऱ्या अर्थाने समाजव्यवस्थेविषयी असलेली अस्वस्थता हे त्यांच्या नाटकातून प्रामुख्याने पुढे येते. ज्याच्या कष्टातून पिकवलेले अन्न खाऊनच प्रत्येकजण आपला जठराग्नी शांत करतो तो बळी राजा आज भिकारी बनला आहे. संभाजी तांगडे यांनी एकांकीकेचे दिग्दर्शन केले होते. नाटकांविषयी चर्चा करतांना लेखक एका अंकातून म्हणतात,

"खरं तर नाटकानं प्रबोधन, क्रांती होईल का? याचं उत्तर काळावर सोडावे कारण काळपरत्वे हत्यारं बदलतात. हात तेच राहतात. हे आम्ही हत्यारच म्हणून घेतलय. आम्ही कोणाचं मनोरंजन करण्यासाठी जन्मलो नाही तर तिला आमची हरकत नाहीच आम्ही व्यक्तिसाठी, गटासाठी नाही, तर समाजासाठी हे करतो. तेव्हा नाटक पाहायला बसलेल्या व्यक्तीने 'पंखा हा फक्त हवा द्यायसाठीच जन्माला घातलाय.' तसाच कलाकार असं समजून आमचे अस्तित्त्व वस्तूच्या रूपात मोजू नये, एवढीच अपेक्षा."

(साधना, 18 जानेवारी 2014, पृ.क्र. 41)

लोडशेंडीगच्या समस्येमुळे शेतकऱ्यांचे कीतीहाल होतात हे अत्यंत चांगल्या पद्धतीने लेखकाने नाटकातून विषद केले आहे. ही समस्या कधीही न संपणारी आहे. एवढेच नव्हे तर विजचोरीचा प्रश्नही या नाटकातून उपस्थित केला आहे. स्वत: शेतकरी कुटुंबातील असल्यामुळे शेतकऱ्यांसमोरील प्रश्न उपस्थित करण्यासाठी त्यांना खूप मदत झाली आणि स्वत: अनुभवलेल्या जीवनाचे अनुभव त्यांनी नाटकातून सहज कथन केले.

राजकुमार तांगडे हे आजच्या पीढीतील सुप्रसिद्ध नाटककार म्हणून सर्वपरिचित आहेत. मराठवाडा प्रांतातील जालना या भागातील ते आहेत. त्यांची अनेक नाटके लोकसंकल्पनेवर आधारित असून ग्रामीण पार्श्वभूमी आणि शेतकरी विचारधारेतून पुढे कोण आले आहेत. त्यांनी जवळपास आपल्या नाट्यलेखनातून समाजातील अनेक गोष्टींवर प्रकाश टाकला आहे. 'शिवाजी अंडरग्राउंड इन भीमनगर मोहल्ला' हे नाटक, 'माळावरचं फुल' ही कादंबरी, हुंडाबळीच्या समस्येवरील 'बहिण माझ्या प्रीतीची' हे नाटक त्यांचे रंगमंचावर आलेले पहिले नाटक. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या अनेक समस्येवर आधारित उस कामगारांची व्यथा मांडणारे 'काय दिलं स्वातंत्र्याने?' तसेच 'आकडा' ही वीज समस्येवरील प्रसिद्ध एकांकिका तसेच तिसऱ्या अपत्याच्या समस्येमुळे आणणारे 'हितशत्रू' हे नाटक तसेच 'पिन्टी' शेतकरी आंदोलनातील 'चक्काजाम', 'स्वर्गारोहण' अशा अनेक संहिता त्यांच्या विचारातून पुढे आल्या

आहेत. अतुल पेठे यांनी त्यांच्या नाट्य संघटनेला 'रंगमळा' असे नाव दिले आहे.

राजकुमार तांगडे यांची नाट्य संघटनेत बहुतांशी कलावंत शेतकरी कुटुंबातीलच आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या समस्या ही मंडळी मनोभावी मांडू शकतात. तांगडे यांचे नाटक भांडवलदार हुकूमशहा, सनातनी अशा लोकांच्या विरोधात आणि शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या उद्देशाने पुढे येते. एकंदर नाट्यकलेद्वारा अत्यंत प्रभावीपणे समाज परिवर्तनाच्या माध्यमातून कार्य शक्य आहे. त्यामुळे संहिता जोपर्यंत निर्माण होणार नाही तोपर्यंत नाट्यप्रदर्शन कसे होईल? म्हणूनच मोठ्या प्रमाणात संहितेचे लेखन होणे गरजेचे आहे. त्याप्रमाणे अनेक लेखकांनी आपले विचार संहितेतून अत्यंत प्रभावीपणे मांडले आहेत. कला प्रायोगिक असो वा ललित किंवा साहित्य कला, प्रत्येक अंगाने सामाजिक विषयांना पुढे आणण्यास खूप मदत होते. त्यामुळे साहित्य कलेचे महत्त्व हे तेवढेच आहे. जेवढे प्रयोग कलेचे कारण जोपर्यंत संहिता लिहिल्या जाणार नाही तोपर्यंत त्याला प्रायोगिक रुप प्राप्त होऊ शकत नाही. आणि शेतकऱ्यांशी संबंधित असलेल्या अनेक समस्या पुढे येऊ शकणार नाहीत.

**संदर्भग्रंथ सूची :**

1. शेतकरी स्वातंत्र्याची रणनिती, लेखक – सुधाकर जाधव, पृ.क्र. 13, तेजस प्रकाशन.
2. आकडा – ले. राजकुमार तांगडे, पृ. 10, जनशक्ती प्रकाशन चळवळ.
3. शेतकरी राजा – ले. शंकर सखाराम, प्रस्तावना, कोमल प्रकाशन.
4. साधना अंक, 18 जानेवारी 2014, पृ.क्र. 41.

# मुलांच्या शैक्षणिक विकासात अंगणवाडीची भूमिका

**संगिता गंगाराम मेश्राम**
(संशोधन विद्यार्थीनी) द्वारा: विशाल पानेकर, संजय सॉ मिल जवळ, जोगळेकर प्लॉट, अमरावती—४४४६०६
Email-sangitameshram233@gmail.com
**DOI-10.5281/zenodo.6988590**

**सारांश :** इतिहास कालापासूनच लहान मुलांचे शिक्षण आणि संगोपन हा मानवी समाजाचा अविभाज्य भाग आहे. एकोणविसाव्या शतकामध्ये युरोपचा बराचसा भाग उत्तर अमेरिका, ब्राझिल, चीन, भारत, जमैका आणि मेक्सिको या देशामध्ये शैक्षणिक उद्दिष्टांच्या पूर्तीकरिता बालवाडी आणि अंगणवाडीची सुरुवात करण्यात आली. शाळापूर्व अंगणवाडी आणि बालवाडीला स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य आणि केंद्रशासन यांच्या सहभागातून निधी पूरविला जातो. ताराबाईनी १९३६ मध्ये मुंबईत दादरला शिशु विहार म्हणून पूर्व प्राथमिक शिक्षणाचे दार उघडले. त्यांचे हे शिक्षणाचे कार्य शहरी विभागातील आर्थिक दुर्बल घटकांपासून ते आदिवासी पाड्यापर्यंत होते. ताराबाईच्या मते आदिवासीचे मुले शाळेत येत नसतील तर शाळा त्यांच्या अंगणात भरवायची आणि यातून अंगणवाडी, कुरणशाळा या संकल्पना साकारल्या गेल्या. अंगणवाडीमुळे मुलांना शालेय शिक्षणाची सवय लागून आवड निर्माण होईल, याकरिता अंगणवाडी केंद्र उत्तम प्रेरणास्थान आहे. लहान वयातील मुलांची भुक, आरोग्य, स्वच्छता या गरजांचा विचार केला गेला. मुलांची अन्नाची भूक आणि बुध्दिची भुक दोन्ही भागविण्यासाठी अंगणवाडी हे सर्वोत्तम ठिकाण आहे. अंगणवाड्या सुरु करण्यामागील मुळ हेतू शिक्षण आणि आरोग्य म्हणजेच मुलांचा शारीरिक व बौध्दिक विकास होय. अंगणवाड्या सुरु करण्यामागचं खर श्रेय हे पद्‌मश्री ताराबाई मोडक यांनाचं जाते.

**प्रस्तावना :**

बालक हे देशाचे आधारस्तंभ आहेत. अंगणवाडीतील शिक्षण बालकांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. याच काळात त्यांचा शारीरिक व बौध्दिक विकास तीव्र गतीने होतो. या संवेदनशिल वयात त्यांचे अनूभवविश्व जितके समृध्द केले जाईल तेवढी त्यांच्या उपजत गुणांच्या विकासाला चालना मिळेल. शिक्षण हे व्यक्तिविकासाचे साधन आहे. शिक्षणामुळे मानवी जीवन समृध्द व संपन्न होते. बालशिक्षणाचे कार्य हे पायाभूत स्वरुपाचे आहे. शिक्षण म्हणजे बालाकांच्या शरीर, मन आणि आत्मा या प्रक्रीयेमध्ये जे सुप्त उत्तमत्व आहे त्यांचा सर्वांगिण विकास घडवून आणणे. ज्यामुळे कृतीशिल समाजाची निर्मिती होईल. — राष्ट्रपिता म. गांधी

**उद्दिष्टे :**

१. मुलांच्या पालकांची शैक्षणिक पाश्वभूमी अभ्यासणे.
२. अंगणवाडीतील पूर्वशालेय शिक्षणाचा दर्जा तपासणे.
३. मुलांची शैक्षणिक गुणवत्ता अभ्यासणे.

**गृहितके :**

१. अंगणवाडीतील मुलांचे पालक शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले आहेत.
२. अंगणवाडीतील शैक्षणिक दर्जा समाधानकारक आहे.
३. अंगणवाडीतील मुलांचा बौध्दिक विकास चांगला होतो.

भावी पिढी ही आपल्या देशाचा पाया आहे. त्यांचे भवितव्य पालक, शिक्षक व समाज यांच्याच हातात आहे. हे ओळखूनच बालशिक्षणाला पाश्चात्य आणि पौर्वात्य शिक्षणतज्ञांनी महत्त्व दिले. पाश्चात्य देशामध्ये पंधराव्या शतकापासून जॉ कोमेनिअस, रुसो, पेस्टॉलॉझी, हर्बार्ट, फ्राबेक, माँटेसरी, जॉन ड्युई यांनी काम केले. भारतामध्ये मात्र बालशिक्षणाचे काम अठराव्या शतकानंतर सुरु झाले. डॉ. मादाम मारिया माँटेसरी यांचे विचार आणि त्यांच्या साहित्यामधून बालशिक्षणाच्या चळवळीला चालना मिळाली. भारतात स्वामी दयानंद सरस्वती, रविंद्रनाथ टागोर, अरविंद घोष यांनीही काम केले. अलिकडच्या काळात माँटेसरी तत्त्वांना प्रेरित होवून गिजूभाई बंधेका, ताराबाई मोडक, अनुताई वाघ यांनी बालशिक्षणाला दिशा देवून बालवाड्या व अंगणवाड्याची स्थापना केली. स्वयंशिक्षणावर भर, बालकांच्या मानसिक शक्तीचा विचार, स्वयंशिस्तीचे शिक्षण व्यक्तिमत्वाचा विकास, व्यावहारीक शिक्षण इत्यादी मूल्ये मुलांमध्ये रुजविण्याकरिता डॉ. मादाम मॉरिया माँटेसरी

यांनी ६ जानेवारी १९०७ रोजी जगातील पहिली बालवाडी इटली या देशात स्थापन केली. डॉ. मादाम मॉरिया माँटेसरी यांच्या बालशिक्षणाच्या कार्याने प्रेरित होवून भारतात ताराबाई मोडक आणि अनुबाई वाघ यांनी ठाणे जिल्हयातील डहाणू तालुक्यातील कोसबाड येथे १९४५ मध्ये आदिवासींच्या मुलांसाठी कुरणशाळा सुरु केली. युनिसेफ आणि वर्ल्ड बॅक यांच्या मदतीने भारतात २ ऑक्टोंबर, १९७५ ला अंगणवाडी केंद्र सुरु करण्यात आले. या योजनेअंतर्गत आरोग्यासोबतच मुलांना पूर्वप्राथमिक शिक्षण देवून त्यांचा शैक्षणिक पाया मजबुत केला जातो. भारतीय राज्यघटनेच्या २००२ च्या सुधारणेनुसार बालकांचे संरक्षण आणि शिक्षण हा कायदा आहे. त्यानुसार अंगणवाडीच्या माध्यमातुन ई. सी.सी.ई. (Early Childhood Care and Education) दिले जाते. एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या माहितीनुसार ऑक्टोबर २०१८ मध्ये महाराष्ट्रात १,०८,७७३ अंगणवाड्या आहेत. यात ३,०२४ पर्यवेक्षक तर २५३ बालविकास प्रकल्प अधिकारी आहेत.

राज्यघटनेच्या ४५ व्या कलमात राज्याने ६ वर्षाचे बालक होईपर्यंत ई.सी.सी.ई. सुविधा पूरविल्या पाहिजे. तसेच शिक्षणहक्क योजनेमध्ये ११ व्या कलमातही यांचा पुर्नरुच्चार केला आहे. यापूर्वीच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९७४) तसेच ११ व्या राष्ट्रीय नियोजनामध्ये हे स्पष्ट केले आहे.

बालकांचा बौध्दिक विकास योग्य होवून त्यांच्यामध्ये विविध कौशल्ये आत्मसात करण्याच्या दृष्टीकोनातून मुलांना शाळापूर्व शिक्षण औपचारिक पध्दतीने न देता अनौपचारिक पध्दतीने देण्यात येते. पूर्व शालेय शिक्षण देण्यामागील मुळ उद्देश मुलांचा शैक्षणिक विकासाचा पाया मजबूत करुन त्यांना प्राथमिक शिक्षणाकरीता तयार करणे. त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेच्या दर्जात सुधारणा करण्याकरिता हसत—खेळत कृतीच्या आधारे शिक्षण देणे, आत्मविश्वास, सहानुभूती, सहनशिलता, सहयोग आणि दयाळुपणा या सारख्या गुणांची वाढ करणे. त्यांच्या शोधप्रवृत्तीला वाव देणे हे होते.

अंगणवाडी केंद्रातील पूर्वशालेय शिक्षण ही एक बालकेंद्रीत सेवा असून ३ ते ६ वर्षे वयोगटातील मुलांच्या शैक्षणिक विकासाकरिता किमान ३ तास हे शिक्षण बालकांना दिल्या जाते. मुलांच्या सर्व क्षमतांचा विकास होईल. अशा संधी उपलब्ध करुन दिल्या जातात. कारण यातूनच देशाचे खरे सुत्रधार घडविले जातात.

शाळापूर्व शिक्षणातील सहभागामुळे मुलांचा माध्यमिक शिक्षण पूर्व करण्याचा दर तसेच त्यांची मानक चाचण्यांमधील कामगीरी उंचावत आहे. त्याचबरोबर मुलांची इयत्ता पुनरावृत्ती आणि विशेष शिक्षण देण्याची गरज असलेल्या मुलांची संख्या सुध्दा कमी होत आहे. शाळापूर्व शिक्षणाची गुणवत्ता ही निम्न आर्थिक—स्तरातील मुलांचा सुधारित बुध्द्यांक, त्यांचे परिक्षेतील वाढलेले मूल्यांकन, इयत्ता पूनरावृत्तीतील घट आणि विशेष शिक्षण देण्याच्या गरजेतील घट, यांचा परस्पर संबंध असतो. अनेक संशोधनाती असे सिध्द झाले की, जी मुले शाळापूर्व शिक्षणात सहभागी झाली आहेत, त्यांचा बुध्द्यांक वयाच्या ५ व्या वर्षापर्यंत ४ ते ११ गुणांनी वाढतो. — कोल्ब

''मुलांच्या जडण—घडणीच्या काळात शिक्षण दिले असता शाळापूर्व शिक्षणात निम्न व उच्च आर्थिक स्तरातील शैक्षणिक अंतर मिटविण्याची क्षमता असते'' — कोल्ब

अंगणवाडीतील पूर्व प्राथमिक शिक्षणाचा गुणात्मक दर्जा उंचविण्यासाठी ३ ते ४ या वयोगटानुसार संकलीत नोंद पत्रिका तयार करून सदर नोंद पत्रिकेच्या आधारे अंगणवाडीतील पूर्व प्राथमिक शिक्षणाचे नियमितपणे मुल्यांकन होवून त्या आधारे अंगणवाडीतील पूर्व प्राथमिक शिक्षणाचा गुणात्मक दर्जा उंचविण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका, बालविकास प्रकल्प अधिकारी यांचे द्वारे केली जाते.

मुलांच्या पालकांची शैक्षणिक पार्श्वभूमी अभ्यासली असता. अधिकतम पालकांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी दिसून आले. काही पालकांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाले. काही पालकांचे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण झाले आहे. तर अगदी कमी पालकांचे शिक्षण पदवीपर्यंत झाले आहे असे दिसून आले.

अंगणवाडीतील शिक्षणविषयक सोईसुविधांची पाहणी केली असता बालकांच्या शैक्षणिक विकासाला अनुकूल वातावरण आढळले, तसेच विविध पूस्तके, शैक्षणिक किट दिसल्या, बौध्दिक खेळणी देखिल होती. ज्यामुळे मुलांचा बौध्दिक विकास होण्यास मदत होते.

मुलांची निरीक्षण आणि बौध्दिक चाचणी नंतर असे दिसून आले की, अंगणवाडीतील मुलांचा शैक्षणिक दर्जा चांगला आहे. मुले विविध चाचण्यांना उत्तम प्रतिसाद देतात. यावरुन हेच स्पष्ट होते की, अंगणवाडीतील शैक्षणिक सोई—सुविधा, उपलब्ध शैक्षणिक साहित्य आणि अनौपचारिक शिक्षण यामुळे मुलांच्या शैक्षणिक दर्जाच्या गुणवत्तेत वाढ दिसून येते.

पूर्व शालेय शिक्षणामुळे केवळ शाळामधील मुलांची प्रगतीच होत नाही तर भविष्यातील शिक्षण आणि विकासाचा पाया देखील मजबुत होतो. मुलांमध्ये सकारात्मक दृष्टीकोन व शिकण्याची इच्छा विकसित होते. यामुळे बालकांच्या शैक्षणिक विकासात अंगणवाडीचे महत्त्वपूर्ण कार्य आहे.

**पूर्व शालेय शिक्षणाचे फायदे :**

उच्च वर्गातील व निम्न वर्गातील शैक्षणिक यशातील दूरी मिटविते.

मुलांना इयत्ता पूनरावृत्ती व विशेष शिक्षणाची गरज पडत नाही.

निम्न आर्थिक स्तरातील मुलांचा बुध्द्यांक वाढतो.

**निष्कर्ष :**

३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना अनौपचारिक शाळापूर्व शिक्षणामध्ये सवयी, नैतिकता, क्षमता यांचा विकास केला जातो. तसेच त्यांना वर्तनाच्या आकृतीबंधाचे ज्ञानही दिले जाते.

अंगणवाडी हे बालकांच्या जीवनाला योग्य वळण लावून दिशा दाखवण्याची उत्तम शैक्षणिक संस्था आहे. बालकाच्या शैक्षणिक विकासात अंगणवाडीला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**संदर्भ :**

१. पूर्व शालेय शिक्षण सचित्र संदेश मूल्यांकन पूस्तिका (वय वर्षे ३ ते ४)
२. आकार बालशिक्षणक्रम (युनिसेफ) २०१९ पर्यवेक्षिका व अंगणवाडी सेविकासाठी हस्तपूस्तिका
३. बाल्यावस्था पूर्व संगोपन शिक्षण विकीपिडीया
४. बोल भिडूडॉट कॉम २०२२
५. महिला व बालविकास विभाग केरळ
६. अंगणवाडीच्या ताई मेस्मा च्या कक्षेत — पण प्रश्न नेमका काय ?
७. महिला व बालविकास विभाग महाराष्ट्र शासन
८. अंगणवाडी कार्यकर्तीसाठी मार्गदर्शिका महाराष्ट्र राज्य
९. महिला व बालविकास विभाग लेखी परीक्षा मार्गदर्शक २०१५ चंद्रकांत मिसळ
१०. एकात्मिक बालविकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य

# नागपूर जिल्हयातील काटोल शहरातील शाळांमध्ये मुलांना ने—आण करणाऱ्या ऑटोचालकांना कोरोना काळात आलेल्या समस्या—एक विश्लेषणात्मक अध्ययन

**Dr.Hemlata Manohar Nagmote**
Assistant Professor, Mother Teresa College of Social Work, Katol, Dist.Nagpur
Email- hemalatawagh92@gmail.com
**DOI-10.5281/zenodo.6988594**

**Abstract:** मानवी जीवनामध्ये वाहतुकीला अनन्य साधारण महत्व आहे. वस्तुची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी ने—आण करण्यासाठी पुर्वी प्राण्यांचा वापर केला जाई. परंतु वेळ आणि पैशाचा अपव्यय होत असे त्यामुळे मानवाने यांत्रिक युगात प्राणी आणि यंत्र यांचा संयुक्तपणे वापर करुन घोडागाडी, बैलगाडी, स्लेज अशा पध्दतीचा मार्ग अनुसरला. सुरुवातीला मानवी रिक्षा सुरु झाल्या. परंतु सध्याची रिक्षा पेट्रोल, डिझेल, गॅस अशा इंधनावर चालविल्या जात आहे. अशी ही तीन चाकी रिक्षा चालविणारा चालक हा घटक मात्र सामाजिक आणि आर्थिकदृष्या वंचित आणि उपेक्षित असा आहे. कोरोना काळात ऑटोचालक हे संपूर्ण बेरोजगार झाले त्यांना या काळात ऑटो चालवीने बंद झाले, रोजगार प्राप्त होत नसल्याने कुटूंबात समस्या निमाण झाल्यात. कारण रोजगार नाही तर कुटूंब कसे चालवायचे असे अनेक प्रश्न त्यांच्यासमोर आज आपणास दिसून येते. अश्याच प्रश्नांचा अभ्यास प्रस्तुत संशोधनकार्यात करण्यात आला आहे. याकरिता नागपूर जिल्हयातील काटोल शहराची निवड करण्यात आली आहे.

**प्रस्तावना :—**

डिसेंबर २०१९ मध्ये कोरोना व्हायरस एक उपप्रकार चीनमधील वृहान शहरात आढळून आला. याला कोविड —१९ असे नाव देण्यात आले. सुरुवातीस आसपासच्या प्रदेशात पसरलेला हा विषाणू अधिक तिव्रतेचा असून या रोगाने मृत्यू पावणाऱ्यांचे प्रमाण वाढले. १३ मार्च २०२० अखेर जगात १३२७५८ जणांना या आजाराची लागन झाली असून एकून १२२ देशामध्ये हा आजार पसरला. २०२० साली महाराष्ट्रात कोरोना विषांणूचा उद्रेक झाला. महाराष्ट्रातील जनजीवनावर याचे फार मोठे परिणाम झाले. राज्यामध्ये निर्बंध लागू झाले. त्यामुळे सर्वांना घरी बसूनच कार्ये करावे लागले. अत्यावश्यक कामासाठीच घराच्या बाहेर जाण्याची मुभा दिली गेली.

**कोरोना व्हायरस म्हणजे काय?**

कोरोना व्हायरस हा संसर्गजन्य रोग आहे. हा विषाणू जवळच्या संपर्कादरम्यान खोकल्यामुळे, शिकंल्यामुळे, किंवा बोलतांना नकळत पडणाऱ्या थुंकीतील तुषारामुळे नागरिकांमध्ये पसरतो. हे थेंब अथवा तुषार श्वासोच्छवासाच्या दरम्यान देखील बाहेर पडतात. अशा दूषित भागाला हाताने स्पर्श करुन, नंतर तोच हात चेहऱ्याला स्पर्श झाल्यास लोक संक्रमीत होऊ शकतात. हे विषाणू ७२ तासापर्यत त्या पृष्ठभागावर जिंवत राहू शकतात. परंतू रोगाची लक्षणे दिसण्यापुर्वी देखील आणि या रोगाच्या नंतरच्या टप्यात देखील फार संक्रमीत होतो.

देशात व राज्यात कोरोनामुळे करण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे जणजीवनावर फार मोठया प्रमाणात परिणाम होवू लागले. त्यातील एक म्हणजे ऑटोरिक्षा चालक हा घटक चांगलाच होरपळून निघाला. कारण टाळेबंदीमुळे शाळाबंद करण्यात आल्या आणि ऑनलाईन शिक्षणाला सुरुवात झाली. परंतु शाळेतील मुलांना ने—आण करणाऱ्या ऑटोरिक्षा चालकांना विविध कौटूंबिक, आर्थिक, सामाजिक, मानसिक समस्यांना सामोरे जावे लागले आहे. सर्वच शाळा बंद असल्याने प्रवासी ने—आण पण नव्हती, त्यामध्ये कुटूंबाचे पालन—पोषण आणि ऑटोरिक्षा चे हप्ते अश्या दुहेरी अडचणीत सापडलेला ऑटोरिक्षा चालक हा अतिशय हताश झाला. शाळेतील मुलांना ने आण करण्याचा ऑटोचालकांचा मुख्य रोजगार होता आणि शाळाबंदीमुळे तो रोजगार त्यांच्याकडून हिरावल्या गेला.

अशा संकटकालीन परिस्थितीत ऑटोचालकांना कोणकोणत्या समस्यांचा सामना करावा लागतो, समाजाकडून, शासनाकडून, नातेवाईकांकडून कुठल्या? प्रकारची मदत मिळते का? त्यांच्या कौटूंबिक आणि वैयक्तिक जीवनात कोणत्या समस्या निर्माण झाल्या. हया सर्व प्रश्नांची उत्तरे प्राप्त करण्याच्या दृष्टिकोनातून प्रस्तुत संशोधनकार्य हाताळण्यात आले. त्यातही या निर्बंधामुळे काही मर्यादा आल्यात.

**अध्ययन पध्दती:—**

प्रस्तुत अध्ययनामध्ये शाळेमध्ये मुलांना ने—आण करणाऱ्या ऑटोचालकांना कोरोना काळात आलेल्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. यामध्ये ऑटोचालकांची वैयक्तिक व कौटूंबिक स्थिती, टाळेबंदीमुळे आलेल्या आर्थिक समस्या तसेच सामाजिक समस्या तसेच कोरोना काळातील वातावरणामुळे त्याला त्याच्या कुटूंबाला येणाऱ्या

अडचणी मागील कारणांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**अध्ययनाचे उद्देश :—** १) अध्ययनाअंतर्गत येणाऱ्या ऑटोचालकांची वैयक्तिक व कौटुंबिक स्थितीचा अभ्यास करणे.

२) कोरोना काळात ऑटोचालकांना येणाऱ्या आर्थिक समस्यांचा शोध घेणे.

३) कोरोना काळातील टाळेबंदीमुळे ऑटोचालकांना येणाऱ्या सामाजिक समस्यांचे अध्ययन करणे.

**अध्ययनाच्या उपकल्पना / गृहितकृत्ये :—**

१) कोरोना काळात शाळा बंदीमुळे ऑटोचालकांना आर्थिक समस्या निर्माण झाल्यात.

२) कोरोना काळात रुपयांच्या अभावामुळे ऑटोचालकांचा सामाजिक दर्जा निम्न झाला.

**कार्यात्मक व्याख्या:—**

**१) कारोना :—**

Covid-19 या विषाणूपासून होणारा आणि सर्व जगाला वेठीस धरणारा, मृत्यूसदनी पाठविणारा संसर्गजन्य आजार म्हणजे कोरोना होय.

**२) शाळा :—**

चार भिंतीच्या आत बौध्दीक दृष्टिकोनातून शैक्षणिक कार्य करणाऱ्या संस्था म्हणजे शाळा होय.

**३) ऑटोचालक :—**

ऑटो या साधनाद्वारे रोजगार प्राप्ती करुन आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करणारा म्हणजे ऑटोचालक होय.

**४) मुलांना ने—आण :—**

शाळेतील मुलांना घरापासून—शाळेपर्यंत आणि शाळेपासून—घरापर्यंत सुरक्षितपणे होणाऱ्या कृतीला मुलांना ने—आण करणे होय.

**५) आर्थिक समस्या :—**

कोरोना काळामध्ये शाळाबंदी, वाहतुकबंदी यामुळे ऑटोचालकांना उदरनिर्वाहाच्या साधनाच्या बंदीमुळे निर्माण झालेल्या रुपयांची अडचण म्हणजे आर्थिक समस्या होय.

**६) सामाजिक समस्या :—**

रोजगार हिरावल्यामुळे, नविन रोजगार प्राप्ती करीत असतांना सामाजिक दुरुत्वामुळे समाजाकडून निर्माण होणाऱ्या अडचणी म्हणजेच सामाजिक समस्या होय.

**संशोधन आराखडा :—**

प्रस्तुत संशोधनात तथ्यांचे योग्य संकलन व विश्लेषण यासाठी आवश्यक अटीची पूर्तता करुन वर्णनात्मक संशोधन आराखडयाची तसेच अंशत: परिचयात्मक आणि निदानात्मक संशोधन आराखडयाची निवड करण्यात आली.

**अध्ययन विश्व व जणगणना अध्ययन पध्दती :—**

प्रस्तुत अध्ययनाचे अध्ययन क्षेत्र हे नागपूर जिल्हयातील काटोल शहर असून अध्ययन विश्व हे काटोल शहरातील एकूण ४२ ऑटोचालक होय. प्रस्तुतु अध्ययनात जणगणना अध्ययन पध्दतीचा अवलंब केलेला आहे. कारण काटोल शहरातील माऊट कारमेंट कॉन्वेंट, बनारसीदास रुईया हायस्कुल, विद्यानिकेतन कॉन्वेंट, नगर परिषद शाळा क्र.२ या चार शाळांमधून प्राप्त झालेल्या अहवाल सुचीनुसार ऑटोचालकांची एकूण संख्या ४२ आहे. जे ऑटोचालक मुलांना ने—आण करण्याचे काम करतात, त्यामुळे अध्ययन विश्व लघु असल्यामुळे जणगणना अध्ययन पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

**तथ्य संकलन पध्दती व तंत्रे :—**

तथ्य संकलन करतांना संशोधनकर्तीने प्रश्नावलीचा उपयोग केला. कारण कोरोनाच्या प्रोटोकॉलचे पालन तसेच ऑटोचालक हा शिक्षित असल्यामुळे आणि त्यांना प्रश्नावली भरीत असतांना त्यांनी संशोधनकर्तीशी दुरसंचार वाहनाद्वारे केलेल्या चर्चेमुळे वस्तुनिष्ठ माहितीचे संकलन करण्यात आले. आणि घेतलेल्या माहितीच्या आधारे सांख्यिकीय विश्लेषण करण्यात आले.

**तथ्य विश्लेषण व अर्थविवरण :—**

**सारणी क्र.१ रोजगार नसल्यामुळे कौटूंबिक गरजांची होणारी पूर्तता दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | कौटूंबिक गरजा | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | काही प्रमाणात | ०९ | २१.४२% |
| २. | फार कमी प्रमाणात | ११ | २६.२०% |
| ३. | पूर्ण होत नाही | २२ | ५२.३८% |
| | एकूण | ४२ | १००% |

वरील सारणी क्र.१मध्ये नागपूर जिल्हयातील काटोल शहरातील शाळांमध्ये मुलांना ने—आण करणाऱ्या ऑटोचालकांच्या कोरोना काळातील टाळेबंदीत कौटूंबिक गरजांची होणारी परिपूर्ततेबाबत माहिती दर्शविलेली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ४२ उत्तरदात्यांपैकी

फक्त २१.४२% उत्तरदत्यांच्या कौटूंबिक गरजांची पूर्तता काही प्रमाणात पुर्ण होत आहे. तर २६.२०% उत्तरदात्यांच्या कौटूंबिक गरजांची पूर्तता फार कमी प्रमाणात होत आहे. तसेच ५२.३८% उत्तरदात्यांच्या कौटूंबिक गरजांची पूर्तता होत नाही.

अध्ययनातून प्राप्त परिणामावरुन असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश ऑटोचालक आपल्या कुटूंबाच्या गरजा पूर्ण करु शकत नाही. आणि यामागील कारण म्हणजे कोरोना काळातील टाळेबंदी आणि शाळाबंदी आहे.

**सारणी क्र.२ कोरोना काळात उत्तरदात्यांची आर्थिक स्थिती दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | आर्थिक स्थिती | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | चांगली | ०६ | १४.२९% |
| २. | सर्वसाधारण | ०३ | ७.१४% |
| ३. | कमकुवत | ०९ | २१.४३% |
| ४. | हलाखीची | २४ | ५७.१४% |
| | एकूण | ४२ | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण ४२ उत्तरात्यांपैकी चांगली आर्थिक स्थिती असणारे उत्तरदात्यांची टक्केवारी १४.२९% आहे. तर सर्वसाधारण आर्थिक स्थिती असणारे उत्तरदात्यांची टक्केवारी ७.१४% आहे. तसेच कमकुवत आर्थिक स्थिती असणारे उत्तरदात्यांची टक्केवारी २१.४३% आहे. आणि हलाखीची आर्थिक स्थिती असणारे उत्तरदात्यांची टक्केवारी ५७.१४% आहे.अध्ययनातून प्राप्त परिणामावरुन असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश ऑटोचालकांची आर्थिक स्थिती ही हलाखीची आहे. त्यामुळे या कोरोना काळात त्यांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे.

**सारणी क्र.३ शाळाबंदीमध्ये ऑटोचालकांच्या कुटूंबाकडे समाजाचा बघण्याचा दृष्टिकोन दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | समाजाचा दृष्टिकोन | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | अनुकुल | ०८ | १९.०४% |
| २. | सहानुभतीचा | ०३ | ७.१४% |
| ३. | समाधानकारक | ०५ | ११.९१% |
| ४. | प्रतिकुल | २६ | ६१.९१% |
| | एकूण | ४२ | १००% |

वरील सारणी क्र.३ वरुन असे निदर्शनास येते की, एकूण ४२ उत्तरात्यांपैकी टाळेंबदीमध्ये ऑटोचालकांच्या कुटूंबाकडे समाजाचा बघण्याचा दृष्टिकोन अनुकुल दर्शविणारे १९.०४% उत्तरदाते असून ७.१४% ऑटोचालकांच्या मते सहानुभूतीचा दृष्टिकोन होता. तर ११.९१% ऑटोचालकांच्या मते समाधानकारक दृष्टिकोन होता. तसेच ६१.९१% ऑटोचालकांच्या मते सामाजिक दृष्टिकोन हा प्रतिकुल होता असे दर्शविण्यात आलेले आहे.

अध्ययनातून प्राप्त परिणामावरुन असे निदर्शनास येते की, बहुतांश उत्तरदात्यांना समाजाच्या प्रतिकुल दृष्टिकोनाचा सामना करावा लागला.

**निष्कर्ष :—**

बहुतांश उत्तरदात्यांचा कोरोना काळात शाळाबंदीमुळे ऑटो बंद होता.

बहुतांश उत्तरदात्यांना कोरोना काळात रोजगार नसल्यामुळे यांच्या कौटूंबिक गरजा पूर्ण होत नाही.

बहुतांश उत्तरदात्यांची कौटूंबिक कौटूंबिक आर्थिक स्थिती कोरोना काळात हलाखीची झाली आहे.

बहुतांश उत्तरदात्यांना काम नसल्यामुळे उधारी भरावी लागत आहे.

काम नसल्यामुळे बहुतांश उत्तरदात्यांच्या कुटूंबाकडे समाजाचा बघण्याचा दृष्टिकोण हा प्रतिकुल आहे.

बहुतांश उत्तरदाते हे मिळेल ते काम करुन लोकांची उधारी तोडत आहे.

बहुतांश उत्तरदात्यांना नातेवाईकांच्या प्रतिकुल वर्तनामुळे त्रास होत आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१. आगलावे प्रदीप, (२००६), ''संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे'' विद्या प्रकाशन, नागपूर.
२. आगलावे प्रदीप, (२००९), ''भारतीय समाज प्रश्न आणि समस्या'' श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
३. ढवन केतन, (२०१९—२०), ''कोरोना व्हायरसचा उद्रेक'' —विकिपिडीया
४. कऱ्हाडे बी.एम, (२००८), ''शास्त्रीय संशोधन पध्दती'' पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.
५. मेश्राम सुरेश, (२०००), ''प्रात्याक्षिक सामाजिक संशोधन'' कृष्णचंद्र एजन्सीज,नागपूर.
६. www. Wikipedia.org - history of the automobile
7- www. Wikipedia.com – ricshaw-wikipedia jinrkisaw story

# बंगाली जीवन में कृतिवासी रामायण का प्रभाव

**डॉ. मनोतोष माजि**
Visva- Bharati, West Bengal
**DOI-10.5281/zenodo.6988596**

**सार**
भारत के राष्ट्रीय जीवन में लिखे गए दो महाकाव्यों में से एक बाल्मीकि द्वारा रचित रामायण है। रामायण का अनुवाद भारत की क्षेत्रीय भाषाओं सहित दुनिया की अन्य भाषाओं में किया गया है। बंगाली में अनुवादित सबसे लोकप्रिय रामायण कृतिबास की 'श्रीराम पांचाली' है। हम चर्चा करेंगे कि कैसे कृतिवासी रामायण ने बंगाली जीवन को प्रतिबिंबित और प्रभावित किया। कृतिवासी रामायण मध्यकालीन बंगाली भाषा और साहित्य के उदाहरणों में से एक है। कृतिबास ओझा उत्तर भारत में रामायण के पहले अनुवादक थे। उनकी अनुवादित पुस्तक का नाम 'श्रीराम पांचाली' है। कृतिबास की रामायण का प्रकाशन श्रीरामपुर के पुजारियों ने १८०३ ई. में किया था। कृतिबास का जन्म नदिया जिले के फुलिया गांव में हुआ था। उनके पिता का नाम बनमाली माता मालिनी देवी था। कृतिबास की आत्मकथा के अनुसार उनका जन्म माघ मास के रविवार के दिन हुआ था।

**"आदित्यबार श्रीपंचमी माघ का पवित्र महीना है।**
**पंडित कृतिबास का जन्म ताथी में हुआ था ।।"** १

आत्मकथा में कवि के जन्म के वर्ष का कोई उल्लेख नहीं है। हालांकि, शोधकर्ताओं का अनुमान है कि वह पंद्रहवीं शताब्दी के कवि हैं। कृतिबास ने बाल्मीकि रामायण का शाब्दिक अनुवाद नहीं किया। उन्होंने भारतीय राष्ट्रीय जीवन शैली, भारतीय संस्कृति और समकालीन हिंदू धर्म के रीति-रिवाजों और परंपराओं को ध्यान में रखते हुए रामायण की रचना की। कई कविताओं में उन्होंने नई कहानियों के साथ-साथ घटाव भी जोड़ा है। कृतिबास ने राम-सीता की कथा को सरल भाषा में बंगालियों के दरबार में प्रस्तुत किया। यही कारण है कि एक आलोचक का कहना है कि कविता करोड़पति के महल से लेकर गरीबों के वेश्यालय तक समान रूप से लोकप्रिय है। 'श्रीराम पांचाली' में बंगालियों के सामाजिक जीवन का विस्तार से वर्णन किया गया है। 'श्रीराम पांचाली' की एक विशेषता यह भी है कि चरित्र के समकालीन अर्थ में राम, सीता, लक्ष्मण आदि के पात्र बंगाली घराने के लोग बन गए हैं। वहीं कविता में लोकप्रिय बंगाली का स्वाद परोसा गया है। माटीचूर, चनाबारा, दूध, जिलिपी, कचुरी आदि खाद्य पदार्थों का उल्लेख है। विभिन्न घरेलू सामान हैं - बर्तन, घड़े, व्यंजन, छतरियां और दीपक। बंगाली समाज की आचार संहिता से लोक रीति-रिवाजों और समारोहों के विभिन्न पहलुओं जैसे अन्नप्राशन, विवाह, षष्ठी पूजा, विवाह अधिवास, विवाह में सतपेके घोड़ा आदि को कविता में अपनाया गया है। अतीत में प्रयुक्त वाहनों, राफ्ट, नौकाओं, झूलों आदि का उल्लेख कविता में विभिन्न यात्राओं के वर्णन में किया गया है। कृतिबास ने अपने काव्य-कथा में विभिन्न स्थानों पर समकालीन समाज में प्रचलित मायाशक्ति, मन्त्रशक्ति, भाग्य, परजनमा, कर्मफल आदि विषयों को प्रस्तुत किया है। बाल्मीकि रामायण में दुर्गा पूजा का कोई उल्लेख नहीं है लेकिन कृतिबास ने राम द्वारा पूजा के माध्यम से अपनी कविता में बंगाली के सर्वश्रेष्ठ पूजा दुर्गा उत्सव को स्थान दिया है। उस समय प्रयुक्त कहावतों और लोकभाषाओं को कवि ने अपनी कविता में प्रकट किया है। जैसे - १। 'चींटी का पंखा उठकर मर जाता है' २।'तुम्हें अपनी कुल्हाड़ी मिल गई'। बंगाली साहित्य में, कृतिवासी रामायण का बंगालियों के जीवन पर सबसे अधिक प्रभाव पड़ा है। यह पिछले कुछ सदियों से बंगाली राष्ट्र के दिल में जगह ले चुका है। कृतिवासी रामायण बंगालियों के दैनिक जीवन में गहराई से शामिल है। 'श्रीराम पांचाली' में युद्ध, शोर-शराबे, राजनीति आदि के मुद्दों के अलावा पति-पत्नी के रिश्ते, प्यार, स्नेह, भाई-भाई के दिल ने बंगाली राष्ट्र को सामाजिक नैतिकता की सीख दी है। कृत्तिवासी रामायण ने समय की गति को जीत लिया है, युग परिवर्तन के साथ बंगाली राष्ट्र बहुत बदल गया है, लेकिन रामायण के प्रति उनका दृष्टिकोण अपरिवर्तित रहा है। रामायण के सन्दर्भ में रवीन्द्रनाथ टैगोर ने कहा– **रामायण की मुख्य विशेषता यह है कि यह घर शब्द को बढ़ा-चढ़ाकर पेश करती है। पिता और पुत्र के बीच धर्म का बंधन, भाई और बहन के बीच, पति और पत्नी के बीच, उस प्यारे रिश्ते, रामायण ने उसे इतना महान बना दिया है कि वह आसानी से महाकाव्य के लिए उपयुक्त हो गया है।**२

रवीन्द्रनाथ की रामायण पर उपरोक्त टिप्पणी आज भी उतनी ही प्रासंगिक है। बंगाली जीवन पर रामायण के

प्रभाव पर बंगाली भाषा और साहित्य के आलोचक प्रोफेसर सुखमय मुखर्जी की टिप्पणी –

**कृतिबास बंगालियों के प्रिय कवि हैं। उनकी रामायण बंगाली का राष्ट्रीय महाकाव्य है।...रामायण का वर्तमान स्वरूप अब किसी एक व्यक्ति का नहीं, बल्कि पूरे देश का छाप है।**[३]

आलोचक की टिप्पणी का समर्थन करते हुए, हम कह सकते हैं कि बंगाली जीवन की छाप न केवल इस महाकाव्य में प्रस्तुत की गई है; सदियों से, 'श्रीराम पांचाली' बंगाली राष्ट्र के गठन के साथ बंगाली संस्कृति का वाहक और वाहक बन गया है।

**संदर्भ**

**१।** 'रामायण। कृतिबास-बिर्चित', सुखमय मुखर्जी द्वारा संपादित, वर्बी, १३/१ बंकिम चतुजे स्ट्रीट, कोलकाता-७३, वर्बी पहली बार १९८० में प्रकाशित, २०१६ में पुनर्मुद्रित, पृ. ३७ । (तब इस पुस्तक को 'रामायण। कृतिबास-बिर्चित' कहा जाता है) ।

२। रवींद्रनाथ टैगोर द्वारा 'प्राचीन साहित्य', विश्व-भारती ग्रंथ विभाग, आचार्य जगदीश चंद्र बोस रोड, कोलकाता-१७, पहला प्रकाशन-१३१४, पुनर्मुद्रण-१४२२, पृ. ९।

३। 'रामायण। कृतिबास-बिर्चित', पृ. १५।

## मराठा आरक्षण: कायदेमंडळ आणि न्यायमंडळासमोरील गंभीर पेचप्रसंग

**Bandu Shrinivas Talikhedkar**
Research Students, Department Civices And Politics, University Of Mumbai
**DOI- 10.5281/zenodo.6988600**

**प्रस्तावना:** भारताने संसदीय लोकशाहीचा पुरस्कार केला आहे. कायदेमंडळ कार्यकारी मंडळ न्यायमंडळ आणि राष्ट्रपती हे संसदीय लोकशाहीचे महत्त्वाचे घटक आहेत.भारतीय राज्यघटनेनुसार कायदे मंडळ हे कायदे निर्माण करणारे एक महत्त्वाचे मंडळ आहे. न्याय मंडळ भारतीय राज्यघटनेच्या विसंगत कायद्याला अंकुश ठेवून भारतीय राज्यघटनेच्या मूलभूत तत्वाच्या संरक्षणासाठी निर्माण झाले आहे. 1952 नंतर कायदेमंडळ आणि न्यायमंडळ यांच्यातील परस्पर सुसंवाद आणि समतोल कायम होताना दिसतो आहे. 1980 नंतरच्या काळात भारताच्या राजकारणात न्यायालयीन सक्रियता हे तत्व अस्तित्वात आल्यामुळे कायदेमंडळाच्या सक्रियेतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळाच्या एकूणच कार्यपद्धती व उद्देशाबाबत साशंकता निर्माण होतात तेंव्हा न्यायालयाकडून अपेक्षा मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसत आहे. सामाजिक न्याय, नागरी आणि राजकीय अधिकार, पर्यावरणाच्या संरक्षणासाठी संदर्भातील महत्त्वाचे निर्णय बाबत सर्वसामान्य जनता न्यायालयाच्या निर्णयावर विसंबून राहताना दिसतात. त्याचाच एक भाग म्हणून मराठा आरक्षणाचा प्रश्न आणि न्यायालयाच्या निर्णयाची गुंतागुंत हा खरा घटनात्मक मूल्याचा म्हणजेच सामाजिक न्यायाच्या प्रश्न म्हणून उभा राहताना दिसत आहे. भारताच्या राजकीय व्यवहारात न्यायालयीन सक्रियता सार्वजनिक चर्चाविश्वाचा आणि अपेक्षाचा महत्त्वाचा घटक राहिला आहे. विशेषतः 1980 नंतर सार्वजनिक प्रश्नासंदर्भात, तत्कालीन सामाजिक धोरणासंदर्भात कायदे मंडळाने आणि कार्यकारी मंडळाने आपल्या भूमिका अस्तित्वात असताना सुद्धा न घेता, न्यायालयाने सक्रियपणे या भूमिका घेऊन सार्वजनिक चर्चाविश्वाचा काही प्रमाणात विश्वास संपादन केला आहे. मराठा आरक्षणाच्या संदर्भात सामाजिक न्याय आणि त्या अनुषंगाने समकालीन सार्वजनिक चर्चाविश्वातील निर्णय यामध्ये मोठे पेचप्रसंग निर्माण झाले आहेत.

### मराठा आरक्षण: एक आकलन

महाराष्ट्रातील मराठा समाज विविध प्रादेशिक आणि भाषिक समूहामध्ये विभागला गेलेला समूह आहे. महाराष्ट्रातील विविध प्रदेशात या समूहाच्या भाषा, चालीरीती आणि कौटुंबिक रितीरिवाज या आधारे भिन्नता दिसून येते. एकूण महाराष्ट्रातील लोकसंख्येचा विचार करता मराठा समुदायाची लोकसंख्या 32 ते 35 टक्के असल्याचे सांगितले जाते. या आकडेवारीमध्ये मतभिन्नता असली तरी एक बाब मात्र निश्चित आहे कि 30 टक्केच्या आसपास मराठा समुदायाची लोकसंख्या आहे. प्रामुख्याने हा समुदाय शेती व्यवसायाशी निगडीत राहायला आहे. शेती व्यवसायाच्या आधारे आपली उपजीविका व आपले व्यवसाय हाच एक प्रमुख आधार स्वातंत्र्यानंतर राहिलेला होता. ग्रामीण जीवनामध्ये प्रामुख्याने हा समुदाय मोठ्या प्रमाणात आपल्या सत्तेच्या केंद्रस्थानी सुद्धा राहिला आहे. ग्रामीण भागामध्ये सहकारी सोसायटी, बँका, शैक्षणिक संस्था, राजकीय पदे यासारख्या महत्त्वाच्या अर्थकारणाशी निगडित बाबी या समुदायाच्या केंद्रस्थानी राहिले आहे. त्यासोबतच जमिनीची मालकी हा सुद्धा या समुदायाच्या राजकीय वर्चस्व शाली भाग म्हणून राहिला आहे. म्हणून अनेक राजकीय अभ्यासकांनी व विश्लेषकांनी प्रभुत्वशाली जात समुदाय म्हणून मानत असताना जात आणि जमीन यांचा परस्पर संबंध आणि अन्वयार्थ लावताना राजकीय अभिजन असलेला समुदाय म्हणून मानले गेले आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर मोठ्या प्रमाणात सरपंचापासून ते लोकसभेच्या खासदारांपर्यंत या समुदायाच्या सर्वाधिक संख्या दिसते.

मराठा समुदाय हा शेतीशी निगडित असलेल्या समुदाय आहे. ग्रामीण जीवनामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक विकासाला पूरक असणारे घटक निर्माण झाले आहे. किंबहुना असे म्हणता येईल की एकूणच समाजातल्या सामाजिक आर्थिक राजकीय जीवनात मोठ्या प्रमाणात बदल झाले. या बदलाची प्रक्रिया समजून घेताना आपणास प्रामुख्याने महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासामध्ये हरित क्रांती चा महत्त्वाचा वाटा आहे. हरित क्रांतीमुळे मोठ्या प्रमाणात शेतीच्या तंत्रज्ञानामध्ये मोठे बदल झाले. विशेषतः बी बियाणे, खते, शेतीतील सिंचनाखालील क्षेत्र, यासारख्या घटना मुळे शेती क्षेत्रात किंबहुना ग्रामीण क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल झालेले दिसून येतात. शेती क्षेत्र हे प्रामुख्याने बाजारपेठेची जोडली गेली.

बाजारावर अवलंबित्व हे हरित क्रांतीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. या सगळ्या प्रक्रियेमध्ये तंत्रज्ञानाची उपलब्धता ही लहान तंत्रज्ञानाला नाहीशी करून मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञानाच्या आधारे जमिनीची आणि त्यासोबतच भांडवल आणि तंत्रज्ञानाचे मक्तेदारी ही मोठ्या वर्गाकडे हस्तांतरित झाले. छोटे-मोठे शेतकरी हे लहान किंबहुना जमीन हे एका विशिष्ट वर्गाकडे हस्तांतरित झाली. त्यातूनच मोठ्या प्रमाणात जमिनीचे आणि संपत्तीचे मोठ्या प्रमाणात मालकी एका वर्गाकडे आली. जी प्रामुख्याने पूर्वी सत्ताधारी असलेल्या जमीन मालक हा नव्या पद्धतीचा वर्गसमीकरण आकाराला आले. राजकीय सत्तेच्या आणि आर्थिक सत्तेच्या केंद्रस्थानी हा वर्ग प्रमुख बनला. पण छोटा जमीन मालक नव्या पद्धतीचा मजुरीवर आधारित कामकरी पडला. जागतिकीकरणानंतर प्रामुख्याने वित्तीय क्षेत्राचे प्रमाण ग्रामीण जीवनामध्ये विविध बचत गट, बँका, किंवा यासारख्या अनेक वित्तीय संस्था प्रमाणामध्ये वाढायला लागला. या पार्श्वभूमीवर मराठा समुदायांमध्ये मोठ्या प्रमाणात वर्ग स्तरीकरण निर्माण झाले. एका बाजूला जातीय चौकटीमध्ये जातीय अस्मितावादी राजकारण जे प्रामुख्याने प्रतिक्रियावादी म्हणून उदयाला आले. जातीवर आधारित मराठा समाजाच्या संघटना निर्माण झाल्या. संभाजी ब्रिगेड, मराठा सेवा संघ,छावा यासारख्या अनेक संघटना महाराष्ट्राच्या राजकारणात निर्माण झाल्या. या पार्श्वभूमीवर मराठा आरक्षणाचा प्रश्न समजून घ्यावा लागेल.

जागतिकीकरणानंतर मराठा समुदायांमध्ये मोठ्या प्रमाणात वर्गीय स्तरीकरण निर्माण झाले. एक वर्ग प्रामुख्याने अल्पभूधारक शेतकरी म्हणून अस्तित्वात आला. आपली उपजीविका शेतीच्या माध्यमातून भागवण्यासाठी रात्रंदिवस मेहनत करणारा हा वर्ग होता. शैक्षणिक सुविधा आणि संधी, रोजगाराची संधी, सरकारी सेवेतील संधी याची मोठ्या प्रमाणात खाजगीकरण झाले आहे या वर्गासाठी ही संधी नाहीशी झाली. आपली उपजीविका शेतीमध्ये भागत नसल्यामुळे सावकार, खाजगी बँका वित्तीय संस्था यांच्या माध्यमातून कर्ज काढून जगत होता. दुसरा वर्ग प्रामुख्याने श्रीमंत शेतकरी या नावाने अस्तित्वात आला. शैक्षणिक संस्था माध्यमातून मोठ्या प्रमाणात डोनेशन घेणे, मोठ्या प्रमाणात राजकीय सत्ता सुद्धा या वर्गाच्या हातात आली. तिसरा वर्ग जो प्रामुख्याने मोठ्या प्रमाणात शहरांमध्ये रोजगाराची संधी शोधत कधी दैनंदिनी रोजगार म्हणून तर कधी नाक्यावर काम करण्यास येऊ लागला अशा विविध वर्गीय स्तरीकरणात मराठा समाज विभागला गेला आहे. या पार्श्वभूमीवर मराठा आरक्षणाची मागणी आणि कायदेमंडळ आणि न्यायमंडळ यांच्यातील ताणतणाव समजून घेणे हे या लेखाचे मुख्य उद्देश आहे.

- **मराठा आरक्षण चळवळ : संक्षिप्त आढावा**

5 मे 2021 रोजी, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या 5 सदस्यीय घटनापीठाने "सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीयांसाठी महाराष्ट्र राज्य आरक्षण (SEBC) कायदा, 2018 ( "SEBC कायदा, 2018") फेटाळला. "डॉ. जयश्री लक्ष्मणराव पाटील विरुद्ध मुख्यमंत्री आणि इतर" ही याचिका सादर करण्यात आली होती . या याचिकेच्या आधारे मराठा आरक्षणाला प्रामुख्याने काही महत्त्वाचे नियम सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. त्यामध्ये महाराष्ट्र सरकारच्या मागासवर्गीय आयोग आणि गायकवाड समितीचा अहवाल देण्यात आला होता. तो अहवाल फेटाळण्यात आला. या अहवालाने व राज्य सरकारने मराठा समाजाला मागास म्हणून घोषित केल्याचे रद्द करण्यात आले. इंद्रा सहानी केसच्या पुनर्विचाराची मागणी चुकीची ठरवली. 50 टक्केपेक्षा जास्त आरक्षण हे एकूणच घटनात्मक चौकटीमध्ये विसंगत आहे. भारतीय राज्यघटनेमध्ये आरक्षणाच्या तत्वाला म्हणजेच आरक्षणाच्या माध्यमातून स्थापित होणाऱ्या समानतेच्या विसंगत आहे अशा प्रकारचे मत सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले. या निर्णयामुळे एकूणच मराठा आरक्षणाची चळवळ व त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे याचा आढावा घेणे अत्यंत आवश्यक आहे.

- **भारतातील विविध समित्या आणि आयोगाचे मराठा आरक्षणासंदर्भातील निरीक्षण**

1) **काका कालेलकर आयोग (पहिला मागासवर्गीय आयोग)**

केंद्र सरकारने देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतातील सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागास घटकांना घटनात्मक चौकटीमध्ये आरक्षण देण्यासाठी काका कालेलकर आयोगाची 1955 मध्ये नेमणूक केली. या आयोगाच्या विविध समुदायाच्या शैक्षणिक व सामाजिक मागासलेपणाबद्दल अभ्यास करून अनेक महत्त्वाचे निष्कर्ष

आणि शिफारसी करण्यात आल्या होत्या. या आयोगाने महाराष्ट्रातील मराठा समाजाबाबत आणि मराठा आरक्षणाबाबत काही महत्त्वाचे निष्कर्ष नोंदवले आहे. त्यापैकी मराठा समाजाचे सामाजिक आणि शैक्षणिक परिस्थिती विचार करता मराठा समाज हा शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या नाही किंबहुना मराठा समाज सामाजिक दृष्ट्या सुद्धा मागास केला नाही. उलट या समाजाचे समाजातल्या इतर शोषित वंचित घटकावर वर्चस्व असल्याचे निष्कर्ष काढले. यातूनच त्यांनी मराठा समाजाला आरक्षणाची गरज नाही अशा प्रकारचे मत नोंदवून आरक्षणाबाबत विचार करता येणारा समुदाय नाही अशी शिफारस केली.

2) **बी. डी. देशमुख आयोग**

महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर केंद्र सरकारच्या सल्ल्यानुसार राज्यामध्ये बी. डी. देशमुख यांच्या नेतृत्वाखाली एक आयोग नेमला होता. या आयोगाची नेमणूक महाराष्ट्र सरकारने 14 नोव्हेंबर 1961 ला केली या आयोगाने अभ्यास करून 11 जानेवारी 1964 हा आयोगाचा अहवाल राज्य सरकारला सादर केला. केंद्र सरकारच्या सल्ल्यानुसार राज्यांमध्ये मागास जातीची यादी निश्चित करणे, त्यासाठीचे निकष आणि निष्कर्ष स्पष्ट करणे. हा या आयोगाच्या मुख्य उद्देश होता. या आयोगाने महाराष्ट्रातल्या विविध 180 मागासवर्गीय जाती म्हणून अधोरेखित केल्या. बी.डी. देशमुख समितीने म्हटले आहे की, "मराठा हा मागासवर्गीय म्हणून आढळला नाही." त्यामध्ये मराठा समाजाला शैक्षणिकदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या मागास नसल्याचे नमूद केले.

3) **मंडल आयोग (१९७९)**

भारताच्या तत्कालीन राष्ट्रपतींनी दुसऱ्या राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाची नियुक्ती केली. बी. पी. मंडल हे या आयोगाचे अध्यक्ष होते. म्हणून या आयोगाला मंडल आयोग म्हणून ओळखले जाते. या आयोगाची नेमणूक भारतीय राज्यघटनेच्या कलम 340 नुसार करण्यात आली होती. या आयोगाने भारतातल्या विविध राज्यांमध्ये शैक्षणिक व सामाजिक दृष्ट्या मागास समुदायांना जे निष्कर्ष ठरवून निवड करण्याची प्रमुख जबाबदारी होती. महाराष्ट्रातल्या विविध जाती समुदायांच्या अभ्यास करून या मागास समुदाय म्हणून नियुक्ती केली. मंडल आयोगाने महाराष्ट्र राज्याच्या अहवालात, मराठ्यांचा समावेश 2.2 टक्के "हिंदू जाती आणि समुदाय" या श्रेणीमध्ये करण्यात आला आहे. त्यानंतर या आयोगाला राज्याच्या विनंतीला प्रतिसाद म्हणून मागासवर्गीयांसाठी राष्ट्रीय आयोगाने मुंबईत सार्वजनिक सुनावणी घेतली; महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या अध्यक्षांनी 25 फेब्रुवारी 1980 रोजी सविस्तर अहवाल सादर केला . ज्यामध्ये मराठा हा सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय समुदाय नसून सामाजिकदृष्ट्या प्रगत आणि प्रतिष्ठित समुदाय असल्याचे नमूद केले आहे.

4) **राणे समिती (2014)**

मराठा आरक्षणाचे चळवळीचा वेग मोठ्या प्रमाणात वाढत होता. मराठा जातीतील विविध संघटना, राजकीय पक्ष व त्यासोबत इतर नेत्यांनी मराठा आरक्षणाचा प्रश्न हाती घेऊन योग्य तो मार्गाने सोडवण्याचे आश्वासन या काळात देण्यात आले. परिणामतः तत्कालीन राज्य सरकारने मंत्री नारायण यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली मराठा आरक्षणासंदर्भात अहवाल सादर करण्याची विनंती केली. नारायण राणे समितीने 2014च्या भारतीय संविधान कलम 15 (4) आणि 16 (4) अंतर्गत मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या संदर्भात शिफारशी केल्या आणि त्यात पद्धतीने आरक्षणाची मागणी केली. याचा अहवालाचा सकारात्मक विचार 2014 चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक XIII प्रसिध्द करण्यात आला. या अध्यादेशामध्ये महाराष्ट्र राज्यातील अनुदानित आणि विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी जागांसाठी स्वतंत्र 16 टक्के आरक्षण तसेच राज्यांतर्गत सार्वजनिक सेवापदांवर नियुक्तीची तरतूद केली होती. तत्कालीन राज्य सरकारने मराठा समाजाला शैक्षणिक आणि नोकरीच्या क्षेत्रांमध्ये आरक्षणाची मागणी जाहीर केली. 2014 च्या शासन निर्णयाला आणि 2014 च्या अध्यादेश क्रमांक XIII ला "श्री संजीत शुक्ला विरुद्ध महाराष्ट्र राज्य WP.No.2053 2014" नुसार मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. मुंबई उच्च न्यायालयाने निर्णय देताना दिनांक 7 एप्रिल 2015 रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने मराठा समाजाला 16 टक्के आरक्षण देण्याच्या अंमलबजावणीला स्थगिती देणारा आदेश जारी केला. दुसरीकडे, अंतरिम आदेशात, रिट याचिकेचा अंतिम निकाल लागेपर्यंत, पूर्वी जारी केलेल्या जाहिरातींमध्ये

मराठा आरक्षणासाठी 16 टक्के नियुक्त्या ओपन मेरिट उमेदवारांकडून केल्या जाव्यात आणि रिटच्या निकालाच्या अधीन राहून नियुक्त्या कराव्यात, असे निर्देश दिले आहेत.

**5) न्यायमूर्ती एम.जी. गायकवाड आयोग (2017)**

महाराष्ट्र सरकारने 2 नोव्हेंबर 1 2017 रोजी न्यायमूर्ती एम. जी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली एक मागासवर्गीय आयोगाची नेमणूक करण्यात आली. या आयोगाने मराठा जातीच्या मागास असण्याबद्दलचे वस्तुस्थिती निरीक्षण या संदर्भातील अहवाल सादर करणे हे या आयोगाचे महत्वाचे उद्दिष्ट होते. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या आयोगाने आपला अहवाल २०१८ रोजी सादर केला. या आयोगाच्या अहवालात प्रामुख्याने महत्त्वाचे निरीक्षण आणि शिफारसी मांडण्यात आले होते. त्यातील प्रामुख्याने मराठा जातीला सेवांमध्ये अपुरे प्रतिनिधित्व असल्यामुळे सामाजिक आणि आर्थिक मागास वर्ग (SEBC) म्हणून नियुक्त करण्याची शिफारस केली होती. या आयोगाच्या आधारेच राज्य सरकारने मराठा समाजाला सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय ठरवत आरक्षणचा विशेष असा अध्यादेश जारी केला. या अध्यादेशाला "सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीयांसाठी महाराष्ट्र राज्य आरक्षण (SEBC) कायदा, 2018" या नावाने ओळखले जाते. हा अध्यादेश राज्यामध्ये 30.11.2018 रोजी लागू झाला.

**6) सर्वोच्च न्यायालयाचा निकाल (२०२१)**

हा अध्यादेश सर्वोच्च न्यायालयाने खाली निकषाच्या आधारे असंविधानिक व घटनात्मक तत्वाच्या विसंगत असल्याचे नमूद केले. त्याची कारणे खालील प्रमाणे देण्यात आली.

1) मराठा आरक्षणाचा अध्यादेश हा एक असंविधानिक आहे. या अध्यादेशाच्या माध्यमातून इंदिरा सहानीविरुद्ध केंद्र सरकार याबद्दलची आरक्षण संदर्भातला अध्यादेश पन्नास टक्के पेक्षा अधिक आरक्षणाची मर्यादा ओलांडता येणार नाही म्हणून हा अध्यादेश असंविधानिक आहे.

2) न्यायमूर्ती गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या आयोग हा प्रामुख्याने मराठा आरक्षणाच्या संदर्भातील माहिती ही अविश्वसनीय आहे. कारण या माहितीच्या आधारे मराठा समाज मागास असल्याचे कोणतेही ही वैज्ञानिक माहिती समोर येत नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील आरक्षणाची मर्यादा 52% वरून 67 % इतकी जाणार हे सांविधानिकदृष्ट्या चुकीचे आहे.

3) या अध्यादेशाच्या आधारे इतर मागास वर्गीय घटक (OBC) यांच्या पलीकडे विशेष लाभ देण्यासाठी ज्या काही तरतुदी केले आहे त्या तरतुदी प्रामुख्याने भारतीय राज्यघटनेच्या कलम 14, 16 आणि 19 चे उल्लंघन करणारी आहे. म्हणून हा अध्यादेश असंविधानिक आहे.

4) या अध्यादेशाच्या निमित्ताने म्हणजेच 2014 आणि 2016 मध्ये जो ठराव पास केला तो उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विसंगत आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्या धोरणाबाबत आणि न्याय मंडळाच्या भूमिकेबाबत संशय निर्माण होत आहे. अशा पार्श्वभूमीवर मराठा समाज गरीब आणि वंचित घटकांना एक प्रकारची राजकीय निर्माण होताना दिसत आहे. निवडणुकीच्या माध्यमातून या प्रश्नाची सोडवणूक विविध राजकीय पक्ष करत असताना दिसत आहेत. आरक्षणाचा प्रश्न हा केवळ निवडणुकीपुरता चर्चिला जातो. मात्र सोडवणुकीच्या दिशेने कोणीही जाताना दिसत नाही.

**निष्कर्ष**

आरक्षणाची मूळ संकल्पना प्रातिनिधिक तत्वावर आधारित आहे. शैक्षणिक आणि शासकीय सेवेत आरक्षणाचे तत्व लागू करून समानता प्रस्थापित करणे किंवा सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास घटकांना मुख्य प्रवाहात संधी उपलब्ध करून देणे हे आरक्षणाचे मुख्य उद्दिष्ट होते. भारताला स्वातंत्र्य मिळून 75 वर्ष झाली असताना सुद्धा आज सुद्धा समाजातल्या अनुसूचित जाती अनुसूचित जमाती आणि इतर मागास प्रवर्ग यांना हव्या त्या पद्धतीने संधी उपलब्ध झालेल्या नाहीत. आरक्षणाचा फायदा घेऊन एक मध्यम वर्ग या जाती धर्मात निर्माण झाल्याचे दिसते. जागतिकीकरणाच्या विकासाच्या प्रक्रियेत सर्वसामान्य जनता मात्र आर्थिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागास असल्याचे दिसून येते. विविध जाती समुदाय जे प्रामुख्याने शोषित वंचित म्हणून आपले जीवन व्यतीत करत आहे. अशा समुदायांना आरक्षणाच्या आधारे जातीय अस्मिता मजबूत बनत असताना दिसते. मराठा समाज वेगवेगळ्या वर्गीय स्तरीकरण यामध्ये विभागला गेला आहे. त्यातील गरीब शेतकरी, शेतमजूर किंवा कामगार यांना खाजगीकरण माध्यमातून शैक्षणिक सुविधा आर्थिक विकासाची संधी पूर्णत: नाकारली गेली आहे. अशा

पार्श्वभूमीवर कायदेमंडळ आणि न्यायमंडळ यांच्यातील ताणतणाव हा आरक्षण धोरणावरचा नक्कीच उपाय नाही. सर्व समाज घटकांचा मूलभूत सामाजिक आर्थिक विकास करणे हेच यामागचे महत्त्वाचे उद्दिष्ट असले पाहिजे.

**संदर्भ**

1. Lele Jayant (१९८१) Elite Pluralism and Class Rule: Political development in Maharashtra, India , University of Toronto Press,
2. Palshikar, S. (2014). Farewell to Maratha Politics? Assembly Election in Maharashtra. Economic and Political Weekly,
3. पळशीकर, एस.व्ही. (2013). राजकारणाचा ताळेबंद: भारतीय लोकशाहीची वाटचाल. पुणे: साधना प्रकाशन.
4. https://kartavyasadhana.in/view-article/maratha-reservation-decisions-that-underlines-social-undercurrent-writes-vivek-ghotale
5. https://www.google.com/amp/s/m.thewire.in/article/law/maratha-reservations-why-scs-verdict-may-still-open-the-door-to-further-litigation/amp
6. Palshikar, S.V., Birmal, N., Ghotale, V. (2010). Coalitions in Maharashtra: Political fragmentation or Social reconfiguration? ( CAS Occasional Paper Series No. 4 ). Pune: Dept of Politics & Public Administration, University of Pune.
7. Sathe,S. P.(2003), Judicial Activism in India,Oxford University Press ,India

# पाली भाषेचे स्वरूप

**डॉ. माधव बसवंते**
प्राध्यापक तथा मराठी विभागप्रमुख राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड, जि.नांदेड
Email: madhavgbt@gmail.com
**DOI-10.5281/zenodo.6988602**

**सारांश :** *इ.स. पूर्व काळापासून भारतात अनेक भाषा भारताच्या वेगवेगळ्या प्रांतात बोलल्या जातात. या भाषांच्या मालिकेतील पाली भाषेचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो. पाली भाषा ही एक स्वतंत्र भाषा आहे. पाली भाषा ही एक प्राकृतिक भाषा आहे. त्रिपिटकातील भगवान बुद्धांची वचने ही पाली भाषेत आहेत. मगध सम्राटाने आपल्या राज्य कारभाराची भाषा म्हणून पाली भाषेला अधिकृत दर्जा प्राप्त करून दिला होता. भारतातील प्रामुख्याने मराठी, हिंदी, बंगाली व पंजाबी, मल्याळम्, गुजराथी या भाषांमध्ये पाली भाषेच्या अनेक शब्दांचा वापर होताना दिसून येतो. भगवान बुद्धाच्या आधीपासूनच पाली भाषा ही अस्तित्वात होती असे भाषा अभ्यासक व संशोधकांना वाटते. आपणास भगवान बुद्धाच्या विशाल मानवतेच्या तत्वज्ञानाचा परिचय हा पाली भाषेतून करून घेता येतो. पाली भाषा ही प्रामुख्याने तथागत भगवान बुद्धांच्या संदेशाची भाषा होती. पाली भाषेच्या साहित्यामध्ये ऐतिहासिक ज्ञानाचा प्रचंड भांडार असून ते ज्ञानभांडार अजूनही वाचकांसमोर पूर्णपणे आलेले नाही, म्हणूनच पाली भाषा आणि पाली साहित्यावर संशोधन करण्याची गरज आहे.*

**बीजसंज्ञा :** पाली भाषा उगम, त्रिपिटक, वर्णमाला, नाम, सर्वनाम, क्रियापद, विभक्ती, निष्कर्ष

**प्रस्तावना :**

पाली भाषा ही सर्वसामान्य माणसांची बोलीभाषा असल्यामुळे पाली भाषेत साहित्य निर्मिती होऊ शकली नाही. आज आपण ज्या भाषेला पाली भाषा म्हणून ओळखतो त्या भाषेचे प्रारंभीचे नाव पाली भाषा नव्हते, हे प्रकर्षाने जाणवते. दीपवंस ग्रंथामध्ये पालीचा प्रयोग बुद्धवचन असे दिसून येते. साधारणतः अठराव्या—एकोणिसाव्या शतकापर्यंत पाली या शब्दाचा अर्थ एक स्वतंत्र भाषा म्हणून दिसून येत नाही. आचार्य बुद्धघोषांच्या अट्ठकथा मध्ये पाली शब्दाचा वापर दोन अर्थानी केलेला आहे. त्यातील पहिला अर्थ बुद्धवचन किंवा मूळ त्रिपिटक तर दुसरा अर्थ पाठ किंवा मूळ त्रिपिटकाचा पाठ असा आहे. तसेच सासनवंश या ग्रंथातही पाली या शब्दाचा अर्थ बुद्धवचन किंवा मूळ त्रिपिटक पाठ असाच असल्याचे दिसून येतेण मूळात मागधी भाषाच पाली ही प्राकृत भाषा म्हणून भारतात बोलली जात होती, पण या भाषेचे स्वतंत्र असे नियमबद्ध व्याकरण नव्हते. परंतु पुढे ही पाली भाषा जेव्हा ग्रंथाची वा साहित्याची भाषा झाली, तेव्हा मात्र पालीभाषेला व्याकरणाचे स्वरूप प्राप्त झाले. *'सामान्य जनांद्वारे बोलली जाणारी पाली भाषा प्रगतीशील मानव समाजाबरोबर आपले रंगरूप बदलत गेली. त्या समयी सामान्य जनांच्या भाषेने मागधीचे रूप ग्रहण केले व त्याच भाषेला पुढे पाली भाषा, मागधीा, तन्ति इत्यादी नावांनी ओळखले गेले. बौद्धकालीन सामान्य जणांच्या भावनासह व भगवान बुद्धांच्या उपदेशांचा अंतर्भाव अंकित करण्याचे सौभाग्य पाली भाषेला प्राप्त झाले.*[१]

आपणास पाली भाषेचा अभ्यास परियत्ति, पटिपत्ति व पटिवेदन या तीन अंगाने करता येतो. यावरून पाली भाषा ही भगवान बुद्धाच्या जन्मापूर्वीपासूनच समाजात बोलली जात होती. धम्म उपदेशासाठी भगवान बुद्धांनी पाली भाषेचा वापर केला आणि पुढे पाली भाषा ही ग्रंथाची भाषा झाली.

*'दुर्दैवाने भारतातून बुद्धाचा धम्म लयाला गेला. भाषा विसरली गेली आणि लिपी वाचता येईनाशी झाली. परंतु श्रीलंका, म्यानमार सारख्या आपल्या शेजारच्या देशांनी बुद्धाच्या धम्मासह पाली भाषेचे जतनच केले नाही, तर ती भाषा जोपासली. जगभरातील बौद्ध राष्ट्रांमध्ये अभ्यासली जाणारी पाली भाषा भारतात मात्र परकी आणि नवीन भाषा असल्यासारखी वाटते. पण आपण हे विसरायला नको की, पाली भाषा ही आज भारतात बोलल्या जाणाऱ्या सर्व भाषांच्या आदिभाषेसारखी आहे आणि त्यामुळे आपल्याला खूप जवळची आहे. ऐकतांना ओळखीची वाटते आणि कित्येक शब्द तर अगदी बोली भाषेतील वाटतात.*[२]

**पाली भाषा अर्थ व उगम :**

आज आपण ज्या भाषेला पाली भाषा म्हणून ओळखतो त्या भाषेचे प्रारंभीक नाव पाली भाषा नाही हे प्रकर्षाने जाणवते. इ.स.एकोणिसाव्या शतकामध्ये भिक्षू प्रज्ञास्वामी यांनी सासनवंश या आपल्या ग्रंथामध्ये पाली शब्दाचा भाषा म्हणून उल्लेख केलेला आहे. पाली या शब्दाचा मूळ अर्थ बुद्धवचन, त्रिपिटकातील मूळपाठ किंवा संस्कृत भाषेप्रमाणे पंक्ती, असावा अशी मते मांडण्यात आलेली आहेत. पाली भाषेच्या उगमाविषयी काही विचारवंतांची मते खालीलप्रमाणे आहेत.

१) प्रोफेसर रायस डेविडस — कोशल प्रदेशामध्ये इ. स.पूर्व सहाव्या आणि सातव्या शतकामध्ये पाली भाषा ही बोलीभाषा होती, कारण भगवान बुद्ध कोशल प्रदेशातीलच होते. म्हणून त्यांची भाषा मागधीच असणार.

२) आर.ओ.फ्रेंक — पाली भाषेचे उगमस्थान विंध्य प्रदेश आहे, कारण गिरणार शिलालेखाशी पाली भाषेचे अधिक साम्य आहे.

३) स्टैन कोनो — विंध्य प्रदेश पाली भाषेचे उगमस्थान आहे. पैशाची प्राकृत भाषा ही विंध्यप्रदेशामध्ये उज्जयिनीच्या जवळपास बोलली जात होती. पैशाची व पाली भाषेत बरेचसे साम्य आहे.

४) डॉ.ओल्डनबर्ग — पाली ही कलिंङग देशाची भाषा होती, कारण लंका शेजारी असल्याने कलिंग वरूनच लंकामध्ये धम्मोपदेशचे कार्य झाले.

५) इ.मुलर – कलिंङगच पाली भाषेचे उगमस्थान आहे, कारण सर्वात आधी भाषेचा लंकामध्ये प्रचार, प्रसार होणे हे अधिक सुसंगत वाटते.

६) मराठी विश्वकोश – पाली ही जातकांची, तसेच धम्मपद बोधनिहाय इ. बौद्ध धर्मग्रंथाची भाषा आहे. पाली याचा मूळ अर्थ ओळ किंवा पंक्ती असा आहे. एखाद्या धर्मग्रंथातील वचन किंवा उतारा असाही अर्थ नंतर त्याला लक्षणेने आला आहे.

**त्रिपिटक**

बौद्धांच्या पवित्र ग्रंथांना त्रिपिटक या नावाने ओळखले जाते. भगवान गौतम बुद्धांनी आपल्या अनुयायांना जे नियम, उपदेश आणि तत्वज्ञान दिले आहेत, ते त्रिपिटकात आहेत. त्रिपिटक म्हणजे तीन पेटारे आहेत. या तीन पेटाऱ्यात सुत्तपिटक, विनयपिटक आणि अधिधम्म या तीन पिटाऱ्यांचा समावेश आहे. थेरवादी बौद्ध परंपरेनुसार त्रिपिटकांना बुद्धवचन मानले जाते, कुशिनारा येथे भगवान बुद्धाचे महापरिनिर्वाण झाल्यानंतर चौथ्या महिन्यात राजगृह येथील वैभार पर्वतावरील सप्तपर्णी गुंफा येथे अनेक भिक्खुंच्या उपस्थितीत प्रथम संगीती घेण्यात आली. भगवन गौतम बुद्धांनी ४५ वर्षे चारिका करून जी बुद्धवचने जनतेला दिली आहेत, त्या धर्मोपदेशांचे संकलनात्मक ग्रंथ म्हणजेच त्रिपिटक होय.

**१.सुत्तपिटक**

ज्या ग्रंथामध्ये सामान्य उपदेश आहेत, अशा त्या ग्रंथाला सुत्तपिटक असे संबोधण्यात आले आहे. तथागतांनी भिक्षु, गृहस्थ व आपल्या अनेक शिष्यांना दिलेल्या अनेक उपदेशांचा या ग्रंथात समावेश आहे. या सुत्तपिटकांध्मये इ.स. पूर्व पाचव्या व सहाव्या शतकातील भारतातील सामाजिक जीवन, उद्योग, धार्मिक पद्धती, मनोरंजन, कला, वर्णवाद, जातिवाद, गाव, शहर, कृषीजीवन, साहित्य, सामाजिक रूढी–परंपरा, माणसांची नैतिकता, स्त्रीयांची अवस्था इत्यादींची माहिती देण्यात आलेली आहे.

**२.विनय पिटक**

बौद्ध धर्माच्या परंपरेत विनयपिटक या ग्रंथाचे स्थान सर्वश्रेष्ठ दर्जाचे आहे. बौद्ध विचारवंत या ग्रंथास भिक्खू संघाचे संविधान म्हणतात. यात भिक्खूंनी पाळावयाच्या नियमांचा संग्रह असून शरीर आणि वाणीचे नियमन केल्यामुळेच या ग्रंथाला विनयपिटक म्हटले जाते. या विनयपिटकाचे तीन भाग असून या तीन भागांचे सुत्तविभंग, भिक्खू विभंग, भिक्खूणी विभंग, खन्धक, महावग्ग व चुल्लवग्ग या नावाचे ग्रंथ तयार करण्यात आले आहेत.

**३)अधिधम्म पिटक**

यात शरीर, चित्त अणि वैज्ञानिक विषयावरील उपदेश संग्रहित करण्यात आले आहेत. आचार्य बुद्धघोषांनी त्रिपिटकातील अधिधम्माचा अर्थ उच्चस्तर धम्म किंवा विशेषधम्म असा केला आहे. अधिधम्म पिटकांमध्ये सात ग्रंथाचा समावेश असून त्यात १) धम्मसंगणि, २) विभंग, ३) धातुकथा, ४) पुग्गल पत्रति, ५) कथावत्थु, ६) यमक, व ७) पट्ठाण या ग्रंथाचा समावेश आहे.

**वर्णमाला**

भारतातील किंवा जगातील कोणतीही भाषा शिकण्यासाठी प्रथमतः वर्णमाला शिकावी लागते. इतर भाषेप्रमाणेच पाली भाषेत ४३ वर्ण असून त्यात दहा स्वर व तेहतीस व्यंजने आहेत. पाली भाषेमध्ये प्रामुख्याने कच्चायन व मोग्गलायन या दोन प्रकारच्या व्याकरणाचा अभ्यास केला जातो. पाली भाषेतील ही वर्णमाला देवनागरी व रोमन लिपीमध्ये आहे. पाली भाषेत स्वर, व्यंजन, नियम आहेत. अट्टकडी व संयुक्त व्यंजनाच्या परिवर्तनाचे काही नियम दिले आहेत. पाली भाषेतील काही अपवादात्मक शब्द वगळता शब्दांच्या प्रारंभीच जोडाक्षर येत नाही.

**नाम**

पाली भाषेतील नामामध्ये तीन लिंग, दोन वचने व सामान्यपणे सात विभक्त्या आहेत. नामाच्या अंत्य वर्णानुसार पाली भाषेतील शब्दांना प्रत्यय लागतात. संस्कृत भाषेची काही रूपे यात आढळतात. पालीतील एकवचन व अनेकवचनाची रूपावली सोपी व स्पष्ट आहे. जसे बुद्धो (बुद्धा)

**सर्वनाम**

एखाद्या वाक्यामध्ये वारंवार नामाचा उल्लेख करणे भाषिकदृ ष्ट्या योग्य नाही. त्यामुळे जेव्हा वाक्यामध्ये नामाच्या ऐवजी वापरण्यात येणाऱ्या शब्दाला सर्वनाम म्हणतात. पाली भाषेतील सर्वनाम हे प्रामुख्याने चार भागामध्ये विभागले गेले आहेत. पाली भाषेतील पुरूषवाचक सर्वनाम (अम्ह, तुम्ह), दर्शक सर्वनाम (त, एत, इम), संबंध दर्शक सर्वनाम (य), प्रश्नार्थक सर्वनाम (क) अशा शब्दांचा वापर केला जातो.

**क्रियापद**

कोणत्याही भाषेच्या अभ्यासासाठी क्रियापदाचा अभ्यास महत्वाचा असतो. जो वाक्यातील कर्त्याची क्रिया दर्शवविते त्या शब्दाला क्रियापद म्हणतात. क्रियापदाच्या मूळ शब्दास धातू म्हणतात. पाली भाषेत तीन काळ आहेत. पाली भाषेत वर्तमानकाळाला, वर्तमान किंवा पच्चुपन्न काल म्हणतात. भूतकाळाला अतित काल म्हणतात, तर भविष्यकाल अनागत काल म्हणतात. पाली भाषेतील क्रियापद ओळखण्यासाठी चार पायऱ्या नेहमीच लक्षात ठेवाव्या लागतात.

*'उदा. धावति (क्रियापद) १. मूळ शब्द ओळखणे (धाव), २. मूळ शब्दाला लागलेले प्रत्यय व वचन ओळखणे (ति), ३. प्रत्ययाचा काळा, पुरिस, वचन ओळखणे (वर्तमानकाळ, पठम पुरिस व एकवचन), ४. मूळ शब्दाच्या व प्रत्ययाच्या काळाप्रमाणे क्रियापदाचा अर्थ लावणे = (धावतो)''*[३]

**विभक्ती** पाली भाषेतील विभक्ती हा व्याकरणाचा महत्वपूर्ण भाग आहे. पाली भाषेत सात विभक्ती असून एक संबोधन आहे. मराठीतील संबोधन विभक्ती प्रकार हा पाली भाषेत स्वतंत्र विभक्ती म्हणून विचार केला जात नाही. मराठी भाषेतील संबोधनला पाली भाषेत आलपन म्हणतात. पाली भाषेतील अनेक शब्द हे स्वरान्त असतात, त्यामुळे विभक्तीनुसार शब्दांचे प्रत्यय बदलतात.

**निष्कर्ष :**

१. मागधी भाषा हीच पुढे पाली भाषा म्हणून नावारूपास आली. देश–विदेशातील सामाजिक,

राजकीय, धार्मिक, वाङ्मयीन, वैज्ञानिक, बौद्धतत्वज्ञान इ. विषयावरील माहितीसाठी पाली भाषेचा उपयोग होतो.

२. पाली भाषा ही फक्त भारतातील आधुनिक भाषांनाच प्रभावित केले नाही, तर जगातील अनेक भाषांवर प्रभाव पाडलेला आहे.

३. भगवान गौतम बुद्धांची शिकवण, उपदेश, तसेच भारतातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक यासारख्या मानवी जीवनाच्या परिस्थितीचे चित्रण त्रिपिटकातून प्रतिबिंबीत होते

४. पाली भाषेत ज्या तीन प्रकारचे वाक्य बोलले जाते त्यास पुरिस म्हणतात. पाली भाषेतील उत्तम पुरिस म्हणजे प्रथम पुरूष, मज्झिम पुरिस म्हणजे द्वितीय पुरूष आणि पठम पुरिस म्हणजे तृतीय पुरूष होय.

५. भारतीय इतिहासाचा कालक्रमाच्या निश्चितीसाठी पाली भाषा आणि पाली साहित्याचे ऐतिहासिक महत्व आहे.

६. तथागत भगवान गौतम बुद्धांच्या काळात अनेक गणराज्य अस्तित्वात होते. या गणराज्यामध्ये उद्‌भवलेल्या अनेक समस्यांवरील अचूक निदानासाठी भगवान गौतम बुद्धांनी मार्गदर्शन केले होते.

७. भयग्रस्त व दु:खी माणसांना त्यांची दु:खातून मुक्ती करण्यासाठी तथागत गौतम बुद्धांनी प्रत्येकांना सुखप्राप्तीचा मार्ग दाखविला.

८. तथागत भगवान गौतम बुद्ध हे जगातील श्रेष्ठ मनोवैज्ञानिक होते.

९. पाली भाषा ही आपणास नऊ अंगानी शिकता येते, म्हणूनच पालीला नवांगसत्थुसासन असेही म्हटले जाते.

१०. विवेकबुद्धी व प्रज्ञाबुद्धीने न वागल्यामुळे माणसांच्या जीवनात दु:ख निर्माण होते, म्हणूनच या दु:खाचे निर्मूलन करण्यासाठी पाली भाषेतील धम्म विचार हा मानवतावाद निर्माण करणरा आहे.

**संदर्भग्रंथ :**

१.भालशंकर राजेंद्र, पाली भाषा ओळख व व्याकरण, कुलसचिव य.च.म.मु.वि. नाशिक, प्रथमावृत्ती जून २०२१,पृ. २.

२.पालि पकासो, इयत्ता बारावी, म.रा. पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ, पुणे, प्रथमावृत्ती २०२०, पृ.१०२.

३.कित्ता, भालशंकर राजेंद्र, पृ.७३.

# पूर्व बाल्यावस्थेतील मुलांच्या विकासात अंगणवाडीचे योगदान

**संगिता गंगाराम मेश्राम**
(संशोधन विद्यार्थीनी) द्वारा: विशाल पानेकर, संजय सॉ मिल जवळ, जोगळेकर प्लॉट, अमरावती—४४४६०६
Email-sangitameshram233@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.6988610**

**सारांश** :आजची मुले देशाचे उज्वल भविष्य आहेत. देशाचे निर्माते आणि आकार देणारे आहेत. मुलांच्या जीवनाचा पाया रचताना अधिक संवेदनशिलतेने कार्यकरण्याची गरज आहे. बालकांचा सर्वांगिण विकास योग्य दिशेने होण्याकरीता आवश्यक गरजांची पुर्तता करणारे पोषक वातावरण मिळायला हवे. बालकांना सुदृढ व निरोगी घडवायचे असेल तर त्यांचे उत्तम योग्य पध्दतीने संगोपन होणे अतिशय आवश्यक आहे मुलांच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने अधिक लक्ष केंद्रित करुन निरोग व सुदृढ पिढी तयार होईल, जी देशाला प्रगतीपथावर नेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य यशस्वीरित्या पार पाडण्यास सक्षम असेल. अशा कार्यक्षम पिढीला घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य अंगणवाडीद्वारे उत्तम प्रकारे पार पाडल्या जाते. अंगणवाडी बालकांच्या विकासासाठी जगातील सर्वात मोठ्या आणि सर्वात अद्वितीय कार्यक्रमापैकी एक आहे.'बालकांच्या सर्वांगिण विकासाची नेमकी दिशा दाखवून उज्वल भवितव्याकडे वाटचाल करण्याचे शिक्षण देणारे केंद्र म्हणजे अंगणवाडी होय.' अंगणवाडीत नोंदणीकृत मुले साधारण: ३ ते ६ वर्षे वयोगटाची असतात. आणि या वयोगटातील मुलांना पूर्व शालेय मुले देखिल म्हणतात. 'पूर्व शालेय अवस्था म्हणजे शाळेत जाण्यापूर्वीचा कालखंड होय.'

**प्रस्तावना :**

बालकांच्या जीवनातील पहिली सहावर्षे अतिशय महत्त्वपूर्ण असून या वयात भावी आयुष्याचा पाया रचला जातो. आरोग्यदायी सवयी लावून विकासाच्या दृष्टिने बालक सर्वाधिक गतीने नव्या गोष्टी आत्मसात करतो. 'जीवनाच्या प्रारंभिक शिक्षणाचा काळ असून या वयामध्ये जगण्याचे अनौपचारीक शिक्षण दिले जाते.' 'पूर्व शालेय अवस्था अत्यंत संवेदनशील व तीव्र ग्रहणक्षमता असणारी असते. बालकांच्या व्यक्तिमत्व विकासाचा पाया याच काळात घातला जातो. म्हणून बालकास संतुलित आहार व अनुकूल वातावरण मिळावयास हवे.' —मानसशास्त्रज्ञ—सिगमंड फ्राईड बालकांच्या आयुष्याला योग्य वळण लावण्याची आणि त्यांची प्रगती घडवून आणण्याचे एकमेव ठिकाण म्हणजे अंगणवाडी होय. अंगणवाडीमध्ये पूरक पोषण आहार, आरोग्य तपासणी, लसीकरण, पूर्व शालेय शिक्षण पोषण व आरोग्य विषयक मार्गदर्शन आणि किशोरी व मातांना प्रशिक्षण यासारख्या सेवांच्या माध्यमातून बालकांचा सर्वांगिण विकास साधला जातो. 'शिक्षण म्हणजे बालाकांच्या शरीर, मन आणि आत्मा या प्रक्रियेमध्ये जे सुप्त उत्तमत्व आहे त्याचा सर्वांगिण विकास घडवून आणणे ज्यामुळे कृतीशील समाजाची निर्मिती होईल.' — महात्मा गांधी

**उद्दिष्टे :**

अंगणवाडीतील नोंदणीकृत बालकांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीचे अध्ययन करणे.
अंगणवाडीत दिल्या जाणाऱ्या सेवांचे मूल्यमापन करणे.
अंगणवाडीतील सेवांचा बालकांच्या विकासावर होणाऱ्या प्रभावाचे अध्ययन करणे.
अंगणवाडीतील सोयीसुविधांचा अभ्यास करणे.

**गृहितके :**

अंगणवाडीतील मुले आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असतात.
अंगणवाडीतील सेवांचा दर्जा समाधानकारक आहे.
अंगणवाडीतील सेवा बालकांच्या विकासाकरिता अनुकूल असतात.
बालकांच्या विकासाकरीता अंगणवाडीतील सोयी सुविधा पूरक आहेत.
भारत हा जागतिक बाल हक्क संरक्षण परिषदेचा सदस्य असल्यामुळे ६ वर्षाखालील बालकांना ई.सी.सी.ई. (Early Childhood Care and Education) देण्यासाठी भारत

देश कटिबध्द आहे. भारतीय राज्यघटनेच्या २००२ च्या सुधारणेनुसार बालकांचे संरक्षण आणि शिक्षण हा कायदा आहे. त्यानुसार अंगणवाडीच्या माध्यमातुन ई.सी.सी.ई. दिले जाते. एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या माहितीनुसार ऑक्टोबर २०१८ मध्ये महाराष्ट्रात १,०८,७७३ अंगणवाड्या आहेत. यात ३०२४ पर्यवेक्षक तर २५३ बालविकास प्रकल्प अधिकारी आहेत. युनिसेफने महाराष्ट्रराज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद तसेच आय.सी.डी.एस. सोबत शाळापूर्व शिक्षण म्हणजेच ई.सी.सी.ई. चा अभ्यासक्रम होय. राज्यघटनेच्या ४५ व्या कलमात राज्याने ६ वर्षाचे बालक होईपर्यंत ई.सी.सी.ई. सुविधा पुरविली पाहिजे. तसेच शिक्षण हक्क कायद्यामध्ये ११व्या कलमातही याचा पुर्नरूच्चार केला आहे. यापूर्वीचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९७४ मध्ये तसेच ११ व्या राष्ट्रीय नियोजनामध्ये हे स्पष्ट केले आहे.

स्वयंशिक्षणावर भर, बालकांच्या मानसिक शक्तीचा विचार, स्वयं शिस्तीचे शिक्षण, व्यक्तिमत्वाचा विकास, व्यावहारिक शिक्षण, इत्यादी मूल्ये बालकामध्ये रूजविण्याकरीता डॉ. मादाम मारीया माँटेसरी यांनी ६ जानेवारी, १९०७ रोजी जगातील पहिली बालवाडी इटली या देशात सुरू केली. डॉ. माँटेसरी यांच्या कार्याने प्रेरित होवून भारतात ताराबाई मोडक आणि अनुताई वाघ यांनी ठाणे जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील कोसबाड येथे १९४५ मध्ये आदिवासींच्या मुलांसाठी कुरणशाळा सुरू केली. १९६० च्या दरम्यान विकसनशील राष्ट्रामध्ये 'माता व बालसंगोपन' याकरीता मार्गदर्शन करणारे, आरोग्य व पोषण आणि शिक्षण याविषयी सर्वंकष माहिती देणाऱ्या केंद्राची गरज भासली.

भारतात २ ऑक्टोबर, १९७५ रोजी एकात्मिक बालविकास सेवा योजनेची सुरूवात अमरावती जिल्ह्यातील धारणी या आदिवासी व मुंबई येथील धारावी या नागरी प्रकल्पाच्या स्थापनेपासूनच महाराष्ट्र राज्यात प्रथम राबविली गेली. अंगणवाडी सेवा योजना सुरू करण्यामागील मुळ उद्देश गरीबातल्या गरीब बालकांचे आरोग्य सुधारणे आणि प्राथमिक शिक्षणाकरीता तयार करणे, हा होता. तसेच ० ते ६ वर्षे वयोगटातील बालाकांचा पोषण व आरोग्याचा स्तर सुधारणे, बालमृत्यूदर, मतीमंदत्व, अनारोग्य, कुपोषण, शाळा गळतीचे प्रमाण कमी करून त्यांचा मानसिक, शारीरिक, सामाजिक विकासाचा पाया विकसित करणे हा देखील होता. अंगणवाडी सेवा योजना हा जगातला महत्वाचा अन्न सुरक्षा कार्यक्रम असुन युनिसेफ आणि वर्ल्ड बॅक यांच्या मदतीने भारतात २ ऑक्टोबर, १९७५ ला सुरू झाल्यामुळे हा भारत सरकारसाठी सर्वात मोठा व महत्त्वकांक्षी कार्यक्रम ठरला. या योजने अंतर्गत आरोग्यासोबतच मुलांना पूर्व प्राथमिक शिक्षण देवून त्यांचा शैक्षणिक पाया मजबूत केला जातो. तसेच बालमृत्यू रोखण्यासाठी व कुपोषणाचा दर कमी करण्यासाठी कार्यप्रणालीचे नियोजन आखून त्याप्रमाणे अंगणवाडी कर्मचाऱ्यांद्वारे अंमलबजावणी केली जाते.

आज भारतात १३,१८,९१२ (तेरा लाख अठरा हजार नऊशे बारा) एवढी अंगणवाडी केंद्र कार्यरत आहेत. शासनाच्या मंजूर अंगणवाड्यांपैकी ९५ टक्के अंगणवाड्या सद्यास्थितीत कार्यरत आहेत. प्रत्येक अंगणवाडीत प्रवेशित बालकांची संख्या सरासरी ३० मुले आहे. साधारणत: ७०० ते ८०० लोकसंख्येमागे १ अंगणवाडी कार्यरत असते. अंगणवाडी सेवा योजनेचे जवळपास १९ कोटी मुले लाभार्थी आहेत. जगातला महत्त्वाचा अन्नसुरक्षा कार्यक्रम म्हणून अंगणवाडीची ख्याती आहे.

महाराष्ट्रात ग्रामीण आदिवासी आणि शहरी वस्त्यामध्ये साधारणत: १ लाख १० हजार अंगणवाड्या आहेत. सद्यास्थितीतील आकडेवारीनुसार ६ वर्षाखालील मुलांची संख्या १ कोटी २८ लाखा पेक्षा अधिक आहे. त्यापैकी फक्त ८० लाख ३० हजार मुलांपर्यंत अंगणवाडीतील सेवा पोहचल्या आहेत. संशोधनाचा मूळ हेतू हाच आहे की, समाजातील आर्थिक दुर्बल घटकातील प्रत्येक मुलांपर्यंत अंगणवाडीतील सेवा पोहचविणे आवश्यक आहे. याकरीता शासन आणि समाजातील सुजाण कार्यकर्त्यांनी, पालकांनी, अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी प्रयत्न करायला हवे. अंगणवाडीचे महत्त्व प्रत्येक व्यक्तिच्या जीवनात अनन्यसाधारण आहे.

'बालके हा केवळ राष्ट्राचा ठेवा न मानता देशाभिमानाची ढापणे लावून तूकडे पडलेल्या या जगाला एकत्र ठेवणारी शक्ती आहे'—पंडित जवाहरलाल नेहरू

शासनाची अंगणवाडी स्थापन्यामागील उद्‌दिष्टे खालीलप्रमाणे —

३ ते ६ वर्षाखालील गरीब मुलांचा आरोग्य आणि पोषणाचा दर्जा वृध्दिंगत करणे.

मुलांचा सुयोग्य, संतुलित, मानसिक, शारीरिक आणि सामाजिक विकासाचा पाया तयार करणे.

लहान मुलांमधील आकस्मिक मृत्यूचे प्रमाण कमी करणे. राज्यातील मुलांच्या विकासाच्या उद्‌देशाने विविध शासकीय उपक्रम आणि योजना राबविणाऱ्या विविध शासकीय विभागामध्ये धोरण सुनिश्चिती आणि अंमलबजावणी करण्याकरीता समन्वय साधणे.

राज्यातील लहान मुलांच्या मातांना आरोग्य आणि पोषण मूल्यांची माहिती आणि प्रशिक्षण देणे. मुलांचे संगोपन करण्याच्या त्यांच्या क्षमता वृध्दिंगत करणे.

लहान मुलांच्या मातांना आणि गर्भवती महिलांना देखिल पौष्टिक आहार पुरविणे.

वरील उद्‌दिष्टांना साध्य करण्याकरिता अंगणवाडी केंद्र सतत कार्यरत असते. समाजाची पुढील पिढी निरोगी व निकोप घडविण्यामध्ये अंगणवाडीचे मोलाचे योगदान आहे. मुलांच्या संपूर्ण आयुष्याचा पाया मजबूत करण्याचे अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य अंगणवाडी निस्वार्थ हेतूने करत असल्यामुळे अंगणवाडीला समाजात महत्त्वाचे स्थान आहे.

संशोधनाकरीता निरीक्षण, मुलाखत आणि प्रश्नावली यासाधनांचा तथ्ये संकलित करण्याकरीता उपयोग केला.

मुलांची कौंटुबिक पार्श्वभूमी अभ्यासली असता असे निदर्शनास आले की, अंगणवाडीतील मुले आर्थिकदृष्ट्या कमकुवत, पालकांचे अज्ञान, अंधश्रध्दा, साक्षरतेचे प्रमाण कमी, व्यसनी पालक, आई—वडीलांमधील मतभेद, पालकांमधील उच्च शिक्षणाचा अभाव, अपत्य संख्या अधिक, उत्पन्नाचे स्त्रोत कमी अशा प्रकारच्या समस्या अधिक असलेल्या मोल मजुरी करणाऱ्या कुटुंबातील मुलांचे प्रमाण अधिक आढळले. या वातावरणातील मुलांमध्ये विविध प्रकारचे आजारपण, रातांधळेपणा, मुडदूस, गलगंड, क्वॉशिऑरकर, मॅरसमस यासाख्या आजारांना बळी पडून मुलांमध्ये कुपोषणाचे प्रमाण अधिक दिसून आले. अंगणवाडीत प्रवेशित मुलांना शासनाद्वारे अंगणवाडी मार्फत प्रमुख ६ सेवा दिल्या जातात. मुलांचे आरोग्य सुधारुन, पूर्व प्राथमिक शिक्षण देणे. तसेच त्यांचा राहणीमानाचा दर्जा उंचावण्याकरीता खालील सेवा दिल्या जातात.

**पूरक पोषण आहार :**

३ ते ६ वर्षे वयोगटातील सामान्य मुलांना ५०० कॅलरी व १२ ते १५ ग्रॅम प्रथिने मिळतील एवढा पुरक आहार दिला जातो. तसेच तीव्र गंभीर कुपोषित बालकांना ८०० कॅलरी व २० ते २५ ग्रॅम प्रथिने मिळतील अशा स्वरूपाचा आहार दिला जातो. जी मुले अंगणवाडी बसून आहार खाऊ शकत नाही अशा मुलांना आहार घरी घेवून जाण्याची परवानगी आहे. यालाच टी. एच.आर. (टेक होम रेशन) असे म्हणतात.

**आरोग्य तपासणी :**

मुलांची दरमहा आरोग्य तपासणी मध्ये वजन व उंची मोजून वाढ व विकासाची गती ठरवितात.

**लसीकरण :**

अंगणवाडीतील मुलांना विविध आजारापासून संरक्षण मिळावे म्हणून प्रतिबंधक उपाय म्हणजे लसीकरण होय. महिन्यातून एकदा लसीकरणाचे आयोजन करतात. वेळापत्रकानुसार लसीकरण केले जाते.

**पूर्व शालेय शिक्षण :**

शिक्षणाचा पाया रचण्याचे कार्य तसेच पूर्व प्राथमिक शिक्षणाकरीता मुलांना तयार करून त्यांना स्वावलंबी बनविले जाते.

**आरोग्य व पोषणाच्या संदर्भात मार्गदर्शन :**

मुलांच्या मातांना पोषण व आरोग्याविषयी मार्गदर्शन केले जाते. उत्तम पोषण आरोग्यदायी जीवन देते. म्हणून संपूर्ण अन्नघटक युक्त आहार रोज घेणे आवश्यक आहे. हे पटवून देण्याचे कार्य अंगणवाडी सेविका करतात.

**संदर्भ सेवा :**

अंगणवाडीतील एखादे मुल आरोग्य तपासणी केल्यानंतर गंभीर आजारी आहे असे आढळल्यास या मुलांना पुढील उपचाराकरीता शासकिय रूग्णालयात पाठविले जाते.

यासारख्या सेवा अंगणवाडी मार्फत समाजातील तळागाळातील बालकांपर्यंत पोहचवून आरोग्यदायी वातावरण तयार केले जाते. असे संशोधनामध्ये दिसून आले.

मुलांना घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य जरी अंगणवाडी करीत असली तरी अधिकाअधिक अंगणवाड्या ह्या भाडेतत्त्वावर इमारत घेवून चालविल्या जातात. शासनाची इमारत अंगणवाडीजवळ नसल्यामुळे मुलांना भरपूर जागा खेळायला मिळत नाही, विजेचा लपंनडाव, नळ अथवा हातपंपाचे पिण्याकरीता पाणी, स्वयंपाकाचे भांडे तसेच इतर साहित्याची कमतरता दिसून आली. शौचालय देखील योग्य स्थितीत नव्हते असे पाहणी करते वेळी निदर्शनास आले. अधिकतर अंगणवाडीत पायाभूत गरजा पूर्ण होतील एवढे देखिल साहित्य उपलब्ध नव्हते. पूरक पोषण आहार बचत गटाच्या महिलांकडून बनवून घेतला जातो. आहारामध्ये स्थानिक अन्नपदार्थाचा समावेश आढळला.

**निष्कर्ष :**

समाजाच्या जडणघडणीत अंगणवाडीचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. देशाला विकासाच्या मार्गावर नेण्याचे कार्य सतत अंगणवाडी केंद्रातून केले जाते. कारण सुजाण, सर्वगुणसंपन्न नागरीक फक्त अंगणवाडीतूनच घडविल्या जातात आणि असे नागरीक देशाचा विकास घडवितात म्हणूनच अंगणवाडीला प्रत्येकाच्या जीवनात महत्त्वपूर्ण स्थान आहे. मुले ही राष्ट्राची वास्तविक संपत्ती असून ती एकप्रकारची भविष्यातील गुंतवणुक आहे.

मुलांच्या सर्वांगिण विकासाच्या अभावी राष्ट्राचे उत्पन्न संभवत नाही. या दृष्टिकोनातून सहा वर्षाखालील मुलांना पूरक पोषण आहार, संदर्भ आरोग्य सेवा, अनौपचारिक पूर्व शालेय शिक्षण, लसीकरण, रोगप्रतिकारकक्षम मुलांना बनविणे, आरोग्य तपासणी अशा विविध सेवा याच प्रमाणे १५ ते ४५ वयोगटातील स्त्रियांना सकस आहाराविषयी शिक्षण देणे, बालसंगोपन इत्यादी विषयीचे मार्गदर्शन अंगणवाडीमध्ये केले जाते. याचा उपयोग बालकांच्या योग्य संगोपनाकरिता होतो.

देशाच्या ग्रामीण तसेच शहरी भागातील आर्थिक दुर्बल समाजातील बालकांचा सांभाळ करण्याकरिता व मनोविकासासाठी अंगणवाड्यांची नितांत गरज आहे.

**संदर्भ :**

१. महिला व बालविकास विभाग केरळ
२. अंगणवाडीच्या ताई मेस्मा च्या कक्षेत — पण प्रश्न नेमका काय ?
३. महिला व बालविकास विभाग महाराष्ट्र शासन
४. अंगणवाडी कार्यकर्तीसाठी मार्गदर्शिका महाराष्ट्र राज्य
५. महिला व बालविकास विभाग लेखी परीक्षा मार्गदर्शक २०१५ चंद्रकांत मिसळ
६. एकात्मिक बालविकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य
७. पूर्व शालेय शिक्षण सचित्र संदेश मूल्यांकन पूस्तिका (वय वर्षे ३ ते ४)
८. आकार बालशिक्षणक्रम (युनिसेफ) २०१९ पर्यवेक्षिका व अंगणवाडी सेविकासाठी हस्तपूस्तिका
९. बाल्यावस्था पूर्व संगोपन शिक्षण विकीपिडीया
१०. बोल भिडूडॉट कॉम २०२२

# शेतमाल हमीभाव व शेतमालाच्या किंमतीचा शेतकऱ्यांवर होणारा परिणाम

**डॉ. संभाजी भाऊराव काळे[1] दिगांबर ज्ञानदेव नलगे[2]**

[1] मार्गदर्शक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख श्री. मारूतराव घुले पाटील शिक्षण संस्थेचे, जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय, भेंडा.

[2]संशोधक , पद्व्युत्तर अर्थशास्त्र संशोधन केंद्र सहकार महर्षी भाऊसाहेब संतूजी थोरात कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, संगमनेर

इमेल – digambarnalage2222@gmail.com

**DOI- 10.5281/zenodo.6988617**

**गोषवारा –** शेतमालाच्या किंमती हा अतिशय संवेदनशील विषय आहे. अन्नधान्य, तेलबिया, ताग, कापूस इ. कृषिउत्पादने कोणत्या किंमतीला मिळतात, यावर लोकांचे वास्तव उत्पन्न अवलंबून असते. या वस्तू महाग झाल्या, तर लोकांचे राहणीमान खर्चिक बनत जाते. कापूस, ताग, ऊस असा कच्चा माल महाग झाल्यास त्यानुसार कापड, साखर अशी जी औदयोगिक उत्पादने तयार होतात, त्यांच्या उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.शेतकऱ्यांच्या बाजूनेही या किंमतींचा विचार करावा लागतो. जर बाजारात शेतीउत्पादनास अगदी कमी किंमत मिळाली, तर शेतकऱ्यांच्या हातात फारसा नफा अगर वाढावा राहात नाही, अथवा या व्यवहारात त्यांचा तोटाही होऊ शकतो. शेतमालाच्या किंमती उच्च पातळीला गेल्या, तर शेतकऱ्यांचा फायदा होतो ; पण गाहकांना या वाढीव किंमतीचा फटकाही बसू शकतो.अनेक कृषिउत्पादने देशाच्या निर्यातीच्या यादीत समाविष्ट असतात. जर अशा उत्पादनांच्या किंमती उच्चपातळीला गेल्या, तर निर्यातीवरही अनिष्ट परिणाम होतो. शेतमालाच्या किंमतींमध्ये फार मोठे चढउतार असण्याचीही प्रवृत्ती आढळते. मुबलक पीक आले, तर या उत्पादनांच्या किंमती कोसळतात व अतिवृष्टीने किंवा अवर्षणाने पीक गेले, तर किंमती आकाशाला भिडतात, हा अनुभव सार्वत्रिक आहे. शेतमालाच्या किंमतींचा विचार सापेक्षतेनेही करावा लागतो. औदयोगिक मालाच्या किंमती वेगाने वाढत असतील व शेतमालाच्या किंमती तुलनेने अगदी सावकाश वाढत असतील, तर औदयोगिक क्षेत्रास अधिक सापेक्ष लाभ होत जातो. ही प्रकिया पुढे सामाजिक ताण व अन्याय वाढविण्यास कारणीभूत ठरते. म्हणून सरकारचा हस्तक्षेप या बाबतीत अटळ ठरतो.

**मुलभूत शब्द –** हमीभाव, किमान आधार किंमत.

**प्रस्तावना –**

हमीभावाच्या माध्यमातून सरकार शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाला एका ठराविक किमतीत खरेदी करण्याचे आम्ही देत असते. या हमीभाव प्रणालीच्या माध्यमातून सरकार ज्या शेतमालाची खरेदी करतो त्यामध्ये गहू, ज्वारी,बाजरी, मका, शेंगदाणा, मुग,सोयाबीन आणि कापूस या पिकांचा समावेश आहे. या शेतमालाची हमीभाव खरेदीचे दर सरकार जाहीर करते आणि मग सरकारी खरेदी केंद्रांवर या शेतमालाची खरेदी केली जाते. याचा फायदा असा होतो की बाजारामध्ये शेतमालाच्या किमतीत घसरण जरी झाली तर तेव्हाही केंद्रसरकार ठरवलेल्या हमी भावाने शेतकऱ्यांकडून शेतमाल खरेदी करतात. शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभाव मिळणार ही महत्त्वाची घोषणा 2018 च्या केंद्रीय अर्थसंकल्पात करण्यात आली. म्हणजे याचा अर्थ असा होतो की एकंदरीत उत्पादन खर्च अधिक त्या खर्चाच्या 50 टक्के नफा हेच हमीभाव सरकार दिल असं जाहीर करण्यात आलं. म्हणजे यामध्ये एक हजार रुपये उत्पादन खर्च येणार असेल तर दीड हजार रुपये हमीभाव सरकार देणार असा याचा अर्थ होतो. उत्पादन खर्च ठरवत असताना सरकारकडून वेगवेगळे घटक ग्राह्य धरले जातात आणि त्यानुसार उत्पादन खर्चाचे वेगवेगळे प्रकार आहे हे निश्चित करण्यात आलेले आहेत.

**शोधनिबधाची उद्दिष्टे–** संशोधकाने पुढील उद्दिष्टे निर्धारित केली आहेत.

1) कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील शेतमालाच्या खरेदी-विक्री व्यवहारांचे अध्ययन करणे.
2) शेतमालाच्या किंमतीचा शेतकऱ्यांवर होणारा परिणामअध्ययनकरणे.

**संशोधनपद्धती –** प्रस्तूत संशोधनाचा प्रकार वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक आहे. निर्धारित केलेल्या उद्दिष्टांनुसार संशोधन आराखडा तयार करण्यात आला आहे.

**तथ्य संकलन -**तथ्य संकलनासाठी पुढील साधने वापरली आहेत.

**दुय्यम स्तर –** उपलब्धमाहिती, संदर्भग्रंथ, शासकीयपत्रके, परिपत्रके, दस्तऐवज, पूर्वी झालेल्या संशोधनाचे संदर्भ, वर्तमानपत्रे, मासिके, कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे अहवाल, खरेदी-विक्री संघाचे अहवाल इत्यादी.

**हमीभाव आणि उत्पादन खर्च –** हमीभाव मराठीत याला किमान आधारभूत किंमत असे म्हणतात. यालाच हमीभाव असेही म्हटले जाते. शेतमालाला जी किमान आधारभूत किंमत दिली जाते त्याला हमीभाव असे म्हणतात. कमिशन फॉर अग्रिकल्चर कॉस्ट अँडप्राईसेसच्या आकडेवारीवरुन भारत सरकारच्या कृषी मंत्रालय हमीभाव ठरवते. एखाद्या शेतमालाचा संपूर्ण देशातलाहमीभाव संपूर्ण देशात एक सारखा असतो.

**उत्पादन खर्च ठरवण्यासाठीचे सूत्रे -** उत्पादन खर्च ठरवण्यासाठी केंद्रीय कृषिमूल्य आयोगाने काही सूत्र निश्चित केले आहेत ती पुढीलप्रमाणे -

**उत्पादन खर्च ठरवण्याचे ए-2 पहिले सूत्र-** या सूत्रानुसार बियाणे, खत,रासायनिक औषध, मजूर, सिंचन, इंधन यावरील प्रत्यक्ष खर्च पकडला जातो.

**उत्पादन खर्च करण्याचे दुसरे सूत्र ए-2+ एफ एल( फॅमिली लेबर )-**या सूत्रात शेतकरी आणि त्यांच्या घरातील व्यक्तींच्या श्रमाचे मूल्यमोजले जाते. म्हणजे घरातील व्यक्ती शेतात काम करत असतील तर त्यांचा समाजासाठी खर्च करताना त्याचा विचार केला जातो

**सी-2( तिसरे सूत्र)-** भारतात व्यापक या सूत्रानुसार बियाणे, खते,रासायनिक औषध,मजूर,सिंचन,इंधन,कुटुंब यासोबतच गुंतवणुकीवरील व्याज आणि शेत जमिनीचे भाडे निश्चित करून त्या आधारे उत्पादन खर्च ठरवला जातो. उत्पादन खर्च ठरवतांना सी-2 चा आधार घेतला तर कृषी उत्पादनाला अधिक भाव मिळतो.

**भारतातील शेतमाल खर्च आणि किंमत आयोग-** भारतातील शेतमालाच्या किंमती निश्चित करण्यासाठी केंद्र शासनाने नेमलेला एक आयोग. स्वतंत्र भारतात टप्प्याटप्प्याने शेतीविकासावर भर देण्यात आला. देशाचे आर्थिक धोरण उच्च विकासदरास अनुकूल राखण्याच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून शेतमालाच्या किंमतीबाबतही काही विशिष्ट धोरणाचा पाठपुरावा करण्यात आला. त्यासाठी १९६५ मध्ये शेतमाल किंमत आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगाची कार्यकक्षा वेळोवेळी वाढविण्यात आली. १९८५ साली याचे नामांतर ' शेतमाल खर्च आणि किंमत आयोग ' झाले.

**भारतातील शेतमाल खर्च आणि किंमत आयोगाची तत्वे-**

1. शेतमालाच्या किंमतींत जे पराकोटीचे चढउतार अल्पकाळातही होत रहातात, त्यांची तीवता कमी करून किंमतींच्या स्थिरीकरणाचे प्रयत्न करणे; देशात सर्वसाधारण किंमतींबाबत जे धोरण असेल त्याच्याशी सुसंगत असे शेतमाल किंमतधोरण आखणे, असे धोरण आर्थिक अभिवृद्धी, विकास, सामाजिक न्याय यांच्याशी सुसंगत राखणे; किंमत-धोरणाच्या संदर्भात शेतमालावरील कर, अर्थसाहाय्य, वाहतूक ,साठवणूक असे प्रशासकीय खर्च यांचा विचार करणे; राखीव धान्यसाठा ठेवणे व त्यानुसार जरूर त्या वेळेस बाजारात पुरवठा करून किंमतींवर नियंत्रण ठेवणे इत्यादी.
2. प्रत्यक्षात सरकारच्या हस्तक्षेपाचे स्वरूप निरनिराळे असू शकते. महाराष्ट्रात चालू असलेल्या कापूस एकाधिकार खरेदी योजनेप्रमाणे शासन पूर्वप्रसिद्ध किंमतीस कापसाचे सर्व पीक खरेदी करण्याची हमी देते किंवा शेतकऱ्यांकडील उत्पादनाचा काही ठराविक भाग लेव्ही स्वरूपात सरकार सक्तीने विकत घेते किंवा बाजारातील शेतमालाच्या किंमती उतरू लागल्यास, एका ठराविक किमान पातळीवर आल्यास बाजारातील सर्व शेतमाल सरकार त्या किंमतीस विकत घेते. परिणामतः शेतकऱ्यांचे संभाव्य नुकसान टाळले जाते.
3. आयाती, करसवलती, पतधोरण, राखीव धान्यपुरवठा या मार्गांनी सरकार हस्तक्षेप करू शकते. शेतमालाचे उत्पादन, उपलब्धता व किंमती यांबाबतच्या माहितीचा प्रसार करणे, जिल्ह्याबाहेरील किंवा राज्याबाहेरील शेतमालाच्या व्यापारावर निर्बंध घालणे अशा अप्रत्यक्ष उपायांनीही शासन हस्तक्षेप करू शकते.

**किंमत निश्चितीचे परिणाम –**

1. सरकार जाहीर करीत असलेली किमान आधार किंमत हा शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय जिव्हाळयाचा प्रश्न असतो. ही किंमत उत्पादनखर्चावर अवलंबून असते. सर्वसाधारणपणे मानले, तरी तोच एक निकष येथे नसतो. सध्या खर्च आणि किंमत या संदर्भात खर्चाच्या आठ निरनिराळ्या संकल्पना आयोग विचारात घेतो. त्यांत मुख्यतः अव्यक्त म्हणजे प्रत्यक्ष रूपयात विचारात घेतले न जाणारे खर्च महत्त्वाचे ठरतात.उदा., शेतकऱ्याच्या कुटुंबातील व्यक्तींच्या श्रमाचे वेतन, शेतकऱ्याच्या स्वतःच्या जमिनीवरील खंड किंवा स्वतः गुंतविलेल्या भांडवलावरील व्याज इ. उत्पादनाचा सरासरी खर्च ठरविताना अतिशय व्यापक व मूलगामी विचार करावा लागतो. जमिनीचा कस, कसण्याच्या पद्धती, तंत्रज्ञानाचा वापर यांनुसार एका खेडेगावातही उत्पादनखर्चात भारी तफावत आढळू शकते. त्यासाठी केवळ गणिती सरासरी काढून यांत्रिक पद्धतीने खर्चपातळी निश्चित केली, तर अनेकांच्या दृष्टीने ते अन्यायाचे ठरू शकते. सरकारने निश्चित केलेल्या किंमतीचा बाजारावरील परिणाम तसेच शेतमालाच्या आयातनिर्यातीवर होणारा परिणाम हेही ध्यानात घ्यावे लागतात.

2. किमान आधार किंमती प्रदेशपरत्वे राज्याराज्यांनुसार निरनिराळया असाव्यात, असे प्रतिपादन केले जाते; पण पिकाचा प्रकार आणि दर्जा यांनुसार सर्वत्र एकसारखी किंमत आयोग जाहीर करतो. यामुळे कार्यक्षमतेत वाढ होते व अधिक उत्पादनासाठी प्रेरणा मिळते, असा अनुभव येतो. किमान आधार किंमत ही हमी किंमत असते व त्यामुळे शेतकऱ्यांची अनिश्चितता कमी होते, हा घटकही विचारात घेणे गरजेचे आहे. आधार किंमतींचा दीर्घकालीन परिणाम होत असतो, हे गृहीत धरून खर्च आणि किंमत यांची निश्चिती केली जाते.
3. शेतमालाची साठेबाजी व काळाबाजार होतो व सापेक्षतेने कमी पातळीवरील अधिप्राप्ती किंमतीस शेतमाल विकण्यापासून शेतकरी परावृत्त होतात. किंमतींचा आधार जरी दिला, तरी किंमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी अनेक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष उपाय प्रभावीपणे वापरावे लागतात; त्यांचा भारतात अभाव आहे.
4. स्थिर आणि किफायतशीर किंमतींचा फायदा सधन शेतकऱ्यांनी बहुतांशी घेतला आहे, असे अनेक सर्वेक्षणांनंतर आढळून आले आहे. दरवर्षी किमान आधार किंमती ज्या दराने वाढविल्या जातात, तो दर सर्वसाधारण किंमतवाढीच्या दरापेक्षा अधिक आहे, असे आढळले आहे. यामुळे किंमतवाढीस खतपाणी मिळते, हे उघड आहे. शेतमालाच्या आधार किंमती वाढविण्यामागे सधन शेतकरी वर्गाचा दबाव कारणीभूत असतो, असेही मानण्यास जागा आहे.
5. बाजारातील वाढीव किंमतींचा फायदा व्यापारी व शेतकरी यांनी घ्यायचा व किंमती कोसळताना होणारा तोटा सरकारने सोसायचा, यामुळे ही योजना व्यवहारात अडचणीत येते आणि अशा व्यापारी व्यवहारांवर आयोगाचे नियंत्रण रहात नाही. सरकारने किमान आधार किंमती आयोगामार्फत लागवडीपूर्वी जाहीर कराव्यात, अशी अपेक्षा असते; पण रब्बी व खरीप अशा दोन्ही हंगामांतील पिकांबाबत कितीतरी वेळा या किंमती उशिरा जाहीर केल्या जातात. यामुळे शेतकऱ्यांना पिकांबाबत वस्तुनिष्ठ निर्णय घेताना अडचणी येतात व बाजारात सट्टेबाजीस वाव मिळतो.
6. शेतकऱ्यांच्या तक्रारीस नेहमीच जागा रहाते. उत्पादनखर्चही वसूल होत नाही किंवा काही रास्त वाढावा वा नफा मिळत नाही, अशी त्यांची तकार होत रहाते. आयोग अशा टीकेपासून दूर राहू शकत नाही. आयोगाने सातत्याने वाढवीत नेलेल्या किंमतींचा निराळा सामाजिक परिणाम दृष्टीस येतो. अल्पभूधारक, भूमिहीन शेतमजूर, सीमान्त शेतकरी यांनाच अशा वाढत्या किंमतींचा अधिक फटका बसतो. समता व सामाजिक न्याय यांपासून हा वर्ग वंचित रहातो. तसेच निरनिराळया पिकांच्या उत्पादन-खर्चातील आंतरराज्यीय फरक दुर्लक्षिण्याजोगा नसतो.उदा., गव्हाचा उत्पादनखर्च पंजाबमध्ये प. बंगालपेक्षा सु. १५ टक्क्यांनी कमी आहे. आयोग खर्च व किंमत ठरविताना प. बंगालचा साहजिकच विचार करतो व त्यामुळे पंजाबमधील शेतकऱ्यांचा आपोआप तेवढा फायदा होतो. यामुळे राज्यांमधील विषमता वाढीस लागते. सरकारने धान्य, कापूस इ. खरेदी केल्यानंतर त्यांची साठवणूक, आवेष्टन प्रकिया, वाहतूक यांचे मोठे खर्च सरकारला करावे लागतात. तसेच तो शेतमाल विकण्याचीही त्याच्यावर जबाबदारी येते. या सर्व व्यवहारांत सरकारला वेळप्रसंगी तोटाही सहन करावा लागतो.

**संदर्भसूची -**

1. Dantwala, M. L. Principles and Problems of Agricultural Price Determination, Bombay, 1966.
2. Government of India, Comp. Agricultural Price Policy-A Long Term Perspective, New Delhi, 1986.
3. देसाई भालेराव ( मे 2013 ), भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे.
4. आगलावे प्रदीप ( 2010 ), सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, श्रीसाईनाथ प्रकाशन, नागपूर.
5. दत्तसुंदरम् (2013), ), भारतीय अर्थव्यवस्था, एस. चांद. पब्लिकेशन, नवीदिल्ली.
6. अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन (2018) , अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

# शिक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रम में बिना उपस्थिति के डिग्री प्राप्त करने की प्रवृति के प्रति विद्यार्थियों एवं शिक्षकों के दृष्टिकोण का अध्ययन

**डॉ० पंकज कुमार**
असि० प्रोफेसर (शिक्षा विभाग) वेंकटेश्वरा ग्रुप ऑफ इंस्टीट्शन, मेरठ (उ०प्र०)

**DOI-10.5281/zenodo.6988621**

**प्रस्तावनाः—** शिक्षा मानव जीवन को समुचित रूप से परिश्कृत कर सार्थक बनाने का मार्ग है यही कारण हैं कि संपूर्ण विश्व शिक्षा के प्रति जागरूक है शिक्षा अपने अर्थ में पूर्ण होकर विज्ञान का सर्जन करती है तथा राश्ट्रीय संस्कार का निर्माण करती है साथ ही व्यक्ति में विराट संस्कृति की अवधारणा के लिए आवश्यक पृश्ठभूमि, व्यक्ति का विशिश्ट रूप सामाजिक तथा राश्ट्र चेतना का ही स्वरूप है इसी चेतना से युक्त होकर वह राश्ट्र का नायक बनता है लोक कल्याण की कलित कामना का उद्घाटन बनता है। शिशु को विशाल वृक्ष बनाने में सूर्य बनकर प्रकाश देता है धरती पर करकटी देता है और जल बनकर अभिशेक करता है। भारतीय चिंतन करने में शिक्षा की परिकल्पना सा विद्या या विमुक्ते के रूप में मुक्ति विधायिका प्रक्रिया के समान है स्पश्ट है कि यदि हम यथार्थ रूप में इस विश्व को सुसंस्कृत बनाना चाहते हैं तो हमें निश्चित रूप से शिक्षा का ही अवलंबन लेना पड़ेगा हम आज के अध्ययनरत शिक्षार्थियों को जिस प्रकार की शिक्षा प्रदान करेंगे वह उसी के अनुरूप आने वाले कल के पीछे का निर्माण होगा। इस दुनिया में इस पेशे को सबसे अच्छे और आदर्श पेशे के रूप में माना जाता है क्योंकि शिक्षक किसी के जीवन को बनाने में निस्वार्थ भाव से अपनी सेवा देते हैं उनके संरक्षित कार्य की तुलना किसी अन्य कार्य से नहीं की जा सकती क्योंकि शिक्षा द्वारा मनुश्य सुसंस्कृत और समृद्ध बनता है शिक्षा मनुश्य को मानवीय बनाती है शिक्षा हमारी उन्नति का साधन है। शिक्षा ही व्यक्ति को वैज्ञानिक, साहित्यकार, नेता, लेखक और समाज का निर्माता बनाती है, क्योंकि प्राचीन काल से ही शिक्षा को समाज में सबसे ऊंचा स्थान दिया जा रहा है शिक्षा एक ज्योति है तथा शिक्षक एक ज्योतिपुंज है जो स्वयं जलकर राश्ट्र को प्रकाशित करता है। शिक्षकों के व्यक्तित्व का बालकों के ऊपर अमिट प्रभाव पड़ता है, क्योंकि वह उनके भावी जीवन की नींव रखता है, उनका किसी भी राश्ट्रीय अथवा समाज की उन्नति अवनति में महत्वपूर्ण स्थान होता है भारतीय शिक्षा आयोग के अध्यक्ष दौलत सिंह कोठारी (१९६४—६६) के शब्दों में ”कल के भावी भारत का निर्माण आज के कक्षा कक्ष में हो रहा हैग्‘‘ यदि उक्त कथन पर ध्यान दिया जाए तो कल के भारत का निर्माता आज का शिक्षक ही है जिसके मनोबल एवं संतुश्टि के आधार पर ही श्रेश्ठ एवं स्वास्थ्य देश का निर्माण संभव हैग किंतु आज २१वीं शताब्दी में अगर हम देखें तो सब कुछ बदल गया है।

यह सच है कि स्वतंत्रता प्राप्ति के समय से ही भारतीय अध्यापक शिक्षा में बहुत अधिक सुधार हुए हैं परंतु फिर भी सभी समस्याओं का हल खोजना संभव नहीं हो सका। आज भारत का उच्च शिक्षा तंत्र अमेरिका, चीन के बाद विश्व का तीसरा सबसे बड़ा उच्च शिक्षा तंत्र है। विगत ७० वर्शों में देश के विश्वविद्यालयों की संख्या में ११.६:, महाविद्यालयों में १२.५:, विद्यार्थियों की संख्या में ६०: और शिक्षकों की संख्या में २५: वृद्धि हुई है। सभी को उच्च शिक्षा के समान अवसर सुलभ कराने की नीति के अंतर्गत संपूर्ण देश में महाविद्यालयों एवं विश्वविद्यालयों की संख्या में उल्लेखनीय वृद्धि हुई है और साथ ही उच्च शिक्षा की स्थापना सुविधाओं पर विनियोग भी बड़ा है। लेकिन दुर्भाग्य है कि इसके बावजूद भी उच्च शिक्षा कि सुलभता का सपना साकार नहीं हो पा रहा है। स्वतंत्रता के ६० दशक बाद भी भारत की उच्च शिक्षा प्रणाली अभी तक पूरी तरह विकसित नहीं हुई है। हाल ही में जारी विश्वविद्यालय रैंकिंग में दुनिया के शीर्श १०० विश्वविद्यालयों में एक भी भारतीय विश्वविद्यालय को स्थान प्राप्त नहीं हो सका ग क्योंकि प्रशिक्षित एवं कुशल शिक्षकों की कमी से शिक्षा प्रभावित हो रही है और उसकी गुणवत्ता में निरंतर गिरावट आ रही है शिक्षा

क्षेत्र में दिखी जाने वाली अनेक खामियों में से एक है बच्चों में न सीखने की प्रवृत्ति का लगातार बना रहना यानी स्कूल संबंधी गतिविधियों में विद्यार्थियों की उपलब्धियों में सबसे महत्वपूर्ण भूमिका शिक्षकों की होती है किसी भी देश के बच्चों की स्थिति व विकास को देखकर उस देश के वर्तमान तथा उसके भविश्य की कल्पना कर सकते हैं। इस भविश्य का निर्माता शिक्षक हैं। शिक्षक के महत्वपूर्ण स्थान को देखते हुए विभिन्न आयोगों, समितियों ने शिक्षक के प्रशिक्षण पर बल दिया। योग्य व कुशल अध्यापकों को निर्माण के लिए ही शिक्षण प्रशिक्षण पाठ्क्रम का प्रावधान किया गया है जिसे शिक्षण प्रशिक्षण महाविद्यालय द्वारा दिया जाता हैं। लेकिन वर्तमान में आज उसी पाठ्क्रम पर प्रश्नचिन्ह लगा है जो समाज को एक भावी शिक्षक प्रदान करने में मुख्य भूमिका निभाता है क्योंकि वर्तमान परिपेक्ष में आप जिस प्रकार से देश के शिक्षा प्रशिक्षण संस्थान चलाए जा रहे हैं उनको देखकर साफ अनुमान लग जाता है कि हमारा समाज भविश्य में कितने भावी शिक्षकों से सुसज्जित होगा और यह अनुमान नहीं बल्कि एक कड़वी सच्चाई है। आज शिक्षण प्रशिक्षण संस्थानों ने इस पाठ्क्रम को सिर्फ अपनी आय का एक स्रोत माना हुआ है जहां पर सिर्फ कुछ आय के लिए उन सभी विद्यार्थियों को डिग्री दे दी जाती है जो उसके योग्य ही नहीं है, इन संस्थानों में अध्ययनरत ऐसे विद्यार्थी जो पूरे पाठ्क्रम में या सत्र में उपस्थित ही नहीं होते और अंत में परीक्षा के समय संस्थानों की दरियादिली के कारण औसत से ऊपर अंक प्राप्त कर उत्तीर्ण हो जाते हैं जिससे उन विद्यार्थियों का अधिकार छीन लिया जाता है जो पूरे सत्र में कक्षा में उपस्थित होकर अपना कार्य करते हैं कहीं—कहीं तो ऐसे भी शिक्षण प्रशिक्षण संस्थान हैं जहां सत्र के शुरू में सीटें फुल हो जाती हैं परंतु पूरे सत्र में एक कक्षा तक नहीं होती क्योंकि कहीं शिक्षकों की कमी है तो कहीं बच्चों में कक्षा में उपस्थित न रहने की प्रवृत्ति, शिक्षण प्रशिक्षण पाठ्क्रम नियमित रूप में चलने वाला पाठ्क्रम है लेकिन आज परिस्थितियां ऐसी है कि आज यह मात्र एक ऐसा पाठ्क्रम बनकर रह गया है जिसमें संस्थान विद्यार्थियों को उपस्थित हुए बिना डिग्री उपलब्ध करा रहे हैं यह एक शिक्षण प्रशिक्षण पाठ्क्रम के लिए चुनौती है जिसके कारण आज शिक्षण प्रशिक्षण पाठ्क्रम को ग्रहण करने वाले छात्र अध्यापकों में रूचि का अभाव देखा जा सकता है शिक्षण प्रशिक्षण पाठ्क्रम में प्रवेश के लिए किसी भी आयु के महिला पुरुश प्रवेश ले सकते हैं जिसके कारण विद्यार्थी जीवन निकल जाने के पश्चात भी महिला पुरुश इस कार्यक्रम में प्रवेश ले लेते हैं ऐसे छात्र अध्यापक या छात्र अध्यापिकाओं के ऊपर अपने घर परिवार की जिम्मेदारी होती है। विभिन्न प्रकार की जिम्मेदारियों के चलते वह इसमें रुचि नहीं ले पाते। इस पाठ्क्रम को केवल खानापूर्ति ही बना कर रख दिया जाता है। वर्तमान में ऐसे विद्यार्थियों की संख्या बढ़ती जा रही है। अब देखना यह है कि इस प्रकार से डिग्री लेने की प्रवृत्ति के प्रति विद्यार्थियों एवं शिक्षकों का क्या दृश्टिकोण है जिससे शिक्षण प्रशिक्षण पाठ्क्रम प्रभावित हुआ है और उसमें यह समस्या उत्पन्न हुई जो कि एक चिंता का विशय है इसलिए शोधकर्ता द्वारा इस समस्या को अपने शोध—पत्र की समस्या के रूप में चयनित किया गया

**समस्या कथनः—**

शशिक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रम में बिना उपस्थिति के डिग्री प्राप्त करने की प्रवृति के प्रति विद्यार्थियों एवं शिक्षकों के दृश्टिकोण का अध्ययन''

**शोध उद्देश्यः—**

प्रस्तुत शोध—पत्र में शोधकर्त्ता द्वारा निम्नलिखित उद्देश्यों को लिया गया हैं।

- शिक्षण प्रशिक्षण पाठ्यक्रम में बिना उपस्थिति के डिग्री प्राप्त करने की प्रवृति के प्रति विद्यार्थियों का दृश्टिकोण।
- शिक्षण प्रशिक्षण पाठ्यक्रम में बिना उपस्थिति के डिग्री प्राप्त करने की प्रवृति के प्रति शिक्षकों का दृश्टिकोण।
- शिक्षण प्रशिक्षण पाठ्यक्रम में बिना उपस्थिति के डिग्री प्राप्त करने की प्रवृति

के प्रति विद्यार्थियों एवं शिक्षकों के दृश्टिकोण का तुलनात्मक अध्ययन।

**शोध परिकल्पनाः—** शिक्षण प्रशिक्षण पाठ्यक्रम में बिना उपस्थिति के डिग्री प्राप्त करने की प्रवृति के प्रति विद्यार्थियों एवं शिक्षकों के दृश्टिकोण में कोई सार्थक अन्तर नही है।

**शोध विधिः—** इस शोध—पत्र में शोधकर्त्ता द्वारा शोध विधि के रूप में सर्वेक्षण विधि का प्रयोग किया है।

**शोध जनसंख्याः—**

इस शोध—पत्र में न्यादर्श के रूप में शोधकर्त्ता द्वारा मेरठ जिले में आने वाले सभी ग्रामीण व शहरी क्षेत्र के सरकारी शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालय, स्ववित्तपोशित शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालय एवं स्ववित्तपोशित विश्वविद्यालय (जिनमें शिक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रम संचालित है) में अध्यापनरत शिक्षकों व अध्ययनरत विद्यार्थियों को चयनित किया गया है।

**शोध न्यादर्शः—** इस शोध—पत्र में न्यादर्श के रूप में शोधकर्त्ता द्वारा मेरठ जिले में आने वाले सभी ग्रामीण व शहरी क्षेत्र के सरकारी शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालय, स्ववित्तपोशित शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालय एवं स्ववित्तपोशित विश्वविद्यालय (जिनमें शिक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रम संचालित है) में कार्यरत शिक्षकों व अध्ययनरत विद्यार्थियों को यादृच्छिक न्यादर्शन विधि द्वारा चयनित किया गया है। जिसमें २० शिक्षक सरकारी शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालय से, ६० शिक्षक स्ववित्तपोशित शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालय से एवं २० शिक्षक स्ववित्तपोशित विश्वविद्यालय से चयनित किये गये हैं। इसी प्रकार ५० विद्यार्थी सरकारी शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालय से, १०० विद्यार्थी स्ववित्तपोशित शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालय से एवं १०० विद्यार्थी स्ववित्तपोशित विश्वविद्यालय से चयनित किये गये हैं। इस प्रकार यह शोध—पत्र शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयों के १०० शिक्षकों एवं २५० विद्यार्थियों से पूर्ण किया गया है।

**शोध उपकरणः—** इस शोध—पत्र में शोधकर्त्ता द्वारा प्रदत संकलन हेतु स्वनिर्मित शिक्षक दृश्टिकोण मापनी एवं विद्यार्थी दृश्टिकोण मापनी का प्रयोग किया है प्रत्येक मापनी में शिक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रम में बिना उपस्थिति के डिग्री प्राप्त करने की प्रवृति से सम्बधित १०—१० प्रश्नों को रखा है। जिसमें प्रत्येक प्रश्न कथन के सामने तीन विकल्प रखे गये हैं प्रथम विकल्प में **(हाँ)**, द्वितीय विकल्प में **(नही)** एवं तृतीय विकल्प में **(कह नही सकते)** दिया गया है जिस पर शिक्षकों एवं विद्यार्थियों को अपनी प्रतिक्रिया देनी है। अंकन करने के लिए शोधकर्त्ता द्वारा प्रत्येक विकल्प को अंक प्रदान किये हैं प्रथम विकल्प के लिये (०२), द्वितीय विकल्प के लिये (००) एवं तृतीय विकल्प के लिये (०१) अंक दिया गया है। उससे जो आंकडे प्राप्त हुए उन पर सांख्यिकी विश्लेशण कर निश्कर्श निकाला गया है।

**प्रदत्त विश्लेशणः—** इस शोध—पत्र में शोधकर्त्ता द्वारा प्रदतों के विश्लेशण हेतु मध्यमान, मानक विचलन एवं टी—परीक्षण सांख्यिकी का प्रयोग किया है।

**परिणामों की व्याख्याः—** प्रस्तुत अध्याय में सांख्यिकी प्रविधियों कि सहायता से विश्लेशित आंकडो को तालिकाओं में स्तम्भ एवं पंक्ति के माध्यम से शोध उद्देश्यों के क्रम से प्रस्तुत किया है। क्योंकि सम्पूर्ण शोध की सार्थकता इस पर निर्भर करती है।

तालिका संख्याः— ०१

शिक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रम में बिना उपस्थिति के डिग्री प्राप्त करने की प्रवृति के प्रति विद्यार्थियों का दृश्टिकोण।

| क्रम स० | प्रश्न कथन | सरकारी संस्थानों में अध्ययनरत विद्यार्थी का दृश्टिकोण प्रतिशत में | स्ववित्तपोशित संस्थानों में अध्ययनरत विद्यार्थी का दृश्टिकोण प्रतिशत में | स्ववित्तपोशित विश्वविद्यालयों में अध्ययनरत विद्यार्थी का दृश्टिकोण प्रतिशत में | कुल २५० विद्यार्थीयों का (हाँ) के प्रति |
|---|---|---|---|---|---|

| | | कुल संख्या (५०) | | | कुल संख्या (१००) | | | कुल संख्या (१००) | | | दृश्टिकोणा प्रतिशत में |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | हाँ | नही | कह नही सकते | हाँ | नही | कह नही सकते | हाँ | नही | कह नही सकते | हाँ |
| १ | शिक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण करने हेतु महाविद्यालय द्वारा उपस्थिति सम्बन्धी कोई बाध्यता नही रखी जाती है। | ३० | ४४ | २६ | ७८ | १८ | ४ | ६५ | २२ | १३ | ६३ |
| २ | महाविद्यालय में उपस्थिति हुए बिना भी अच्छे आन्तरिक एवं प्रायोगिक अंक प्रदान कर दिये जाते है। | ४४ | ३२ | २४ | ६५ | २२ | १३ | ७६ | १८ | ६ | ६५ |
| ३ | महाविद्यालय में उपस्थिति हुए बिना सैद्धान्तिक पाठ्यक्रम के नोटस शिक्षकों द्वारा प्रदान कर दिये जाते है। | ५० | ४४ | ६ | ७६ | १८ | ६ | ६३ | २४ | १३ | ६६ |
| ४ | शिक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रम बिना उपस्थिति के पूर्ण करने हेतु महाविद्यालय द्वारा पाठ्यक्रम पूर्ण करने में कोई व्यवधान पैदा नही किया जाता है। | ४४ | ४८ | ८ | ६८ | २२ | १० | ८१ | ७ | १२ | ६८ |
| ५ | शिक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण करने के साथ साथ छात्र कोई अन्य कार्य अथवा व्यवसाय करता है तो महाविद्यालय द्वारा कोई आपत्ति नही की जाती है। | ४२ | ३६ | २२ | ६९ | १६ | १५ | ८८ | ९ | ३ | ७१ |
| ६ | शिक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण करने वाले छात्रों को यहाँ विद्यालय के सम्बन्ध में लगभग कोई जानकारी नही होती है। | ४८ | २६ | २६ | ८८ | १२ | ० | ७८ | १८ | ४ | ७६ |
| ७ | महाविद्यालय में उपस्थित हुए बिना भी ऑनलाइन के माध्यम से योग्य शिक्षकों द्वारा पढ़ा जा सकता है। | ५२ | ३६ | १२ | ८२ | १६ | २ | ७४ | २० | ६ | ७३ |
| ८ | महाविद्यालय मेंकुछ | ४ | ४ | १६ | ७ | १८ | ८ | ८ | ११ | ३ | ७२ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रशिक्षणार्थी केवल विश्र्वविद्यालयी परीक्षा देने हेतु ही उपस्थित होते है। | ० | ४ | | ४ | | | ६ | | | |
| ९ | शिक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रम में बिना उपस्थित हुए विद्यार्थियों के दस्तावेज सम्बन्धी सभी कार्य महाविद्यालय द्वारा स्वयं पूर्ण कर दिये जाते हैं। | ५२ | २८ | २० | ८१ | ९ | १० | ९२ | ६ | २ | ८० |
| १० | शिक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण कराने में एन०सी०टी०ई०/विश्वविद्यालय द्वारा प्रस्तुत नियमों को छात्र अथवा महाविद्यालय द्वारा पूर्ण नही किया जाता है। | ३६ | ५२ | | ७९ | १५ | ६ | ८७ | ७ | ६ | ७४ |

उपरोक्त तालिका न०:— **०१** के माध्यम से शिक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रम में बिना उपस्थिति के ड़िग्री प्राप्त करने की प्रवृति के कारणों का विद्यार्थियों के दृश्टिकोण से अध्ययन किया गया जिसमें सरकारी एवं स्ववित्तपोशित संस्थानों तथा स्ववित्तपोशित विश्वविद्यालयों के विद्यार्थियों को सम्मिलित किया गया प्रत्येक विद्यार्थियों से १० प्रश्न पूछे गए हैं, प्रश्नों में संस्थान में उपस्थिति की बाध्यता, बिना उपस्थिति के अच्छे अंक प्राप्त करना, बिना उपस्थिति के सैद्धान्तिक पाठ्यक्रम के नोटस शिक्षकों द्वारा प्रदान किया जाना, पाठ्यक्रम के साथ कोई अन्य नियमित कार्य करने से संस्थान को कोई आपत्ति न होना, संस्थान में बिना उपस्थित हुए विश्वविद्यालय परीक्षा पूर्ण करना, छात्र के बिना संस्थान में आये सभी दस्तावेजों को संस्थान द्वारा पूर्ण कर लिया जाना, योग्य शिक्षकों का अभाव तथा एन०सी०टी०ई० के किसी भी उपस्थिति सम्बन्धि नियमों का पालन न करना इत्यादि से सम्बन्धित कथन थे जिनमें लगभग सभी छात्रों द्वारा विद्यालय में उपस्थित न होने की प्रवृति को बल प्रदान करने में उपरोक्त कथनों की भूमिका को स्वीकार किया गया है जिसमें प्रत्येक कथन पर ६०: से ऊपर विद्यार्थी सहमत पाये गए स्ववित्तपोशित संस्थानों तथा स्ववित्तपोशित विश्वविद्यालयों में छात्रों की सहमती का प्रतिशत उपरोक्त कथनों पर ७०: से ज्यादा था। सरकारी संस्थानों के विद्यार्थियों की सहमती का प्रतिशत ४०—५० था तथा

उपरोक्त विवेचना के आधार पर यह कहा जा सकता है कि संस्थानों की शैक्षिक एवं प्रशासनिक व्यवस्था ही छात्रों के बिना उपस्थिति ड़िग्री प्राप्त करने में मुख्य भूमिका निर्वाहण कर रही हैं।

| तालिका संख्या:—०२ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| शिक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रम में बिना उपस्थिति के डिग्री प्राप्त करने की प्रवृति के प्रति शिक्षकों का दृश्टिकोण। | | | | | |
| क्रम स० | प्रश्न कथन | सरकारी संस्थानों में कार्यरत शिक्षकों का दृश्टिकोण प्रतिशत में | स्ववित्तपोशित संस्थानों में कार्यरत शिक्षकों का दृश्टिकोण प्रतिशत में | स्ववित्तपोशित विश्वविद्यालयों में कार्यरत शिक्षकों का दृश्टिकोण | कुल शिक्षकों के दृश्टिकोण (हाँ का) |

| | | | | | | | | प्रतिशत में | | | प्रतिशत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कुल संख्या (२०) | | | कुल संख्या (६०) | | | कुल संख्या (२०) | | | |
| | | हाँ | नही | कह नही सकते | हाँ | नही | कह नही सकते | हाँ | नही | कह नही सकते | हाँ |
| १ | शिक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रम में विद्यार्थियों द्वारा बिना उपस्थित हुए सैद्धान्तिक एवं प्रायोगिक परीक्षा में प्रथम श्रेणी में उर्तीण हो रहे हैं। | ३५ | ६० | ५ | ७० | २७ | ३ | ३० | ६५ | ५ | ५५ |
| २ | वर्तमान समय में शिक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रम में प्रबन्ध तंत्र द्वारा उपस्थिति की कोई बाध्यता नही रखी जाती है। | २५ | ५५ | २० | ६८ | १७ | १७ | ५० | ४० | १० | ५५ |
| ३ | एन०सी०टी०ई० के मानकों के अनुरूप शिक्षक रखने वाले संस्थओं की संख्या दिन प्रतिदिन कम होती जा रही है। | ६० | ३५ | ५ | ७० | १० | २० | ६० | ३० | १० | ६६ |
| ४ | शिक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रम में विद्यार्थियों को उपस्थित हुए बिना भी सरकारी योजनाओं का लाभ प्राप्त हो जाता है। | ९० | १० | ० | ८० | १८ | २ | ७५ | २५ | ० | ८१ |
| ५ | शिक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रम में संस्थान द्वारा विद्यार्थियों को कक्षाओं में उपस्थित होने की कोई अनिवार्यता नही रखी गयी है। | ४० | ६० | ० | ६७ | २५ | ८ | ५५ | ३५ | १० | ६९ |
| ६ | शिक्षक प्रशिक्षण संस्थानों द्वारा विद्यार्थियों को सभी सम्बन्धित सूचनायें ई–मेल/फोन के माध्यम से पहुँचाना अनिवार्य हो गया है। | ५० | ३० | २० | ८० | १७ | ३ | ७० | ३० | ० | ७२ |
| ७ | शिक्षक प्रशिक्षण | ८० | १५ | ५ | ८३ | १३ | ३ | ८० | १५ | ५ | ८२ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पाठ्यक्रम के विद्यार्थी बिना उपस्थित हुए भी आंतरिक एवं प्रायोगिक परीक्षा में अच्छे अंक प्राप्त कर लेते है। | | | | | | | | | | |
| ८ | शिक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रम में नये प्रवेशित विद्यार्थियों को पुरातन उत्तीर्ण विद्यार्थियों का सत्रीय कार्य प्रतिलिपियों को संस्थान द्वारा उपलब्ध करा दिया जाता है। | ६० | ४० | ० | ८० | १८ | २ | ७० | ३० | ० | ७४ |
| ९ | शिक्षक प्रशिक्षण संस्थानों में नियमित कक्षायें सम्पन्न करने वाले विद्यार्थियों की संख्या दिन प्रतिदिन घटती जा रही है। | ८० | १५ | ५ | ७३ | १० | १७ | ८० | २० | ० | ७६ |
| १० | शिक्षक प्रशिक्षण संस्थानों में योग्यताधारी शिक्षकों की संख्या प्रबन्ध तंत्र द्वारा कम ही रखी जाती है। | ६० | ३० | १० | ७७ | १३ | १० | ६० | ३५ | ५ | ७० |

उपरोक्त तालिका न०:— ०२ के माध्यम से शिक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रम में बिना उपस्थिति के ड़िग्री प्राप्त करने की प्रवृति के कारणों का शिक्षकों के दृश्टिकोण से अध्ययन किया गया जिसमें सरकारी एवं स्ववित्तपोशित संस्थानों तथा स्ववित्तपोशित विश्वविद्यालयों के शिक्षकों को सम्मिलित किया गया प्रत्येक शिक्षक से १० प्रश्न पूछे गए हैं, प्रश्नों में प्रबन्ध तंत्र द्वारा संस्थान में उपस्थिति की बाध्यता, बिना उपस्थिति के सैद्धान्तिक एवं प्रायोगिक परीक्षा में प्रथम श्रेणी में उत्तीण हो जाना, एन०सी०टी०ई० के मानकों के अनुरूप शिक्षकों का न होना, संस्थान द्वारा कक्षा में उपस्थित होने की कोई बाध्यता न होना, विद्यार्थियों को संस्थान द्वारा सभी सूचना फोन/ईमेल से प्रदान करना, छात्रों को बिना संस्थान में आये सत्रीय कार्य की प्रतिलिपि उपलब्ध करा देना, प्रबन्ध तंत्र द्वारा योग्यताधारी शिक्षकों का अभाव रखना इत्यादि से सम्बन्धित कथन थे जिनमें लगभग सभी शिक्षकों द्वारा संस्थान में उपस्थित न होने की प्रवृति को बल प्रदान करने में उपरोक्त कथनों की भूमिका को स्वीकार किया गया है जिसमें कथन संख्या १,२,३, व ५ पर ५५—६५:ए कथन संख्या ६,८,९, व १० पर ७५: तथा कथन संख्या ४ व ७ पर ८०: से ऊपर शिक्षक सहमत पाये गए स्ववित्तपोशित संस्थानों तथा स्ववित्तपोशित विश्वविद्यालयों में शिक्षकों की सहमती का प्रतिशत उपरोक्त कथनों पर ८०: से ज्यादा था। सरकारी संस्थानों के शिक्षकों की सहमती का प्रतिशत ६०—८०: था।

उपरोक्त विवेचना के आधार पर यह कहा जा सकता है कि संस्थानों की शैक्षिक एवं प्रशासनिक व्यवस्था ही छात्रों के बिना उपस्थिति ड़िग्री प्राप्त करने में मुख्य भूमिका निर्वाहण कर रही हैं।

तालिका संख्या:—०३

शिक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रम में बिना उपस्थिति के डिग्री प्राप्त करने की प्रवृति के प्रति विद्यार्थियों एवं शिक्षकों के दृश्टिकोण का तुलनात्मक अध्ययन।

| शिक्षक प्रशिक्षण संस्थान का स्वरूप | विद्यार्थी एवं शिक्षकों की कुल संख्या | | औसतमान | प्रमाणिक विचलन त्रुटि | टी—परीक्षण | सार्थकता स्तर (०.५ एवं .०१) |
|---|---|---|---|---|---|---|
| सरकारी संस्थान | विद्यार्थी | 50 | 14.84 | 2.08 | 0.254399 | ' नही |
| | शिक्षक | 20 | 14.7 | 2.31 | | |
| स्ववित्तपोशित संस्थान | विद्यार्थी | 100 | 15.92 | 1.88 | 2.475548 | '' है। |
| | शिक्षक | 60 | 15.16 | 2.2 | | |
| स्ववित्तपोशित विश्वविद्यालय | विद्यार्थी | 100 | 15.1 | 2.04 | 1.300791 | ' नही |
| | शिक्षक | 20 | 15.75 | 1.71 | | |
| स्वतन्त्रता अंश | ०.०५ | ०.०१ | | | | |
| सारणी मान | १.९८ | २.६१७ | | | | |

उपरोक्त तालिका न०:— ०३ के माध्यम से बिना उपस्थिति ड़िग्री प्राप्त करने में विद्यार्थियों की बढ़ती प्रवृति के कारणों पर सरकारी एवं स्ववित्तपोशित संस्थानों तथा स्ववित्तपोशित विश्वविद्यालयों के विद्यार्थियों एवं शिक्षकों के दृश्टिकोण का तुलनात्मक विश्लेशण किया गया जिसमें यह पाया गया की सरकारी संस्थानों एवं स्ववित्तपोशित विश्वविद्यालयों के विद्यार्थियों एवं शिक्षकों के दृश्टिकोण में कोई सार्थक अन्तर नही था। इसी प्रकार स्ववित्तपोशित संस्थानों के विद्यार्थियों एवं शिक्षकों के दृश्टिकोण में .०५ स्वतन्त्रता अंश स्तर सार्थक अन्तर पाया गया जिससे यह स्पश्ट होता है कि विद्यार्थियों में बिना उपस्थित हुए ड़िग्री प्राप्त करने की प्रवृति का मुख्य कारण संस्थाओं का बिना उपस्थिति के ड़िग्री प्रदान कर देने की प्रक्रिया ही पूर्ण रूप से जिम्मेदार है।

## निश्कर्श एवं परिणाम

वर्तमान समय में नई शिक्षा नीति २०२० के संदर्भ में यह स्पश्ट किया गया है कि शिक्षा के क्षेत्र के सभी पाठ्क्रमों में परिवर्तन होने वाला है लेकिन इस अध्ययन के परिणामों से ऐसा प्रतीत होता है कि छात्रों की अनुपस्थित रहने की प्रवृत्ति पर अगर सरकार संस्थान एवं विश्वविद्यालय द्वारा कठोर नियम बनाकर नहीं इन्हे नहीं रोका गया तथा बिना उपस्थिति के डिग्री प्रदान करने वाले संस्थान एवं विश्वविद्यालयों पर अंकुश नहीं लगाया गया तो सरकार द्वारा किया जा रहे प्रयास का कोई सार्थक परिणाम नहीं मिल पाएगा क्योंकि छात्रों के अनुपस्थित रहने में केवल छात्र ही दोशी नहीं है बल्कि परिणाम से पूर्ण तरह स्पश्ट है कि शिक्षण संस्थानों द्वारा छात्रों की अनुपस्थिति पर कोई अंकुश नहीं लगाया जा रहा है बल्कि उनके द्वारा विभिन्न कार्यक्रमों में बिना उपस्थिति के छात्रों को उत्तीर्ण कर देना एवं अच्छे अंक प्रदान कर देना अनुपस्थित रहने की प्रवृत्ति को पूर्ण रूप से बल प्रदान कर रहा है।

**सन्दर्भ ग्रन्थ सूची—**

1. पाण्डेय, रामषक्ल, (२००३) 'उदीयमान भारतीय समाज में षिक्षक', विनोद पुस्तक मन्दिर, आगरा — २ ।
2. षर्मा, आर.ए., (२००६), 'भारतीय षिक्षा प्रणाली का विकास', आर.लाल बुक डिपो, मेरठ।
3. बक्षी एन.एल. (२००७), 'उदयीमान भारतीय समाज एवं षिक्षा', प्रेरणा प्रकाषन, दिल्ली ।
4. पाण्डेय रामषक्ल एवं मिश्रा करूणा षंकर, तृतीय संस्करण (२००७/२००८) 'भारतीय षिक्षा की सम—सामयिक समस्याएँ',, अग्रवाल पब्लिकेषन, आगरा—७ ।
5. पाठक पी.डी., (२००७/२००८), 'भारतीय षिक्षा और समस्याएँ', अग्रवाल पब्लिकेषन्स, आगरा — ७ ।
6. चौबे सरयू प्रसाद, (२००७/२००८), 'तुलनात्मक षिक्षा', अग्रवाल पब्लिकेषन, आगरा — ७ ।

# 'युगांत' आणि 'साई' एक दृष्टिक्षेप

**डॉ. यशवंत राऊत**
मराठी विभाग, कर्नाटक विद्यापीठ, धारवाड
**DOI-10.5281/zenodo.6988624**

**प्रास्ताविक -** प्राचीन महारठ्ठी, मरहठ्ठी भाषा, महाराष्ट्र प्राकृत भाषा, अपभ्रंश मराठी भाषा आणि आजची मराठी भाषा, असा मराठी भाषेचा प्रवास सांगता येतो. भारतातील कोणत्याही राज्याला राष्ट्र हे प्रत्यय जोडलेले दिसून येत नाही. महाराष्ट्राव्यतिरिक्त महाराष्ट्राला महान राष्ट्र म्हटले जाते. कारण या राज्याला थोर संतांचा, पराक्रमी राजांचा, थोर समाजसुधारकांचा, विचारवंतांचा आणि दैवी शक्ती प्राप्त झालेल्या साईबाबासारख्या देवतुल्य माणसांचा वारसा लाभलेला आहे. आजवर झालेल्या महाराष्ट्राच्या संबंध जडण-घडणीमध्ये या थोर माहात्म्यांचे आणि संतांचे भरीव योगदान मिळालेले आहे. म्हणून भारतामध्ये आणि समस्त विश्वामध्ये महाराष्ट्राने आपले आगळे वेगळे स्थान निर्माण केले आहे. आजमितीला महाराष्ट्राने बदलत्या जगाबरोबर प्रचंड भौतिक प्रगती केलेली आहे. तरीपण साधूसंतांच्या शिकवणुकीचे आणि संस्कारांचे महत्त्व टिकून राहिलेले आहे. कारण वरकरणी कल्याणकारी आणि आनंददायी दिसणारी ही भौतिक प्रगती कितीही आल्हाददायी वाटत असली तरी, तिच्या म्हणून काही अंगभूत मर्यादा आहेत.

पूर्णपणे स्वीकारलेला भौतिकवाद हा शाश्वत सुखाची अनुभूती देऊ शकत नाही. अध्यात्म व भगवंत भक्ती हा विचार शाश्वत आणि चिरंतन सुखाचा मुख्य मार्ग आहे. हे वास्तव आजच्या मानवी समाजाला कळून चुकले आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणून दरवर्षी नित्यनियमाने आषाढी 'वारी' कडे पहाता लक्षात येते. तुळजाभवानी, तीरुपती, बद्रीनाथ, अंबाबाई अशा अनेक भक्तीस्थळांची भक्त भेट घेतात, त्याचबरोबर जगातील सर्व भक्त वर्षातून एकदा तरी शिर्डी साईबाबांचे दर्शन घेताना दिसतात. येथे वारकरी संप्रदायाचे व साई दर्शनाचे आत्मिक आणि मानसिक उर्जेची अनुभूती देते. अन्यथा दळण-वळणाची इतकी साधने उपलब्ध असताना, मैलो न मैल पायपीट करत, उन्हा-पावसाचा व वाऱ्याचा विचार न करता कोण प्रवास करेल? अर्थातच मानवी जीवनातील अध्यात्माचे स्थान अद्यापही अढळ, अबाधित आणि अभेद्य आहे. खरे पहाता महाराष्ट्राच्या सर्वांगीन जडण-घडणीमध्ये अनेक भक्ती संप्रदायांचा मोठा वाटा आहे. त्यापैकी नाथसंप्रदाय, महानुभाव संप्रदाय, वारकरी संप्रदाय, दत्त संप्रदाय, समर्थ संप्रदाय व या बरोबरीने 'साई' संप्रदायाचा निर्देष करणे जरूर वाटते. या सर्वच संप्रदायांची स्वत:ची म्हणून प्रत्येकाची स्वतंत्र अशी वेगळी ओळख आहे. या सर्व संप्रदायाची भक्ती करण्याच्या पद्धती वेगवेगळया आहेत. यापैकी काही संप्रदाय काळाच्या ओघामध्ये कमी अधिक प्रमाणात लुप्त झालेली पहायला मिळतात. तरी काही संप्रदायांनी आजही आपले अस्तित्व टिकवून ठेवलेले आहे. त्यामध्ये नाथ संप्रदाय, वारकरी संप्रदाय, दत्त संप्रदाय व साई संप्रदाय म्हणून सांगता येते.

आज रोजी शिर्डी साई मंदिर भारतातील महत्वाचे तीर्थक्षेत्र आहे. संत साईबाबांचे हे मंदिर भारतातील श्रीमंत मंदिर म्हणून ओळखले जाते. कारण संत साईबाबा सर्व जाती धर्माच्या भक्तांच्या समस्यांना धावून जातात व प्रसन्न होताना दिसतात. तेव्हा जगभर साईबाबांचे भक्त आहेत. म्हणून शिर्डी हे ठिकाण जगातील एक धार्मिक स्थळ झालेले आहे. अशा दैवीशक्ती लाभलेल्या 'साईबाबा'वरती डॉ. विनोद गायकवाड यांनी 'साई' या नावाने कादंबरी लिहिलेली पहायला मिळते. या कादंबरीचे कन्नड, गुजराती, हिंदी, तमिळ, इंग्रजी अशा विविध भाषांमध्ये या कादंबरीचे भाषांतर झालेले आहे. ही एक अध्यात्मिक जीवनावरील महान कादंबरी आहे.

माणूस अध्यात्मिक जीवनामध्ये फार सुखी व समृद्ध असतो. चांगले वाईट याची पारख करू शकतो. काम, क्रोध, मद व मत्सर यांचा त्याग झालेला असतो. म्हणूनच साधू-संत उपरोक्त गोष्टींचा त्याग करुन अध्यात्मिक जीवनामध्ये रमून जाताना दिसतात तर आणखी एक महत्त्वाची कादंबरी म्हणजे, महाभारतातील एक महत्वपूर्ण व्यक्तिरेखेवर अधारित

आहे. ती व्यक्तिरेखा म्हणजे गंगापूत्र भीष्म होय. म्हणूनच या भीष्मावर डॉ. विनोद गायकवाड यांनी 'युगांत' या नावाने कादंबरी लिहिली आहे.

'साई' ही डॉ. विनोद गायकवाड यांची आध्यात्मिक जीवनावरील महाकादंबरी आहे. या कादंबरीचा कन्नड, तेलग, गुजराती, इंग्रजी व हिंदी भाषेमध्ये अनुवाद झालेला आहे. यामुळे उपरोक्त भाषेतील साईभक्तांना साईबाबांच्या जीवनातील अनेक चमत्कारिक घटनांची ओळख करून देण्यास मदत होणार आहे. 'साई' या महाकादंबरीचे लेखन करण्यासाठी डॉ. गायकवाड यांनी अहोरोत्र कष्ट घेतलेले आहेत. त्यासाठी त्यांनी साईबाबांच्यावर लिहिलेल्या अनेक पुस्तकांचा अभ्यास केलेला आहे. ते रोज पंधरा-पंधरा तास अखंड वाचन-लेखन करीत असत. या कालावधीत त्यांना सर्व चमत्कारिक अनुभव येत होते. कारण संत साईबाबांविषयी वाचन-लेखन करताना ते स्वत: आध्यात्मिक विश्वामध्ये वावरायचे. पण ज्यावेळी ते लेखन-वाचन थांबवायचे त्यावेळी ते संसारिक जीवनातल्या व्यापामुळे अस्वस्थ व्हायचे. म्हणूनच अनेक साधू-संत या भौतिक जगाचा त्याग करून अध्यात्मिक जीवन जगताना दिसतात. या संदर्भात धैसास व जितेंद्र ठाकूर म्हणतात, "जे भगवतभक्त तुमच्या परमपवित्र चरित्राचे श्रवण, पठण, चिंतन, मनन करतात ते इहपर सौख्य प्राप्त करतात."१ 'साई' या कादंबरीत साईबाबा सारख्या देवतुल्य महामानवाचे चित्रण आलेले आहे.

'साई' या कादंबरीच्या सुरुवातीला चांदभाईची घोडी हरवते. त्यामुळे चांदभाई दु:खी व कष्टी होतात. त्यांच्या घोडीचे नाव प्यारी आहे. प्यारीवर ते जीवापाड प्रेम करत असतात. प्यारी ही त्यांचे सर्वस्व असते. तिच आता हरवलेली आहे. त्यामुळे ती आता चांदभाईंना परत सापडणार नाही म्हणून लोक सांगत असतात. पण चांदभाई आपले प्रयत्न करण्याचे सोडत नाहीत, म्हणून ते प्यारीला पुन्हा पुन्हा शोधण्याचा प्रयत्न करतात. 'प्रयत्नांती परमेश्वर' म्हणून चांदभाई प्यारीला शोधण्यासाठी भर उन्हात कशाचीच पर्वा न करता प्यारीला शोधत असतात. पण प्यारी हरवून दोन महिने झाले तरी ते सर्व जंगले, आजुबाजुची गावे पायपीट करुनही त्यांना प्यारी मिळत नव्हती. निराश होऊन ते खोगीर पाठीवर बांधून घरी परत यायचे. एक दिवस श्री संत साईबाबा त्यांना भेटतात व ते घोडीचा ठावठिकाणा सांगतात. घोडी चांदभाईंना सापडताच त्यांना फार आनंद होतो. घोडीला घेऊन चांदभाई साईबाबांकडे येतात. चांदभाई व घोडी साईबाबांचे आभार मानतात. जाताना चांदभाई साईबाबांना आपल्या घरी बोलावतात. साईबाबा त्यांना मी नक्कीच दोन-तीन दिवसानंतर आवश्य येईन म्हणून सांगतात. साईबाबा चांदभाईंना चिलिम विचारतात. चांदभाई चिलिम व तंबाखू आहे पण चिलिम पेटवायला विस्तव व छापी भिजवायला पाणी नाही म्हणून सांगतात. पण साईबाबा आपला चिमटा जमिनीवर आपटताच मातीच्या छोट्या-छोट्या ढेकळांचे निखारे तयार होतात. चिलिमीवर निखारा ठेवला, तोच त्याचे लक्ष छापीकडे गेले. जमिनीवर सोटा मारून पाणीही काढले जाते. छापी भिजवून चिलिमीचे छानसे कश मारून, धुरांचे ढग हवेत सोडतात. चांदभाई हे सारे दृश्य पाहून आश्चर्यचकित होतात. पुढे चांदभाईंच्या घरात लग्न समारंभाच्या वेळी अंगणात साप येतो. लोक त्या सापाला मारण्यास तयार होतात, पण त्याच क्षणी साईबाबा तेथे येतात व त्या सापाला मारण्यापासून वाचवितात, पुढे तो साप साईबाबांच्या पायाच्या बोटाला आपल्या जिभेने स्पर्श करून निघून जातो. पण लोक घाबरतात, सापाचे व साईबाबांचे ते दृश्य पाहून विस्मयचकीत होतात. पुढे साईबाबा वामन तात्यांच्या घरी जातात व तात्यांना दररोज दोन कच्च्या घागऱ्या आणून देण्यास विनंती करतात व त्या घागऱ्या पैसे घेऊनच देण्यास सांगतात. त्याप्रमाणे तात्या साईबाबांना नित्य नियमाने दररोज दोन घागऱ्या देण्यास सुरूवात करतात. श्री संत साईबाबा त्या घागऱ्यातून पाणी आणून फुला-झाडांना शिंपडत असतात. पाणी आणून शिंपडून झाल्यावर साईबाबा त्या घागरी लिंबाच्या झाडाखाली ठेवत असतात. साईबाबा त्या घागरी झाडाखाली ठेवून झाल्यावर घागरी तातडीने फुटून जात होत्या. पण जोपर्यंत साईबाबा कच्च्या घागरीतून झाडांना पाणी शिंपडेपर्यंत मात्र घागर कधीच फुटली नाही. हा साईबाबांचा सर्वात मोठा चमत्कार म्हणावा लागतो. श्री संत साईबाबा हे लोकप्रिय होते. गावातील सर्व तरुण मारुती मंदिरासमोर साईबाबांशी गप्पा मारत बसले होते. साईबाबांबरोबर गप्पा मारण्यात या सर्व तरुणांना आनंद वाटायचा. ते सर्व आपल्या नानाशंका बाबांना

विचारीत असत. साईबाबाही त्यांना मजेदार उत्तरे देऊन तरुणांचे मनोरंजन करत असत. गप्पा मारता मारता सर्वांचे लक्ष मंदिरासमोरील भल्या मोठ्या दगडाकडे गेले. पूर्वी तो दगड व्यायाम करताना गावातील पैलवान उचलून खांद्यावर घेण्याचा प्रयोग करून दाखवत व काहीजण तो दगड खांद्यावर घेऊन दाखवत असत. त्यामुळे त्यांची छाती अभिमानाने फुलून जाई. एक दिवस त्या दगडावर कुत्रा येऊन मुततांना मुले त्या कुत्र्याला हुसकावून लावतात. कारण तो दगड साधासुधा व नव्हता. पूर्वी पैलवान त्या दगडाला खांद्यावर घेत पण आता नाही. म्हणून आताच्या पैलवानांनी तो उचलता येत नाही. तेव्हा साईबाबा चौघां तरुणांना एकत्र येऊन तो दगड उचलण्यास सांगतात. पण तो दगड जाग्याहून हालत सुद्धा नाही. शेवटी आठ जणांना तो उचलायला सांगतात. तरीपण तो दगड हलवायला सुद्धा शक्य होत नाही. मुले हतबल होतात. पण तो दगड साईबाबा एका हाताने उचलून दाखवितात. साईबाबांचे ते रुप पाहून ती तरुण मुले आश्चर्यचकित होतात. कारण साईबाबा हे दिव्य देहधारी आहेत, त्या अर्थी ते देवयोनीतले अध्यात्मात पोचलेले आहेत. याची कल्पना आली. त्यामुळे श्री साबईबाबांना प्रणाम करतात. हे बलशाली व दैवीशक्ती प्राप्त झालेले देव होते, असे दिसून येते.

कादंबरीच्या पाचव्या भागात नानासाहेब डेंगळयांना लग्न होऊन फार वर्षे झाली होती, पण काही केल्याने त्यांना मूल-बाळ होत नव्हत. पण त्यांच्या पत्नीला समाजामध्ये अवमान सहन करावा लागत होता. त्यांना लोक निपुत्रिक म्हणून अवहेलना करू लागले. त्यांना सर्वत्र अंधार दिसत होता. पण नानासाहेब हे साईबाबांचे परमभक्त झाले ते नेहमी साईकिर्तनात दंग झाले. मोठ्या आत्मियतेने, पूर्ण समर्पणशीलतेने ते साईभक्तीत तल्लीन व्हायचे. मिळेल तेव्हा ते साईबाबांचे गुणगाण करायचे. त्यामुळे त्यांच्या जीवनात साईबाबांनी साक्षात्कार घडविला. त्या संदर्भात नानासाहेब डेंगळे त्यांच्या जिवलग मित्राला पत्र लिहितात व त्या पत्रात ते म्हणतात, “शिर्डीच्या संत साईबाबांचा आशीर्वाद लाभला आणि ‘आंधळा मागतो एक, देव देतो दोन’ आपण अध्यात्मगामी आहात. पुण्यवान आहात. मी आपणास सांगू इच्छितो की, आपण एकवेळ आवश्य शिर्डीस जाऊन यावे. श्री साईसमर्थाचे दर्शन घेण्यासारखे आहे. श्री साईबाबा हे साक्षात ईश्वर आहेत. यात मला तरी तिळभरही शंका नाही. या पृथ्वीतलावर त्यांच्या रुपाने ईश्वरच अवतरला आहे. अशी माझी खात्री आहे. विश्वास आहे. तसा प्रत्यक्ष अनुभवही आही. विलक्षण व अद्भूत अशा तेजाचे दर्शन तुम्हाला घडते. मनातील मळभ दूर होते. किल्मिषे नष्ट पावतात. शंकाकुशंका आणि तर्कवितर्क अंत:र्धात पावतात. मन गंगेप्रमाणे पावन होते. मनात गहन शांतता लाभते. हृदय प्रकाशाने आणि बुद्धी ज्ञानाने भरून जाते. आपण आपली मुलेबाळे व इष्टमित्र घेऊन दर्शनाला यावे हीच नम्र विनंती.”[२] अशाप्रकारे साईबाबांनी नानासाहेबांच्या जीवनात मोठा चमत्कार घडविला होता. पुढे ज्या पुजाऱ्याने संत साईबाबांना खंडोबाच्या देवळात येण्यास मज्जाव केला होता, त्या खंडोबाच्या देवळातील पुजाऱ्याला मस्तकशूळ झाले होते. कितीही उपचार केल्यांने थांबत नव्हते. तेव्हा तो पुजारी संत साईबाबांकडे येतो साईबाबांनी त्या पुजाऱ्याच्या कानफटीत लगावल्यामुळे त्या पुजाऱ्याचा मस्तकशूळ थांबतो. तेव्हां लोकांना माहीत होते की, संत साईबाबा हे आपली सर्वच प्रकारची संकटे दूर करण्यासाठीच अवतार पुरुष म्हणून आले आहेत. असे समजतात. या संदर्भात सरश्री म्हणतात, “हा तर अत्यंत उत्तम शुभशकून आहे पुढे महापुरुष होणार असल्याचा संकेत त्याच्या हास्यात दडलेला आहे.”[३] येथे सरश्री यांचे म्हणणे योग्य वाटते. अशाच प्रकारे शंकर नावाच्या साई भक्ताला डोळयांचा विलक्षण आजार झाला. त्याचे डोळे लालभडक झाले. प्रचंड सूज आली. डोळयांचा खोलगट भाग सुजेमुळे वरती फुगून आला. त्यामुळे त्याला मरणाच्या वेदना होऊ लागल्या. त्यामुळे तो वळवळू लागला, तडफडू लागला. त्यांने अनेक प्रकारचे औषधोपचार करूनही त्याच्या डोळयांचा आजार मात्र कमी होत नव्हता. ज्यावेळी तो संत साईबाबांकडे येतो. त्यावेळी साईबाबा त्याच्या डोळयात बिब्बे चेचून डोळयात घालतात. त्यामुळे शंकरच्या डोळयांचा आजार बरा होतो. त्यामुळे तो चमत्कारामुळे बाबांना दंडवत घालतो.

पुढे रॉबर्ट नावाच्या एक ब्रिटीश अधिकाऱ्यांना संत साई बाबांना भेटण्याची इच्छा होते. त्यानुसार नानासाहेब चांदोरकरांच्या मध्यस्थीने रॉबर्टना संत साई बाबांच्या दर्शनाला घेऊन येतात, पण रॉबर्टच्या

अहंकारी स्वभावामुळे साईबाबा त्यांना आपल्याजवळ घेत नाहीत. म्हणून वाट बघून बाबा त्यांनाजवळ बोलावत नाही, पुढे बाबांच्या परवाणगीशिवाय शिर्डी सोडून जातात. वाटेत त्यांच्या टांग्याचा अपघात होतो व रॉबर्ट जबरदस्त घायाळ होतात. शेवटी ते साईबाबांची क्षमा मागतात. या संदर्भात शंकर पेंडसे लिहितात, "संजया श्री कृष्ण म्हणजे अर्जुनाचा केवळ सारथी आणि अर्जून हा अजिक्य योद्धा"[४] येथेही धृतराष्ट्राचा अहंभाव व पोटतिडकी भाषा त्यांच्या नाशाला कारणीभूत होते. म्हणून पेंडसे यांचे मत योग्य वाटते. असेच एक दिवस दीक्षितांच्या माडीवर बापुसाहेब व शामा झोपलेले होते. अचानक त्यांच्या मनामध्ये आपले एक घर असावे असा विचार ठेवून ते झोपले. फक्त त्याविषयी त्यांनी शामाला सांगितले होते. त्याच दिवशी व दोघांनाही स्वप्न पडते, दोघांच्याही स्वप्नात एकाचवेळी संत साईबाबा प्रकटतात व बापूसाहेबांना व शामाला म्हणाले, "बापू तुम्ही तुमचा वाडा देवघरासह बांधायला सुरुवात करा'. तसेच शामाला बाबा म्हणाले, "शाम्या देवघरासह वाडा तयार होऊ द्या. मग मी सर्वांचे इच्छित पुरविन!" तेव्हा दोघेही दचकून उठले. एकमेकांची स्वप्ने सांगितली आणि ते गप्पगार झाले. पण लगेच घराच्या कामाला माधवराव व बुट्टी यांनी सुरूवात केली. संत साईबाबा त्या कामावर जातीने लक्ष देत होते. येता-जाता सूचना व बदल करवून घेत होते आणि बघता बघता संत साईबाबांच्या आशीर्वादाने बुट्टीचा वाडा पूर्ण झाला.

अशाप्रकारे संत साईबाबा सर्व प्रकारच्या भक्तांची सुख-दुःखे जाणून त्यांना नानातऱ्हेने मदत करताना दिसतात. म्हणून कधी पाऊस पाहिजे असल्यास पाऊस पाडवायचे तर कधी खुशालचंद्र सारख्या भक्ताला साईंना भेटायची इच्छा झाली तर स्वत: संत साईबाबा त्यांच्या भेटीसाठीची व्यवस्था करतात. तर दासगणूंसारख्या भक्ताला गोदावरी नदीमध्ये स्नान करण्याऐवजी आपल्या चरणाजवळ झऱ्यांना बोलावून दासगणूला गंगास्नानाचा साक्षात्कार घडवून दाखवितात. कारण बाबांचे चरण हे गंगेचे उगम स्थान होते.

डॉ. विनोद गायकवाड हे सुसंस्कारीत लेखक आहेत. संत साईबाबांसारखे त्यांच्या मनामध्ये सुद्धा 'सर्वधर्म समभाव' ही संकल्पना रुजली आहे. ते साईबाबांच्या अध्यात्मिक जीवनावरती कादंबरी लिहिताना संत साईबाबांना त्यांनी हिंदू धर्मापुरतेच बंदिस्त करून ठेवले नाही तर सर्व धर्माच्या लोकांना साईबाबांची भक्ती करण्यास प्रवृत्त केलेले दिसून येते. म्हणून डॉ. गायकवाड यांनी साई कादंबरीच्या अकरा भागापैकी अनेक भाग हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन यासारख्या धर्म ग्रंथांच्या रचनाने सुरूवात केलेले दिसून येते. म्हणून डॉ. गायकवाड यांनी आपल्या प्रतिभेच्या जोरावर 'साई' ही कादंबरी लिहिली व अनेक धर्मातील लोकांना ती मार्गदर्शन करणारी आहे असे म्हणावेसे वाटते. साक्षात. साईबाबासारखेच डॉ. गायकवाड सद्धा सर्व माणसांकडे समान दृष्टिकोनातून पहाताना दिसतात. तेव्हा डॉ. गायकवाड हे मानवतावादी लेखक आहेत म्हणून सांगावेसे वाटते.

साईबाबा सर्व धर्माकडे समानतेच्या दृष्टिकोणातून पहात होते व 'सर्व धर्म समभाव' ही उदात्त दृष्टी त्यांच्याकडे होती म्हणून सांगता येते. तसेच साई म्हणजे महाराष्ट्रातील थोर संत, भक्त वत्सल, भक्ताभिमानी, करुणेचा सागर, योग्यांचे योगी, चराचराचा विसावा, शरणागतांचा आधार आणि दीन आर्त्यांचा रक्षक म्हणून सर्व मान्य आहे. या संदर्भात नंदा ठाकूर लिहितात, "जो प्रेमाने माझे नाव घेईल त्याचे प्रेम मी वाढवत राहीन, त्याच्या सर्व इष्ट मनोकामना पुरवीन. जो माझे चरित्र गाईल त्याच्या मी मागे-पुढे उभा राहीन. जे माझी मनःपूर्वक भक्ती करतात त्यांना माझ्या कथाश्रवणाने परमानंद होईल. जो मला अनन्य शरण आलेला, जो विश्वासाने माझे भजन करील, माझे चिंतन, माझे स्मरण करील त्यांचा उद्धार करणे हे माझे ब्रीद आहे त्याला मी कृतांताच्या दाढेतून बाहेर करीन. माझ्या कथांचे श्रवण केल्याने रोगांचे निरसन होईल माझे नाम घेतल्याने कली प्रभावाने उत्पन्न होणाऱ्या दुष्ट वासनांचा क्षय होईल. मला नमस्कार केल्याने पूर्वजन्मीची पापे नष्ट होतील."

उपरोक्त साई बाबांचे चमत्कार सर्वसामान्य भक्तांच्या प्रत्ययास येतात. ते भक्तांच्या समस्या दूर करतात, म्हणून जगामध्ये साईबाबांचा गजर होताना दिसतो. सदर कादंबरीत साईबाबांच्या चमत्कारांनी व त्यांनी केलेल्या महान कार्याचा आढावा घेतला आहे. तसेच 'युगांत' कादंबरीत डॉ. विनोद गायकवाड यांनी गंगापुत्र भीष्म यांच्या जीवनावर सखोल भाष्य केल्याचे दिसून येते. त्यामध्ये भीष्मानी घेतलेल्या प्रतिज्ञाचा व

कुरुवंशाच्या उद्धारासाठी घेतलेल्या सर्व जबाबदाऱ्यांची सखोल विचार केलेला आहे.

**संदर्भ -**


1. दि. अ. धैसास, जितेंद्र ठाकूर, 'श्री साई सच्चरित - कथासार', रायकर प्रकाशन, मुंबई, २०१६, पृ. क्र. ५.
2. गायकवाड विनोद, 'साई', साईसाक्षी प्रकाशन, बेळगाव, २००७, पृ. क्र.१९४.
3. सरश्री सद्गुरू नानक साधना रहस्य आणि जीवन चरित्र, सकाळ प्रकाशन, पुणे, २०१७, पृ. क्र. १९.
4. पेंडसे शंकर दामोदर, 'भगवंताचे अधिष्ठान', सत्कार्योत्तेजक सभा, धुळे, १९५८, पृ. क्र. १०२.
5. ठाकूर नंदा, श्री साईचरित्र कथासार, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई-२०१५, पृ. ३८

*'Journal of Research & Development'*
*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,*
*Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, July 2022, Volume-14 Issue-8*

# राजर्षी शाहू महाराजांची सामाजिक न्याय विषयक भूमिका

**प्रा.डॉ.शिवाजी गोविंदराव दिवाण**

सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, महिला महाविद्यालय,गेवराई

Email ID-shivajidiwan@gmail.com

**DOI- 10.5281/zenodo.6988629**

**प्रस्तावना :** आपल्याला स्वातंत्र मिळून 75 वर्ष झालीत तरी देखील तळा-गळातील लोकांसाठी शिक्षण देण्यात, महिला आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात शासकीय व निमशासकीय क्षेत्रात नोकऱ्या देण्यात व त्यातील आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात शासनाला पूर्ण यश आलेले नाही. या सगळया पार्श्वभूमीवर एक अग्रणी सुधारक म्हणून 'शाहू महारांजा'चे आरक्षण धोरण व त्यांची बहुजन समाजाला न्याय देण्याची भूमिका खूप महत्त्वाची आहे. म्हणूनच 'राजर्षी शाहू महाराजांची सामाजिक न्यायविषयक भूमिका' हा विषय संशोधनासाठी निवडण्यात आला आहे. या विषयाची व्याप्ती जरी खूप मोठया प्रमाणावर असली तरी देखील सारांश रुपाने या विषयाचा आढावा घेतला आहे. राजर्षी शाहू महाराजांची विचारधारा सर्व घटकांसाठी होती. सर्व वर्गांना सामावून घेणारी होती. त्यांच्या विचाराला सामाजिक न्यायाची किनार होती. त्यांचे विचार सर्वंच दृष्टीने व्यापक होते. जीवनाभिमुख असे होते. सामाजिक, राजकीय , आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक या सर्व अंगांना स्पर्श करणारे होते. भारतातील मोठ-मोठया संस्थानिकांनी महालात, दिवानखान्यात मौजमजा करत दिवस काढले पण राजर्षी शाहूंनी कोल्हापूरसारख्या छोटया संस्थानात हे करुन दाखविले. त्याचबरोबर ब्रिटीश राजवटीत स्वातंत्रपूर्व कालखंडात अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. त्यापैकी 1902 साली प्रशासनात 50 टक्के जागा मागास वर्गीयांसाठी राखीव ठेवण्याचा अध्यादेश.

राजर्षी शाहू महाराज हे सामाजिक समतेच्या तत्वाचे पुरस्कर्ते आणि कृतिशिल राजे होते. 'भारतात इतका समतावादी व न्यायप्रिय राजा झाला असेल यावर काहींचा पुढील पिढींचा विश्वास बसणार नाही' हे खरेच आहे. विसाव्या शतकात काळाची पावले ओळखून आपल्या कर्मभूमीत जातीयता, सामाजिक विषमता व अनिष्ठ रुढी विरुध्द कायदे घडवून त्यांची अंमलबजावणी करुन समतेवर आधारित समाज निर्माण करण्याचे महान कार्य शाहू महाराजांनी केले. मानवी मूल्यावर आधारित व सामाजिक न्यायावर आधारित असणारी समाज व्यवस्था निर्माण करण्याचे कार्य महाराजांनी केले आहे. राजर्षी शाहू महाराजांचे हे विचार भारतीय समाजात परिवर्तनासाठी आजही उपयोगी आहेत.

**संशोधनाची उदिष्टये :**

1. शाहू महाराजांची सामाजिक न्यायाविषयीची भूमिका अभ्यासणे.
2. शाहू महाराजांची समतेची विषयी भूमिका समजून घेणे.
3. शाहू महाराजांनी न्यायाकरीता केलेल्या कृती तपासणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन लेखाकरिता वर्णणात्मक व विश्लेषणात्मक सामाजिक शास्त्र संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. संशोधन लेखाकरिता दुय्यम स्वरुपाच्या साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य :**

शाहू महाराजांचे एकूण कार्यात त्यांचे शैक्षणिक कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. महात्मा फुले यांच्याप्रमाणेच सामाजिक सुधारणेच्या कार्यात त्यांनी शिक्षणाला प्रमुख स्थान दिले. शाहू महाराजांनी अधिकारग्रहण केले. त्याचवेळी बहुजन समाज अज्ञानाचे व अंधश्रध्देचे जीवन जगत होता. शिक्षण घेणे आपले काम नाही अशी या समाजाची समजूत होती. ज्ञानाच्या क्षेत्रात ब्राम्हण जातीची मक्तेदारी ब्रिटिशपूर्व काळापासून निर्माण झालेली होती. इंग्रजांनी विद्येची प्रवेशद्वारे सर्व जातींसाठी खुली केली. तथापि पूर्वीपासून ज्यांना विद्या अभ्यासाची परंपरा नव्हती. त्यांना या नव्या संधीचा लाभ घेता आला नाही. बहुजन समाजातील असंख्य लोक अज्ञान व दारिद्र्याचे जीवन जगत होते. छत्रपती शाहू महाराजांनी या अज्ञानी बहुजन समाजात ज्ञानाची ज्योत पेटविली बहुजन समाजाला, स्त्रियांना सुशिक्षित करण्यासाठी प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत ध्येय उपलब्ध करण्याचे धोरण त्यांनी आखले. बहुजन समाजाच्या शैक्षणिक प्रगतीत येणाऱ्या अडचणींवर मात करण्याचे त्यांनी ठरविले.

**प्राथमिक शिक्षणाला प्राधान्य :** बहुजन समाजाचा शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी महाराजांनी योजनाबद्द आखणी केलेली दिसते. प्राथमिक, शिक्षणाचा पाया मजबूत केल्यानंतर उच्च शिक्षणापर्यंत वाटचाल करण्याचा त्यांचा निश्चय होता. प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारांमध्ये भरभक्कम पायावर उच्च शिक्षणाची इमारत उभी करण्याचा त्यांचा मानस होता. सन 1913 मध्ये शाहू महाराजांनी प्रत्येक गावात एकतरी शाळा असावी व ती शाळा गावात राहणाऱ्या बहुसंख्य जातीच्या व्यक्तीने चालवावी असे त्यांचे मत होते. शिक्षकाचा गावकामगारांत समावेश करुन गाववतनाने भाडेमुक्त जमीन देण्याचे त्यांनी ठरविले. शिक्षणाविषयी शिक्षकांच्या मनात आस्था निर्माण व्हावी व त्याने शिक्षणविषयक चळवळीला गती यावी असे महाराजांना वाटत होते. तथापि, शिक्षकांच्या बाबतीत वतनदारी पध्दत उपयुक्त न ठरल्याने त्यांनी शिक्षकांची पगारावर नेमणूक सुरु केली. 'सन 1913 च्या आदेशानुसार'[1] निरनिराळया खेडयांमध्ये मंदिरे, चावडी, धर्मशाळा व इमारतीमधून प्राथमिक शाळा सुरु झाल्या. शाळेच्या इमारतीचे बांधकाम दुरुस्ती व देखरेख ही कामे पाटील, कुलकर्णी व प्रजाजनांवर सोपविली. शिक्षणाच्या कार्यात समाजाचा सहभाग मिळविण्याची त्यांनी योजना केलेली दिसते. बहुजन समाजाच्या सर्वांगिण हितासाठी प्राथमिक शिक्षणाद्वारे छत्रपती शाहू महाराज व्यापक बैठक तयार करीत होते. त्या दृष्टीकोनातूनच त्यांनी निरनिराळया शिक्षण संस्था व व्यक्तींना आर्थिक सहकार्य केले. त्यामुळेच कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षणाचा मोठया प्रमाणावर विकास झाला.

**मोफत व सक्तीचे शिक्षण :**

'25 जुलै 1917 च्या हुकुमानुसार महाराजांनी प्राथमिक शाळेत फी माफीची घोषणा केली.'[2] 'शिक्षणामधून सामाजिक समता येईल. त्यासाठी प्रथम शिक्षण घेतले पाहिजे. जोपर्यंत हिंदुस्थान जाती बंधनाने निगडीत राहील तोपर्यंत स्वराज्य स्थापनेपासून मिळणारे अधिकार आपणास घेता येणार नाहीत. म्हणून निरनिराळया समाजातील लोकांना शिक्षण घेण्याची पध्दत मी अवलंबित आहे.'[3]

**राखीव जागांबद्दल भूमिका :**

भारताची राज्यघना 26 जानेवारी 1950 सालापासून अंमलात आली. त्यात राखीव जागांची तरतूद केली होती. भारतीय राज्यघटनेत आर्थिक दृष्टया आणि शैक्षणिक दृष्टया मागास वर्गाकरिता राखीव जागा ठेवण्याची सूचना आहे. भारतात या घटनेच्या कैक वर्ष अगोदरच राखीव जागा ठेवण्याचा शाहू महाराजांचा वट हुकुम आहे. या हुकुमात शाहू महाराजांनी म्हटले आहे. 'संस्थानाच्या नोकरीत मागासवर्गीयांचे प्रमाण कमी आहे. म्हणून ही परिस्थिती काही अशी दूर करण्यासाठी व संस्थानामध्ये महाराजांच्या प्रजाजनांना उच्च शिक्षण संपादण्यास उत्तेजन देण्यासाठी या व वर्गाकरीता आजपर्यंतच्या प्रमाणापेक्षा विस्तृत प्रमाणात संस्थानाच्या नोकरीत जागा राखून ठेवण्याचा महाराजांचा कृतनिश्चय झाला आहे.' [4]

शाहू महाराजांनी 26 जुलै 1902 रोजी आपल्या संस्थानात पन्नास टक्के (50%) राखीव जागा ठेवल्या होत्या. पुढे शाहू महाराज म्हणतात. 'या धोरणाला अनुसरुन या हुकुमाच्या तारखेपासून ज्या जागा मोकळया पडतील, त्यापैकी 50 टक्के शेकडा जागा मागासलेल्या वर्गातील उमेदवारांना देण्यात येतील. अशी महाराजांची अनुज्ञा झाली आहे. ज्या - ज्या ऑफीसात मागासलेल्या लोकांचे प्रमाण हल्ली शेकडा 50 टक्के पेक्षा कमी आहे. त्या- त्या ऑफीसातील मोकळी पडणारी जागा झटपट मागासलेल्या वर्गातील इसमास देण्यात येईल. प्रत्येक खात्यांच्या मुख्यांनी या हुकुमानंतर भरलेल्या जागांचा तिमाही अहवाल सादर केला पाहिजे.'[5] शाहू महाराजांच्या या भूमिकेने समाजाला काही अंशी न्याय देण्याचे कार्य महाराजांनी प्रत्यक्ष कृतीने केलेले आढळून येते.

**विशेष संधीचे तत्व :** विषमतेने भरलेल्या समाजात संधीची विषमता निर्माण करणे आवश्यक असते. व ही विषमता आरक्षण धोरणामुळे वैद्यानिक ठरते. यावर महात्मा फुलेंचा देखील विश्वास होता. म्हणूनच त्यांनी विविध ठिकाणी निवडक जातींना आधी प्राधान्य दयावे व पुढारलेल्या जातींचा नंतर विचार करावा असे सूचित केले. त्यामुळे हजारो वर्षापासून सामाजिक, आर्थिक व राजकीयदृष्टया अस्पृश्य राहिलेल्या बहुजन समाजाला त्यांच्या जातीला सामाजिक न्याय मिळत आहे. महात्मा फुलेंनी या संकल्पनेचा प्रथम उल्लेख केला. यानंतर शाहू महाराजांनी आरक्षणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली.

पुढे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी याच धोरणाला भारतीय राज्यघटनेत स्थान देऊन हाच वारसा चालविला. डॉ.आंबेडकर समतेच्या ध्येयाचा पुरस्कार

करताना समतेचा अर्थ संधीची समानता एवढाच करीत नाहीत. तर आणखी एक पाऊल पुढे टाकून विशेष संधीचे तत्त्व समतेत समाविष्ट आहे, असेही सांगतात, सामाजिक, आर्थिकदृष्टया शोषित, मागास- समुहातील व्यक्तीच्या विकासाला चालना द्यावयाची असेल तर त्यांच्यासाठी खास संधी, सवलती व संरक्षण यांची घटनात्मक तरतुद करणे आवश्यक आहे. तरच काही काळाने समाजातील पुढारलेल्या वर्गाशी स्पर्धा करण्याची त्यांची क्षमता वाढेल. विशेष संधीचे हे तत्त्व समतेच्या तत्त्वांशी वरकरणी विसंगत वाटले, विषमता दर्शक वाटले तरी खऱ्या समतावादयांना तसे वाटत नाही. डॉ.आंबेडकरांनी विशेष संधी तत्त्वाचे पुढीलप्रमाणे समर्थन केले आहे. 'समतावादयांचे ध्येय सर्वांना समतेने वागविणे हे नसून समता प्रस्थापित करणे हे आहे. हे ध्येय साधताना सर्वांना समतेने चालणे शक्य नाही. जेथे सर्व व्यक्ती समान आहेत. तेथे काही लोकांना असमानतेने वागविल्यास विषमता निर्माण होईल. पण जेथे त्यांना सारख्या लेखून चालणे म्हणजे समता प्रस्तापनेच्या ध्येयाला विरोध करणे होय. समाजाला समानतेने न वागविणे हा समतावादयांचा दस्तूर आहे.' [6]

डॉ.आंबेडकर यांच्या समतेच्या विचारात विशेष संधीचे तत्त्व अंर्तभूत करुन न्यायतेला, सामाजिक न्यायाला महत्त्व देतात. भारतीय राज्यघटनेत अनुसूचित जाती-जमाती, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गीय आदि समुहांना विकासासाठी ज्या सवलती व संरक्षण दिले आहे. त्यांची प्रेरणा त्यांच्या या प्रकारच्या समतेच्या संकल्पनेत आहे.

भारतामधल्या ज्या उच्च जाती आहेत. त्या इतर जातीपेक्षा स्वत:ला श्रेष्ठ समजतात. कारण हजारो वर्षापासून त्यांनी आपल्या वर्चस्वाचे डांगोरे पिटून सर्वसामान्य माणसांना जगण्यास पायबंद केला आहे. यामध्ये केवळ आर्थिक विषमता नाही तर एकूणच मानवी जीवनात व्यवहारातील सर्व घटकांना बंदिस्त केले आहे. त्यामुळे कनिष्ठ जातीतील माणसांत आपण उच्च जातीपेक्षा कमी आहोत, ही न्युनगंडाची भावना निर्माण झाली. त्याचे स्वत्व हरवले आणि तो दिशाहिन झाला. त्याचा परिणाम म्हणजे आपल्या हक्कांसाठी त्याच्या मनात कुठलीच आशा उरली नव्हती. म्हणून तो कायम आपले अस्तित्व गमावून बसला. त्यांना भारतीय समाजव्यवस्थेत दुय्यम स्थान मिळाले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जातनिहाय आरक्षणांची तरतूद केली. त्यामुळे सामाजिक परिवर्तन मोठया प्रमाणात घडले. सर्वसामान्य माणसाला नवी ऊर्जा मिळाली. हीच ऊर्जा शेवटच्या माणसांचे जीवनमान उंचावण्यास मोलाची ठरली. परंतु या सोबतच समानेत खूप मोठी दरी निर्माण झाली आहे. एकीकडे प्रचंड भौतिक सुविधा तर दुसरीकडे एक जेवणाची पंचाईत, त्याचा परिणाम जातीय द्वेष वाढत चालला आहे. हा द्वेष कुणाच्याही भल्याचा नाही. पण आपल्या आजूबाजूलाच कधी काळी सोबतीने राहणारा समुह हा प्रगतीच्या दिशेने घोडदौड करतो आहे आणि आपणास थोडीसुध्दा संधी मिळत नाही. ही खंतच सामाजिक तेढ निर्माण करण्यास कारणीभूत ठरते आहे.

**निष्कर्ष :**

1) शाहू महाराजांनी दिलेल्या 50 टक्के आरक्षण धोरणाने प्रशासनातील नोकऱ्यात संधी मिळून ब्राम्हणेत्तर
2) जातीचे प्रशासनातील संख्याबळ वाढलेले दिसते. याचा परिणाम बहून समाजाला बऱ्याच अंशी सामाजिक न्याय मिळाल्याचे दिसते.
3) राजर्षी शाहूंनी सतत अपेक्षित व वंचित जीवन जगणाऱ्या भटक्या विमुक्त व गुन्हेगार समजल्या जाणाऱ्या जातींना शिक्षणाच्या व रोजगारांच्या संधी उपलब्ध करुन देऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले. त्यामुळे भटक्या व विमुक्त जातींचा सामाजिक दर्जा काही प्रमाणात उंचावला गेला.
4) शाहू महाराजांनी मानवतेला कलंक असलेल्या जाती प्रथा व जातीभेद यावर प्रहार केला. विविध कायदे व व्यावहारिक उपाययोजना केल्या. याचा परिणाम म्हणून जातिभेदाची ही तीव्रता खूप कमी झालेली दिसते. हे शाहू महाराजांच्या प्रयत्नांचे यशच म्हणावे लागेल.
5) शाहू महाराजांनी मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण या सुरु केलेल्या योजनेमुळे दलित-अस्पृश्य व शेतकऱ्यांच्या मुलांना देखील घेता आले. शिक्षण हे व्यापक झाले.
6) शाहू महाराजांनी महाराष्ट्रभर शिक्षण संस्था व वसतिगृहे यांना मदत केली. देणग्या दिल्या. यामुळे महाराष्ट्र हे शिक्षणात अग्रेसर असलेले राज्य आढळते.

7) राजर्षी शाहू महाराजांच्या स्त्री शिक्षणाविषयीच्या धोरणाने स्त्री शिक्षणाला चालना मिळाली. स्त्रियांमध्ये शैक्षणिक जागृती निर्माण होऊन त्या शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आल्या .
8) शाहू महाराजांचा राजकीय सुधारणांना विरोध नव्हता परंतु राजकीय सुधारणांच्या अगोदर सामाजिक
सुधारणा झाल्या पाहिजेत असे त्यांचे स्पष्ट मत होते.
9) शाहू महाराज हे राजे होते. तरी देखील त्यांनी सत्ता हळूहळू जनतेकडे सोपवण्याचा प्रयत्न केला. म्हणजे शाहू महाराज हे सामाजिक लोकशाहीचा पुरस्कार करणारे राजे होते.

**संदर्भ :**

1. पवार जयसिंगराव,(संपा), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, प्रथमावृत्ती ,महाराष्ट्र इतिहासप्रबोधिनी, कोल्हापूर, 2001, पृ.क्र.07.
2. ॲड पानसरे गोविंद, राजर्षी शाहू: वसा आणि वारसा, तिसरी आवृत्ती, लोकवाङमय गृह प्रकाशन, मुंबई, 2007, पान क्र.26.
3. कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती (मराठी: जीवनग्रंथ) तिसरी आवृत्ती, पॉप्युलरप्रकाशन, मुंबई पुर्नमुद्रण, 2016, पृ.क्र.08.
4. डॉ.भोसले एस.एस., राजर्षी शाहू: संदर्भ आणि भूमिका, प्रथम आवृत्ती, रणजीतप्रकाशन, कोल्हापूर,1981, पान क्र.71.
5. अर्जुने दिलीप, राजर्षी शाहू महाराजांची आरक्षण भूमिका आणि सद्यस्थिती, प्रथम आवृत्ती, साद प्रकाशन, औरंगाबाद,2013, पृ.क्र.20.
6. आलटे रानबा नरहरी, राजर्षी शाहू महाराजांची सामाजिक न्यायाबद्दलची वाटचाल: एक समाजशास्त्रीय अभ्यास, अप्रकाशित पि.एच.डी.प्रबंध, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, पृ.क्र.216.देशपांडे एम.डी.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार, सातवी आवृत्ती,लोकवाङमय प्रकाशन,मुंबई, 2013, पृ.क्र.16-17.

# स्वा. वि. दा. सावरकर :— वाङ्मयीन कार्य

**प्रा. प्रियंका आकाश राऊत**
सहाय्यक प्राध्यापक ( पद्व्युत्तर मराठी विभाग ) बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा
ता. कळमेश्वर, जि. नागपूर महाराष्ट्र (India)
मेल आय डी — akash_raut15@yahoo.in
**DOI-10.5281/zenodo.6988635**

**प्रस्तावना** स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचार व संघर्षमय जीवन त्यांच्या साहित्यातून आपल्याला उपलब्ध होते. सावरकरांनी विपुल असे लेखन केले. वीर सावरकरांना ग्रंथ वाचनाची आवड बालपणापासूनच लागलेली होती. ज्या वयात इतर मुले बाराखडी गिरवतात त्या वयात सावरकर उत्तमोत्तम ग्रंथ वाचू लागले होते. परिपक्व वयातील भाषाप्रभू साहित्यिकास शोभेल असे भाषावैभव व विचारमांडणी, ऐन तारूण्याच्या उंबरठयावर वीर सावरकरांनी आत्मसात केली होती. ऐतिहासिक, पौराणिक ग्रंथ, मोरोपंत, वामन, इत्यादी ग्रंथांसोबतच जे घरात बसून वाचण्यास निशिध्द मानले जाते ते 'आरण्यक' ही वीर सावरकरांनी बालपणीच वाचले. विभिन्न प्रकारच्या अडथळयांचे आयुष्य असूनही वयाच्या दहाव्या—अकराव्या वर्षापासून सुरू झालेले लेखनकार्य वयाच्या अंशीव्या वर्षापर्यंत अविरत सुरू होते. "साहित्याच्या विविध क्षेत्रात त्यांनी आपल्या जाज्वल्य राष्ट्रभक्तीच्या वारूवर स्वार होऊन, तत्वाच्या खड्गाने एकेक प्रांत हस्तगत केला आणि त्या—त्या प्रांतात आपल्या विजयाची सर्वांना दिसेल अशी उंच गुढी उभारली. त्यामध्ये कविता, पोवाडे, फटके, आरती, निबंध, चरित्र, आत्मचरित्र, ऐतिहासिक, संशोधनपर ग्रंथ, सामाजिक व राजकीय विचारावर लेख, नाटके, कादंबरी, इत्यादी सर्वच विषय आहे. या विविधांगी लेखनकार्यामुळे मराठी साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपदही आपसुकच चालून आले. त्यांच्या साहित्यात देशभक्ती व त्यासंबंधित तत्वाचेच परिपोषण केले आहे, नव्हे त्या तत्वाच्या स्पष्टीकराणासाठी, सर्वांसमोर सत्य येण्यासाठीच त्या—त्या साहित्याची निर्मिती झालेली आहे. त्यांच्या कवितेतही देशभक्तीच्या विचारांशी वचनबध्द राहण्याचं ते सुचवतात. तर पोवाडयातही राष्ट्रभक्तीचीच शिवनीती शिकवितात, साहित्याचे सर्वच प्रकार व अविष्कारणाचे माध्यम ते आपल्या विचारांसाठीच वापरतात. त्यांचा नायकही राष्ट्रीयतेचे विचार विसरत नाही."

सावरकरांच्या लेखनकौशल्याचे एक अनन्यसाधारण वैशिष्ट असे की, अंगात व्यासंगी विद्वत्ता पुर्णपणे मुरलेली असूनही त्यांच्या लिखाणात रूक्ष बोजडपणा कोठेही आढळत नाही. प्रतिभा आणि प्रचिती यांनी त्यांचे लिखाण भरलेले असते. त्यांच्याप्रमाणे दुसऱ्या कोणाच्याही लेखनीने महाराष्ट्रात एवढी प्रचंड खळबळ उडवून दिली नाही किंवा इतके प्रक्षुब्ध विचारमंथन घडवून आणले नाही. " महाराष्ट्रातील स्थितिप्रिय, प्रतिगामी, परंपरावादी आणि शब्दप्रामाण्यवादी लेखक नि पंडित यांच्यावर तितक्याच आवेशाने ते तुटून पडले. परंतु त्या सामाजिक विरोधकांना चिकित्सक बुध्दिच्या कडक आसूडाने सावरकरांनी फटकारून काढले. यंत्र, गाय, मनुस्मृतीतील महिला, ललनांच्या लावण्याचे हानि—लाभ, दोन शब्दात दोन संस्कृती, मनुष्याचा देव आणि विश्वाचा देव, जात्युच्छेदक निबंध, इत्यादी विषयावर त्यांनी लिहिलेले प्रखर बुध्दिवादी लिखाण जगातील श्रेष्ठ समाजसुधारकांच्या मालिकेत त्यांना अढळ स्थान मिळवून देण्यास पुरेसे आहे."

## स्वा. सावरकरांचे वाङ्मयीन कार्य :—

१. **सवाई माधवराव यांचा फटका** :— १८९४ ला वयाच्या अकराव्या वर्षी हा फटका लिहिला.
२. **हिंदू संस्कृतीचा गौरव** :— ओजस्वी विचार आणि जहाल भाषा असलेला लेख स्वा. सावरकरांनी 'नाशिक वैभव' साठी लिहिला.
३. **स्वदेशीचा फटका** :— वयाच्या १५व्या वर्षी १८९८ ला हा फटका प्रकाशित झाला. याचवेळी त्यांनी वृत्तदर्पणचा अभ्यास केला व गणमात्रा समजून घेतल्या.
४. **चाफेकरांचा पोवाडा** :— प्लेगचे थैमान व रँडचा अत्याचार यांनी जनता होरपळून निघत होती. चाफेकर यांनी रँडचा वध

केला व त्यांना फाशी झाली. त्या भावनेच्या आवेगात सर्वांग व मन त्वेषाच्या अंगाराने पेटून उठलेल्या स्थितीत हा चाफेकर व रानडे यांचा वीररसप्रधान पोवाडा लिहिला.

५. **शिवरायांची आरती** :— इ.स. १९०२ मध्ये आर्यन संघाकरिता शिवरायांवर आरती रचली.

६. **एतिहासिक पुरूषांचे उत्सव का करावेत** :— नाना फडणीस यांच्या शतवार्षिक पुण्यातिथी निमित्त १०० निबंधापैकी प्रथम क्रमांकाचा निबंध १९०२ साली लिहिला.

७. **स्वतंत्रतेचे स्तोत्र** :— 'जयोस्तुते श्री महान्मंगले' हे स्वतंत्रतेचे स्तोत्र सावरकरांनी १९०३ मध्ये लिहिले.

८. **सिंहगड चा पोवाडा** :— "नरवीर तानाजीच्या पराक्रमाचा पोवाडा १९०५ साली लिहिला. यामध्ये शिवनीतीचा उल्लेख केला आहे. १९०६ ला बाबाराव सावरकर यांनी तो छापला."

९. **बाजीप्रभूंचा पोवाडा** :— बाजीप्रभू देशपांडे यांच्या शौर्यावर हा पोवाडा १९०५ ला रचला. हे पोवाडे मित्रमेळयात म्हटले जायचे. गावोगावी यांच्या चाली आबालवृध्दांच्या तोंडी पाठ झाल्या होत्या. तीन वर्षानतर यांच्यावर जप्ती आली.

१०. **रामायण व इलियड** :— पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजला असतांना हा लेख लिहिला.

११. **तारकांस पाहून** :— "लंडनला जाताना बोटीवरून प्रवास करताना रात्रीच्या वेळी आकाशातील असंख्य तारे पाहतांना केलेली कविता. प्रत्येक कडव्यात ताऱ्यांची उत्पत्ती कशी झाली याचा काव्यात्मक अंदाज घेतला."

१२. **जोसेफ मॅझिनी चरित्र** :— लंडनच्या वास्तव्यात लिहिलेला पहिला ग्रंथ, सावरकरांनी इटलीचा महान क्रांतिकारक जोसेफ मॅझिनीचे चरित्र व त्याला साजेशी मनोवेधक प्रस्तावना लिहिली. २८ सप्टेंबर १९०६ या दिवशी हा ग्रंथ पूर्ण केला. लोकमान्य टिळक व काळकर्ते शि. म. परांजपे यांना अर्पण केला. या ग्रंथाची प्रस्तावना अनेक तरूणांना मुखोद्‍गत होती.

१३. **लंडनची बातमीपत्रे** :— लंडनला आल्यापासून तेथेच अटक होईपर्यंत नियमित लिहिलेली वार्तापत्रे.

१४. **१८५७चे स्वातंत्र्य समर** :— "के. नि. मॅलेसनचे समग्र ग्रंथ इंडिया ऑफिसच्या ग्रंथलयातली असंख्य पुस्तके वाचून वरी सावरकरांनी हा ग्रंथ मराठीत १९०८ च्या एप्रिलमध्ये महात्प्रयासांनी पूर्ण केला. त्या ग्रंथाचा भारत प्रवास पुन्हा लंडन विविध भाषात भाषांतरित छापन्यासाठीचे विविध उपाय पाहता जगातला हा एकमेवाद्वितीय ग्रंथ असावा, ज्याचा छापण्यासाठीचा एवढा प्रवास व खटाटोपी झाल्या असतील. छापण्यापूर्वीच या ग्रंथावर बंदी घालण्यात आली. ५० वर्षानंतर जगासमोर वीर सावरकरांनी सत्य प्रकट केलं की, १८५७ चे शिपायाचे बंड नसून ते भारतीय सैनिकांनी, संस्थानिकांनी अणि विविध प्रांतातील जनतेने एकत्र येऊन केलेले स्वातंत्र्याचे युध्द होते." हॉलंडमध्ये हा ४०० पानांचा ग्रंथ इंग्रजीत छापण्यात आला. यास क्रांतिकारकांची गीता संबोधले जाऊ लागले.

१५. **शिखांचा इतिहास** :— रूग्णालयात या ग्रंथाचा मसुदा तयार केला. नंतर पॅरिसला हा ग्रंथ लिहून पूर्ण केला. त्याच्या तीन प्रती करूनही, दुर्दैवाने गहाळ झाल्या आहेत. आज हा ग्रंथ उपलब्ध नाही. वीर सावरकर इंग्लंडमध्ये असतानाच प्रभाकरचे निधन झाले. त्याची आठवण म्हणून त्यांनी हा ग्रंथ चि. प्रभाकरास अर्पण केला आहे.

१६. **हे हुतात्म्यांनो** :— १८५७ च्या स्वातंत्र्यवीरांना आदरांजली म्हणून पत्रक काढले, सोबतच सैनिकांना पत्रके म्हणून शिखांना क्रांती चळवळीसाठी प्रेरणा दिली.

१७. **ने मजसी ने परत मातृभूमिला** :— ब्रायटनच्या समुद्रकिनारी आजारपणानंतर अत्यंत थकलेल्या मन:स्थितीत ही कविता लिहिली.

१८. **वहिनीस सांत्वनपर पत्र** :— संपूर्ण कुटुंबाची क्रांतिकार्यामुळे वाताहात झाल्यानंतर धैर्य देणारे काव्यात्मक पत्र.

'माझे मृत्यूपत्र'

" कि घेतले व्रत न हे आम्हि अंधतेने
लब्ध प्रकाश इतिहास निसर्ग माने
जे दिव्य, दाहक म्हणूनि असावयाचे
बुध्दांची वाण धरिले करिं हे सतींचे " (९वे कडवे)

या प्रसिद्ध ओळी या कवितेमधीलच आहेत.

१९. **रवींद्रनाथ टागोरांचे अभिनंदन** :— १९१३ नोबेल प्राईझ मिळाल्याबद्दल अंदमानातून काव्यरूप अभिनंदन.

२०. **कमला** :— " ८८२ कडव्यांचे, अनुष्टूभ छंदातले खटयाळ, श्रृंगारमय, निसर्गकाव्य. अंदमानच्या दगडी कारागृहाच्या भिंतीवर टोकदार लोखंडी पट्टीच्या साहयाने लिहिलेले, स्वतः व इतर बंदीवानांनी कंठस्थ केलेले जगातील एकमेव काव्य. साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकर म्हणतात, सावरकरांचे 'कमला' काव्य वाचतांना कालिदासाच्या 'रघु'चाच सर्ग वाचलासे वाटते. विद्वत्ता नि कवित्व हातात हात घालून चालताना दिसतात."

२१. **सप्तर्षी** :— अंदमानच्या कोठडीतुन दिसेल ते रात्रीचे आकाश पाहत केलेले काव्य. भावनिक भरती—ओहोटीचे वैचारिक कल्लोळाचे कुलात्मक शब्दांकन म्हणजे सप्तर्षी खंडकाव्य.

२२. **जगन्नाथाचा रथ** :— कविता—विश्वाच्या विराट स्वरूपाचे दर्शन म्हणजे जगन्नाथाचा रथ ही कविता.

२३. **विरहोच्छवास** :— ३८४ ओळीचे प्रेम व शौर्य यांचा मेळ असणारे खंडकाव्य.

२४. **गोमंतक** :— अंदमानातच रचलेले खंडकाव्य गोव्यात १५०० ते १९०० या कालखंडात पोर्तुगिजांकडून झालेला अमानुष अत्याचार, धर्मांध इसाई व विरोध करणारा हिंदू यांचे वर्णन या काव्यात आहे.

२५. **मराणोन्मुख शय्येवर** :— अंदमानच्या रूग्णालयात रचलेली कविता तत्वज्ञ सावरकर यांचे दर्शन या काव्यात होते.

२६. **अंदमानच्या अंधेरीतून** :— अंदमानमध्ये कारागृहात गेल्यापासून पुढील भारतातील तुरूंगात जाईपर्यंत, नियमितपणे, लहान बंधू डॉ. नारायण दामोदर सावरकर यास पाठविलेली दीर्घ आठ पत्रे. पहिले पत्र १५ डिसेंबर १९१२ चे तर शेवटचे म्हणजे आठवे ६ जुलै १९२० चे.

२७. **हिंदूपदपादशाही** :— छत्रपती शिवराय ते राजाराम यांचा ओझरता उल्लेखासह पेशवे यांच्या कार्यकाळावर प्रकाश टाकला आहे.

२८. **हिंदुत्व** :— मूळ इंग्रजी लेखनकाल १९२३

२९. **तुम्ही आम्ही सकल हिंदु** :— सर्व जातींना एकत्र बांधणारी आवाहनात्मक कविता रत्नागिरी वास्तव्यात १९२५ ला लिहिली.

३०. **माझी जन्मठेप** :— लेखनकाल १९२६ रत्नागिरी " रत्नागिरीच्या तुरूंगात बंदिस्त असताना मुख्य टिपणे भितीवर लाल विटांच्या तुकडयाने लिहिले. कारण लेखनसाहित्य पुरवण्यावर बंदी होती. नंतर यथावकाश लेखनसाहित्य उपलब्ध झाल्यानंतर तीन महिन्यात हा ग्रंथ लिहून पूर्ण केला. अंदमानच्या सेल्युलर जेलमध्ये १४ वर्षे तुरूंगवास भोगत असतानाचे सविस्तर रोमहर्षक, चित्तथरारक, वास्तववादी चित्रण — आत्मचरित्र."

३१. **मला काय त्याचे ( मोपल्याचे बंड )** :— लेखनकाल १९२६ बादंबरी मोपल्यांनी हिंदूवर केलेले भयानक अत्याचार हिंदू स्त्रियांची केलेली विटंबना, लुटून बेचिराख केलेली गावे, झालेल्या कत्तली, इत्यादी आसुरी घटनांचे वर्णन या कादंबरीत आहे.

३२. **काळे पाणी** :— लेखनकाळ रत्नागिरी. अंदमान पार्श्वभूमीवर रेखाटलेली कादंबरी.

३३. **उःशाप** :— १९२७ ला रत्नागिरीस स्थानबद्ध असताना लिहिलेले नाटक. यामध्ये अस्पृश्यतेचा प्रश्न हाताळण्यात आला आहे.

३४. **सन्यस्त खड्ग** :— १९३१ रत्नागिरी. हिंसा व अहिंसा यांचे मूलगामी द्वंद्व आणि अहिंसा तत्वतान कसे पांगळे आहे याचे संवादातून सविस्तर स्पष्टीकरण.

३५. **उत्तरक्रिया** :— छत्रपती शिवाजी महाराज व पेशवाई संपल्यानंतरचा कार्यकाळ यामध्ये रंगवला आहे. लेखनकाळ १९३३ रत्नागिरी.

३६. **बोधिवृक्ष** :— एक अपूर्ण नाटक. सिध्दार्थ व यशोधरा यांच्या जीवनावर आधारित यशोधरा हिचेही विचार देशभक्त आणि सैनिकांच्या बायकांनी मनन करण्यासारखे आहेत.

३७. **जात्युच्छेदक निबंध** :— १९३०—३१ मध्ये रत्नागिरीला असताना समाजाच्या सप्तबेडया तोडण्याचे आवाहन करताना लिहिलेले जातीवरील अभ्यासपूर्ण निबंध. हिंदुच्या संघटनासाठी सावरकरांनी केलेले निबंध.

३८. **क्ष—किरणे** :— १९३५ रत्नागिरी. हा तात्विक निबंधाचा संग्रह असून यामध्ये गाभारा की गोठा, गायीसंबंधी स्फोटक लेख, समस्यामूलक निबंधांचा समावेश आहे.

३९. **विज्ञाननिष्ठ निंबध** :— यातील निबंध हे बुध्दिनिष्ठ व तर्कवादाने परिपूर्ण निबंध आहेत.

४०. **पूर्वपीठिका** :— १८८५ पासूनचा भारतीय राजकीय कार्यकाळाचा उल्लेख या पुस्तकात आहे.

४१. **माझ्या आठवणी** :— वीर सावरकरांच्या बालपणीच्या आठवणी, व्यक्तिमत्वाची जडणघडण कशी झाली याचा आलेख यामध्ये मांडला आहे. यामध्ये जन्म, पूर्वइतिहास, आडनावाची आख्यायिका, आईसंबंधी, व्यायाम, पहिले भाषण, बालपण, येसुवहिनी इत्यादी संबंधी सविस्तर माहिती वाचकास मिळते.

४२. **भगुर, नाशिक** :— आत्मचरित्र

४३. **सावरकरांच्या गोष्टी** :— कथा

४४. **रणशिंग** :— ऐतिहासिक लेख

४५. **ऐतिहासिक निवेदन** :— त्यावेळच्या विविध विषयांवर सावरकरांचे निवेदन यातून त्यांनी कार्यकर्त्यांना अनेक संदेश दिलेत.

४६. **हिंदुत्वाचे पंचप्राण** :— लेखसंग्रह

४७. **तेजस्वी तारे** :— लेखसंग्रह

४८. **प्राचीन अर्वाचीन महिला** :— भारतीय महिलांचा त्याग, धैर्य, याचे गुणगाण सावरकर म्हाणतात, “ लावण्य विलोभनीय आहेच, पण त्याहूण शील विलोभनीय आहे.”

४९. **भाषाशुध्दी, लिपीशुध्दी** :— स्वदेशी शब्द का वापरावे? स्वभाषा का वापरावी? देशाचे स्वातंत्र्य व राष्ट्रीयतेशी त्यांचा संबंध काय? यासंबंधी सविस्तर विश्लेषण. सावरकरांनी परकीय शब्दांना अनेक पर्यायी शब्द दिले. देशातील सर्व भाषा देवनागरी लिपीत लिहाव्यात ही सुचनाही दिली.

५०. **शत्रूच्या शिबिरात** :— आत्मचरित्र १९६५ ला प्रसिद्ध झाले.

५१. **सहा सोनेरी पाने** :— पूर्वार्ध — १० मे १९५६ ला प्रसिद्ध झाला. उत्तरार्ध १९६३ एप्रिलला वयाच्या ८०व्या वर्षी प्रसिद्ध झाला. “ हिंदुस्थानचा इतिहास विजयांनी भरलेला, विजयाचा इतिहास आहे हे सिद्ध करण्यासाठी हा ग्रंथ लिहिला. पहिले सुवर्ण विजयी पानाचा श्रीगणेशा केला, ते सम्राट चंद्रगुप्त व चाणक्य या गुरू शिष्यांनी. दुसऱ्या सुवर्ण पानाचा शिल्पकार ठरला तो सम्राट पुष्यमित्र, तिसऱ्या सुवर्ण पानाचे मानकरी ठरले ते सम्राट विक्रमादित्य. चवथे सुवर्ण पान सजवलंय ते महापराक्रमी राजा यशोधर्मा यांनी. पाचव्या सुवर्ण पानावर नाव कोरलं ते छत्रपती शिवाजी महाराज व त्यांचे मावळे, सहावे सुवर्ण पान व्यापून टाकलं ते इंग्रजाविरूद्ध झालेल्या स्वातंत्र्यलढयाने ”, अशा सहा सोनेरी पाने ग्रंथाची सिध्दता वीर सावरकरांनी केली. या व्यतिरिक्त त्यांचे स्फूट कविता, इतर प्रासंगिक लेखन, प्रतिक्रिया असा भरपूर मजकूर आहे.

“ साहित्याच्याद्वारा स्वमत प्रचार करण्याचे जे अनन्यसाधारण सामर्थ्य नि कौशल्य सावरकरांच्या लेखणीत होते, ते इतर कोणाही भारतीय लेखकात असल्याचे आढळत नाही. सावरकरांनी देशस्वातंत्र्याचा इतका निर्भय प्रचार केला होता आणि हिंदू जातीच्या पुनरूत्थानाचा इतका सर्वकष पुरस्कार केला होता की, या दोन बाबतीत त्यांच्याशी तुलना करता येईल असा दुसरा कोणताही साहित्यिक वा नेता झालेला नाही, असे मत माडखोलकरांनी व्यक्त केले आहे.”

मूळ प्रांत कवीचा असताना सुध्दा साहित्यदृष्टी मूळातच पक्व असल्यामूळे साहित्याच्या विविध प्रकारात त्याचे प्रकटीकरण —अविष्करण केले. शेकडो व्याख्यानातून जी कार्यसिद्धी होत नाही ती एका नाटकाने होते, हे ज्ञात असल्यामूळे सामाजिक समस्यांना नाटकाचे रूप दिले. वीर सावरकर कोमल मनाचे कवी व कठोर मनाचे देशभक्त होते, हे खरेच आहे. १८५७ चे स्वातंत्र्य समर व ' सहा सोनेरी पाने ' या ग्रंथानी एतिहासिक संशोधक म्हणून मान्यता मिळाली. सोबतच्या क्रांतिकार्याने त्यांना ' इतिहास घडविणारा इतिहासकार ' असे नामाभिदान मिळाले.

## निष्कर्श

१. आपल्या अल्पवयातच भारताचे राजकीय स्वातंत्र्य सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने परत मिळविणे हे ध्येय सावरकरांनी निश्चित केले. 'अभिनव भारता' ची स्थापना याच हेतूने झाली होती.
२. वीर सावरकर हे महान साहित्यिक होते. भाषा आणि लिपी हे त्यांच्या दृष्टीने राष्ट्रीयत्वाचे घटक आहेत. राष्ट्रजीवन म्हणजे हिंदुजीवन सर्वार्थाने समृद्ध करण्यासाठी त्यांनी भाषाशुद्धी व लिपिशुद्धीवर जोर दिला. भाषा व लिपी त्यांना राष्ट्रीय प्रवृत्ती वाढविण्याचे साधन वाटत होते. याही क्षेत्रात त्यांची राजकीय दृष्टी सुटली नाही त्यांच्या प्रत्येक विचाराला, कृतीला, सुधारणांना राजकीय परिमिती आहे.
३. संपूर्ण आयुष्यभर सावरकरांनी अखंड हिंदुस्थान हीच कल्पना जोपासली. पण त्यांच्याच नजरेसमोर राष्ट्राची फाळणी झाली. केळकरांच्या मते हे सावरकरांचे अपयश नव्हते तर संपूर्ण हिंदुसमाजाचे अपयश होते. एका अर्थाने हे सावरकरांच्या तत्वज्ञानाचे, नेतृत्वाचे अपयश होते. त्यांची शरीरप्रकृती ही त्यांच्या मार्गातील आणखी एक अडचन होती. अंदमानातील हालअपेष्टानंतर त्यांचे शरीरस्वास्थ्य पुर्णतः ढासळले होते. त्यामुळे वयाच्या चौपन्नाव्या वर्षी सक्रिय राजकारणात शिरल्यावर त्यांना फारसे श्रम करता आले नाही. हिंदुमहासभेचे कार्य देखील त्यांना सोडून दयावे लागले. भविष्यकाळाने नोंद घ्यावी असेच महान कार्य स्वातंत्र्यवीर सावरकरांनी करून ठेवलेले आहे.

## संदर्भ ग्रंथसूची

१. चोपडे हेमंत, सावरकर आंबेडकर अेक समांतर प्रवास सचिन उपाध्याय विजय प्रकाशन हनुमान गल्ली, सीताबर्डी नागपूर. प्रथम आवृत्ती २००८ पृ.क्र. १४८, १५०, १५४
२. कीर धनंजय, स्वातंत्र्यवीर सावरकर, हर्ष भटकळ पॉप्युलर प्रकाशन प्रा.लि. ३०१ महालक्ष्मी चेंबर्स मुंबई पृ.क्र. २२०, २२४
३. आचार्य डॉ. भालेराव सुधाकर स्वातंत्र्यवीर सावरकर पुतळा नागरिक समिति ३३ प्रेरणा रामदासपेठ नागपूर प्र.क्र. २१३, २१६

# 'पचपन खम्भे लाल दीवारें: अदृश्य वेदना की दास्तान

**प्रा.बालाजी सूर्यवंशी**
हिंदी विभाग शिवाजी महाविद्यालय, उदगीर जिला लातूर

**DOI-10.5281/zenodo.6988638**

**सार:** 'पचपन खम्भे लाल दीवारें' उपन्यास स्त्री विमर्श का ऐसा पाठ प्रस्तुत करता है जहाँ कहीं पर भी स्त्री-पुरुष का संघर्ष नहीं है और न ही पुरुष के अत्याचारों एवं पुरुषसत्ताक व्यवस्था में दबी-कुचली स्त्री है। यहाँ न स्त्री पुरुषप्रधान संस्कृति के प्रति संघर्ष कर रही है न स्त्री पर लादे गए प्रतीकों का विरोध। वस्तुत: उपन्यास में लेखिका एक ऐसी स्त्री को उपस्थित करती है जो अपने पारिवारिक दायित्वों एवं समाज की मानसिकता के बीच द्वन्द्वग्रस्त है। उसका वास्तविक युद्ध उसके मनोभूमि पर चल रहा है जहाँ वह अनंत अवकाश में दोलायमान है। वह न अपने रास्ते का चयन कर पाती है और न ही चयन किये रास्ते पर निर्भीकतापूर्वक चल पाती है। वस्तुत: इस उपन्यास की नायिका दोहरे संकट से गुजर रही है जो पारंपारिक समस्याओं के साथ-साथ उत्तरआधुनिक परिवेश से निर्मित समस्याओं से भी ग्रस्त है। अपनी पीड़ा, यातना और जीवन संघर्ष में वह अकेली है तथा अपने अंतर्मन में घुट-घुट के जी रही है। उसकी इस स्थित के लिए जितना पुरुष जिम्मेदार है उतनी ही स्त्री भी, जितना समाज जिम्मेदार है उतना उसका परिवार भी।

## परिचय

'पचपन खम्भे लाल दीवारें' उपन्यास की नायिका सुषमा पढ़ी-लिखी और उच्चशिक्षित है, वह नौकरी करती है तथा दृष्टिकोण से आत्मनिर्भर है। मगर वह जीवन में सुखी नहीं है। उसका जीवन संघर्षमय है। वह अकेलेपन की पीड़ा एवं एक अदृश्य व्यथा से त्रस्त है। वह आज की उच्चशिक्षित युवती का प्रतिनिधित्व करती है। एक समय था जब महिलाओं का जीवन बालविवाह, अनमेल विवाह, सती प्रथा आदि समस्याओं के दलदल में फँसा हुआ था। शिक्षा के माध्यम से समाज में आधुनिकता का संचार हुआ। धीरे-धीरे समाज की मानसिकता में परिवर्तन आया। बालविवाह की प्रथा समाप्त हो गई और स्त्री के सामने शिक्षा के द्वार खुल गए। किंतु शिक्षा और नौकरी के चक्रव्यूह में आज युवाओं के सामने एक नई समस्या खड़ी है-प्रौढ़ विवाह की। सुषमा तैंतीस वर्ष की हो गई है किंतु जीवन का आधा वसंत समाप्त होने पर भी वह अविवाहित है। उसके जीवन में भयानक सन्नाटा व्याप्त है। उषा प्रियंवदा उसकी तुलना अंधकार से भरी रात्री के साथ करती है। वह कहती हैं- "रात्री के वह मौन स्वर उसके चारों ओर मँडरा रहे थे।... सुषमा को लगा कि उसके प्राणों और रात्री की आत्मा में घना साम्य है। वैसे ही कुछ मद्धिम स्वरों की प्रतिध्वनियाँ गूँजती हैं, मन में कुछ करवट लेता है और चुप हो जाता है; ऐसा ही अभेद्द सर्वग्रासी अंधकार जीवन में सिमटता है।"[1]

मनुष्य का जीवन आशा के बल पर आगे बढ़ता है। आशा के आधार पर ही इन्सान जीवन में संघर्ष करता है, बड़े-बड़े संकटों का सामना करते हुए आगे बढ़ता है। वह आशा करता है कि आज-न-कल निराशा के बादल टल जाएँगे और जीवन में व्याप्त अंधकार समाप्त होकर नया सवेरा आयेगा। किंतु कब तक? एक समय के बाद निराशा घेर लेती है। जैसे-जैसे समय आगे बढ़ता है वैसे-वैसे वह सपनों की दुनिया से निकलकर यथार्थ की जमीन पर आ जाता है। अपने ऑफिस में बैठे-बैठे सुषमा का ध्यान बाहर उमड़ते युवा स्वप्निल चेहरों पर जाता है। उस रंगीन दुपट्टों की झलक देख अचिंतित युवा स्वरों की हँसी-खुशी में वह डूब जाती है। आज उसके पास पद की गरिमा है मगर वह चैतन्य, वह नई आशाएँ उसके जीवन में नहीं है। "अब वह उस स्थान पर आ पहुँची है, जहाँ पीछे मुड़कर देखने से आशाएँ बड़ी खोखली नजर आती है। यथार्थ की प्रखरता में कोमल स्वप्न कुम्हला जाते हैं।"[2] उषा प्रियंवदा ने सुषमा की इस व्यथा का अत्यंत मार्मिक चित्रण किया है।

सुषमा का परिवार उस पर ही निर्भर है। पाँच भाई-बहनों में वह सबसे बड़ी है और उसे अपनी जिम्मेदारी का एहसास है। सुषमा के पिता बिमार हैं और माँ चिंताग्रस्त। सुषमा के प्रति माता-पिता के मन में संवेदना है पर उन्होंने उसकी शादी का भरसक प्रयास नहीं किया जिसका कारण है सुषमा का वेतन। वहीं इस घर का मुख्य आर्थिक स्रोत था। सुषमा की माँ सुषमा से छोटी बेटी निरुपमा की शादी के बारे में चिंतित है, वही सुषमा की ओर से निश्चिंत। सुषमा की शादी न होने का एक कारण उसके पिता की गैरजिम्मेदारी भी है। "बात असल यह थी कि उन्होंने यह चाहा ही नहीं कि सुषमा की शादी हो, उनके अंतर्मन में यह बात अवश्य होगी कि सुषमा से उन्हें सहारा मिलेगा।"[3] सुषमा की माँ को यह भी लगता है सुषमा की शादी अब उनके बस की बात ही नहीं है। सुषमा इतनी पढ़ी-लिखी है कि उसके उम्र का

लड़का मिलना मुश्किल है। माँ-बाप के इस बर्ताव से सुषमा कभी-कभी निराश होती है, उसका मन क्रोध से भर जाता है, मगर वह काफी संवेदनशील है। अपने जीवन से ज्यादा वह अपने घर-परिवार के संबंध में सोचती है।

हमारे विवाह एवं हमारे समूचे जीवन की चिंता हमसे ज्यादा हमारे समाज को होती है। बेचारा समाज! न जाने क्यों दूसरों की इतनी चिंता करता है। हमसे ज्यादा हमारा विचार हमारा समाज करता है। कृष्णा मौसी सुषमा से कहती है कि समाज किसी को जीने नहीं देता। वस्तुत: समाज विभिन्न रुपों में हमारे जीवन में हस्तक्षेप करता रहता है। इस सामाजिक हस्तक्षेप से हमारा व्यक्तित्व विभिन्न रुपों में प्रभावित होता है। वर्तमान समाज इस संदर्भ में अधिक जटिल और संवेदनशील बन गया है। इस संदर्भ में राजेंद्र यादव कहते हैं-"आज की समाज व्यवस्था में जीवन का संघर्ष इतना विषम और कठिन हो गया है कि स्वतंत्र रूप से आपके व्यक्तित्व का विकास हो ही नहीं पाता।"[4] सुषमा विवाह न होने से जितनी व्यथित है उससे कई ज्यादा परेशान है विवाह से संबंधित समाज की चिंता एवं प्रश्नों से। किन-किन को समझायेगी सुषमा और क्यों? यह उसका व्यक्तिगत प्रश्न है। मगर समाज मानता नहीं। कुछ लोगों के मन में सुषमा के प्रति संवेदना है और वे उसका भला ही चाहते हैं। मगर विवाह का विषय सुषमा की पीड़ा बना है। वह उदास और खिन्न-खिन्न रहने लगी है। वह कानपुर आती है तो कृष्णा मौसी विवाह की चर्चा करती है। उसकी सहेली मिनाक्षी कहती है कि उसे शादी कर लेनी चाहिए। अपनी सहयोगी मीरा धर के घर आने पर भी वही बात कि विवाह क्यों नहीं करती? इससे सुषमा की पीड़ा कम होने की जगह पर बढ़ती ही जाती है।

